# आंबेडकरी कवितेचे अंतरंग

## हरीश खंडेराव



म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 300९

REFBK-0024047

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(कृ. मा. प.)
५०००-१२-८२

आंबेडकरी
कवितेचे
अंतरंग : हरीश खंडेराव

संदर्भ निबंध (वाङ्मय समीक्षा)
३००१
२४०४७
११/११/८३

# आंबेडकरी कवितेचे अंतरंग

हरीश खंडेराव

REFBK-0024047

जागर प्रकाशन

आंबेडकरी कवितेचे अंतरंग

जागर प्रकाशन : सात. प्रथमावृत्ती : सहा डिसेंबर एक्याऐशी. © हरीश खंडेराव.
प्रकाशक : रमेश कुबल, जागर प्रकाशन, १४/११२, उन्नत नगर नं. ४, गोरेगाव (प),
मुंबई ४०० ०६२. मुद्रक : जयसेन पाटील, ओमेगा प्रिंटर्स, पापडी, वसई, जि. ठाणे.
मुखपृष्ठ : शिवा सोनावणे.

मूल्य : अठरा रुपये

आंबेडकरी
कवितेचे
अंतरंग

आई बाबा यांस

हरीश

महत्त्वाच्या चुकांचे शुध्दिपत्र :

१. पृ. क्र. २३ वरील श्री. हरिभाऊ तोरणे यांच्या पुस्तकाचे शीर्षक 'श्री संत चोखोबा महाराजांची पंढरपुरावर स्वारी' ऐवजी, श्री. चोखामेळा महाराजांची पंढरपुरावर स्वारी' असे वाचावे. त्याच पानावरील 'श्रीसंत चोखामेळा महाराज यांचे चरित्र व अभंग गाथा : संपा. स. भा. कदम ही तळटीप गाळावी.

२. पृ. क्र. ३१ वरील २३ ते २५ ओळीतल्या उद्धृतासाठी 'केशवसुत आणि तांबे : प्रा. श्री. के. क्षीरसागर, अशी तळटीप समजावी.

३. पृ. क्र. ३६ वरील 'साहित्य आणि समाज : अविनाश सहस्त्रबुद्धे, या तळ-टीपेतील ग्रंथाचे शीर्षक, 'समाज आणि साहित्य' असे वाचावे.

४. पृ. क्र. ४५ वरील तळटीपेत आलेली १७–७–८१ ही तारीख २७–७–८० अशी घ्यावी.

५. पृ. क्र. ५० ओळ ९ व पृ. क्र. ६५ ओळ २ वर आणि इतरत्र ज्या ज्या ठिकाणी बौध्दधर्म असे छापले आहे त्या ऐवजी 'बौध्दधम्म' असे वाचावे

६. पृ. क्र. ६१ वरील ओळ १५ मधील, 'आंबेडकरी प्रेरणेची कविता बांधिलकी स्वीकारताना' या ओळीत स्वीकारताना ऐवजी, 'स्वीकारते' असे वाचावे.

७. पृ. क्र. ६३ ओळ ४ मध्ये, 'आंबेडकरवादापासून फारकत देणे अनिवार्य आहे' यातील 'देणे' ऐवजी 'घेणे' असे वाचावे. त्याच पानावरील १५ व्या ओळीत, 'आंबेडकरी प्रेरणेचा सातत्याने उद्घोष करणारी कविता' यात 'उद्घोष करुनही' असे वाचावे.

८. पृ. क्र. ६४ ओळ ८ ची सुरवात 'करणारे साहित्य' या दोन शब्दांत 'आंबेडकरी प्रेरणेचे' असे शब्द घालून वाचावी. व १३ व्या ओळीत, 'मार्क्सविचार हा जागतिक आहे' यात 'जागतिक विचार आहे' असे वाचावे.

९. पृ. क्र. ६५ ओळ ८ 'दलित म्हणून सांगते' ऐवजी 'सांगतात' असे वाचावे.

१०. पृ. क्र. ७२ ओळ १३ 'जलीम' ऐवजी 'जालीम' असे वाचावे

११. पृ. क्र. ९४ मनोहर तल्हार यांच्या कवितेतील ओळ ६ मधील 'पाया' ऐवजी 'पाय' असे वाचावे.

## आंबेडकरी कवितेचे अंतरंग

: अनुक्रम :

भाग : १


| | |
|---|---|
| १. सो बोधिसत्तो | ९–१२ |
| २. मनोगत | १२–१६ |
| ३. प्रास्ताविक | १७–२० |
| ४. चोखामेळा | २१–२८ |
| ५. केशवसुत | २९–३७ |
| ६. किसन फागोजी बनसोडे | ३७–३९ |
| ७. किसन फागोजी बनसोडे आणि केशवसुतोत्तर मराठी कविता | ४०–४४ |


भाग : २


| | |
|---|---|
| ८. आंबेडकरी प्रेरणेची कविता | ४५–६६ |


भाग : ३


| | |
|---|---|
| ९. आंबेडकरी प्रेरणेची प्रवर्तक कविता : | ६७–१२४ |
| १०. गौतम शिंदे | ६७–७४ |

| | | |
|---|---|---|
| ११. | दामोदर मोरे | ७४–८१ |
| १२. | बाळ हाटे | ८१–८४ |
| १३. | बळवंत कांबळे | ८४–८७ |
| १४. | अशोक पाटील | ८७–९३ |
| १५. | मनोहर तल्हार | ९३–९६ |
| १६. | अरविंद निकाळजे | ९६–९८ |
| १७. | शिवाजी सोनवणे | ९८–१०० |
| १८. | मधु गबई | १००–१०१ |
| १९. | भुजंग मेश्राम | १०१–१०२ |
| २०. | अशोक चक्रवर्ती | १०२–१०४ |
| २१. | बबन लोंढे | १०४–१०५ |
| २२. | धुरंधर मिठबावकर | १०५–१०६ |
| २३. | डब्ल्यू कपूर | १०६–१०७ |
| २४. | मिलिंद आठवले | १०७–१०८ |
| २५. | विजय जामभंडेकर | १०८–११० |
| २६. | ज्योती लांजेवार | ११०–११३ |
| २७. | मीना गजभीये | ११३–११६ |
| २८. | कुन्दा गायकवाड | ११६–११८ |
| २९. | गिपल गिमेकर | ११९–१२२ |
| ३०. | सुरेखा भगत | १२२–१२४ |
| ३१. | समारोप | १२५–१२७ |
| ३२. | संदर्भग्रंथ | १२७–१२८ |

ग्रंथालय ठाणे

। सो बोधिसत्तो रतनवरो अतुल्यो
मनुस्सलोके हितसुखताय जातो ।

आंबेडकरांना प्रेरणा मानून काव्य लेखन करणाऱ्या नवोदित कवींच्या कवितेचा मी अभ्यास करतो आहे असे श्री. हरीश खंडेराव म्हणाले, तेव्हा मलाही वाटले, की दलित साहित्यात आणखी एका समीक्षा ग्रंथाची भर पडत आहे. पण माझा अभ्यास थोडा वेगळा आहे. आजपर्यंत ज्या प्रकारच्या दलित साहित्याची निर्मिती झाली व त्या साहित्याची समीक्षा झाली ते साहित्य, 'दलित साहित्य' व 'विद्रोही साहित्य' म्हणूनच ओळखले गेले. पण मी आंबेडकरी प्रेरणेच्या साहित्याचा अभ्यास करीत आहे. आणि त्याची फक्त 'प्रवर्तक' बाजूच लक्षात घेत आहे. ज्यांच्या जीवनाचे आणि साहित्याचे मूळ प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत, त्यांचे साहित्य हे आंबेडकरीच आहे. डॉ. आंबेडकरांनीं बौद्धधम्मप्रवर्तन केले त्या मागील 'बोधिसत्व' ही त्यांची प्रेरणा आहे. म्हणून 'बुद्धत्व' आणि 'आंबेडकरत्व' ही तत्त्वे वेगळी नाहीत. ती आपल्या जीवनाची व साहित्य निर्मितीची प्रेरणा मानून पुढे येणाऱ्या कवींच्या कवितेचा अभ्यास हा माझ्या अभ्यासाचा विषय आहे; असे ते म्हणताच श्री. खंडेरावांचा अभ्यासविषय मला नवा वाटला. आणि हा अभ्यास लोकांच्या समोर यायलाच हवा अशी हूरहूर लागून राहिली. याचे आणखी एक महत्त्वाचे कारण असे होते, की भारतीय समाजरचनेत हजारो वर्षांपासून जीवनाच्या ज्या ज्या क्षेत्रांत विषमता आहे, त्यात जातीयता महाभयंकर आहे. त्यामुळेच हजारो-वर्षे दलितांना अनंत क्लेष भोगावे लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मप्रवर्तन करून भारतीय समाजजीवनात समता प्रस्थापित करण्याचे पाऊल उचलले आणि दलितांच्या प्रश्नांना उद्‌गार प्राप्त करून दिला. बाबासाहेबांनी जिथे जिथे जातीयता दिसेल तिथे तिथे विद्रोहाचा पवित्रा आणि जीवनाच्या इतर क्षेत्रातील बदलासाठी प्रवर्तनाचा मंत्र स्वीकारला. याचे कारण असे, विद्रोहालाही काही मर्यादा असतात हे डॉ. बाबासाहेबांनी पूर्णपणे लक्षात घेतले होते.

डॉ. बाबासाहेबांची प्रेरणा मानून जे साहित्य निर्माण झाले त्यात 'विद्रोही' आणि 'प्रवर्तक' अशा दोन्ही प्रकारच्या प्रवृत्तींच्या साहित्याचा समावेश होता. परंतु 'विद्रोही' साहित्याची बाजूच विचारवंतांनी अधिक लक्षात घेतली. त्यावर अधिक प्रतिक्रिया व्यक्त केली. त्या तुलनेत 'प्रवर्तक' बाजूकडे जितकं लक्ष दिलं जाणं आवश्यक होतं ते दिलं गेलं नाही. त्यामुळे काही असंतुष्ट दलितेतरांच्या बाबतीत मात्र असं घडलं, की त्यांनी विद्रोही साहित्याला व विद्रोही प्रवृत्तीला नाके मुरडली. त्याचे कारण असे असू शकेल, की बुद्ध–आंबेडकर विचार हा समता प्रस्थापित करू पहाणारा अहिंसेचा विचार आहे हे या असंतुष्टांच्या कधी लक्षात आले नसावे.

तर काही दलित कवींच्या बाबतीत असे घडले, की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विद्रोहाचा पुरस्कार केला म्हणजे नेमके काय सांगितले? हे त्यांनी चाणाक्षपणे लक्षात न घेतल्याने डॉ. बाबासाहेबांच्या विद्रोहाच्या विचारसरणीत स्वतःच्या कल्पनांचे रंग मिश्रित करून तो विद्रोह हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याच विचारात अनुस्यूत असलेला आहे, असे भासविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ज्या ज्या अभ्यासकांना डॉ. बाबासाहेबांचा विद्रोहाचा शुद्धविचार ठाऊक होता ते या काही विद्रोही कवींच्या भूमिकेच्या संदर्भात हेतूपुरस्सर मूक राहिले. काहीनी त्या विरूद्ध आवाज उठविण्याचा प्रयत्न केला. परंतु ज्या ज्या दलितेतरांना डॉ. बाबा-साहेब आंबेडकरांचा विचार समजला नव्हता त्यांच्याप्रत, डॉ. आंबेडकरांच्या विचारात स्वतःच्या कल्पनांचे रंग मिश्रित करून झालेला विद्रोही काव्याविष्कार पोहोचला तेव्हा त्यांच्या मनात डॉ. आंबेडकरांच्या विद्रोही विचारासंबंधी अकारण संभ्रम निर्माण झाला. दलितांविषयी, प्रामुख्याने बौद्धधर्मियांविषयी नवी तेढ निर्माण झाली.

या परिस्थितीत समतेचे उद्‌गान करणारा बुद्धविचार–आंबेडकरविचार ज्या ज्या आंबेडकरी प्रेरणेच्या साहित्यातून प्रसारीत झाला आहे तो जनसामान्य व रसिकवाचकांसमोर अभ्यासपूर्णतेने येण्याची आवश्यकता होती. कारण त्या विचाराकडे साहित्यसमीक्षकांनी हेतूपुरस्सर लक्ष दिलेले नव्हते. आणि ज्या समीक्षकांनी लक्ष देण्याचा प्रयत्न केला, त्यांनी तो विचार योग्य त्या प्रकारे उलगडून दाखविण्याचा प्रयत्नच केला नव्हता.

या संदर्भात आंबेडकरी कवितेची प्रवर्तकबाजू लक्षात घेण्याचा श्री. हरीश खंडेराव यांनी जो प्रयत्न केला आहे तो निश्चितपणे बहुमोलाचा मानावा लागतो तो आणखी एका अर्थाने, की ज्या आंबेडकरी कवितेत डॉ. आंबेडकर विचारात अनुस्यूत असलेली प्रवर्तकबाजू प्रकट झाली आहे ती अहिंसेची आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय ही लोकशाही तत्त्वप्रणाली सांगणारी आहे. माणसा माणसातील ताण तणाव कमी करू पाहाणारी आहे. खऱ्या माणुसकीच्या मूल्यांचा प्रसार करणारी आहे. अशा प्रकारची प्रवर्तक प्रवृत्ती ही प्रवर्तक जाणिवेच्या कवींची सर्वार्थाने जीवन प्रवृत्तीच बनलेली आहे. म्हणून ही प्रवर्तकबाजू काव्यरसिकांसमोर आली म्हणजे दलितेतरांच्या मनात निर्माण झालेली तेढ आपोआप नष्ट होऊन जाईल. आजच्या काळाची ती खरी गरज आहे. डॉ. बाबासाहेबांनी अनेक वर्षापूर्वीच ही गरज ओळखली होती. म्हणूनच समतेचा विचार प्रतिपादणारा बुध्दविचार त्यांनी धम्मप्रवर्तनासाठी स्वीकारला. आजचे आंबेडकरी प्रेरणेच्या प्रवर्तक जाणिवेचे कवी

नेमका बुध्द–आंबेडकरविचार आपल्या साहित्यातून प्रसारीत करीत आहेत ही लक्षणीय कामगिरी मानली पाहिजे.

या अभ्यासाचे ठळकपणे लक्षात आलेले आणखी दोन विशेष आहेत. पहिला सामाजिक अभिसरणाचा आणि दुसरा आविष्काराचा.

सामाजिक अभिसरणाचा विचार या कवितेतून येतो आहे तो पूर्णपणे आंबेडकर विचारच भारतीय उपेक्षितांचे प्रश्न सोडविण्यास आणि त्यांना न्याय मिळवून देण्यास पूर्ण समर्थ आहे, त्यासाठी मार्क्स वा अन्य कोणत्याही विचारसरणीच्या नादात गुंतण्याचे प्रयोजन नसल्याचे ठाशीव प्रतिपादन करणारा. आजच्या दलित वा विद्रोही कवितेच्या पार्श्वभूमीवर हा विचार अधिक मोलाचा ठरणारा आहे.

आविष्काराच्या बाबतीत या कवितेची लक्षणीय कामगिरी ही आहे, की बुध्द–आंबेडकरविचारांचे प्रामाणिकपणे अनुसरण करून त्या विचारांच्या मार्गानेच स्वतःची संस्कृती घडविण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती या कवितेत शब्दबध्द होत आहे. बुध्द–आंबेडकर विचाराधिष्ठित नव्या प्रतिमा, प्रतिके, मिथ्स् घडविल्या जात आहेत मराठी साहित्याला आंबेडकरी कवितेची ती नवी देणगी ठरणार आहे.

आंबेडकरी कवितेचे अंतरंग तपासताना वर उल्लेखिलेले सर्व विशेष साहित्य रसिकांना विचारप्रवण करतील अशी खात्री वाटते. शेवटी, साहित्याभ्यासाला जशी कोणतीही लेबले लावली जाऊ नयेत, तद्वतच साहित्याभ्यासातील कोणताही नवा दृष्टिकोण साहित्यविचाराला उपकारक ठरेल की अपकारक ठरेल अशा शंकाही असू नयेत. सद्धेतूने केलेला कोणताही साहित्याभ्यास हा मानवी विचाराला चालना देणारा असतो. मानवी जीवनाला पोषक ठरणारा असतो असे मला सतत वाटत आले आहे. तेव्हा आंबेडकरीकवितेची प्रवर्तक बाजू अभ्यासण्याचा श्री. हरीश खंडेराव यांचा प्रयत्न मराठी साहित्यविचाराला खचित पोषक व उपकारक ठरेल असे मला वाटते !

१ डिसेंबर १९८१ रमेश कुबल

| | | |
|---|---|---|
| ११. | दामोदर मोरे | ७४–८१ |
| १२. | बाळ हाटे | ८१–८४ |
| १३. | बळवंत कांबळे | ८४–८७ |
| १४. | अशोक पाटील | ८७–९३ |
| १५. | मनोहर तल्हार | ९३–९६ |
| १६. | अरविंद निकाळजे | ९६–९८ |
| १७. | शिवाजी सोनवणे | ९८–१०० |
| १८. | मधु गायई | १००–१०१ |
| १९. | भुजंग मेश्राम | १०१–१०२ |
| २०. | अशोक चक्रवर्ती | १०२–१०४ |
| २१. | बबन लोंढे | १०४–१०५ |
| २२. | धुरंधर मिठबावकर | १०५–१०६ |
| २३. | डब्ल्यू कपूर | १०६–१०७ |
| २४. | मिलिंद आठवले | १०७–१०८ |
| २५. | विजय जामभंडेकर | १०८–११० |
| २६. | ज्योती लांजेवार | ११०–११३ |
| २७. | मीना गजभीये | ११३–११६ |
| २८. | कुन्दा गायकवाड | ११६–११८ |
| २९. | गिपल गिमेकर | ११९–१२२ |
| ३०. | सुरेखा भगत | १२२–१२४ |
| ३१. | समारोप | १२५–१२७ |
| ३२. | संदर्भग्रंथ | १२७–१२८ |

आंबेडकरी कवितेचे अंतरंग

ग्रंथालय ... शाखा

। सो बोधिसत्तो रतनवरो अतुल्यो
मनुस्सलोके हितसुखताय जातो ।

आंबेडकरांना प्रेरणा मानून काव्य लेखन करणाऱ्या नवोदित कवींच्या कवितेचा मी अभ्यास करतो आहे असे श्री. हरीश खंडेराव म्हणाले, तेव्हा मलाही वाटले, की दलित साहित्यात आणखी एका समीक्षा ग्रंथाची भर पडत आहे. पण माझा अभ्यास थोडा वेगळा आहे. आजपर्यंत ज्या प्रकारच्या दलित साहित्याची निर्मिती झाली व त्या साहित्याची समीक्षा झाली ते साहित्य, 'दलित साहित्य' व 'विद्रोही साहित्य' म्हणूनच ओळखले गेले. पण मी आंबेडकरी प्रेरणेच्या साहित्याचा अभ्यास करीत आहे. आणि त्याची फक्त 'प्रवर्तक' बाजूच लक्षात घेत आहे. ज्यांच्या जीवनाचे आणि साहित्याचे मूळ प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत, त्यांचे साहित्य हे आंबेडकरीच आहे. डॉ. आंबेडकरांनीं बौद्धधम्मप्रवर्तन केले त्या मागील 'बोधिसत्व' ही त्यांची प्रेरणा आहे. म्हणून 'बुद्धत्व' आणि 'आंबेडकरत्व' ही तत्त्वे वेगळी नाहीत. ती आपल्या जीवनाची व साहित्य निर्मितीची प्रेरणा मानून पुढे येणाऱ्या कवींच्या कवितेचा अभ्यास हा माझ्या अभ्यासाचा विषय आहे; असे ते म्हणताच श्री. खंडेरावांचा अभ्यासविषय मला नवा वाटला. आणि हा अभ्यास लोकांच्या समोर यायलाच हवा अशी हूरहूर लागून राहिली. याचे आणखी एक महत्त्वाचे कारण असे होते, की भारतीय समाजरचनेत हजारो वर्षांपासून जीवनाच्या ज्या ज्या क्षेत्रांत विषमता आहे, त्यात जातीयता महाभयंकर आहे. त्यामुळेच हजारो-वर्षे दलितांना अनंत क्लेष भोगावे लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मप्रवर्तन करून भारतीय समाजजीवनात समता प्रस्थापित करण्याचे पाऊल उचलले आणि दलितांच्या प्रश्नांना उद्गार प्राप्त करून दिला. बाबासाहेबांनी जिथे जिथे जातीयता दिसेल तिथे तिथे विद्रोहाचा पवित्रा आणि जीवनाच्या इतर क्षेत्रातील बदलासाठी प्रवर्तनाचा मंत्र स्वीकारला. याचे कारण असे, विद्रोहालाही काही मर्यादा असतात हे डॉ. बाबासाहेबांनी पूर्णपणे लक्षात घेतले होते.

डॉ. बाबासाहेबांची प्रेरणा मानून जे साहित्य निर्माण झाले त्यात 'विद्रोही' आणि 'प्रवर्तक' अशा दोन्ही प्रकारच्या प्रवृत्तींच्या साहित्याचा समावेश होता. परंतु 'विद्रोही' साहित्याची बाजूच विचारवंतांनी अधिक लक्षात घेतली. त्यावर अधिक प्रतिक्रिया व्यक्त केली. त्या तुलनेत 'प्रवर्तक' बाजूकडे जितकं लक्ष दिलं जाणं आवश्यक होतं ते दिलं गेलं नाही. त्यामुळे काही असंतुष्ट दलितेतरांच्या बाबतीत मात्र असं घडलं, की त्यांनी विद्रोही साहित्याला व विद्रोही प्रवृत्तीला नाके मुरडली. त्याचे कारण असे असू शकेल, की बुद्ध–आंबेडकर विचार हा समता प्रस्थापित करू पहाणारा अहिंसेचा विचार आहे हे या असंतुष्टांच्या कधी लक्षात आले नसावे.

तर काही दलित कवींच्या बाबतीत असे घडले, की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विद्रोहाचा पुरस्कार केला म्हणजे नेमके काय सांगितले ? हे त्यांनी चाणाक्षपणे लक्षात न घेतल्याने डॉ. बाबासाहेबांच्या विद्रोहाच्या विचारसरणीत स्वतःच्या कल्पनांचे रंग मिश्रित करून तो विद्रोह हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याच विचारात अनुस्यूत असलेला आहे, असे भासविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ज्या ज्या अभ्यासकांना डॉ. बाबासाहेबांचा विद्रोहाचा शुद्धविचार ठाऊक होता ते या काही विद्रोही कवींच्या भूमिकेच्या संदर्भात हेतूपुरस्सर मूक राहिले. काहींनी त्या विरूद्ध आवाज उठविण्याचा प्रयत्न केला. परंतु ज्या ज्या दलितेतरांना डॉ. बाबा-साहेब आंबेडकरांचा विचार समजला नव्हता त्यांच्याप्रत, डॉ. आंबेडकरांच्या विचारात स्वतःच्या कल्पनांचे रंग मिश्रित करून झालेला विद्रोही काव्याविष्कार पोहोचला तेव्हा त्यांच्या मनात डॉ. आंबेडकरांच्या विद्रोही विचारासंबंधी अकारण संभ्रम निर्माण झाला. दलितांविषयी, प्रामुख्याने बौद्धधर्मियांविषयी नवी तेढ निर्माण झाली.

या परिस्थितीत समतेचे उद्‌गान करणारा बुद्धविचार–आंबेडकरविचार ज्या ज्या आंबेडकरी प्रेरणेच्या साहित्यातून प्रसारीत झाला आहे तो जनसामान्य व रसिकवाचकांसमोर अभ्यासपूर्णतेने येण्याची आवश्यकता होती. कारण त्या विचाराकडे साहित्यसमीक्षकांनी हेतूपुरस्सर लक्ष दिलेले नव्हते. आणि ज्या समीक्षकांनी लक्ष देण्याचा प्रयत्न केला, त्यांनी तो विचार योग्य त्या प्रकारे उलगडून दाखविण्याचा प्रयत्नच केला नव्हता.

या संदर्भात आंबेडकरी कवितेची प्रवर्तकबाजू लक्षात घेण्याचा श्री. हरीश खंडेराव यांनी जो प्रयत्न केला आहे तो निश्चितपणे बहुमोलाचा मानावा लागतो तो आणखी एका अर्थाने, की ज्या आंबेडकरी कवितेत डॉ. आंबेडकर विचारात अनुस्यूत असलेली प्रवर्तकबाजू प्रकट झाली आहे ती अहिंसेची आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय ही लोकशाही तत्त्वप्रणाली सांगणारी आहे. माणसा माणसातील ताण तणाव कमी करू पाहाणारी आहे. खऱ्या माणुसकीच्या मूल्यांचा प्रसार करणारी आहे. अशा प्रकारची प्रवर्तक प्रवृत्ती ही प्रवर्तक जाणिवेच्या कवींची सर्वार्थाने जीवन प्रवृत्तीच बनलेली आहे. म्हणून ही प्रवर्तकबाजू काव्यरसिकांसमोर आली म्हणजे दलितेतरांच्या मनात निर्माण झालेली तेढ आपोआप नष्ट होऊन जाईल. आजच्या काळाची ती खरी गरज आहे. डॉ. बाबासाहेबांनी अनेक वर्षापूर्वीच ही गरज ओळखली होती. म्हणूनच समतेचा विचार प्रतिपादणारा बुध्दविचार त्यांनी धम्मप्रवर्तनासाठी स्वीकारला. आजचे आंबेडकरी प्रेरणेच्या प्रवर्तक जाणिवेचे कवी

नेमका बुध्द–आंबेडकरविचार आपल्या साहित्यातून प्रसारीत करीत आहेत ही लक्षणीय कामगिरी मानली पाहिजे.

या अभ्यासाचे ठळकपणे लक्षात आलेले आणखी दोन विशेष आहेत. पहिला सामाजिक अभिसरणाचा आणि दुसरा आविष्काराचा.

सामाजिक अभिसरणाचा विचार या कवितेतून येतो आहे तो पूर्णपणे आंबेडकर विचारच भारतीय उपेक्षितांचे प्रश्न सोडविण्यास आणि त्यांना न्याय मिळवून देण्यास पूर्ण समर्थ आहे, त्यासाठी मार्क्स वा अन्य कोणत्याही विचारसरणीच्या नादात गुंतण्याचे प्रयोजन नसल्याचे ठाशीव प्रतिपादन करणारा. आजच्या दलित वा विद्रोही कवितेच्या पार्श्वभूमीवर हा विचार अधिक मोलाचा ठरणारा आहे.

आविष्काराच्या बाबतीत या कवितेची लक्षणीय कामगिरी ही आहे, की बुध्द–आंबेडकरविचारांचे प्रामाणिकपणे अनुसरण करून त्या विचारांच्या मार्गानेच स्वतःची संस्कृती घडविण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती या कवितेत शब्दबध्द होत आहे. बुध्द–आंबेडकर विचाराधिष्ठित नव्या प्रतिमा, प्रतिके, मिथ्स् घडविल्या जात आहेत मराठी साहित्याला आंबेडकरी कवितेची ती नवी देणगी ठरणार आहे.

आंबेडकरी कवितेचे अंतरंग तपासताना वर उल्लेखिलेले सर्व विशेष साहित्य रसिकांना विचारप्रवण करतील अशी खात्री वाटते. शेवटी, साहित्याभ्यासाला जशी कोणतीही लेबले लावली जाऊ नयेत, तद्वतच साहित्याभ्यासातील कोणताही नवा दृष्टिकोण साहित्यविचाराला उपकारक ठरेल की अपकारक ठरेल अशा शंकाही असू नयेत. सद्धेतूने केलेला कोणताही साहित्याभ्यास हा मानवी विचाराला चालना देणारा असतो. मानवी जीवनाला पोषक ठरणारा असतो असे मला सतत वाटत आले आहे. तेव्हा आंबेडकरीकवितेची प्रवर्तक बाजू अभ्यासण्याचा श्री. हरीश खंडेराव यांचा प्रयत्न मराठी साहित्यविचाराला खचित पोषक व उपकारक ठरेल असे मला वाटते !

१ डिसेंबर १९८१ रमेश कुबल

**मनोगत :**

'आंबेडकरी कवितेचे अंतरंग' हा ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या २५ व्या महापरिनिर्वाणदिनी वाचकांच्या हाती देताना मला आनंद वाटतो आहे. वास्तविक हा ग्रंथ रौप्यमहोत्सवी धम्मचक्रप्रवर्तनदिनी वाचकांच्या हाती देण्याचा प्रकाशकानी आटोकाट प्रयत्न करूनही काही अडचणीमुळे देता आलेला नाही.

'आंबेडकरी कवितेचे अंतरंग' या ग्रंथात आंबेडकरी प्रेरणेच्या कवितेचा अभ्यास करताना प्रामुख्याने, 'आंबेडकरी प्रेरणेची प्रवर्तक कविता' तेवढीच विचारात घेतलेली आहे. सन १९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्धधम्मचक्रप्रवर्तन घडवून आणल्यानंतर त्या वर्षापासून जन्मलेली तरूण पिढी एक वेगळाच सांस्कृतिक वारसा घेऊन आलेली आहे. या पिढीच्या कवितेला दिशा आहे, सांस्कृतिक मूल्य आहे आणि कलामूल्यही आहे, असे ही कविता अभ्यासताना माझे मत बनलेले आहे. शिवाय या तरूण पिढीजवळ प्रचंड आत्मविश्वास आहे. सारासार विचार करण्याची कुवत आहे; विवेक आहे. आत्मसन्मान करण्याची लालसा जशी आहे, तशीच दुसऱ्याचा सन्मान करण्याचीही मनोवृत्ती आहे. सुसंस्कृत आणि विवेकी मन आहे. आणि या तरूण कवींच्या पिढीला स्वतःच्या बौद्ध संस्कृतीचा ध्यास आहे. आपली नेमकी संस्कृती कोणती ! असा घुटमळत प्रश्न ही कविता विचारत नाही. आत्मशोध आणि आत्मउद्धार करण्यासाठी उघडउघड बुध्दविचार स्वीकारून बौद्धसंस्कृती विकसित करण्यासाठी ही तरूण कवीपिढी प्रयत्नशील आहे. या कवींचे काव्यसंग्रह वाचकांपर्यंत पोहोचले नसतीलही, परंतु या कवींच्या कवितेची ओळख मात्र आधीच वाचकांना झालेली असून, काही कवींचे काव्यसंग्रह प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

अलिकडे आंबेडकरविचाराने प्रभावित झालेल्या निरनिराळ्या स्तरातील कवींना केवळ सांस्कृतिक चळवळच पुढे रेटण्याची आवश्यकता वाटलेली नसून आंबेडकरविचाराला वाङमयीन प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याची आवश्यकता वाटली; हे अतिशय लक्षवेधी आहे. आंबेडकरविचाराला कलामूल्य प्राप्त झाले आहे; हे विचारात घेताच हा विचार अल्पावधीतच मराठी वाङमयात काही मूलभूत प्रश्न का निर्माण करतो ! ह्याचे इतरांप्रमाणेच माझ्याही मनात कुतूहल निर्माण झाले. अशी कविता माझ्या जिव्हाळ्याचा विषय ठरली. आंबेडकरविचारप्रेरणा मानणारी कविता मी आत्मियतेने वाचू लागलो. अनेक कवींनी आपली वाङमयीन प्रेरणा 'आंबेडकरविचार' आहे, असे घोषित केले आहे. या संख्येत दिवसेंदिवस भर पडतच आहे. या घोषणेतील उद्देश्य, हेतू आणि कार्यकारणभाव याविषयी माझ्यातील

वाचकाला अंतर्मुख होऊन विचार करावा लागला. त्यातून माझ्या मनात काही प्रश्न निर्माण झालेत. त्याची उकल करण्याचा मी प्रयत्न करू लागलो.

'आंबेडकरी कवितेचे अंतरंग' उलगडून घेताना, कवींच्या भावभावना, प्रतिक्रिया आणि मनोव्यापाराचा विचार करताना आंबेडकरविचारप्रेरणा मानणारी कविता 'दलित कविता' म्हणून का मान्यता पावली ह्याचा शोध मी वाचक म्हणून घेऊ लागलो. ही कविता 'दलित' या संकल्पनेला अधिक महत्व का देत आहे? हा प्रश्न मला सारखा जाणवत होता. अनेक विद्वानांनी दलित संकल्पनेला उचलून धरताना जी जी कारणे दिलीत ती समजून घेण्याचा प्रयत्न केला, परंतु माझे समाधान त्याने झाले नाही. त्याचे कारण असे, की दलित संकल्पनेमुळे आंबेडकर-विचार दुय्यम तर ठरत चालला नाही ना? असा प्रश्न एकसारखा मला भेडसावत राहिला. त्यामुळे स्वाभाविकपणे कवितेचा वाचक म्हणून मी अस्वस्थ होत होतो. ज्यांनी ज्यांनी आंबेडकरविचारप्रेरणेच्या काव्याची दलित काव्य म्हणून समीक्षा केली आणि 'दलित' या संकल्पनेला वाङ्मयीन मूल्य प्राप्त करून दिले, त्यांनी 'संकल्पना' अतिशय महत्वाची मानलेली आहे, हे उघड सत्य आहे. परंतु 'संकल्पने' ऐवजी 'विचार' मोलाचा मानावा, की मानू नये, असा प्रश्न त्यातूनच निर्माण होऊ शकतो. दुर्दैवाने, 'दलित' ही संकल्पना दृढ होत असतानाच दलित काव्याच्या संदर्भात अभ्यासूंनी अनेक विवेचक प्रश्न निर्माण केलेले आहेत. अशा पार्श्वभूमिवर 'संकल्पना' आणि 'विचार' यापैकी मी विचाराला प्राधान्य देणारा आहे. म्हणूनच आंबेडकरविचारप्रेरणेच्या काव्याची समीक्षा होणे आवश्यक आहे असे मला सतत वाटत होते. या अभ्यासाच्या रुपाने माझ्या मनात निर्माण झालेल्या काही प्रश्नांना वाट मोकळी झाली आहे.

मराठीत ज्या पद्धतीने काव्य समीक्षा केली जाते, तसा मी समीक्षक नाही. 'आंबेडकरी कवितेचे अंतरंग' एक वाचक म्हणूनच मी अभ्यासलेले असल्याने, माझ्या मर्यादांची मला जाणीव आहे. काव्यातून व्यक्त झालेला आंबेडकरविचार समजून घेण्याच्या जिज्ञासेतून माझ्या कुवतीनुसार हा प्रयत्न केला आहे.

आंबेडकरविचाराबरोबरच 'दलित' संकल्पना अधिक व्यापक करण्याच्या दृष्टिकोणातून मार्क्सविचारही आंबेडकरी प्रेरणेच्या काही कवींनी कवितेतून मांडला आहे. 'आंबेडकरी कवितेचे अंतरंग' समजून घेताना आंबेडकर–बुध्दविचारा-बरोबरच, मार्क्सविचार काव्यातून ज्या पध्दतीने, ज्या उद्देशाने आणि ज्या ध्येयाने आलेला आहे, तोही कवितेच्या प्रकृतीवरून, आकृतीवरून आणि स्वभावधर्मा-नुसार प्रस्तुत अभ्यासात विचारात घ्यावा लागलेला आहे, कारण मार्क्सविचार-प्रेरणेचा आंबेडकरविचारप्रेरणेशी समन्वय साधण्याचा काही कवींनी केलेला प्रयत्न

आंबेडकर विचाराशी सुसंगत आहे, की विसंगत आहे, हे पाहिल्याशिवाय आंबेडकरी विचाराचे निर्विवादत्त्व पटवून देणे अडचणीचे वाटले. वस्तुतः बुध्दविचार आणि मार्क्सविचार याविषयी बोलणारे अनेक विद्वान विचारवंत आहेत. बुद्धविचार–मार्क्सविचार सख्खे भाऊ भाऊ आहेत, असेही काही विचारवंत मानतात. हे शोधणे हा या अभ्यासाचा विषय नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा काव्यातून आलेला विचार समजून घेतानाच अलिकडच्या आंबेडकरी प्रेरणेच्या कवींनी नेमका कोणता विचार स्वीकारला, कोणता विचार नाकारला हे काळजीपूर्वक उलगडण्याचा मी प्रयत्न केला आहे. त्या संदर्भातच मार्क्सविचार तपासला इतकेच.

'आंबेडकरी कवितेचे अंतरंग' अभ्यासताना प्रामुख्याने बहुसंख्य तरुण कवींच्या कवितांचा अभ्यास जाणीवपूर्वक केलेला आहे. त्याचे कारण असे, की या कवींपाशी असलेले प्रवर्तक जाणिवा व्यक्त करण्याचे बळ! त्यामुळे आंबेडकर विचारप्रेरणेच्या सर्वच कवींचा प्रस्तुत अभ्यासात समावेश करता आलेला नाही. प्रवर्तक जाणिवेच्या प्रत्येक कवीची कविता अभ्यासताना माझ्या कवि प्रकृतिला ती कविता स्वतःचीच वाटली आणि तिचा रसास्वाद घेताना असीम आनंद मी प्राप्त करू शकलो. या प्रयत्नात मी कितपत यशस्वी झालो, हे वाचकांनीच ठरवावे.

आंबेडकरी कवितेच्या अंतरंगात ज्या ज्या कवींचा अभ्यास झाला आहे त्या त्या कवींना, 'हे सारे दलित कवीच आहेत.' असे म्हटले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. कोण दलित कवी आहे आणि कोण दलित कवी नाही, हे ठरविणाऱ्यांनी ठरवावे. परंतु या सर्व कवींचा, 'आंबेडकरविचार प्रेरणा' मानणारे कवी म्हणूनच मी विचार केलेला आहे. आंबेडकरविचार तळागाळातील समाज-जीवनाच्या उध्दारासाठी प्रेरक आहे, असे जो जो कवी मानतो, स्वीकारतो, आणि आत्मसात करतो तोच कवी मला अधिक महत्वाचा वाटतो. तो दलित आहे की नाही हा प्रश्न माझ्या दृष्टीने महत्वाचा नाही, त्याचे कारण असे, की दलित संकल्पनेपेक्षा आंबेडकरविचार अधिक मार्गदर्शक, उन्नतीकडे नेणारा, आत्मप्रतिष्ठा देणारा, गतिमान असणारा, चिरंतन मूल्य असणारा आणि ध्येयनिष्ठा असणारा विचार आहे, हे काव्यवाचकांच्याही केव्हाच लक्षात आलेले आहे, अशी माझी धारणा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरासारखा महापुरुष दलित समाजात जन्मास आलेला आहे म्हणून तेवढ्याच हेतूसाठी जवळीक साधणारे काही कवी असतील. बाबासाहेबांनी आपल्या समाजबांधवांना बौध्दधम्माचा आदर्श दिला म्हणून भावनिक जवळीक निर्माण करू पाहणारे काही कवी असतीलही, हे नाकारता येत नाही. शिवाय डॉ. आंबेडकरांचा विचार मूलगामी आणि प्रवर्तक वाटतो म्हणून तो विचार आत्मसात करून त्यानुसार वाटचाल करणारेही काही कवी असतील. डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वापुढे लीन होऊन त्यांची पूजा करणे, असेही काही कवींच्या समोर उद्दिष्ट असू

शकते. या सर्वबाबींचा एकत्रीतपणे विचार केला तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार मूलगामी आणि प्रवर्तक आहे असे ज्या ज्या कवींना आचरणात आणून वाटचाल करावी असे वाटते, त्या सर्व समाजघटकातील कवींची आंबेडकरविचारनिष्ठा मला अधिक मोलाची वाटते. कारण स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या तत्व-प्रणालीनुसार जाणारा आंबेडकरविचार आहे.

आंबेडकरी कवितेच्या अंतरंगात पाच कवयित्रींचा समावेश करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'आंबेडकरी प्रेरणेची कवयित्री' समाजप्रबोधनात कवीपेक्षा तसूभरही मागे नाही, ह्याची जाणीव अनेक कवयित्रींच्या कविता अभ्यासताना जाणवली. सर्वच कवयित्रींचा प्रस्तुत अभ्यासात समावेश करणे शक्य झालेले नाही, ही खंत मनात आहेच. स्वतंत्रपणे आणि सलगपणे सर्वच कवयित्रींच्या काव्याचे रसग्रहण करण्याचा प्रयत्न झालाच तर खरेखुरे 'प्रवर्तन' घडण्याची जी प्रक्रिया चाललेली आहे, ती अधिक विकसित होईल. धम्मचक्रप्रवर्तन झाल्यापासून स्त्रीमनावर झालेले सुसंस्कार मराठी काव्यातून प्रकट होणे आवश्यकच आहेत. त्यामुळे पुढील पिढ्यांवर त्याचे योग्य परिणाम होण्यास मोलाचे साह्य लाभेल या हेतूनेच प्रस्तुत अभ्यासात पाच महत्त्वपूर्ण कवयित्रींचा समावेश केलेला आहे. शाहीर घेगडे, वामनराव कर्डक, कवि दीनबंधू, दिनेश लखमापूरकर, हरिहरराव सोनुले, बंधुमाधव इ. अनेक लोककवींचा प्रस्तुत अभ्यासात विचार केलेला नाही. या कवींचा ओझरता उल्लेख करणे म्हणजे डॉ. आंबेडकरांची समाजउध्दारक चळवळ ज्यांनी खेड्यापाड्यातील जनतेला साध्या, सोप्या, बाळबोध आणि चटकन आत्मसात करता येईल इतक्या चांगल्या शब्दात समजावून सांगितली, तर त्या कवींचा उपमर्द करणे ठरेल.

सदरच्या लोककवींचा सलगपणे व स्वतंत्रपणे संशोधनात्मक विचार होणे आवश्यक आहे.

मिलिंद कला महाविद्यालय, औरंगाबाद येथे शिकत असताना माझ्यावर जे साहित्यिक संस्कार झाले, त्याचा या अभ्यासात अनेकपरीनी उपयोग झाला. 'भाकरी पेक्षा क्रिएटिव्हीटीला मी कमी महत्व देतो' असे म्हणण्याचा कटू प्रसंग माझ्या जीवनात आलेला असताना, ज्यांनी मोठ्या सहृदयतेने मला आधार दिला, जीवनाला दिशा प्राप्त करून दिली आणि वेळोवेळी, 'भाकरी मिळाली आता क्रिएटिव्हीटीचे काय?' अशी माझ्या लेखनाबद्दल वारंवार विचारणा केली व प्रोत्साहन दिले ते आकाशवाणीचे पश्चिम विभागीय डेप्युटी डायरेक्टर जनरल श्री. रघुनाथराव भोळेसाहेब यांच्या ऋणातून अंशतः मुक्त होण्याची संधी या अभ्यासाद्वारे प्राप्त झाली. माझे आईवडील आणि जिने स्वतःच्या आयुष्यापेक्षा माझ्यातील कलागुणांना उजाळा देण्याचा सतत प्रयत्न केला ती माझी शकू या निर्मितीतील अपरिहार्य व्यक्ती आहेत.

वेगवेगळ्या स्तरातील व क्षेत्रांतील माझ्या असंख्य मित्रांच्या, हितचिंतकांच्या आग्रहामुळे लेखनाची निकड सतत लागत राहिली याची मला जाणीव आहे.

त्या सर्वांचा नामनिर्देश करणे माझे कर्तव्य आहे याचीही मला जाणीव आहे. सर्वांच्याच ऋणात राहूनही ज्यांचा उल्लेख टाळणे कृतघ्नपणाचे ठरेल ते प्रा. केशव मेश्राम ज्यानी सातत्याने उत्तेजन व प्रोत्साहन देऊन माझा उत्साह अधिक वाढविला. प्रा. गंगाधर लोखंडे आणि प्रा. अरूणा लोखंडे, श्री. उत्तमराव बोदवडे, श्री. सोपान भोसले गुरूजी, श्रीमती वैजयंती सोनवणे, यांचे प्रोत्साहन मला शब्दात सांगता येणार नाही. गुरूवर्य डॉ. म. ना. वानखडे, प्रि. रे. प. नाथ, डॉ. शहारे, प्रिं. मधुकर शिंदे, प्रा. रा. ग. जाधव. प्रा. गजमल माळी, प्रा. रायमाने, वामन निंबाळकर, प्रा. प्र. ई. सोनकांबळे, प्रा. यशवंत मनोहर, प्रा. अविनाश डोळस, बाबुराव बागुल, दया पवार, अर्जुन डांगळे, वामन होवाळ, प्रल्हाद चेंदवणकर, प्रा. अरूण कांबळे, रामदास आठवले, ज. वि. पवार, प्रा. यादवराव गांगुर्डे या सारख्या अनेक साहित्यिक मित्रांनो माझ्या लिखाणाबाबत सौजन्याने, आत्मियतेने व आस्थेने चौकशी करून उत्तेजन दिले. हेमंत कारंडेनी आपल्याकडील अनेक काव्यसंग्रह अभ्यासासाठी उपलब्ध करून दिले. त्या सर्वांचा मी ऋणी आहे. महाराष्ट्र बौध्द साहित्य परिषदेचे अध्यक्ष आयुष्यमान भाऊसाहेब अडसूळ आणि चिटणीसद्वय विश्वास भोसले व मोहन वाघमारे यांनी महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषदेच्या संदर्भग्रंथालयाचा मला पुरेपूर उपयोग करू दिला व वेळोवेळी मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. माझे स्नेही शिवा सोनवणे ह्यांनी विषयानुरूप मुखपृष्ठ तयार करून दिले आणि या ग्रंथाची मुद्रणप्रत तयार करण्याच्या कामी माझा भाऊ यशवंत व बहीण कुसूम यांनी जे परिश्रम घेतले त्यांचा उल्लेख करणे मी माझे कर्तव्य मानतो.

या ग्रंथनिर्मितीसाठी, मी अभ्यासिलेल्या कवींच्या कविता, अस्मितादर्श, तक्षक, सिंहगर्जना, संवाद, राजधानी, बहुमत आणि मुंबई सकाळ आदि नियत-कालिकांतून उपलब्ध झाल्या. त्या त्या नियतकालिकांच्या चालकांचा मी अत्यंत ऋणी आहे. माझे परमस्नेही प्रा. रमेश कुबल यांनी हा ग्रंथ प्रकाशित करण्याची जबाबदारी पुरेसे आर्थिक बळ नसतानाही पत्करली ती केवळ माझ्या काव्याभ्यासाचा उपक्रम त्यांना आवडला म्हणून. आणि प्रोत्साहन देऊन हा ग्रंथ वाचकांच्या हाती देण्यात त्यांनी जी मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार मानणे त्यांना मुळीच आवडणार नाही, पण माझे कर्तव्य मी बजावीत आहे. ओमेगा प्रिंटर्स, पापडी, चे चालक श्री. जयसेन पाटील व त्यांचे कर्मचारी यांनी वसई सारख्या ठिकाणी या ग्रंथाची सुबक छपाई केली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

प्रस्तुत ग्रंथात अनेक मुद्रणदोष राहिले आहेत याची मला जाणीव आहे. जाणत्या वाचकांनी त्या दोषांकडे चाणाक्षपणे पाहू नये अशी मी विनंती करतो.

डिमेलो चाळ,
सेंट झेव्हीयर तांत्रिक विद्यालयाजवळ,
माणिकपूर, वसई.

— हरीश खंडेराव
१–१२–१९८१.

**प्रास्ताविक :**

स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी साहित्यात जे जे नवेप्रवाह आले आणि फोफावले त्यातील आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य हा असाच एक महत्वाचा नवाप्रवाह आहे. या प्रवाहाचे मूळ अधिष्ठान आंबेडकर विचार आहे. शतकानुशतके ज्या पददलीत जातीजमातीनी अन्याय, अपमान, तिरस्कार सोसला त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने नवी संजीवनी दिली. आणि दबलेली, मरगळलेली मने जिवंत झाली, नव्हे तर पेटून उठली. आणि डॉ. आंबेडकरांच्या विचारांतून त्यांना जो नवा प्रकाश मिळाला होता त्या नव्या प्रकाशाचे ही मने गाणे गात सुटली. या गाण्यांत अंगार होता, वेदना होती, नकार होता, विद्रोह होता आणि प्रवर्तन होते. या नव्या प्रवाहाचे, नव्या अभिव्यक्तिचे स्वरुप तपासताना त्याला वेगवेगळ्या संकल्पना, बिरुदे चिकटवली गेली. परंतु एक तत्व सर्वमान्य केले गेले, की मराठी साहित्याला या वाङ्मयाने सर्वसमावेशकता, सर्वगामित्व प्रात करुन दिले. एका नव्या जीवन विचाराबरोबरच नवा कलाविचारही बहाल केला. आंबेडकरी साहित्याची समस्त मराठी साहित्याला ही फार मोठी देणगी आहे असेच म्हणावे लागते.

आंबेडकरी विचारावर अधिष्ठित झालेल्या साहित्यात आंबेडकरी कवितेचे स्थान अनन्यसाधारण मानावे लागते. या कवितेचे स्वरुप तपासताना, तिचे अंतरंग उलगडून दाखविताना त्या कवितेने निर्माण केलेले प्रश्न आणि त्या कविते-बरोबरच जन्मास आलेले तिचे साहित्यशास्त्र लक्षात घेतले पाहिजे.

आंबेडकरी प्रेरणेच्या कवितेने सामाजिक मूल्यांचा मर्मभेदी प्रश्न निर्माण केला आणि त्याचबरोबर बौध्द संस्कृतीही आत्मसात करण्याचा व तिची अभिव्यक्ती करण्याचा कसोशीने प्रयत्न चालविला आहे. माणसामाणसातील भेदाभेद, ताणतणाव, श्रेष्ठ-कनिष्ठत्व नष्ट करु पाहणारी, गोरगरिबांचा हुंकार व्यक्त करणारी आंबेडकरी प्रेरणेची कविता ही गेल्या एकतपाहून अधिक काळ पूर्वीपेक्षा अधिक जोमाने वाटचाल करीत आहे. काळाच्या उदरात गडप झालेली परंतु संपूर्ण भारतीय असलेली बौध्द संस्कृती नव्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे मराठी कवितेतून व्यक्त होत आहे. बौध्द संस्कृतीचा ध्यास घेणे आणि ती रुजविणे, या कवितेने उघडउघड प्रयोजन मानल्याने, मराठी वाङ्मयात काही प्रश्न तिने निर्माण केलेले आहेत. मराठी कविता फार मोठ्या प्रमाणात अध्यात्मवाद, ईश्वरवाद, कर्मविपाकवाद आणि अंधश्रध्दा इत्यादिंचा कधी उघडपणे तर, कधी छुप्यामार्गाने पुरस्कार करताना दिसते. आंबेडकरी प्रेरणेची कविता अध्यात्मवाद, ईश्वरवाद, कर्मविपाकवाद अंधश्रध्दा, पूर्वजन्म, पुनर्जन्म आणि मोक्षकल्पना इ. वर कडाडून हल्ला चढविते; या

सर्व संकल्पनांच्या विरोधी विद्रोह पुकारते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मचक्र-प्रवर्तन केल्याने ही जाणीव या कवितेला प्राप्त झालेली आहे. असे जरी असले तरी आंबेडकरी प्रेरणेच्या कवितेला पारंपारिक जीवनमूल्यांच्या विरोधी केवळ नकार, प्रक्षोभ, बंड आणि विद्रोह पुकारावयाचा नसून, स्वांतत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या आदर्श तत्वप्रणालीनुसार वाटचाल करताना, आदर्श, सदाचार, विवेक, संयम आणि शांततेचाही उद्घोष करावयाचा आहे. म्हणूनच आंबेडकरी प्रेरणेच्या कवितेच्या अंतरंगाचे ‘ विद्रोही ’ आणि ‘ प्रवर्तक ’ असे दोन कप्पे मानावे लागत आहेत.

आंबेडकरी प्रेरणेच्या विद्रोही कवितेबाबत विचारवंतांनी अधिक खोलवर जाऊन विचार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तिची झेप व मर्यादाही लक्षात घेतलेली आहे. परंतु या कवितेचे समर्थन करणाऱ्यांनी आणि तिच्यावर टीका करणाऱ्या टीकाकारांनी आंबेडकरी प्रेरणेच्या कवितेची, ‘ प्रवर्तक ’ बाजू फारशी गंभीरपणे विचारात घेतलेली दिसून येत नाही. किंबहुना या ‘ प्रवर्तक ’ कवितेचे मूल्यमापन करण्यात उदासीनताच दाखविलेली आहे. अर्थात् ही उदासीनता हेतूपूर्वकही असू शकते. मराठी कविता अभ्यासणाऱ्यांनी विद्रोही कवितेचे जे बारेमाप गुणगान केले आहे, उदंड उत्साहाने अमाप कौतुक केले आहे. तद्वतच मोरपीस अंगावरून हळूवार फिरवावे तसा तोचतोपणाचा दोषही या कवितेला चिकटविण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. विद्रोही कवितेच्या अभ्यासकांनी विद्रोही कवितेचे गुणदोष स्पष्ट करताना आंबेडकरी प्रेरणेच्या कवितेची दुसरी ‘ प्रवर्तक ’ बाजू मराठी साहित्याला प्रगतीकारक आहे किंवा नाही, वा मराठी कवितेला उपकारक ठरणार आहे किंवा नाही, हे सांगण्याचेही परिश्रम घ्यावयास हवे होते. तसे ते झाले नाहीत. प्रस्तुत अभ्यासात आंबेडकरी प्रेरणेच्या कवितेची प्रवर्तक बाजू विचारात घेतलेली आहे.

आंबेडकरी प्रेरणेची कविता विद्रोही आहे असे जेव्हा मान्य करण्यात येते तेव्हा हा विद्रोह कोणत्या स्वरूपाचा आहे याचा विचार करणे अटळ ठरते. टीकाकार आणि समर्थक असे प्रतिपादन करतात की जातीव्यवस्था, विषमता, भेदाभेद, चातुर्वर्ण्यव्यवस्था आणि अमानवी प्रवृत्ती यांवर आसूड ओढणारी ही कविता आहे. उपेक्षित, भरडलेला, चिरडलेला आणि नाडलेला तळागाळातील माणूस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलितोद्धाराच्या आंदोलनामुळे जागरूक झाला. बौध्द धम्माच्या स्वीकारामुळे त्याची अस्मिता जागृत झाली. त्याला स्वाभिमान गवसला. नव्या जोमाने, उत्साहाने, तेजाने आणि आत्मविश्वासाने तो आपले आत्मप्रकटीकरण कवितेतून करु लागला. त्यासाठी त्याने विद्रोही पवित्रा घेतला.

समाजाच्या सर्व थरांत सर्वांगपूर्ण समता प्रस्थापित करणे हे त्याचे साधे, सरळ उत्तर आहे. त्यासाठी आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विषमता, जातीयता, वर्ण्यव्यवस्था, ईश्वरशाही, कर्मविपाकवाद इत्यादि विरूध्द नकार प्रकट केला. इ.

परंतु खरे पाहता असे दिसते की विद्रोही कवितेला आपली नेमकी संस्कृती कोणती असावी याचे भान राहिलेले नाही. बुद्धविचारापेक्षा या कवितेला मार्क्स विचाराने अधिक आकर्षित केले. परिणाम असा झाला, की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारावर मार्क्सवादी विचाराचे कलम करण्याचा प्रयत्न झाला यातच विद्रोही कवितेच्या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत असे दिसते.

आंबेडकरी प्रेरणेच्या कवितेची ' प्रवर्तक ' बाजू विचारात घेता असे दिसते की ही कविता लोकशाही मूल्यांवर विद्रोही कवितेपेक्षा अधिक अधिष्ठित आहे. आत्मचिंतन आणि स्वात्मजाणीव ह्याचा ध्यास घेतलेली, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय या मार्गदर्शक तत्वांची हमी देणाऱ्या बुध्द विचारप्रणालीवर निष्ठा ठेवणारी, दीनदुबळ्या, गोरगरीब समाजाचा उध्दार आणि कायापालट याच मार्गाने झाल्याशिवाय राहाणार नाही अशी अंतरी खूणगाठ बांधणारी कविता आहे. आंबेडकरविचार बुद्धविचार शिकवितो हे समजून घेऊन, स्वतःच्या समस्या सोडवून घेताना सुसंस्कृत समूहमन तयार करून बुद्धविचारानुसार परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केल्यास तो अधिक मूलगामी ठरू शकेल याची जाणीव ठेवणारी ही कविता आहे. अतएव स्वतःच्या समस्या सोडविण्यासाठी जालीम उपायच फलदायी ठरतील अशी प्रवर्तक कवितेची भूमिका नाही. तिचा तसा प्रयत्न नाही. विवेक, संयम आणि शांततेचा उदघोष करताना, ' माणूस ' या संकल्पनेतील अस्मितेला जोपासताना आत्मपरिक्षण व आत्मशोध घेण्याची प्रवर्तक जाणिवेची धारणा आहे. विद्रोहाच्या पार्श्वभूमीवर प्रवर्तक कवितेची ही धारणा लक्षणीय ठरणारी आहे.

गेल्या २५ वर्षांत नव्याने आचरणात आणलेल्या बौद्धजीवन पद्धतीबाबत चिंतन, परीक्षण आणि आत्मनिरिक्षण इत्यादि अनुभव प्रवर्तक कवितेचे नवेपण सांगणारे आहेत त्याच बरोबर हे अनुभव आविष्कृत करीत असताना नव्या ' मिथस् ' निर्माण करण्याचा सातत्याने ही कविता प्रयत्न करीत आहे. स्वतःच्या संस्कृतीचा, दैनंदिन जीवनातील आचार-विचार, श्रद्धा, संकेत आणि जीवनमूल्यांचा या कवितेने विसर पडू दिलेला नाही. इतकेच नव्हे तर आपल्या मागील पिढीला हाच उज्ज्वल वारसा ठेवण्याचे कार्य प्रवर्तकजाणीवेची कविता करीत आहे. त्यामुळे बौद्धसंस्कृती बौद्धधम्म आणि बौद्धजीवनपद्धतीनुसार बौध्द, दलित व मागासलेल्या समाजात चैतन्य निर्माण करण्याचेही कार्य प्रवर्तकजाणीवेची कविता करू पाहात आहे.

भारतीय मातीतील सामाजिक दुखण्यावर मार्क्सवाद हे गुणकारी औषध नाही असे तिचे स्पष्ट मत आहे. अनेकांनीही ते मान्य केले आहे. म्हणूनच आजची प्रवर्तक जाणिवेची कविता दलितत्व नाकारते आणि आंबेडकरी विचारांचे उद्गान करते ही तिची भूमिका समजून घेतली गेली पाहिजे.

## चोखामेळा :

मराठी वाङ्मयात संत वाङ्मयास फार मोठे महत्व प्राप्त झालेले आहे. 'ज्ञानेश्वरी', 'एकनाथांची भारुडे' आणि 'तुकारामाची गाथा' इ. संतवाणीस अद्यापही गौरवाने उल्लेखले जाते. ज्ञानेश्वर हे मन एकाचवेळी एका श्रेष्ठ दर्जाच्या तत्वचिंतकाचे व कवीचे मन आहे" * तदवत् तुकोबाच्या अभंगवाणीने जे मराठी मनाला स्वतःकडे आकर्षून घेतले आहे त्याला इतर भाषांतील वाङ्मयातही जोड सापडणे जरा कठीण आहे. त्याचे एक गमक असे आहे की तुकोबाच्या ह्या अभंगवाणीचे आकर्षण जसे सुशिक्षिताला आहे, तसेच अशिक्षितालाही आहे. सामान्यांच्या आणि असामान्यांच्या प्रेमादराचा आणि कुतूहलाचा एकाच वेळी विषय होण्याचे हे भाग्य! वारकऱ्यांच्या दिंडीतून ध्वजपताका हातात घेऊन जाणारे लक्षावधी अशिक्षित स्त्रीपुरुष ज्याप्रमाणे ह्या अभंगवाणीत रंगून जातात, त्याचप्रमाणे भांडारकर, रानड्यांसारखे व्यासंगी व बुद्धिमान विद्वानही त्या अभंगवाणीचा रसास्वाद घेऊ पाहतात, तिच्यावर भाष्य करताना आढळतात. तुकारामाच्या अभंगवाणीला लाभलेले हे भाग्य खरोखरच अपूर्व आहे." ऽ 'नामदेवाची अभंगवाणी' आणि 'एकनाथांची भारुडे' या विषयीसुद्धा मराठीतील समीक्षकांनी व विचारवंतानी मनापासून चिंतन केलेले आढळते. परंतु संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ आणि संत तुकाराम या संतांचा विचारवंतांनी ज्या पद्धतीने विचार केलेला आहे, तसा तर सोडाच परंतु संत चोखामेळ्याचा संतकवी म्हणून सुद्धा साधा विचारही कुणी फारसा केलेला नाही. वास्तविक संत चोखामेळा हे संत नामदेव व संत ज्ञानेश्वर यांचे समकालिन. ज्ञानेश्वरांची स्तुती मुक्तपणे करताना संत चोखामेळा म्हणतो :

संसारी आसक्त माया मोहे रत ।
ऐसे जे पतित तारावया ॥
चोखा म्हणे श्रेष्ठ ज्ञानदेवी ग्रंथ ।
वाचिता सनाथ जीव होती ॥

भक्तिमार्गाने जाणारा संत चोखामेळा जसा ज्ञानेश्वरीचे महत्त्व अधात्मासाठी मान्य करतो. तसेच नामदेवाला गुरुस्थानी मानतो. तो म्हणतो–

"धन्य धन्य नामदेव। माझा निरसला भेव ॥
विठ्ठलमंत्र त्रिअक्षरी। खुण सांगीतली निर्धारी ॥

---

* मराठी कविता : जुनी आणि नवी, ज्ञानेश्वरांच्या कल्पनाशक्तीचे स्वरूप : प्रा. वा. ल. कुलकर्णी, पृ. – क्र. ३

ऽ मराठी कविता : जुनी आणि नवी, तुकारामाची कविता; काही विचार पृ. क्र. ४३

ठेवोनि माथा हात । दिले माझे मज हित ।।
दावियेले तारू । चोखा म्हणे माझा गुरू ।।

लीनता हा भक्तीमार्गाचा विशेष गुण होय. ज्ञानेश्वर आणि नामदेव यांच्याप्रती चोखामेळ्याने भक्तीपूर्ण लीनतेचा भाव व्यक्त केला आहे. परंतु याच लीनतेचा विचार करताना विचारवंतानी चोखामेळ्याच्या वाङ्मयास उपेक्षा टाकलेली आहे. आणि म्हणूनच संत चोख्यामेळ्याविषयी आदरभाव व्यक्त करणारे म्हणतात, की "अनेक संतांवर, अनेक विद्वानांनी, मीमांसकांनी टीकाकारांनी व तत्त्वज्ञांनी अनेक ज़ाडे ग्रंथ आळवून-आळवून निर्माण केले. इतकेच नव्हे तर, त्यांच्या एकेका चरणावर, एकेका ओवीवर व एकेका अभंगावर प्रदीर्घ भाष्य व प्रदीर्घ विवेचन करणारी, तोचतोपणा अळणंवळणं घेत ग्रंथरूपाने प्रसवली. पण श्रीसंत चोखामेळ्यासारखा मानवतावादी संतश्रेष्ठ जसा पूर्वी उपेक्षित राहिला तसा तो त्यानतरही उपेक्षित राखला गेला. कुण्या एखाद्याही महामनाचे लक्ष तिकडे वेधले गेले नाही असे नाही, पण, त्याने ते मुद्दामच दुर्लक्षिले व उपेक्षित हा उपेक्षितच राहावा, अस्पृश्य हा अस्पृश्यच मानला जावा, अशी जणू खूणगाठ बांधूनच इतर लेखकांनी त्या महान संताची अवहेलनाच केली आहे." *

संत चोखामेळ्याविषयी जे लेखन आज उपलब्ध आहे, ते अतिशय अल्प स्वरूपाचे आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्याविषयी विपुल साहित्य उपलब्ध असल्याने ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव कसे होते हे समजून घेता येते; चोखामेळ्याबाबत मात्र तसे घडत नाही चोखोबाचे ३४९ अभंगच काय ते उपलब्ध असावेत, असे सोनोपंत दांडेकराचे मत असून चोखोबाच्या अभंगावर नामदेव ज्ञानदेव यांच्या अभंगाची छाप पडलेली आहे, तात्पर्य, ज्ञानदेव-नामदेवासारख्या संतांच्या छायेखाली वावरणारा आणि स्वतःला देवाच्या दारीचा कुत्रा म्हणणारा संत चोखामेळा कुणाच्या आकर्षणाचा विषय ठरु शकला नसेल, असे जे कुणी विचार मांडतात, त्यांच्या विधानाची गंभीरपणे दखल घेणारे चोखामेळा प्रेमीही आहेत. किसन फागोजी बनसोड ह्यांना 'संत चोखामेळ्याच्या वाङ्मयाचा एक मर्मज्ञ संशोधक' असे श्री. ना. रा. शेंडे गौरवतात. संत चोखामेळ्यांच्या विषयी श्री. सोनेपंत दांडेकरांनी व्यक्त केलेले मत विचारात घेताना ते म्हणतात, "आचार्य सोनेपंत दांडेकरांच्या अभिप्रायात नामदेव-ज्ञानदेव यांच्या अंभगांची छाया चोखोबां-च्या अभंगांवर पडलेली दिसते हे विधान ग्राह्य मानता येत नाही उलट चोखोबांच्या अभंगांची छाया तत्सम इतर संतांच्या अभंगावर व ओव्यांवर पडलेली असावी असे

* दलितोध्दारक गुरुवर्य बनसोड : ना. रा. शेंडे. पृ. क्र. १०३

अनुमान संतसाहित्याच्या त्या त्या अभंगाशी तादात्म्य पावलेल्या दुसऱ्या टीकाकारांनाही करता येईल. कोणाची कोणावर छाया पडली असे विवाद्य स्वरूप कोणी कोणाला न दिलेले बरे" यावरून असे अनुमान काढावे लागते, की चोखोबांचे जे काही अभंग उपलब्ध आहेत, त्यांचा अभ्यासूंनी गंभीरपणे विचार केला तर असे दिसून येईल, की ज्ञानेश्वर-नामदेव आणि तुकाराम यांच्याच तोलामोलाचे कविमन असलेला विचारवंताना आव्हान देणारा चोखामेळा हा एक संतकवी होता.

'श्रीसंत चोखोबा महाराजांची पंढरपुरावर स्वारी' हा हरिभाऊ तोरणेंचा ग्रंथ १९२१ साली प्रकाशित करण्यात आलेला आहे. दलितोध्दारक किसन फागोजी बनसोड यांनीसुद्धा 'श्रीसंत चोखामेळा चरित्रग्रंथ गाथा' हा ग्रंथ १९४२ साली प्रसिद्ध केलेला आहे. हे दोन्ही ग्रंथ चोखामेळा या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकणारे आहेत. हरिभाऊ तोरणे ह्यांचा 'श्रीसंत चोखोबा महाराजांची पंढरपुरावर स्वारी' हा ग्रंथ अभ्यासताना संत चोखामेळा वर्णव्यवस्थेचा कसा बळी पडलेला आहे, त्याची कशी कोंडी झालेली आहे, ह्याची जाणीव होते. १९२१ साली हरिभाऊ तोरणेनी लिहिलेल्या छोट्याशा ग्रंथाकडे कुणाचेही लक्ष गेलेले दिसत नाही. या ग्रंथाला सोनु रामचंद्र कुलकर्णी, सत्यशोधक जलशाचे उत्पादक व चालक मौजे (मेडद) सोलापूर, जागो संतू बोरकर दाभा (यवतमाळ) व तायप्पा गंगाराम माने, कोंडर्की (सोलापूर) यांची प्रस्तावना लाभलेली आहे. या प्रस्तावनेत संत चोखोबांच्या संबंधी हरिभाऊ तोरणेंनी व्यक्त केलेले मत प्रखरपणे प्रस्तावनाकारांनी मांडलेले दिसून येते. "प्रस्तुत पुस्तकात लेखकाने म्हटलेल्या परमेश्वराच्या अभेदविश्वकुटुंबाच्या मंगल प्रचारात ज्यांनी भेदभावनेच्या विषाची पेरणी केली त्या नामधारी ब्राह्मणांचा अनुपम गर्व, तीव्र परमत्सर, स्वजातीवर्चस्वाचा श्रेष्ठ मोह, इतरांच्या मुंड्या मुरगाळून आपली तळघरे भरण्याचा परमधनलोभ इत्यादि दुर्विकाररुपी राक्षसांचा चोखोबांनी फन्ना उडविला. आपल्या अतुल सदाचार शास्त्राने ब्राह्मणाची राष्ट्रघातक, दुर्बुध्दी, कुटील निती इत्यादि राक्षसिणींचा नायनाट करून उज्ज्वल किर्तीची जयपताका फडकविली. हेच ते युद्ध आणि हीच ती पंढरपुरावरील स्वारी होय" * या म्हणण्यावरून पुस्तकाचे साधारण सार कळण्याजोगे असले तरी आम्हाला असे म्हणावेसे वाटते, की आरंभीच्या ग्रंथातील आणि लोकप्रचारातील समता, मध्यकाळी जातीमदांध ब्राह्मणांनी केलेली पुराणातील घुसडाघुसड आणि भट्टी, स्वैराचाराला आळा घालणारे श्रीमंत चोखोबारायाचे अवतारकार्य व आज मागासलेल्या लोकावर येऊन पडलेली जबाबदारी ही या पुस्तकात थोडक्यातच पण अगदी खुबीने वर्णिली आहेत." ८

---

* श्रीसंत चोखामेळामहाराज यांचे चरित्र व अभंगगाथा संपादक स. भा. कदम, प्रस्तावना

८ श्री. चोखामेळा महाराजांची पंढरपुरावर स्वारी, श्री. हरिभाऊ तोरणे, प्रस्तावना पृ. क्र. २

वरील उद्‌गार चोखोबांच्या विद्रोही विचारसरणीची साक्ष पटवून देणारे आहेत. किंबहुना विसाव्या शतकाच्या प्रारंभी हरिभाऊ तोरणे सारख्यांनी चोखोबाच्या विचारांचे महत्व ओळखलेले आहे. हरिभाऊ तोरणेंना संत चोखामेळ्याच्या विचारात जे मर्म गवसले, तेच विचारवंताना का दिसले नाही ? ते का उदासीन असावेत ? त्याचे कारण असे, की चोखोबांच्या विद्रोहाचे समर्थन केले तर संतवाङमयात त्यांचे अनन्यसाधारण असे महत्व लक्षात घ्यावे लागते. अद्यापही संत वाङमयाचे विश्लेषण करताना टीकाकार संत चोखामेळ्याबाबत असा अभिप्राय व्यक्त करितात, की " चोखामेळ्यासारख्या संताला सामाजिक विषमतेचे शल्य बोचत होते. परंतु त्याचे पूर्वसंस्कार इतके प्रबळ होते, की वारकरी संप्रदायात सर्व जातीचे संत एकत्र आलेले दिसत असले तरी वर्गसंघर्षाची जाणीव त्यांच्यात निर्माण झालेली नव्हती व समाज व्यवस्थेची चौकट मोडण्याचे मर्यादित उद्दिष्ट त्यांच्यासमोर होते. " * या मताचा विचार केला तर, आजची पुरोगामी विचारसरणी संत वाङमयाने वर्गसंघर्ष लक्षात घेतलेला नाही असे मत व्यक्त करते. वर्णव्यवस्थेपेक्षा वर्गसंघर्षाला प्राधान्य दिल्याने चोखामेळ्यासारख्या संताचे अस्पृश्यतेविरोधी असलेले मत लक्षात घेणे शक्य होऊ शकत नाही. म्हणूनच ना. रा. शेंडे ह्यांनी ' दलितोध्दारक गुरुवर्य बनसोड ' या ग्रंथात व्यक्त केलेले मनोगत अभ्यासण्याजोगे आहे. ते म्हणतात, " सुमारे ७०० वर्षापूर्वी, श्री संत नामदेव व श्री संत ज्ञानेश्वर हे महाराष्ट्राच्या त्या काळच्या पावनभूमीत जन्माला आले. अगदी त्याचसुमारास अस्पृश्योध्दारार्थ प्रतापी बंड पुकारणारा दलितवर्गातील श्रीसंत चोखामेळा हे जन्माला आले होते. संत चोखामेळा यांनी आपल्या स्वयंप्रज्ञेची आणि स्वयंध्येयधोरणाची जी आध्यात्मिक चौकट निर्माण करुन पंढरीचा विठोबा हा आपल्या आराध्यासाठी व अर्चनेसाठी प्रतिकात्मक स्वरुपाचा जरी ' देव ' कल्पिला होता तरी त्यातील देवत्व मनुष्यत्वात आविष्कृत होत नसेल तर तो देव ' देव ' नव्हे अशी प्रखर भूमिका सवर्ण हिंदूंच्या अमानुष छळातून निर्माण झाली होती. आणि तत्संबधीच्या प्रक्रियेतून चोखोबांच्या अंगारयुक्त बोलांनी संपूर्ण मराठी मुलूख पेट घेऊन उठला होता ! याची तीव्र जाणीव लक्षात घेऊन, गुरुवर्य बनसोड यांनी बुलडाणा जिल्ह्यातील संत चोखोबांच्या मेहुणा या जन्मगावी जाऊनच नव्हे तर त्यांच्या पंढरपूर दैवतस्थानी व कर्मभूमी असलेल्या मंगळवेढा आदीच्या भूभागात संशोधनात्मक दृष्टीने भ्रमण करुन सत शतकापूर्वीच्या त्या मराठी मुलखाच्या टापूतील दाहक वस्तुस्थितीचे आणि त्याकाळी निर्माण झालेल्या मान्यवर साधुसंतांच्या प्रभावळीतील संतवाङमयाचे सूक्ष्म संशोधन केले व त्या त्या संताच्या आचरणाचा, विचारांचा व भावनांचा

* समाज आणि साहित्य, अविनाश सहस्त्रबुध्दे पृ. क्र – ५४

तौलनिक दृष्टीने अभ्यास करून, श्रीसंत चोखामेळा यांचे माहात्म्य तळमळीने आविष्कृत करण्याचा कसोशीने प्रयत्न केला." * अविनाश सहस्त्रबुध्दे यांनी चोखामेळ्याविषयी व्यक्त केलेले विचार किंवा ना. रा. शेंडेनी व्यक्त केलेली भावना विचारात घेतली तर चोखोबा सारख्याच्या वाट्यास आलेले उपेक्षित जीवन आणि त्यामागील कार्यकारणभाव डोळसपणे पहावा लागतो. चोखामेळ्यासारख्याने वर्गसंघर्ष करणे तर सोडाच साधा अस्पृश्यतेविरोधी टाहो फोडणेही परिस्थितीने कसे अशक्य करुन सोडले होते, ह्याचे प्रत्यंतर चोखोबाच्याच अभंगातून होते. ते असे :

'जोहार माय बाप जोहार। तुमच्या महाराचा मी महार ॥
बहु भुकेला जाहलो। तुमच्या उष्ट्यासाठी आलो ॥
बहु केली आस। तुमच्या दासाचा मी दास ॥
किंवा
धाव घाली विठू आता चालू नको मंद।
मज मारीती बडवे काहीतरी अपराध ॥
किंवा
त्रासिलो, गांजीलो विटाळे। सोडवी आता मज चक्रपाणी ॥
एकावरी एक पडती आघात। सोसवेना आता काय करु ॥

'जोहार माय बाप', 'बहु भुकेला' 'मारीती बडवे', त्रासीले 'गांजीले', 'विटाळे' 'पडती आघात' आणि 'सोसवेना' इ. शब्दांतून अस्पृश्य समाजाच्या वाट्यास आलेले जीवन, त्यांनी सोसलेल्या नरकमय यातना यांचा चलत्‌चित्रपट डोळ्यांसमोर उभा राहातो. चोखोबांनी प्रातिनिधिक स्वरूपात अस्पृश्य समाजाची दुःस्थिती आपल्या अभंगांतून प्रकट करण्याचा जो प्रयत्न केलेला आहे, जी मानसिक अवस्था व्यक्त केलेली आहे, ती समजून घेतली तर चोखोबा 'दीनवाणा' नव्हता तर परिस्थितीने त्याच्यावर आणि त्या काळच्या अस्पृश्य समाजावर दीनवाणे, लाचार आणि अमानुष जीवन लादलेले दिसून येते. वर्णाश्रमाचा त्याकाळी केवढा जबदरस्त प्रभाव होता ह्याची कल्पना न केलेली बरी! संत नामदेवाच्या स्वप्नसृष्टीचे वाङ्मयीन मूल्यमापन करताना प्रा. वा. ल. कुळकर्णी म्हणतात, "ह्या सृष्टीत नामदेव आणि विठोबा यांचा सतत हृदयसंवाद चालतो. ह्या संवादात अनेकदा रखुमाईही भाग घेते. विठोबारखुमाईशी नामदेवाचे असलेले अत्यंत जिव्हाळ्याचे नाते तेथे प्रकट होत असते" § असाच हृदयसंवाद चोखामेळा आणि विठोबात चालतो म्हणूनच चोखामेळा म्हणतो, "धाव घाली विठू आता चालू नको मंद। मज मारिती बडवे काहीतरी अपराध॥ नामदेवासाठी रागावलेल्या

---

* दलितोध्दारक गुरुवर्य बनसोडः ना. रा. शेंडे. पृ. क्र. १००

§ मराठी कविता : जुनी आणि नवी, पृ. क्र. २१

ब्राम्हणांना उपदेश करणारा, वर्णाश्रम धर्माविरुद्ध वर्तन झाल्यामुळे नामदेवाप्रित्यर्थ ब्राम्हणांनी सांगितलेले प्रायश्चित्त स्वतः घेणारा विठोबा, बडवे चोखोबास मारीत असतानाही पक्षपाती दिसून येतो. नामदेवाचा काय, किंवा चोखोबाचा काय, विठोबाशी जो हृदयसंवाद चालतो त्यातून त्याकाळी असलेल्या समाजस्थितीचेच यथार्थ वर्णन स्पष्ट होते. वर्णाश्रमधर्माचा अंमल आणि बडवेशाही किती पराकोटीला गेलेली होती, ह्यावर अधिक भाष्य करण्याची गरज उरत नाही.

तात्पर्य, ज्ञानेश्वर, नामदेव आणि चोखामेळा ह्यांच्यावर वर्णाश्रमधर्माचा आणि वर्णाश्रमधर्मास प्राणपणाने जपणाऱ्या त्याकाळच्या ब्राम्हणांचा जबरदस्त प्रभाव असल्याचे दिसून येते. ही वास्तवता लक्षात न घेताच पुरोगामी विचारवंत म्हणविणारे अनेकदा "ज्ञानेश्वरांचा पिंड हा बहुजन समाजाकडे ओढल्या जाणाऱ्या, त्याच्याशी मिसळून जाणाऱ्या क्रान्तिकारकाचा होता म्हणूनच ते सनातन्यांचा विरोध सहन करून स्त्री–शूद्रादिकांना मानवतेचा अधिकार देऊ शकले" ÷ अशी गफलत करून टाकतात. ज्ञानेश्वरीत जे 'धर्मकीर्तन' ज्ञानेश्वरांनी सांगितले ते शेवटी आहे तरी काय? असा प्रश्न निर्माण केला तर भगवद्गीतेत श्रीकृष्णार्जुन संवाद आहे. तोच ज्ञानेश्वरीत आहे. भगवद्गीता चातुर्वर्ण्याचा पुरस्कार करताना म्हणते :

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः
तस्य कर्तारमपि मां विध्दयकर्तारमव्ययम् ॥ ४–५३ ॥

जर भगवद्गीतेतून चातुर्वर्ण्याचा पुरस्कार होत असेल तर तो ज्ञानेश्वरीतून होणेही अपरिहार्य आहे. ज्ञानेश्वरांचे मोठेपण मराठी वाचकांवर एवढे बिंबले आहे, की त्यामुळे कळत न कळत ज्ञानेश्वरांचे नाहीत ते गुणविशेष सांगण्याचा मोहसुध्दा विचारवंताना अनावर होतो. ज्ञानेश्वर जे 'धर्मकीर्तन' सांगतात ते ऐकण्यासाठी श्रोते जमलेले आहेत. "समोर बसलेल्या श्रोत्यांची जाणीव ज्ञानेश्वरांना प्रारंभापासून अखेरपर्यंत आहे. ज्ञानेश्वरीत असा एकही अध्याय नाही, की त्यात ही जाणीव कोठे ना कोठे व्यक्त झालेली नाही. आपण बोलत आहोत ते श्रोत्यांशी, वाचकांशी नव्हे, व हे श्रोतेदेखील सर्व थरातील आहेत, ते जिज्ञासू असले तरी काही पंडीत नाहीत, ह्याची त्याना पूर्ण कल्पना आहे" + अशा विधानांतून ज्ञानेश्वरांनी सांगितलेल्या धर्मकीर्तनाची सार्वत्रिकता दिसून येत असली तरी ती फसवी आहे कारण वर्णाश्रमानुसार आचरण करणारे आणि त्यानुसार चोखोबाला छळणारे कोणत्या मनोवृतीचे असातेत ह्याचा बोध होत असतानाही अस्पृश्यांना धर्मकीर्तनात सहभागी होता आले असेलच ह्याची शाश्वती देता येत नाही. हा विचार

÷ समाज आणि साहित्यः अविनाश सहस्रबुध्दे. पृ. क्र. ५४
+ मराठी कविताः जुनी आणि नवीः प्रा. वा. ल. कुलकर्णी पृ. क्र. २

ज्ञानेश्वरांचे मोठेपण उलगडणारे विचारात का घेत नाहीत ? अस्पृश्य छळ सोसतो तेव्हा त्यात स्वाभाविकता असते. आणि उच्चकुलीन मात्र सनातन्याचा जाच सोसतो तेव्हा तो क्रान्तिकारक ठरतो. हा जो निष्कर्ष तथाकथित पुरोगामी विचारवंत काढतात तेव्हा पुरोगामीत्वाबाबत गंभीरपणे विचार करावा लागतो. कारण चोखामेळा आणि ज्ञानेश्वर यांच्यातील फरक लक्षात घेतानाच, किंबहुना ज्ञानेश्वरांचे श्रेष्ठत्व सिध्द करण्याच्या हट्टापायी पुरोगामी विचार विश्वासार्हता गमावून बसतो. पुरोगामीत्व सिध्द करणाऱ्यांच्या भूमिकेबद्दलच संशय घेण्यास वाव मिळतो. त्याचे कारण उघड आणि स्पष्ट आहे. "ज्ञानेश्वरादिकांची भूमिका समन्वयशील होती. चातुर्वर्ण्यावर त्यांनी सरळ आघात केला नाही, सामाजिक विषमतेवरती प्रहार केले नाहीत हे खरे परंतु त्या काळाच्या मर्यादा होत्या * अशी स्वतःची समजूत करून घेऊन ज्ञानेश्वरांना क्रांतिकारत्व बहाल करणारी मनोवृत्ती कोणत्या दृष्टीचा परिपाक आहे ह्याचा उलगडा करणे फारसे अवघड नाही. ज्ञानेश्वर काळाच्या मर्यादेत राहूनही क्रांतिकारक आणि स्त्री शुद्रादिकांना मानवतेचा अधिकार देणारे कवी, तर त्याच मालिकेतील उघड उघड जातीयवादावर, ब्राम्हण श्रेष्ठत्वावर प्रहार करणारा परंतु शुद्र समाजात जन्मलेला संत चोखामेळा मात्र 'दीनत्राणा' कवी होता असा उल्लेख करण्याचे धाडस केले जाते तेव्हा ही पुरोगामी विचारसरणी उघडपणे कोणत्या संस्कृतीच्या छायेखाली वावरते, ह्याची स्पष्ट जाणीव होते.

वर्गसंघर्ष पेटविण्याचा पिंड संतांच्या ठायी असणे काळाच्या मर्यादेमुळे शक्यच नव्हते. वर्गसंघर्ष पेटविणे हे संत चोखामेळ्याचेही उद्दिष्ट नसले तरी सामाजिक समता प्रस्थापित करणे हेच ध्येय त्यांनी जपलेले नाही असे म्हणण्याचे धाडस मात्र करता येत नाही. कोणत्याही संतापेक्षा चोखोबाच्या जातीयतेच्या भस्मासुरविरोधी भावना अतिशय तीव्र होत्या. याबाबत त्यांनी पुकारलेला विद्रोह त्यांच्या प्राणांचे मोल घेऊन गेलेला आहे, ह्याची जाणीव "श्री चोखामेळा महाराजांची पंढरपुरावर स्वारी" या पुस्तकावरून होते. भक्तीमार्गातील निर्मळ आणि सर्वस्पर्शी जीवनातही किती खोलवर जातियता पसरलेली होती, ह्याचा चोखोबांनी अनुभव भोगलेला आहे. संतलीला अध्याय ३० चा आधार घेऊन चोखोबांचे मनोगत तोरणेंनी आपल्या पुस्तकात व्यक्त केलेले आहे. ते असे, "दिवानसाहेब आणि सभाजन हो, जरी मी होऊन देवाला जेऊ घातले असले किंवा देव माझ्या घरी नेहमी येऊन जेवत असले तरी त्यात काय बिघडले ! कारण आपणा सर्वांचे हस्तपदादि अवयव, चेहऱ्याची बनावट वगैरे वगैरे मध्ये बाह्यतः कोठे फरक असला तरी सर्वांचा इंद्रियचालक आत्मा अभेद आहे. तो सर्वांच्या देहात असून वर्ण, जाती वगैरे

---

* समाज आणि साहित्य, अविनाश सहस्त्रबुध्दे पृ. क्र. ५५

कल्पित उपाधी त्याला बांधत नाहीत. तसेच ज्या पृथ्वीवर आपण राहतो, त्या वाऱ्यावर आपले सर्वांचे जीवन अवलंबून आहे. ज्या गंगादिकांच्या पाण्यात आपण स्नानादि कर्मे करून ते पितो. ते पाणी, वारा किंवा प्राणरक्षक हवा, पृथ्वी, सूर्य, प्रकाश ही कधीकाळी कोणाच्या तरी स्पर्शाने बाटली आहेत काय ? *

चोखोबांनी भक्तीमार्गात स्वतःचे मन गुंतवून हे मत त्या काळी व्यक्त केलेले आहे. परंतु आजची विद्रोही कविता तरी यापेक्षा कोणता वेगळा सूर लावते ? ईश्वर, भक्ती, आत्म्याचे अस्तित्व हे आजच्या विद्रोही कवितेला मान्य नाहीच तरीही चोखोबांनी चातुर्वर्ण्य याबाबत जो अनुभव व्यक्त केला, तोच विद्रोही कविता स्पष्ट करते, ज्ञानेश्वरासारख्या कवीला क्रांतीकारकत्व बहाल करताना त्यांनी असे मत कधी व्यक्त केलेले आहे, की नाही ? ह्याची जाणीव पुरोगामी विचारसरणीने ठेवणे आवश्यक आहे. चोखोबांनी असे मत व्यक्त केल्याने त्यांची विटंबना किती आणि कशाप्रकारे झाली हे सांगताना हरिभाऊ तोरणे म्हणतात. "हे सत्यपदिप्लुत वाग्बाण त्या कर्मठ ब्राह्मणाच्या वक्षस्थळी खोचले आणि दिवाणसाहेबांच्याही प्रदिप्त क्रोधाग्नी-वर धृतसींचन झाल्यासारखे होऊन त्यांनी देव बाटविल्याचा गुन्हा चोखोबावर शाबीत केला. व त्यास बैलाकडून ओढवून ठार मारण्याची शिक्षा दिली !" ऽ

वर्णवर्चस्वाचा पगडा असणाऱ्या सामाजिक स्थितीचा परिपाक म्हणूनच या घटनेकडे पहावे लागते.

---

* श्री. चोखामेळा महाराजांची पंढरपुरावर स्वारीः हरीभाऊ तोरणे पृ. क्र. १९–२०

ऽ श्री. चोखामेळा महाराजांची पंढरपुरावर स्वारीः हरीभाऊ तोरणे पृ. क्र. २०

**केशवसुत :**

कवि केशवसुतांचा उल्लेख वारंवार आदि विद्रोही कवी म्हणून केला जातो. कवि यशवंत मनोहरांनी आपला 'उत्थानगुंफा' हा काव्यसंग्रह केशवसुतांना अर्पण केला आहे. "माझ्या कवितेला कुळारंभ देणाऱ्या मराठीतील आदिविद्रोही कवि केशवसुतांना." मनोहरांनी हा जो केशवसुतांचा गौरव केलेला आहे त्याचे समर्थन करताना प्रा. भालचंद्र फडके म्हणतात, "आपल्या कवितेला कुळारंभ देणाऱ्या मराठीतील आदि विद्रोही कवीलाही ते अभिवादन करतात. कारण, "जरी त्यावरी सावली माझी गेली, तरी काय बाधा असे ठेवलेली!" असा अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न केशवसुतांनीच प्रथम मांडला. अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न कवितेतून विचारणारा केशवसुत आदिविद्रोही म्हणून कुणाच्या कवितेला कुळारंभ देणारा ठरत असेल आणि तसे समर्थन त्या कवीकडून होत असेल तर ती चिंतेची बाब मानावी लागते. विद्रोही कविता केशवसुताऐवजी डॉ. आंबेडकरना प्रेरणास्थान का मानते ? यात केशवसुतानाच समजून घेताना काही गफलत होत आहे की काय ? अशी शंका उत्पन्न होते.

केशवसुत वृत्तीने बंडखोर कवी होता. या बंडखोरपणामागे सृजनशील मन होते. जनजागरणाची लालसा होती. त्यांनी आपल्या हृदयात खोलवर ध्येयवाद रुजवलेला होता. आणि या ध्येयवादास बोधवादाची साथ होती. खरे तर केशवसुत ज्या कालखंडात कवितेतून वावरत होते तो कालखंडच मुळी जहाल राष्ट्रवादी भूमिका घेणाऱ्या न्या. रानडे, आगरकर व गोखले या सुधारणावादींचा होता. "स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे" असा स्वातंत्र्यवादी बुलंद आवाज करणाऱ्या टिळकांचा होता. ह. ना. आपटे, वा. म. जोशी व केशवसुत यासारखे ललित साहित्यिक याच कालखंडात वावरत होते. चैतन्यमय वातावरण निर्मिती करणे, जहाल राष्ट्रवादी भूमिका घेणे, मानवी स्वातंत्र्याचा उद्घोष करणे आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणे इ. चे काळाची गरज म्हणून केशवसुतांच्या कवितेने दायित्व स्वीकारलेले आहे. मराठी साहित्यात हा दृष्टिकोण सर्वस्वी नवा होता. या आधीचे साहित्य लोकरंजनात अडकून पडलेले होते. पारलौकिकाकडून इहलौकिकापर्यंतच ते घुटमळत होते. या वाङ्मयावर उच्चवर्णीयांची संपूर्ण मिरासदारी असल्याने 'अध्यात्मवाद' हेच मध्यवर्ती सूत्र अतिशय सफाईदारपणे सांभाळलेले दिसून येते. कवितेचा आशय, आविष्कार, अभिव्यक्ति आणि काव्यविषयक दृष्टिकोणात बदल घडवून आणणे ही त्यावेळी काळाचीच गरज होती. कवितेला राजकीय व सामाजिक पार्श्वभूमी प्राप्त करुन देणे आवश्यक होते. केशवसुतांनी मानवी मनाला अनन्य-साधारण महत्व दिल्याने केशवसुतांच्या व्यक्तिमत्वाचा कवितेवर प्रभाव पडलेला

कल्पित उपाधी त्याला बांधत नाहीत. तसेच ज्या पृथ्वीवर आपण राहतो, त्या वाऱ्यावर आपले सर्वांचे जीवन अवलंबून आहे. ज्या गंगादिकांच्या पाण्यात आपण स्नानादि कर्मे करून ते पितो. ते पाणी, वारा किंवा प्राणरक्षक हवा, पृथ्वी, सूर्य, प्रकाश ही कधीकाळी कोणाच्या तरी स्पर्शाने बाटली आहेत काय ? *

चोखोबांनी भक्तीमार्गात स्वतःचे मन गुंतवून हे मत त्या काळी व्यक्त केलेले आहे. परंतु आजची विद्रोही कविता तरी यापेक्षा कोणता वेगळा सूर लावते ? ईश्वर, भक्ती, आत्म्याचे अस्तित्व हे आजच्या विद्रोही कवितेला मान्य नाहीच तरीही चोखोबांनी चातुर्वर्ण्य याबाबत जो अनुभव व्यक्त केला, तोच विद्रोही कविता स्पष्ट करते, ज्ञानेश्वरासारख्या कवीला क्रांतीकारकत्व बहाल करताना त्यांनी असे मत कधी व्यक्त केलेले आहे, की नाही ? ह्याची जाणीव पुरोगामी विचारसरणीने ठेवणे आवश्यक आहे. चोखोबांनी असे मत व्यक्त केल्याने त्यांची विटंबना किती आणि कशाप्रकारे झाली हे सांगताना हरिभाऊ तोरणे म्हणतात. "हे सत्यपदिप्लुत वाग्बाण त्या कर्मठ ब्राह्मणाच्या वक्षस्थळी खोचले आणि दिवाणसाहेबांच्याही प्रदिप्त क्रोधाग्नी-वर घृतसींचन झाल्यासारखे होऊन त्यांनी देव बाटविल्याचा गुन्हा चोखोबावर शाबीत केला. व त्यास बैलाकडून ओढवून ठार मारण्याची शिक्षा दिली !" ऽ

वर्णवर्चस्वाचा पगडा असणाऱ्या सामाजिक स्थितीचा परिपाक म्हणूनच या घटनेकडे पहावे लागते.

---

* श्री. चोखामेळा महाराजांची पंढरपुरावर स्वारीः हरीभाऊ तोरणे पृ. क्र. १९–२०

ऽ श्री. चोखामेळा महाराजांची पंढरपुरावर स्वारीः हरीभाऊ तोरणे पृ. क्र. २०

**केशवसुत :**

कवि केशवसुतांचा उल्लेख वारंवार आदि विद्रोही कवी म्हणून केला जातो. कवि यशवंत मनोहरांनी आपला 'उत्थानगुंफा' हा काव्यसंग्रह केशवसुतांना अर्पण केला आहे. "माझ्या कवितेला कुळारंभ देणाऱ्या मराठीतील आदिविद्रोही कवि केशवसुतांना." मनोहरांनी हा जो केशवसुतांचा गौरव केलेला आहे त्याचे समर्थन करताना प्रा. भालचंद्र फडके म्हणतात, "आपल्या कवितेला कुळारंभ देणाऱ्या मराठीतील आदि विद्रोही कवीलाही ते अभिवादन करतात. कारण, "जरी त्यावरी सावली माझी गेली, तरी काय बाधा असे ठेवलेली!" असा अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न केशवसुतांनीच प्रथम मांडला. अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न कवितेतून विचारणारा केशवसुत आदिविद्रोही म्हणून कुणाच्या कवितेला कुळारंभ देणारा ठरत असेल आणि तसे समर्थन त्या कवीकडून होत असेल तर ती चिंतेची बाब मानावी लागते. विद्रोही कविता केशवसुताऐवजी डॉ. आंबेडकरना प्रेरणास्थान का मानते? यात केशवसुतानाच समजून घेताना काही गफलत होत आहे की काय? अशी शंका उत्पन्न होते.

केशवसुत वृत्तीने बंडखोर कवी होता. या बंडखोरपणामागे सृजनशील मन होते. जनजागरणाची लालसा होती. त्यांनी आपल्या हृदयात खोलवर ध्येयवाद रुजवलेला होता. आणि या ध्येयवादास बोधवादाची साथ होती. खरे तर केशवसुत ज्या कालखंडात कवितेतून वावरत होते तो कालखंडच मुळी जहाल राष्ट्रवादी भूमिका घेणाऱ्या न्या. रानडे, आगरकर व गोखले या सुधारणावादींचा होता. "स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे" असा स्वातंत्र्यवादी बुलंद आवाज करणाऱ्या टिळकांचा होता. ह. ना. आपटे, वा. म. जोशी व केशवसुत यासारखे ललित साहित्यिक याच कालखंडात वावरत होते. चैतन्यमय वातावरण निर्मिती करणे, जहाल राष्ट्रवादी भूमिका घेणे, मानवी स्वातंत्र्याचा उद्‌घोष करणे आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणे इ. चे काळाची गरज म्हणून केशवसुतांच्या कवितेने दायित्व स्वीकारलेले आहे. मराठी साहित्यात हा दृष्टिकोण सर्वस्वी नवा होता. या आधीचे साहित्य लोकरंजनात अडकून पडलेले होते. पारलौकिकाकडून इहलौकिकापर्यंतच ते घुटमळत होते. या वाङ्मयावर उच्चवर्णीयांची संपूर्ण मिरासदारी असल्याने 'अध्यात्मवाद' हेच मध्यवर्ती सूत्र अतिशय सफाईदारपणे सांभाळलेले दिसून येते. कवितेचा आशय, आविष्कार, अभिव्यक्ति आणि काव्यविषयक दृष्टिकोणात बदल घडवून आणणे ही त्यावेळी काळाचीच गरज होती. कवितेला राजकीय व सामाजिक पार्श्वभूमी प्राप्त करून देणे आवश्यक होते. केशवसुतांनी मानवी मनाला अनन्यसाधारण महत्व दिल्याने केशवसुतांच्या व्यक्तिमत्वाचा कवितेवर प्रभाव पडलेला

आहे. निव्वळ प्रभावच पडलेला आहे असे नसून ती काव्यविश्वातली अभिनव क्रांती ठरली. म्हणूनच केशवसुतांना नवकवितेच्या संप्रदायाचे जनकत्व बहाल करण्यात आले. केशवसुतांचे मोठेपण त्यांच्या आत्मबलात आहे. त्यामुळे त्यांचे व्यक्तित्व दीप्तिमान व प्रखर झालेले असून कवितेचे स्वरूप ठरविण्याऱ्यांना ते उद्दामपणाने आव्हान देतात. हीच केशवसुतांच्या विद्रोहीपणाची खूण आहे. या विद्रोहामागील खरी 'प्रेरणा' स्वातंत्र्याची लालसा, ही होय. नवसमाज घडविण्याचे स्वप्न ही प्रेरणा १८७५ ते १९२० या कालखंडात पहात होती. त्याचा स्वाभाविक परिणाम नव्या–जुन्या मूल्यांचा संघर्ष, वैचारिक संघर्ष आणि वेगवेगळ्या प्रवृत्तीच्या संघर्षावर होणे अटळ होते. त्यामुळे कवीची तटस्थता टाळणेच केशवसुतांनी योग्य मानले. त्याचे कारण असे, की समाजात आधुनिक विज्ञानामुळे बदल घडत होता. सामाजिक सुधारणा समाजात रुजण्यासारखे वातावरण होते. अशा वातावरणातून बंडखोरीचा पवित्रा घेण्यास केशवसुताना आत्मविश्वास प्राप्त करणे सहज शक्य झाले. पृथ्वीला स्वर्ग बनविण्याचे स्वप्न त्यांनी कवितेतून जपलेले आहे. जगाला बदलविण्याचे सामर्थ्य कवितेत आहे ह्याचा आत्मप्रत्यय त्यांना आला. नवीन साम्राज्य निर्माण करण्याचे व शांततेची प्रस्थापना करण्याचे ध्येय त्यांनी बाळगलेले आहे आणि म्हणूनच सर्वच क्षेत्रांत बंडखोरी करणे अटळ आहे. असा आशावादी सूर त्यांनी व्यक्त केला. त्यामुळे मानवतावादी दृष्टिकोणाचे भाव त्यांना अपरिहार्यतेपोटी जपावे लागले.

मराठी कवितेला नवा आशय, अभिव्यक्ति आणि आकृतीबंध जसा केशवसुतांनी प्राप्त करून दिला, तशीच सामाजिकतेची जाणीवही करून दिली. यामुळे नवी दिशा, नवे वळण केशवसुतानी मराठी कवितेला दिले म्हणून त्यांचा विद्रोही कवी म्हणून उल्लेख होणे समजण्यासारखे आहे. परंतु आजच्या विद्रोही कवितेच्या संदर्भात केशवसुतांचा आदिविद्रोही कवी म्हणून उल्लेख होतो, त्याबाबत मात्र काळजीपूर्वक विचार करण्याशिवाय गत्यंतर उरत नाही. आजच्या विद्रोही कवितेचा नकार, बंड, विद्रोह आणि प्रक्षोभ इ. ज्या भूमिकेसाठी व्यक्त होतो, तो येथील पारंपारिक मूल्याविरुद्ध, जातीव्यवस्था, चातुर्वर्ण्यव्यवस्था, अंधश्रध्दा, कर्मविपाकपाद, धार्मिकमूल्ये आणि सरंजामशाही व्यवस्था नष्ट करण्यासाठी आहे. या पार्श्वभूमीच्या अनुषंगाने केशवसुतांच्या कवितांचा विचार करणे अटळ मानावे लागते.

"ब्राम्हण नाही, हिंदूही नाही, न मी एक पंथाचा
तेच पतित की जे आखडीत प्रदेश साकल्याचा"

अशी भूमिका केशवसुतानी घेतलेली आहे. 'तुतारी' 'नवा शिपाई' आणि 'स्फूर्ती' यासारख्या त्यांच्या कविता एका वेगळ्या अर्थाने विचारात घेण्यासारख्या आहेत. 'स्फूर्ती' सारख्या कवितेतून त्यांनी बंडाचे निशाण उभे करण्याचा आभास निर्माण केलेला आहे.

'बंडाचा तो झेंडा उभवुनी धामधुम जिकडे तिकडे
उडवुनी देऊन जुलमाचे या करू पहा तुकडे तुकडे'

असे केशवसुत म्हणतात. त्यांच्या भावभावनांचे प्रतिबिंब त्यातून उमटते. आत्मविश्वास द्विगुणीत झाल्याने 'तुतारी' या कवितेत केशवसुतांना अघटित असे काहीतरी सांगावयाचे आहे. ते म्हणतात.

एक तुतारी द्या मज आणुनी
फुंकिन मी जी स्वप्राणाने,
भेदुनि टाकीन सगळी गगने
दीर्घ जिच्या त्या किंकाळीने
अशी तुतारी द्या मज आणुनि

बंडाची भाषा बोलणाऱ्या कवीच्या हातात कुणी तुतारी आणून द्यावी आणि तिचा उपयोग त्याने सामाजिक हेतू प्राप्तीसाठी करावा, हा कल्पनाविलास आपण समजू शकतो. परंतु दलितोध्दाराचे नेमके ध्येय 'तुतारी' किंवा 'अंत्यजाच्या मुलाचा प्रश्न' या कवितांना अभिप्रेत होते की नाही, हे सांगणे अवघड आहे. 'एक तुतारी द्या मज आणुनी' या ओळीतून व्यक्त होणारा आशय अभिव्यक्तिच्या मर्यादा स्पष्ट करून जातो. स्वांतत्र्याच्या प्रेरणेतून बंडखोरपणा अवतरलेला असल्यामुळे केशवसुतांनी व्यक्तिस्वांतत्र्याची अभिलाषा मनात ठेवून अनेकाविध विषयाशी कधी सुसंगत तर कधी विसंगत असे नाते सांगणारी कविता निर्माण केली. त्यामुळे 'तुतारी' ही कविता स्वातंत्र्याच्या प्रयोजनासाठी, की दलितोध्दारासाठी आहे, हे ठरविणे कठीण काम आहे. खरे तर ती स्वातंत्र्याच्या प्रयोजनासाठीच असावी, यात संदेह नाही. मराठी कवितेला वेगवेगळ्या कारणास्तव हादरविणाऱ्या या कवीला क्रान्तिकारकत्व बहाल करणाऱ्या काही अतीउत्साही विद्रोही कवींचा आणि टीकाकारांचा दृष्टीकोण आपुलकी हाच असला पाहिजे. "कोठे स्वर्गसमक्षता प्रकटते हे नेहमी पाहणे' हा त्यांचा संदेश 'गोफण हाणा' 'रुढी मोडा' या संदेशाहून अधिक महत्त्वाचा आणि अधिक 'त्यांचा' असा आहे" "तुतारी' केवीलवाणे मागणे मागत आहे. जो कोणी ती तुतारी केशवसुतांना आणून देईल तेव्हा तो कवी ती तुतारी स्वप्राणाने फुंकणार आणि त्या तुतारीच्या आवाजाने क्रान्तीचे वातावरण निर्माण होईल. ज्यामुळे सामाजिक विषमतेच्या पारंपारिक कल्पनेला, रूढीला, जातीभेदाला हादरे बसून ही भेदाभेदाची, उच्चनीचतेची, वरिष्ठ–कनिष्ठतेची सारी इमारतच कोसळून पडेल. असा दावा केशवसुतांना अभिप्रेत असावा व त्यादृष्टीने कवि केशवसुत मराठी साहित्यातील एक तेजस्वी बंडखोर क्रान्तिकारक या बिरुदाने रूढ केले गेले. हक्क मागून मिळत नसतात. त्यासाठी संघर्ष करावा लागतो. मानवी

स्वातंत्र्याची व समतेची केवळ स्वप्ने बघून चालत नाही. त्यासाठी आडवे येणाऱ्या रूढीला नि भेदाला निकराचा विरोध करुन मुक्तीमार्गाचे अडसर दूर करावे लागतात." ※ असे स्पष्टपणे भाऊसाहेब अडसूळ म्हणतात. तेव्हा केशवसुतांच्या आदिविद्रोही भूमिकेच्या संदर्भात काही मुलभूत प्रश्न निर्माण होतात.

कवि केशवसुतांच्या विद्रोही भूमिकेचे समर्थक आणि विरोधक ह्यांच्यात साम्य न आढळणे, व्यक्तिच्या विशिष्ट दृष्टिकोणामुळे समजण्यासारखे आहे परंतु कार्यकारण भावासंबंधी उदासीन असणे वा अतिउत्साही असण्याचे कारण नाही. केवळ केशवसुतांच्या आदिविद्रोहाचे समर्थन करताना केशवसुतांशी फार जवळीक साधण्याचा प्रयत्न करणे आणि केशवसुतांच्या विद्रोहाशी नाते संबंध जुळवून आणण्याचा घाट रचणे, ही मानसिक प्रवृत्ती असू शकते. केशवसुतांचे मराठी काव्यातील स्थान अढळ आहे म्हणून त्यांना आदिविद्रोही ठरवून स्वतःच्या विद्रोही भूमिकेसाठी पाठपुरावा करणे समर्थनीय ठरत नाही. तसा प्रयत्न कोणी करणे औचित्यपूर्ण नाही.

आपल्या विद्रोही भूमिकेचे समर्थन करताना यशवंत मनोहरांनी, "आणि केशवसुतांनीच खुद्द तुतारी माझ्या हातात दिली आहे." * असे म्हटले आहे. तर आणखी एका कवितेत,

"केशवसुता,
आम्ही ज्वालामुखी झालो आहोत
इथल्या काळोखाशी
आम्ही तुझ्या दाहकतेने भांडू लागलोत" ※

असा साक्षात्कार कविमनाला झाला आहे. भालचंद्र फडकेसारखे टीकाकार, "यशवंत मनोहरांची कविता मराठी कवितेतील पारंपारिकतेविरूध्द, विचारदारिद्र्याविरुध्द विफलग्रस्ततेविरुध्द, तर उभी आहे, पण या ना त्या कारणाने माणसाचे माणूसपण नाकारणाऱ्या प्रवृत्तिविरुध्द ती उभी आहे." ऽ असे म्हणून यशवंत मनोहरांचे केशवसुतांशी नाते दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. असाच प्रयत्न म. सु. पाटलांनीही केलेला आहे. ते म्हणतात, "तो आपले नाते, थोडेफार केशवसुतांशी असल्याचे मानतो हे या संदर्भात मोठे अर्थपूर्ण आहे" + बाबुराव बागुलांचा यशवंत मनोहरांबाबतचा जिव्हाळा लक्षात घेतला म्हणजे प्रा. यशवंत मनोहर यांची कविता, "केशवसुती

※ दलित साहित्य कां नको : विजय सोनवणे. प्रस्तावना पृ. क्र. ३८
* उत्थानगुंफा : यशवंत मनोहर पृ. क्र ६४ किंवा–
※ उत्थानगुंफा : यशवंत मनोहर पृ. क्र. ७५
ऽ दलित साहित्य प्रकाश यात्रा : भालचंद्र फडके. पृ. क्र. ६४
+ दलित कविता : म. सु. पाटील. पृ. क्र. ५

काव्यपरंपरेचा आजचा प्रखरतम टप्पा होते. विद्रोही काव्यपरंपरेचा कळस होते" + असे उद्गार यशवंत मनोहरांच्या कवितेबाबत त्यांच्याकडून निघणे सहज शक्य आहे. यशवंत मनोहरांचा काव्यप्रकृतिपिंड कोणता आहे, हा स्वतंत्रपणे विचार करण्यासारखा प्रश्न आहे. केशवसुतांना आदिविद्रोही ठरवून यशवंत मनोहरांच्या कवितेचे नाते त्यांच्याशी जोडणे कोणी सोयीचे मानीत असतीलही परंतु त्यामुळेच केशवसुत वादग्रस्त होतात, हे भान मात्र ठेवले जात नाही. केशवसुतांची निखळ कविप्रवृत्ती लक्षात घेऊनच त्यांच्या सामाजिक बांधिलकीचा विचार करावा लागतो. इथल्या काळोखाशी भांडताना आणि ज्वालामुखी होताना तुझ्या दाहकतेने आम्ही भांडू लागलो, असे जेव्हा यशवंत मनोहर म्हणतात तेव्हा सामाजिकबांधिलकीच्या संदर्भात केशवसुतांच्या मर्यादा स्पष्टपणे लक्षात येतात. तरीही अशा कवीशी आपले विद्रोहाचे नाते जुळवून आणणे फारसे कठीण नाही. प्रश्न नाते व्यक्त करण्याचा नसून ज्या ध्येयपूर्ततेसाठी आजची विद्रोही कविता रंगमंचावर अवतरलेली आहे, तीच दृष्टी केशवसुतांच्या कवितेने जोपासलेली आहे, की नाही, हा आहे. त्यात सर्वसमावेशकता कितपत आहे, हा प्रश्न बाजूला ठेवून सांस्कृतिक उत्थापनासाठी केशवसुतांनी कोणते भरीव कार्य केले, हे तपासणे मौलिक ठरते. "केशवसुत हे आधुनिक मराठी कवितेचे जनक! पण चमत्कार असा, की त्यांना ही पदवी देणाराकडूनच त्यांचा संपूर्ण पराभव झाला आहे! त्यांचा आणि पुढील काव्याचा पुनर्विचार व्हायला नको काय? तो कसा? आजच्या विलक्षण काळात आपली संस्कृती काय आहे, हे नीट पाहायला नको काय?" * असा प्रश्न प्रा. मुरलीधर जावडेकरांनी केशवसुतांच्या पराभवाचे रहस्य शोधताना विचारला आहे, अर्थात हा सवाल आपल्याला अभिप्रेत असणाऱ्या संस्कृतीरक्षणार्थ विचारलेला आहे. केशवसुतांनी एकाचवेळी संस्कृतीवर अपरंपार प्रेम व्यक्त केले, तर 'जुने जाळुनि किंवा पुरुनि टाका" असे म्हटले. अर्थात जे जे वाईट असेल ते ते जाळून टाकले पाहिजे, पुरून टाकले पाहिजे, हा केशवसुतांचा दृष्टिकोण असावा. आपल्या संस्कृतीबद्दल मनस्वी आदर असल्याने केशवसुतांनी दुसरी नवी संस्कृती निर्माण झाली पाहिजे असा आग्रह धरलेला नाही, 'जुने जाळून वा पुरुन टाका' एवढाच माफक आग्रह त्यांनी धरलेला आहे. नेमका याचठिकाणी केशवसुतांच्या विद्रोहात आणि आजच्या आंबेडकरीप्रेरणेच्या कवितेतून व्यक्त होणाऱ्या विद्रोहात फरक आहे. आंबेडकरीप्रेरणेच्या कवितेला हिंदुवादी संस्कृतीचे शुध्दिकरण करावयाचे नसून बौध्द संस्कृती तिला विकसित करावयाची आहे. केशवसुतांसमोर असे उद्दिष्ट नव्हते.

---

+ उत्थानगुंफा : यशवंत मनोहर, पृ. क्र. ६.

* पराभवांची रहस्ये : मुरलीधर मनोहर जावडेकर : केशवसुतांचे अंतरंग, अमृत परंपरा

म्हणूनच आंबेडकरी प्रेरणेच्या काही कवींना केशवसुतांची विद्रोही भूमिका वरपांगी आणि नाटकी वाटते. हरीश बनसोडे ' केशवसुतास, ' ( हू विल डायग्नोझ इट ) या कवितेतून केशवसुतांच्या बांधिलकीचे ' पोष्टमॉर्टम ' करतो; ते अतिशय परिणामकारक ठरणारे आहे. त्याने या कवितेतून काही प्रश्नांना अतिशय प्रभावीपणे शब्दबध्द केलेले आहे. " अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न ऐकणाऱ्या केशवसुतांनी ब्राम्हणांच्या माथ्यावर ' गोफण ' भरुन दगड का भिरकावले नाहीत? ब्राम्हणांनी महारांना संस्कृत शिकविले पाहिजे असा आग्रह का धरला नाही? किंवा ' मुळामुठेच्या तीरावर ' बसून अंत्यजाच्या मुलावर ' प्रणयगीत ' का लिहिले नाही? ' मूर्तिभंजन ' करणाऱ्या केशवसुतांना ' मनुस्मृती ' दहन का कराविशी वाटली नाही? इ. प्रश्नांनी हरीश बनसोडे व्यथित आहे. अनेक दुष्ट रूढींवर ' गोफण ' चालविणारा केशवसुत नेमका महाराच्या गळ्यातल्या मडक्यावर नेम मारण्यास का कमकुवत ठरला, ह्याचे आश्चर्य या कवीस वाटते. म्हणूनच त्याने अशी खंत व्यक्त केली, की जातियतेच्या लढ्यात एकाकी पडलेला केशवसुतांचा नव्या दमाचा ' नवा शिपाई ' महारांमध्ये तुतारी फुंकू शकला असता तर त्यास अनेक शूर, लढवय्ये शिपाई निश्चितच मिळाले असते. हरीश बनसोडेने केशवसुतांचे केलेले यथायोग्य डायग्नोसिस केशवसुतांच्या प्रभावाखाली दडपून जाणाऱ्या विद्रोही कवींना अंतर्मुख करण्यास पुरेसे आहे.

यशवंत मनोहरांचा ' उत्थानगुंफा ' आणि हरीश बनसोडेचा ' हू विल डायग्नोझ इट ? ' हे एकाच वर्षी प्रकाशित झालेले काव्यसंग्रह. केशवसुतांबद्दल परस्पर विरोधी विचार प्रकट करतात. दोन्हीही कवी स्वतंत्रप्रवृत्तीचे परंतु आंबेडकरी प्रेरणेचे कवी आहेत. केशवसुतांबद्दल उत्कट भावना व्यक्त करणाऱ्या टीकाकारांना हरीश बनसोडे सारख्या कवीने केशवसुतांबद्दल व्यक्त केलेली खंत उल्लेखनीय वाटली नसेल, आणि यशवंत मनोहरांनी काढलेले उद्‌गार अर्थपूर्ण वाटले असतील. परंतु त्यामुळे टीकाकारांच्या मर्यादा आणि त्यांचा विद्रोही काव्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण कसा संकुचित व भेदाभेद करणारा आहे, हे लक्षात आल्यावाचून राहात नाही.

प्रा. भालचंद्र फडके व डॉ. म. सु. पाटलांसारखे टीकाकार फार मोठ्या आपुलकीने यशवंत मनोहरांची केशवसुतांकडे पाहण्याची दृष्टी विचारात घेऊन मोठ्या शालीनतेने केशवसुतांशी यशवंत मनोहरांचे साम्य जुळवून आणण्याची किमया घडवू पाहतात, ज्या तडफेने, विश्वासाने आणि वैशिष्ट्यपूर्णतेने त्यांनी यशवंत मनोहरांची दखल घेतली, त्यामागील कार्यकारणभाव कोणताही असेल, पण ती न्यायीपणाची खूण नाही. यशवंत मनोहर केशवसुतांचा प्रभाव मान्य करणारा दलितातील पहिला मानकरी नाही, ह्याचे भान या टीकाकारांनी जपलेले नसावे. नाहीतर ना. रा. पगारेसारखा केशवसुतांपासून प्रेरणा घेतलेला कवी विस्मृतीत ढकलला गेला नसता.

'मधुवंती' हा त्यांचा काव्यसंग्रह १९६६ साली प्रकाशित झाला. 'कवि मधुगंध उर्फ ना. रा. पगारे, यशवंत मनोहरांइतकेच केशवसुतांमुळे भारावलेले आहेत. किंबहुना या कवीने आपल्या लेखनाची दिशा केशवसुतांपासून प्रेरणा घेऊन ठरविलेली आहे. ना. रा. पगारे म्हणतात, "कवितेचे प्रयोजन' या कवि कुलगुरू केशवसुतांच्या कवितेचे मला जबरदस्त आकर्षण होते. अगदी लहानपणी तीर्थरूप वडील रोज भल्या पहाटे 'पोथी' वाचीत असताना त्यातले काही कर्ण-मधुर शब्द माझ्या कानावर पडताच असे वाटायचे, की आपणही पाहावं एखाद गाणं लिहून! त्यावेळी मनाला जी कवितेची ओढ लागली, ती आजतागायत अटळ आहे. वयाच्या चौदाव्या वर्षी 'संपूर्ण केशवसुत' मला एकदम गवसला "×

कविवर्य मधुगंध आणि यशवंत मनोहर केशवसुत वेगवेगळ्या दृष्टिकोणातून विचारात घेतात. मधुगंधाना केशवसुत जसा सापडला तसाच व्यक्त करण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. 'तुतारीच्या कर्त्यास' अशी एक भावपूर्ण कविता लिहून केशवसुतांस अर्पण केलेली आहे. कविवर्य मधुगंध ह्यांना केशवसुतांच्या व्यक्तिमत्वातून विद्रोहाचेही आकलन झालेले आहे, परंतु विद्रोहाचे भांडवल न केल्याने आदिविद्रोही कवी न म्हणण्याची जणू गफलत ते करून बसले. यशवंत मनोहरांची 'केशवसुतास' ही कविता टीकाकारांनी अतिशय महत्वपूर्ण मानली आणि त्याला केशवसुतांशी नाते सांगणारा कवी म्हणून शाबासकी दिली. ती केवळ विद्रोही भूमिकेचे समर्थन करण्यासाठी. ना. रा. पगारे यांच्या वाट्यास असे काहीही आलेले नसले तरी केशवसुतांकडे डोळसपणे आणि अभ्यासूवृत्तीने पाहणारा हा कवी मनोहरां-आधी लक्षात घेतल्याशिवाय गत्यंतरच उरत नाही.

कविवर्य 'मधुगंध' या कवीचे वैशिष्ट्य असे, की दलित जीवनजाणिवांच्या आपल्या श्रध्दास्थानाविषयीच्या 'मधुवंती' या काव्यसंग्रहात अनेक कविता आहेत. 'चौदा एप्रिल', 'सोन्याचा दिवस', 'काय घडे?', 'त्या काळ रात्री' 'भीमदेव गेले जेव्हा' 'हीच ती अजूनही माती पायाखाली' 'कुठून आलो कुठेजायचे?' 'रे! हिरा कोहिनूर निखळता!!' आणि 'कोटी कोटी प्रणाम' या कवितांतून सामाजिकबांधिलकी, श्रध्दास्थानाविषयी आपुलकी आणि दलित समाजजाणीव नीट आकारास आलेली आहे. दुर्दैवाने १९६६ साली प्रकाशित झालेल्या 'मधुवंती' या काव्यसंग्रहाची योग्य ती दखल घेण्याची तत्परता कुणाही टीकाकाराने दाखविलेली नाही. कविवर्य मधुगंध यांची कविता पारंपारिक वळणाची आहे. म्हणून भगवान बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, केशवसुत आणि पंडीत जवाहरलाल नेहरू इ. बद्दल उचंबळून लिहिणारा हा कवी आतून पेटलेला नाही असे म्हणता येत नाही. श्रीमती शांता

× मधुवंती : ना. रा पगारे, उमाळा, पृ. क्र. ५

शेळके यानी या काव्यसंग्रहास प्रस्तावना लिहिताना जे भाष्य केले आहे, ते लक्षात घेण्यासारखे आहे. त्यानी कविवर्य मधुगंधांच्या उल्लेखनीय वैशिष्ट्यांबद्दल म्हटले, की "ही पराक्रमपूजनाची परंपरा केशवसुतांपासून कुसुमाग्रजांपर्यंत मराठीत अविच्छिन्न चालत आली आहे. आणि तीच पगारे यांच्या काव्यातही दिसून येते. त्यांच्या काव्याचे हे एक उल्लेखनीय वैशिष्ट्य आहे.' *

केशवसुतांनी मराठी कवितेला क्रांतीचा अनुभव प्राप्त करून दिला असे टीकाकार मानतात. परंतु ही क्रांतिकारक भूमिका केशवसुतांनी राजकीय स्वांतत्र्या-साठी घेतलेली आहे, की सामाजिक स्वातंत्र्यासाठी घेतलेली आहे हे तपासणे तेवढेच तोलामोलाचे आहे. "मराठीतील बांधिलकीच्या कवितेला एक सलग अशी जी परंपरा लाभली तिचा आरंभबिंदू केशवसुत हेच आहेत" * असे काही टीकाकारांना वाटत असले तरी सामाजिक स्वातंत्र्याच्या भावनेतून प्रेरित झालेला कवी म्हणून केशवसुतांना स्वीकारणे तसे जडच जाते. सामाजिक आशय व्यक्त करणारा, सामाजिकतेला महत्व देणारा आणि सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारा केशवसुत हा कवी उत्स्फूर्ततेने आणि सहजतेने सामाजिक विषमतेचा प्रश्न हाताळत नसून स्वातंत्र्य प्रेरणेला त्याशिवाय गत्यंतरच नसल्याने तो बुरसटलेल्या आणि जुन्या चालिरीतीवर तुटून पडतो.

---

* मधुवंती : ना. रा. पगारे, प्रस्तावना, पृ. क्र. १३

* साहित्य आणि समाज : अविनाश सहस्त्रबुध्दे, पृ. क्र. ६७

**किसन फागोजी बनसोडे :**

सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारा विद्रोही कवी ! म्हणून किसन फागोजी हा कवी दीर्घकाळ स्मरणात राहावा असा आहे. किसन फागोजी ह्यांचा 'प्रदीप' हा काव्यसंग्रह त्यांच्या निधनानंतर १९५८ झाली श्री. शामराव किसन बनसोडे यांनी प्रकाशित केलेला आहे. सामाजिक स्वातंत्र्याचे उत्कट गाणे गाणारा हा कवी विद्रोही आणि प्रवर्तक अशी दुहेरी भूमिका घेणारा आहे. त्याचे कारण असे, की या कवीने जनजागरण करणे हा आपल्या कवितेचा प्रधान हेतू मानलेला आहे. सामाजिक विषमता नष्ट झाल्याशिवाय स्वातंत्र्य व समता अस्तित्वात येऊ शकणार नाही, ही पक्की समजूत या कवीची झालेली होती. म्हणूनच त्यानी पुरोहित वर्गावर आसूड ओढणारी कविता लिहिली. तशीच स्वबांधवानांही नीचकाम सोडून द्या असे फटकारुन सांगण्यासाठीही लिहिली. खऱ्या समाजसुधारकाचा प्रकृतिपिंड जपणारा हा कवी विलक्षण वाटतो. सर्व दुष्ट प्रवृत्तीविरोधी कटिबध्द असणारा तो बुलंद आवाज आहे. दलितसमाजमन कर्तृत्वशून्य झालेले आहे, ह्याचा प्रत्यय किसन फागोजी यांना आल्याने आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाची, शूरतेची आणि शौर्याची आठवण करून दिली पाहिजे ह्याची त्याना जाणीव झाली. आणि म्हणून "धन्य तुमचे पूर्वज ! "ऐका महार हो जरा," 'दलित बांधवा' व 'देह असा जाणार' इ. कविता समाजप्रबोधन, सामाजिक बांधिलकी आणि आत्मप्रत्ययाची जाणीव करुन देतात.

या कविता म्हणजे दुसरे तिसरे काही नसून किसन फागोजी यांनी अस्पृश्य समाजाला त्यावेळी मारलेले फटकारेच मानावे लागतात. जनजागृतीसाठी धडपडणारा हा कवी कुणाच्याही लक्षात आलेला दिसून येत नाही. जनजागृती करणे म्हणजे प्रचार करणे, असा सोयीचा अर्थ लावणाऱ्या टीकाकारांना हा कवी दलित समाजातील असल्याने महत्वपूर्ण वाटला नसावा. अलिकडे बांधिलकीच्या कवितेला अर्थपूर्णता प्राप्त झालेली आहे. दलितांच्या हितासाठी झटणारा, समाजहित महत्त्वपूर्ण मानणारा आणि त्या अनुषंगाने प्रखर सामाजिक जाण असलेला, हा दृष्टिआड झालेला कवी किती प्रचंड विद्रोही होता ह्याची साक्ष आज पटत आहे. अमानुषतेविरोधी गरळ ओकल्याने, तिचा धिक्कार केल्याने किंवा जळजळीत शब्दप्रहार केल्याने ती नष्ट होत नाही तर तसे करण्यास प्रवृत्त झालेल्याने आधी स्वतःचे आत्मबळ शोधले पाहिजे, आत्मसंशोधन केले पाहिजे आणि आत्मपरीक्षेची जोड दिली पाहिजे, हे किसन फागोजींनी आपल्या कवितेचे ध्येय मानलेले आहे. 'थू ; तुमच्या तोंडावर, धिक् जिणे तुमचे', 'स्वस्थ बैसता, हे महार कसे', 'दावा शूरत्व आपुले', 'नाही लढ्याविण मुक्ती', 'आज जरी तुम्ही स्वस्थ बसले,' 'तू सोड जुनी ही चाल', 'कोठे केव्हाही' आणि 'विचार काय करणार' इ. कवितांतून दलित समाजाने काय करावे

आणि काय करू नये, हे सांगण्याचे डोळसभान जपलेले आहे. प्रस्थापितांविरूद्ध संघर्ष करताना रूढीने लादलेल्या अमानुष व अन्यायी चालीरीतींवर हल्ला करताना दलित समाजाने अन्याय सहन करण्याची प्रवृत्ती सोडून दिली पाहिजे, अशी त्यांची वैचारिक बैठक होती. एका अर्थाने त्यांच्या कवितांना चिंतनाची अजोड अशी देणगी प्राप्त झालेली आहे.

किसन फागोजी यांचा कालखंड म्हणजे १८७९ ते १९४६ स्वातंत्र्यपूर्व असा तेजस्वी कालखंड पाहण्याचे भाग्य या कवीच्या वाट्यास आलेले आहे. याच कालखंडात राजकीय स्वातंत्र्याने प्रेरीत झालेले सर्व समाज सामाजिक स्वातंत्र्याच्या लढ्यात उतरलेले नसतीलही, परंतु सामाजिक समानता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न झालेले नाहीत असेही नाही. किसन फागोजी सारख्या दलितोध्दारकाने याबाबत इतरांप्रमाणे प्रयत्न केलेला आहे. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महान पुरुषांच्या निकटतम संबंधामुळे राजकीय व सामाजिक स्वातंत्र्याच्या चळवळीत या कवीचा वाटा महत्वपूर्ण आहे. स्वातंत्र्य चळवळीत गुंतलेल्या कै. नरकेसरी मोरूभाऊ अभ्यंकर, डॉ. मुंजे, डॉ. हेडगेवार, दादासाहेब ओगले व डॉ. भाऊजी दप्तरीसारख्या नेत्यांबरोबर या कवीने कार्य केलेले आढळते. असे असले तरी किसन फागोजींचे समाजकार्य राजकीय कार्यापेक्षा मोलाचे आहे. दलितोध्दाराचा आवाज बुलंद करण्यासाठी काढलेल्या ‘ निराश्रीत हिंद नागरिक ’ ‘ विटाळ विध्वंसक ’ ‘मजूर पत्रिका’ व ‘ चोखामेळा ’ ही वर्तमानपत्रे त्याच्या सामाजिक कार्याचीही साक्ष पटवून देतात. १९०७ साली नागपूर येथे त्यानी ‘ चोखामेळा मुलींची शाळा ’ काढली. त्यानंतर ‘ चोखामेळा ’ मुलांचे वसतिगृह काढले. या आणि अशा-प्रकारच्या घटना अतिशय बोलक्या आहेत. दलितोध्दाराच्या कार्यास वाहून घेताना आणि स्वाभिमानी मन जपत असताना समाजसुधारणेची लालसा त्यानी ठेवलेली होती. त्यांचे प्रतिबिंब ‘ प्रदीप ’ या त्यांच्या काव्यसंग्रहातून स्पष्टपणे जाणवते.

किसन फागोजींच्या प्रकृतिपिंडाचे राजकीय आणि सामाजिक असे वेगवेगळे पृथक्करण केल्याशिवाय त्यांच्या कवितांतील सामाजिकबांधिलकीचा आग्रह नीटपणे समजून घेणे शक्य होत नाही. प्रचारासाठी त्यानी कविता राबवून घेतलेली नसून बांधिलकीच्या भानातून ती व्यक्त झालेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याने अतिशय प्रभावित होऊन त्यांच्या दलितोध्दाराच्या चळवळीची त्यानी मुक्तपणे प्रशंसा केली आहे. ‘ माझ्या दलित बांधवांच्या उद्धराप्रित्यर्थ मी माझ्या रक्ताच्या थेंबान् थेंबाची संजीवनी देईन ’ * असे उद्‌गार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२० साली नागपूर येथे बहिष्कृत समाज परिषदेत काढताचक्षणी किसन

* प्रदीप : संपादक : शामराव बनसोडे, पहिले मानकरी, पृ. क्र.२१

फागोजींनी, 'पोटी यावा ऐसा गुंडा, ज्याचा तिन्ही लोकी झेंडा'× असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी उद्‌गार काढलेले आहेत. डॉ. आंबेडकरांचे व्यक्तित्व आणि त्यांना असलेली दलितोद्धाराची तळमळ किसन फागोजींनी जाणीवपूर्वक लक्षात घेतलेली आहे. आपल्यापेक्षा वयाने लहान असणाऱ्या परंतु दलितोध्दाराचे महान कार्य करणाऱ्या डॉ. बाबासाहेबांचे शिष्यत्व आयुष्याच्या उत्तरार्धात किसन फागोजींनी स्वीकारलेले आहे. सन १९४६ च्या अखेरीस मृत्युशी झुंजणारा हा कवी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मौलिक आदेश मागतो, हा प्रसंग विलक्षणच म्हटला पाहिजे. दलितोध्दारासाठी झटणाऱ्या दोघांतील हा प्रसंग अतिशय मनोवेधक ठरणारा आहे. अर्थात कुणाही आंबेडकरीप्रेरणेच्या कवीचे ध्यान अद्याप या प्रसंगावर आकृष्ट झालेले नाही.

'प्रदीप' या काव्यसंग्रहात 'दलितांचे पहिले मानकरी' असा किसन फागोजींचा गौरव करताना श्री. ना. ख. तिरपुडे यांनी किसन फागोजींच्या उत्तरार्धातील जीवनातील एक चित्तवेधक प्रसंग प्रभावीपणे रेखाटला आहे. तो प्रसंग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे त्यानी आदेश मागितला त्यावेळेचा आहे. तो असा: "बाबासाहेब, गावी परत जातो. तुम्ही मला ओळखलंत किती धन्यता वाटते! पण माझ्यासाठी काही आदेश!".... एका जाड्या ग्रंथावर खिळलेली आपली नजर वर करून ती रोगाने जर्जर झालेल्या आपल्या गुरूवर्यांच्या मुद्रेवर केन्द्रीत करून बाबासाहेब गंभीरपणे उद्‌गारले, "गुरूवर्य, मी तुम्हाला काय आदेश देणार? आता तुम्ही अवश्य विश्रांती घ्या; आणि दलितांपैकी जे कोणी तुमच्याकडे येतील त्यांना शक्य झाल्यास संघटीत राहण्याची व एकात्मतेच्या भावनेची जाणीव करून द्या. आज हेच अतिशय महत्वाचे कार्य आहे. हे साधले तर आज ना उद्या गड जिंकलाच म्हणून समजा. माझ्या बांधवाना अशी सद्‌बुद्धि प्राप्त होवो!" * हा प्रसंग याठिकाणी नमूद करण्याचे कारण असे, की मरणाच्या उंबरठ्यावर असलेला हा कवी दलितोद्धारासाठी किती झपाटलेला होता ह्याची खात्री पटते. आणि म्हणूनच आजच्या सामाजिकबांधिलकीच्या आंबेडकरीप्रेरणेच्या कवितेला पुढील वाटचाल करण्यासाठी केशवसुतांपेक्षा किसन फागोजीपासून काही बोध घेण्यासारखा आहे.

---

× प्रदीप, पृ. क्र. २१

* प्रदीप : संपादक : शामराव बनसोडे, पृ. क्र. २३

## किसन फागोजी बनसोडे आणि केशवसुतोत्तर मराठी कविता :

किसन फागोजी ज्या कालखंडात (१८७९ ते १९४६) काव्यलेखन करीत होते, त्याकडे दृष्टिक्षेप टाकला तर असे दिसून येते, की याचकालखंडात केशवसुत, भास्करराव तांबे, रे. टिळक, गोविंदाग्रज, रेंदाळकर, बालकवी, 'बी', रविकिरण मंडळ, मर्ढेकर आणि कुसुमाग्रज इ. कवी काव्यलेखन करीत होते. मराठी कवितेत यातील प्रत्येक कविचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. कवि केशवसुतांचा मृत्यू ज्यावर्षी झाला, त्यावेळी किसन फागोजीचे वय साधारणपणे सव्वीस असावे. केशवसुत संप्रदायाचा यावेळी प्रामुख्याने मराठी कवितेवर प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. केशवसुत संप्रदाय म्हणजे 'केशवसुतांनी स्थापन केलेला' संप्रदाय नव्हे, तर ज्या आत्मनिष्ठ, जीवननिष्ठ संप्रदायाचा केशवसुतानी अंगिकार केला, तो संप्रदाय होय.' ÷ कवि केशवसुत आणि भा. रा. तांबे यांना 'रोमँटिक' कवी म्हणूनच प्रा. क्षीरसागरांनी विचारात घेतलेले असून केशवसुत संप्रदाय आणि तांबे संप्रदाय हे भिन्न नाहीत अशी भूमिकाही त्यांनी घेतलेली आहे. एवढेच काय तांब्यांना केशवसुत संप्रदायी म्हणूनच प्रा. क्षीरसागर संबोधतात. 'केशवसुताप्रमाणेच ऐहिक आनंदविषयांना, स्त्री सौंदर्याला, स्त्री प्रेमाला, बालक्रीडांना, निसर्गदृश्यांना–तांबेही महत्व देतात, या अर्थानेच मी तांब्याना केशवसुत संप्रदायी म्हणतो', अर्थात् 'केशवसुतसंप्रदायी' याचा अर्थ केशवसुतांचे 'अनुयायी' असा मुळीच नव्हे, हे येथे मुद्दाम सांगितले पाहिजे. केशवसुत आणि तांबे दोघेही पाश्चात्य विद्येच्या संस्काराने आपल्याकडे दिसू लागलेल्या मुक्त व्यक्तिमत्वाचे नमुने होते." * असे विश्लेषण करतात. कवि केशवसुतांच्या 'तुतारी' ला क्रांतिकारक कविता म्हणणाऱ्या टीकाकारांची याबाबत मतभिन्नता असू शकते. हे जरी खरे असले तरी कवि केशवसुत संप्रदायात कोणकोणत्या बाबी समाविष्ट झालेल्या आहेत, आणि त्या वादग्रस्त आहेत, ह्याचाही उलगडा होतो.

सामाजिक बांधिलकीची कविता म्हणून किसन फागोजींच्या कवितांचा विचार करतांना त्याच कालखंडातील तांब्यांची रोमँटिक कविता, गूढगुंजन करणारी कविता, बालकवींची 'निसर्गप्रेम' कविता, कवी 'बी' ची प्रेमकविता विचारात घ्यावी लागते. कारण याच प्रकारच्या कवितेने मराठी काव्य व्यापून टाकलेले आहे. 'केशवसुतांच्या 'तुतारी' चे स्वर कानांवर पडताच 'बी' कवींनी 'डंका' वाजविला, रे. टिळकांनी 'रणशिंग' फुंकले, गोविंदाग्रजांनी 'सीमोल्लंघन' केले तसा बालकवींनीही आपला 'धर्मवीर' उभा केला' + असे असले तरी रोमँटिक कवितेने,

÷ केशवसुत आणि तांबे; प्रा. श्री. के. क्षीरसागर. पृ. क्र. ७१

* कित्ता, पृ. क्र. ९२

+ मराठी कविता जुनी आणि नवी : पृ. क्र. १५२

भावकवितेने, निसर्गप्रेम कवितेने आणि प्रेमकवितेने सामाजिकतेला फारसे महत्व दिलेले आढळत नाही. आणि म्हणूनच 'नाही लढल्याविण मुक्ति' ही किसन फागोजीची भूमिका महत्वपूर्ण वाटते.

कवि केशवसुतांनी सामाजिकतेला जो काही थोडाफार काव्यातून वाव दिला तो तांब्यापासून बाद ठरविला गेलेला आहे. "निसर्ग प्रेम, नाविन्यप्रेम, स्त्रीप्रेम, सौंदर्यप्रेम, प्रेमासंबंधीचे प्रेम, जुन्या वस्तुसंबंधीचे, वातावरणासंबंधीचे आणि काला-संबंधीचे प्रेम, गूढ वातावरणासंबंधीचे प्रेम या सर्व वैशिष्ट्यांचा अंतर्भाव रोमँटिक वृत्तीत होतो" * असे जे सौंदर्यवादाचे स्पष्टिकरण भा. रा. तांब्यांच्या रोमँटिक वृत्तीचे समर्थन करतात, त्यांचीही दृष्टी सामाजिकतेला फारसे महत्व न देण्याचीच असू शकते. स्त्री–पुरुष प्रेमाला विशेष प्रतिष्ठा प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न भा. रा. तांब्यांनी केलेला असून कवितेला घाट, आशय, कथात्मकता, नाट्यात्मकता आणि गेयता प्राप्त करून दिली. सर्वसाधारण माणसाच्या जीवनातील क्षुल्लक वाटणाऱ्या घटना प्रसंगांतून एक भावनिक नाट्य साकार करण्याचा तांब्यानी प्रयत्न केलेला दिसून येतो. मूल्यात्मक कल्पनांना खतपाणी घालणे, 'श्रद्धेय' वाटणाऱ्या गोष्टी-बद्दल मूल्यांचे हेतूपूर्वक चित्रण करणे तांब्यानी आपल्या कवितेचे प्रयोजन मानलेले आहे. "तांब्यांच्या काळीच काय, पण नंतरही त्यांच्याइतका अस्सल भारतीय आणि नितान्त सश्रध्द कवी झालेला नाही. एक अपवाद रे. टिळकाचा मानता येईल. पण या भारतीय कवीच्या श्रध्देला धर्मान्तराचा डाग लागलेला होता. दुसरा अपवाद चंद्रशेखरांचा खासच आहे. पण ते सश्रध्द असले तरी खऱ्या अर्थाने 'आधुनिक' नव्हते. तांबे आधुनिक होते, भारतीय होते आणि ईश्वरनिष्ठही होते. म्हणजेच ते त्यांच्या पूर्वगामी कवीहून आणि समकालीन कवीहून वेगळे होते" ऽ असे समर्थन तांब्याच्या सश्रध्देचे होते. परंतु तळागाळाच्या समाज जीवनाविषयी अनास्था दाख-विणाऱ्या आणि आपल्यापुरत्या मध्यमवर्गीय जीवनाच्या कोषात दिवास्वप्नात्मक रंजन करणाऱ्या कविप्रवृत्तीबाबत सामाजिकबांधिलकीच्या संदर्भात निश्चितपणे प्रश्नचिन्ह निर्माण होते. सामाजिकबांधिलकी मान्य करणाऱ्या केशवसुत परंपरेच्या कवितेला रोमँटिक कविता पध्दतशीर आणि नेटाने शह देत होती असे केशवसुत परंपरेचे समर्थन करणारे टीकाकार मान्य करतात परंतु त्याचबरोबर हेही दृष्टिआड केले जाते, की अंधश्रध्दा, वर्णव्यवस्था, ईश्वरशाही, कर्मविपाकवाद, विषमता, जातियता आणि भेदाभेद यांबाबत केशवसुत संप्रदायात समाविष्ट केलेले तांब्यांसारखे 'ईश्वरनिष्ठ' सरंजामशाही वृत्तीचे कवी उदासीन का असू नयेत? स्त्रीपुरुषांच्या

---

* केशवसुत आणि तांबे : श्री. के. क्षीरसागर, पृ. क्र. ७२

ऽ केशवसुत आणि तांबे : श्री. के. क्षीरसागर, पृ. क्र. ७६

प्रेमाचे दिवास्वप्नात्मक रंजन किंवा गूढगुंजन करणेच ज्या कवितेचे ध्येय असू शकते, किंवा निसर्गप्रेमाचे ज्या कवितेला वेड लागलेले आहे, त्या कविप्रवृत्तीपासून जातीयतेच्या भस्मासुराशी, संघर्ष करण्याची अपेक्षा बाळगता येत नाही.

तेव्हा किसन फागोजी ज्या कालखंडात आपले काव्यलेखन करीत होते त्या कालखंडातील कविता सामाजिकतेचे फारसे सोयरसुतक नसल्याने सामान्य माणसाच्या जीवनाचे, वास्तवतेचे दर्शन घडविण्यास फारशी वचनबध्द नव्हती. ना. सी. फडक्यांच्या कलावादाचा फार मोठा प्रभाव या कवितेवर होता. १९३० च्या सुमारास महात्मागांधींनी खेड्याकडे चला हा संदेश दिला होता. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा आणि राजकीय प्रेरणेचा त्या कालखंडातील मध्यमवर्गीय लेखकांवर मोठा प्रभाव होता. काही कवींनी तर जानपद जीवनाचे वास्तव दर्शन घडविण्याचे जणू दायित्व स्वीकारले होते. श्री. वि. भि. कोलते, के. नारखेडे, ग. ल. ठोकळ हे याप्रकारची रचना करणारे प्रमुख कवी होते. त्यातही ग. ल. ठोकळ यांचे ग्रामीण काव्यरचनेबाबतचे श्रेय फार मोठे आहे. त्यांनी ग्रामीण जीवनाचा वास्तव तपशील प्रथमच मराठी कवितेला प्राप्त करून दिला. तथापि तत्कालीन समाजजीवनाची स्थिती काय होती? त्याचे चित्रण मात्र या कवींनी केलेले दिसत नाहीच. मग दलितांच्या वाट्यास आलेले अमानुष जीवन त्यांच्या दृष्टिपथात येणे अस्वाभाविकच. ‘मुठभर दाणे’ या कवितेत ठोकळांनी दलित जीवनाचे चित्रण करण्याचा प्रयत्न केला परंतु तो केविलवाणा म्हणून फोल ठरला. ‘ओळखा पाहु, मी कोण?’ असे दलितत्वाचे ते कोडे घालतात आणि त्यातच अडकून पडतात. राजकीय स्वातंत्र्याची जाणीव झालेली मध्यमवर्गीय जाणीव खेड्यात घेऊन जाणारी जानपद कविता दलितोध्दारासाठी आणि सामाजिक समतेसाठी किती उदासीन होती याचा स्पष्ट पुरावा ‘मुठभर दाणे’ ही कविता होय. ग्रामीण जीवनाचा वास्तववादी अविष्कार आपल्या कवितेत करणाऱ्या बहिणाबाई चौधरींनी दलित जीवनाबद्दलही दुःखोद्‌गार काढले आहेत. तथापि जातीयता किती विषारी आहे, समाजविघातक आहे आणि त्यावर आसूड ओढणे कसे आवश्यक आहे, हा काही बहिणाबाईंच्या काव्यलेखनाचा मूलभूत दृष्टिकोण नव्हता.

‘खेड्याकडे चला’ या महात्मागांधीजींच्या विचारमंत्रामागे सामाजिक जाणिवेची प्रेरणा आहे. खेड्यांचा सर्वांगीण विकास म्हणजे देशविकास हा विचार गांधीजींच्या मनात प्रबळ होता. परंतु गांधीजींचा विचार स्वीकारणाऱ्यांनी ग्रामजीवनाला जो स्पर्श केला तो निव्वळ राजकीय दृष्टिकोणातूनच. त्यामुळे सामाजिक परिवर्तनाची खरी चाहूल ग्रामीण परिसराला लागली नाही. म्हणून केशवसुतोत्तर रचनेचा सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिने विचार करताना निराशाच पदरी पडते.

किसन फागोजी बनसोडेची कविता, वरील कवितेच्या पार्श्वभूमीवर अधिक मोलाची वाटते. गांधीजींचे, 'खेड्याकडे चला' हे विचार तंतोतंत आचरणात आणून खऱ्या सामाजिक परिवर्तनाची जाणीव नेमकेपणाने व्यक्त करण्याचे काम किसन फागोजींच्या कवितेने केले आहे असे दिसते. तरीही रविकिरण मंडळाच्या कवींच्या वाट्यास आलेली प्रतिष्ठा वा जानपद रचना करणाऱ्या कवीना प्राप्त झालेला लौकिक किसन फागोजींच्या वाट्यास आला नाही.

याच कालखंडात आवेशपूर्ण काव्यरचना करणारा कवि कुसुमाग्रज. राजकीय प्रेरणा व सामाजिक प्रेरणा सारख्याच तोलामोलाने या कवीच्या काव्यलेखनाला आवाहन करीत असलेल्या दिसतात. अनंत काळापासून माणसाने ज्या व्यक्तिगत निष्ठा जोपासल्या त्यांचे उद्गान कुसुमाग्रजांच्या कवितेत झाले. साहजिकच कुसुमाग्रजांची कविता समूहमनाच्या आविष्काराची कविता झाली. समाजमनाची स्पंदने, हुंकार आणि आशावाद त्यांच्या कवितेतून उत्कटतेने आविष्कृत झाला. 'विशाखा' मधील त्यांच्या अनेक कवितांचे अनुभव राजकीय वातावरणातील असूनही त्यांची कविता त्या पार जाते. त्याचे कारण त्यांचा मानवतावादी दृष्टिकोण. जीवनातील शाश्वत मूल्यांवर निष्ठा ठेवणाऱ्या या कवीला समाजजीवनाबाबत प्रचंड आस्था आहे. प्रेम आहे. त्यामुळेच भिक्षुकशाही, भटशाही, श्रीमंतशाही यांनी पोखरलेल्या समाजजीवनातील अपप्रवृत्तींचा त्यांची कविता निषेध करते.

भारतीय जीवनात शाश्वत मूल्यांचा शोध घेणारा हा कवी सामजिकबांधिलकीच्या दृष्टिने खरोखर अंतर्मुख होतो काय? राजकीय आणि सामाजिक जाणिवा 'विशाखात' व्यक्त होऊनही दलितोद्धाराची तगमग वा तळमळ त्याच्या कोणत्या कवितेत व्यक्त होते? जनजागरणाची कास धरणाऱ्या या कवीने दलितोद्धाराला का बरे महत्व दिले नाही? डॉ. बाबासाहेब आंबडेकरांनी महाडला समतेसाठी केलेला सत्याग्रह सामाजिकबांधिलकीच्या दृष्टीने या कवीला का बरे महत्वाचा वाटला नाही? १९३० साली नाशिकलाच घडलेला 'काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह' या कवीला का बरे मोहित करू शकला नाही? भारतातच नव्हे तर 'जा जरा पूर्वेकडे' सारखी कविता लिहून भारताबाहेरच्या मानवतेची कणव करणारे हे नाशिकचे कविमन त्याच्या दारातच घडलेल्या प्रसंगाकडे सरळ सरळ डोळे झाक का करते? हे जाणतेपणी होते की अजाणता? म्हणूनच शिरवाडकरांची मानवतेची कणव, सामाजिकतेसंबंधीची खंत नकली वाटायला लागते.

मर्ढेकर, मुक्तिबोध, करंदीकर, या कवींचीही कविता या ठिकाणी लक्षात घेणे उचित ठरेल. शहरी जीवनातील कडवट निराशेची चित्रे रंगविणारे मर्ढेकर अधिक कलावादी होते. वास्तवाचे सूक्ष्म निरिक्षण करण्याची फार मोठी ताकद असूनही

मर्ढेकरांची कविता सामाजिकबांधिलकीच्या संदर्भात सर्वसमावेशक नाही. मुक्तिबोधांची कविता मर्ढेकरी कवितेहून सर्वथः वेगळी आहे. तिच्यावर साम्यवादाचा तीव्र प्रभाव आहे. मानवतेबद्दल जिव्हाळा, विषमतेबद्दल मनस्वी चीड आणि शोषितांच्या दुःखाशी समरस होणारी कविता म्हणूनच साम्यवादी विचारसरणीच्या कवितेकडे पहावे लागते. ही जाणीव विंदा करंदीकरांच्या कवितेतही स्पष्टपणे दिसते. तथापि या तिन्ही कवींच्या कवितेने दलितांच्या व्यथावेदनांचा विचार केलेला दिसत नाही.

मराठी कवितेला वेगळे वळण १९६० नंतरच्या कवितेने देण्याचा प्रयत्न केला. अरुण कोलटकर, दिलीप चित्रे, भालचंद्र नेमाडे, वसंत गुर्जर, अशोक शहाणे, तुलसी परब, मनोहर ओक यांची कविता या दृष्टीने महत्वाची वाटते. ॲकॅडेमिक मानदंडांना या कवितेने जुमानले नाही. मराठी कविता अधिक प्रयोगशील केली परंतु याच कालखंडात काव्यलेखन करणाऱ्या कवि नारायण सुर्वे यानी सामाजिक बांधिलकीचे जे भान जोपासले ती ताकद वरील कवींत आढळत नाही. सुर्व्यांनी १९६० नंतरच्या कवितेचा चेहरामोहराच बदलून टाकला. डाव्या विचारसरणीवर निष्ठा ठेवणाऱ्या या कवीने जनजागृती व शोषितांच्या व कष्ट करणाऱ्यांच्या दुःखाला नवा अर्थ, नवा संदर्भ प्राप्त करुन दिला. मराठी कवितेत सामाजिक-बांधिलकीला अतिशय महत्वाचे स्थान प्राप्त झाले. इतकेच नव्हे तर केशवसुतानंतर दलितांविषयीची कणव असलेला सुर्वे हा एकमेव कवी होय. अन्यथा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महापुरुषाने संपूर्ण सामाजिक जीवन बदलून टाकणाऱ्या ज्या ज्या समाजक्रान्त्या घडवून आणल्या तिकडे संपूर्णतया मराठी कवी आणि त्यांच्या कवितेने पाठ फिरविलेली दिसते. समाजपरिवर्तनासाठी सहाय्यभूत ठरलेल्या घटनांकडे उदासीनतेने पाहणाऱ्या मराठी कवितेने स्वतःचीच हानी करुन घेतली आहे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेतलेल्या कवितेने सिद्ध करुन दाखविले आहे.

भाग २ :

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३००९
निबंध २४०४७
११।११।८३
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

## आंबेडकरी प्रेरणेची कविता :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेतलेल्या विद्रोही कवितेने मराठी कवितेला सर्वसमावेशकता व सार्वत्रिकता यांच्या अगदी निकट आणून सोडलेले आहे. सामाजिकबांधिलकीचे महत्व विद्रोही कवितेला आत्मसात करण्यास भाग पाडलेले आहे. कविता ही जनजागृतीचे साधन आहे अशी ठाम भूमिका विद्रोही कवितेने घेतल्याने प्रस्थापित कवितेचे मानदंड प्रमाण मानणाऱ्या टीकाकारांनी या कवितेला फारसे महत्वपूर्ण मानले नाही. कवितेची रचना, आकृतीबंध तिच्यातून व्यक्त होणारे मूडस्, प्रतिमा, प्रतिकांना महत्व देणाऱ्या टीकाकारांनी संपूर्णतया सामाजिकतेवर भर देणाऱ्या विद्रोही कवितेला तिच्यात सर्वसमावेशकता नाही वा सार्वत्रिकता नाही म्हणून विचारात घेतलेले नाही. विद्रोही कवितेची प्रेरणा आंबेडकर वादातून आलेली आहे. ती मार्क्सवादी विचारधारा स्वीकारते म्हणून "डॉ. आंबेडकर–मार्क्स ही वाङमयीन प्रेरणा होऊ शकत नाही. ती विचारप्रेरणा आहे." + प्रेरणा व विचारप्रेरणा असा मूलभूत फरक या ठिकाणी कवितेतील सौंदर्य शोधण्याच्या हट्टापायी केलेला आढळतो. कवितेचे मूल्यमापन करताना कवितेच्या निव्वळ कलात्मक स्वरूपालाच महत्व देण्याचा कुणी दंडक लादून घेतला तर काव्यानुभवास गौणत्व प्राप्त झालेले दिसेल. याचे भान समीक्षकांनी ठेवावयास हवे. अन्यथा अनुभव घेण्याची कसोटी कोणती ? हा प्रश्न अवाजवी महत्वाचा ठरतो. काही तरी अघटित परंतु नाविन्यपूर्ण भोगण्याची उर्मी प्रत्येक मनुष्याच्या ठायी

---

+ दलित कवितेची वाङमयीन फलश्रुती : शशिकांत लोखंडे, रविवार सकाळ, दि. १७–७–८१

असते. या मानवी प्रवृत्तीतूनच अनुभव आकारास येतो. हा अनुभव अप्रतिम कलाकृतीच्या निर्मितीस साह्यभूत ठरतो. वाङ्मयीन प्रेरणेचा उगमही यातूनच होतो. हे खरेच परंतु ह्या मागील सुप्त प्रेरणा ही विचार प्रेरणाच असते, हे नाकबूल करता येत नाही. मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. समाजात वावरताना तो आपले कौशल्य पणास लावताना बुध्दीचा वापर करतो. एखादी सुंदर कल्पना सुचणे देखील सर्वस्वी विचारांवर अवलंबून असते. निव्वळ काल्पनिकतेवर विसंबून राहिल्याने काव्यनिर्मिती होणे शक्य असले तरी ती अनुभवाच्या परिपक्व मुशीतून अवतरली तर ती अधिक उत्कट, अधिक सर्वस्पर्शी होऊ शकते. मास अपील करण्याचे सामर्थ्य तिच्यात असते. त्यासाठी कवीचा अनुभव अस्सल असायला हवा. आपल्याच कोषात राहणारा आणि सामाजिक जाणिवेपासून अलिप्तता राखणारा कवी सामाजिकबांधिलकीपासून परावृत्त झालेला असतो, आणि तो असे का करतो असा प्रश्न निर्माण होतो. सामाजिकबांधिलकीचा विचार समाजशील प्राणी असणाऱ्या मानवी मनाला अस्वस्थ करीत नसेल का ? सामाजिकबांधिलकीचा विचार स्वीकारणे म्हणजे स्वतःपेक्षा सभोवताली असणाऱ्या असंख्य माणसांच्या सुखदुःखांचा विचार करणे. स्वतःच्या ठिकाणच्या स्वार्थीवृत्तीचा त्याग करणे, सामाजिकबांधिलकीला अभिप्रेत असते. समर्पित जीवन जगण्यासाठी प्रेरणा स्वीकारावयाची असते. ज्यांना स्वतःच्या स्वार्थापलीकडे, सभोवतीच्या सुखदुःखांविषयी आणखीन दुसरे काहीही करणे शक्य वाटत नाही त्यालाही कारणीभूत विचार असतो. आणि म्हणून कवीने कोणती विचारप्रेरणा स्वीकारावी हे सर्वस्वी त्याच्या मानसिक वृत्तीवर अवलंबून असते.

आपल्या देशातील संस्कृतीने ज्या समूहमनांवर अमानवी जीवन हेतुपुरस्सर लादले त्या संस्कृतीवर, त्या संस्कृतीतून निर्माण झालेल्या मनःप्रवृत्तीवर सामाजिकबांधिलकी मानणारे मन प्रकाश टाकते. विद्रोही कवितेचा सूर हा दुःखी मानवी मनाची ओळख करून देणारा आहे. परंतु व्यक्तिगत दुःख त्यात जेवढे आहे त्याच्या कितीतरी पटीने ते समूहमनाचे आक्रंदन आहे. ज्यांनी येथील जातीयतेमुळे हद्दपारी भोगलेली आहे आणि ज्यांच्या सर्व मानवी सुखमय कल्पनांचा व सौंदर्याचा चुराडा झालेला आहे, त्याला कारणीभूत ठरलेली आहे येथील सामाजिक व्यवस्था. आणि म्हणून हा सामाजिक आशय प्रामुख्याने विद्रोही कवितेच्या केंद्रस्थानी अवतरलेला आहे. विलक्षण असे दुःख भोगणे हे एका विशिष्ट समाजाने विशिष्ट सामुहिक समाजमनावर लादलेले आहे. ते झुगारण्याचे सामर्थ्य आंबेडकर विचारात आहे. ' डॉ. आंबेडकर विचार वाङ्मयीन प्रेरणा होऊ शकत नाही. ती विचार प्रेरणा आहे ' असे जे कुणी म्हणतात त्यांनी आधी कवी हा समाजबाह्य घटक आहे,

तो समाजशील प्राणी नाही हे मान्य करावयास हवे. कारण एखादा विचार समाजाला जेव्हा पोषक ठरतो, तेव्हा तो प्रेरणा म्हणूनही मान्यता पावतो. सामाजिक ऋण फेडणारे त्यापासून स्फूर्ती घेतात. आणि हे सारे घडत असते समाजात राहून आणि सामाजिकबांधिलकी मान्य केल्यावरच! ज्या वाङमयीन प्रेरणेला, दीनदुबळ्यांना, दलितांना आणि गोरगरिबांना गुलामगिरी झुगारून देण्यास लावणारा आणि माणूस म्हणूनच समर्थपणे उभा करणारा विचार महत्वपूर्ण वाटत नाही त्याचे कारणही स्पष्टच आहे. या वाङमयीन प्रेरणेच्या मुळाशी खंबीरपणे आणि घट्टपणे पाय रोवून उभा असलेला विषमतावादी बिचार सोडून देण्याची ताकद नाही. आंबेडकर विचार ही वाङमयीन प्रेरणा नाही असे कुणी म्हटल्याने, डॉ. आंबेडकरांपासून वाङमयीन प्रेरणा घेण्याचे काही कुणी टाळलेले नाही. सन १९३० सालापासून महात्मा गांधीपासून वाङमयीन प्रेरणा घेतलेल्या कवितेला गांधीवाद भरभक्कमपणे आत्मसात न करता आल्याने ती वाङमयीन प्रेरणा लुप्त झाली. मार्क्सपासून प्रेरणा घेतलेल्या कवींनी १९३० पासून धडपड करीत करीत मार्गक्रमण करूनही, मार्क्सवादीविचारप्रेरणा वाङमयीन प्रेरणा म्हणून भक्कमपणे आणि समर्थपणे आजही उभी राहू शकली नाही. आणि मराठी कवितेला मागे सारून ही पुरोगामी कविता पुढे सरकलेली नाही. या पार्श्वभूमीचा आधार घेऊन टीकाकार आंबेडकरविचाराचा याच दृष्टिकोणातून विचार करीत असतील तर ती गंभीर चूकच म्हटली पाहिजे. आंबेडकरविचार वाङमयीन प्रेरणा स्वीकारणाऱ्या विद्रोही कवितेने अल्पावधित आपला दबदबा निर्माण का केला? ललित कवितेला आणि पुरोगामी कवितेलाही मागे सारून ती का पुढे जात आहे? आणि मराठी कवितेला नवी दिशा आणि नवा आशय का प्राप्त होत आहे, याची चिकित्सकपणे मीमांसा केली तर त्याचे मर्म आंबेडकरविचारात सापडते. म्हणून गांधीवाद किंवा मार्क्सवादास ज्या कसोट्या लावण्यात आल्या त्या आंबेडकरवादास गैरलागू ठरतात. त्याचे कारण असे, की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'माणूस' या संकल्पनेस परिपोषक असणारा बुध्दविचार सांगितला. आंबेडकरविचार तळागाळातील माणसाच्या उध्दारासाठी आणि विकासासाठी सर्वंकष विचार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तळागाळातील समाजाच्या ज्या चळवळी उभारल्या त्यात सामाजिक उत्थापनाचे प्रतिबिंब स्पष्टपणे उमटलेले जाणवते. त्यामुळेच भरडलेला, चिरडलेला आणि ज्यांची सतत छळणूक व गांजवणूक केली जात होती, असा समाज खळबळून जागा झाला. त्याला अस्मितेची जाग आली. तेव्हा पिडलेल्या समाजाची हरवलेली अस्मिता शोधून देण्याचे महानकार्य आंबेडकरविचाराने पार पाडलेले आहे. हेच कार्य अन्य कोणत्याही प्रभावी विचारप्रणालीला करता येणे शक्य होते पण तसे प्रयत्न केले गेले नाहीत. याचे मूळ कारण असे होते, की भारतीय समाजजीवनात आंबेडकरविचा-

मार्क्सवादापेक्षा वेगळा विचार आहे आणि तळागाळाच्या समाजजीवनासाठी उध्दारकही आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊन ज्यांना आपल्या अस्मितेची जाण झाली, त्यांनी आपल्या वेदना, दुःख, मानहानी, अवहेलना आणि पशुतुल्य जीवनाची करुण कहाणी शब्दबध्द केली. आंबेडकरी विचारप्रेरणा मान्य करणाऱ्या विद्रोही कवितेला याशिवाय अन्य पर्यायही नव्हता. म्हणूनच सुरवातीला राजा ढाले, नामदेव ढसाळ, दया पवार, केशव मेश्राम, अर्जुन डांगळे इ. कवींनी बौद्ध व दलित समाजाची अस्मिता चेतविणे आपल्या काव्यनिर्मितीचे प्रमुख अंग मानले. आंबेडकर-विचार वाङमयीन प्रेरणा होऊ शकत नाही, असे टीकाकारांना वाटत असले तरी विद्रोही कवितेचे शक्तिस्थान आंबेडकरविचारच आहे, हे नाकबूल करता येत नाही.

विद्रोही कवितेचा मुखवटा तपासला तर असे आढळून येते, की या कवितेला पानांत, फुलांत, प्रेमात आणि मदिरेच्या कैफात अडकून पडणे मानवलेले नाही. तिचा तो पिंड नव्हता. तिचा तसा अनुभव नव्हता. तिच्या भाषाशैलीवरही आपोआप बंधने आली. स्वतःचा मुखवटा असणारी तिची भाषाशैली ओबडधोबड असणे स्वाभाविक होते. कारागिरीचा तिला स्पर्शही झालेला नव्हता. परंतु सत्यं-शिवं-सुंदरंचा उद्घोष करणाऱ्या टीकाकारांना पानांत, फुलांत, मदिरेच्या कैफात, प्रेमात, अंधश्रध्देत गुरफटून जाणाऱ्या आणि ईश्वरशाहीत विलीन होणाऱ्या कवितेचे जबरदस्त आकर्षण असल्याने विद्रोही कविता त्यांनी नाकारली. तरीही बंडाची, नकाराची व विद्रोहाची भाषा म्हणून जिवंतपणा ओतणारी विद्रोही कविता आपले बळ आणि सामर्थ्य सिद्ध करीतच होती. वास्तवतेचा दाहक अनुभव घेणारी, प्रसंगी विजेचा लोळगोळ होणारी. दुःखाचे उत्कट गीत गाणारी आणि सभोवतालचे जग हादरविणारी ही विद्रोही कविता, अनेक शतके भोगलेल्या यातनामय जीवनाचा परिपाक असल्याने आणि हे जीवनानुभव सर्वस्वी नवे असल्याने या कवितेने सर्वांचे लक्ष्य वेधून घेतले. तिच्यातून व्यक्त होणारा तळतळाट आणि जळफळाट काहींना आक्रोशी वाटला. काहींनी त्यास आक्रस्ताळेपणा असेही म्हटले. विद्रोही कवितेतून व्यक्त होणाऱ्या आशयाचे विद्रोही कवी भांडवल करतात अशी टीका करण्यात आली. परंतु त्याच बरोबर वेगळ्याच जीवनसृष्टीचे आकलन करणारी आणि तसे इतरांना करण्यास भाग पाडणारी ही कविता नवीन वाङमयीनमूल्ये निर्मिती प्रक्रियेस साहाय्यभूत ठरलेली आहे, हे नाकबूल करता येत नाही.

विद्रोही कवितेचा अभ्यास करताना समतोल समीक्षाविचारदृष्टीची आवश्यकता आहे. पारंपारिक मूल्यांना छेद देणारा विचार मांडला जात असेल तर तो नाकारणे व पर्यायाने रूजू न देणे ही पारंपारिकतेची महत्वपूर्ण कसोटी आहे. विद्रोही कविते-

तून जेव्हा आंबेडकरविचार काव्यरूप होऊ लागला तेव्हापासूनच पारंपारिक मूल्यांची कास धरणाऱ्या समीक्षेने या कवितेला मोडीत काढण्याचा प्रयत्न केला. "विद्रोही कविता एकसूरी आहे. विद्रोह, नकार, बंड, क्रान्ती, चीड याशिवाय तो व्यक्तच होत नाही. दलितत्वाचे भांडवल करीत ती आक्रस्ताळेपणा आणि आशयाच्या साचेबंदपणामुळे नवोदित कवीही प्रस्थापित कवीच्या आवाजात स्वतःचा आवाज लोप करतो." + हे आरोप विद्रोही कवितेत अनुभव आणि कल्पना अभावात्मक सापडते यावर आधारीत आहेत. या आरोपात फार तथ्य आहे असे म्हणता येणार नाही. दया पवार, नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, वामन निंबाळकर, नरेशकुमार इगळे, सुखराम हिवराळे, चोखा कांबळे, ज. वि. पवार, अर्जून डांगळे, यशवंत मनोहर, प्रल्हाद चेंदवणकर आणि त्र्यंबक सपकाळे इ. कवींच्या काव्यनिर्मितीचे प्रयोजन आणि हेतू लक्षात घेतले तर दलितत्वाचे अवाजवी, काहीवेळा अप्रस्तुत असे भांडवल झालेले दिसत असले तरीही अन्याय, अत्याचार, विषमता, छळवणूक, गांजवणूक आणि पिळवणूक याविरुद्ध पेटून उठणे आणि नकार, बंड, चीड, संताप व विद्रोह पुकारणे एवढ्याच ध्येयपूर्तीसाठी ही कविता अवतरलेली आहे. समाज-जागृती, समाजप्रबोधन आणि सामाजिकबांधिलकीसाठी ती प्रकटली आहे हे लक्षात घ्यायला हवे. कोणत्याही वेगळ्या आणि नाविन्यपूर्ण विचाराचे स्वागत त्यातील ताजेपणा, टवटवी, उत्साह आणि दूरगामी होणाऱ्या परिणामामुळे करावे लागते. अर्थात कोणत्याही विचाराचे सैध्दान्तिक रूप स्पष्ट करण्यासाठी आणि त्याची व्यवहारिक उपयुक्तता सिद्ध करण्यासाठी काही कालावधी जाऊ देणे इष्ट ठरते. विद्रोही कवितेचे मूल्यमापन होत असतानाच तिच्या आगमनापासूनच वाङमयीन फलश्रुती शोधण्याचे प्रयत्न होऊ लागले. हे अनिष्ट असले तरी हितावह ठरलेले आहे.

विद्रोही कविता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार करण्यापलिकडे अधिक वेगळा विचार करू शकत नाही हे खरे आहे. 'माणूस' ही संकल्पना विकसित करणारा आंबेडकरविचार हा आदर्श विचार असल्याने विद्रोही कवी या विचाराने प्रभावित झालेले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारप्रणालीच्या छायेखाली ते सातत्याने वावरतात. जग हादरवून सोडणाऱ्या या प्रचंड व्यक्तिमत्वापुढे ते नतमस्तक झालेले आहेत. काही प्रमाणात विभूतीपूजेच्या आहारी देखील काहीजण गेलेले स्पष्ट जाणवतात. ह्यामागील कार्यकारणभाव कोणता ? मला वाटते, की सहजता आणि उत्स्फूर्तता ही त्यामागील कारणे असावीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जो विचार या देशाला दिला आहे तो विचार मूळ धरू लागलेला आहे. अजून काही

+ दलित कवितेची वाङ्मयीन फलश्रुती : शशिकांत लोखंडे, रविवार सकाळ : २७।७।८०

वर्षे या विचाराचा प्रभाव भारतीय समाजमनावर असणे अटळ आहे. आणि तसा तो निश्चित राहाणार आहे. साऱ्या दिनदुबळ्यांना दिलासा देणारा, उपेक्षितांचा कैवार घेणारा हा विचार आहे. म्हणूनच समाजाच्या सर्व थरांतून त्याचे स्वागत होत आहे. समाजमनावर आंबेडकरविचार बिंबविण्याचे व रुजविण्याचे काही विद्रोही कवी सातत्याने प्रयत्न करीत असताना स्वतःच्या अनुभवांना आणि कल्पनांना व्यक्त करण्याची पुरेशी उसंत त्यांना लाभत नसेल का ? खरे तर असा प्रश्न निर्माण होण्याची गरज नाही. जातीयतेच्या भस्मासुराशी झगडताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शक्ती पणास लागली. शेवटी अतिशय कडवट अनुभवामुळे त्यांनी बौध्दधर्म स्वीकारला. तेवढा कटुअनुभव आजच्या आंबेडकरीप्रेरणेच्या कवींना जातीयतेचा येत नसला तरी जातीयतेशी झगडताना अद्यापही सर्वस्व पणास लावावे लागत आहे. आणि नेमका याच अनुभवाचा टीकाकार टीकेसाठी वापर करतात. विद्रोही कविता अनुभवशून्य आणि कल्पनाशून्य आहे असे प्रतिपादन त्यामुळेच होते. 'मी आणि माझा समाज' असे समीकरण मांडणाऱ्या कवीने डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे अनुकरण करणे अटळ आहे, हे टीकाकारांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. कारण जोपर्यंत विद्रोही कवींना आपण एका विशिष्ट तत्वज्ञानानुसार वाटचाल करणाऱ्या समाजव्यवस्थेचे नाहक बळी ठरलेले आहोत ही आत्मजाणीव भेडसावीत राहणार आहे तोवर तिचा निषेध करण्याशिवाय, तिच्याविरूध्द नकार नोंदविल्याशिवाय दुसरा पर्याय नाही. त्यामुळे तोच तोच सूर वारंवार व्यक्त होतो अपरिहार्यतेपोटी ! म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार विद्रोही कवी अनुवाद करतात असे मानणे सयुक्तिक ठरत नाही. तो या कवितेवर उघड अन्यायच ठरतो.

विद्रोही कवितेतून बंड, नकार, प्रक्षोभ, चीड आणि संताप व्यक्त होताना तोचतोचपणामुळे या कवितेला किमान मर्यादा पडलेली आहे, असाही आरोप सातत्याने होत असतो. आणि नेमके या आरोपामुळेच विद्रोही कवितेच्या सौंदर्याकडे, आशयाकडे आणि भावानुभवाकडे दुर्लक्ष करण्यात येते. विद्रोही कवीला पाने, फुले, बागबगीचे यांचे सौंदर्य आकर्षून घेत नाही, प्रेमभावनांचा मोह होत नाही, त्याचा तसा अनुभव नाही असले प्रश्न शोधण्यापेक्षा त्याहूनही जीवनात इतके काही विदारक अनुभव त्याच्या वाट्यास आलेले असतात, की त्यातून जिवंतपणाचे प्रभावी चित्रण उभे राहाते.

विद्रोही कवितेच्या मर्यादित कल्पनाविश्वापुरता विचार याठिकाणी विचारात घेतलेला आहे. संपूर्ण आंबेडकरीप्रेरणेच्या कवितेच्या संदर्भात हा विचार मांडलेला नाही, 'प्रवर्तक जाणीवे'च्या कवितेतून ती पुढे येणारच आहे. तात्पर्य, विद्रोही कवीच्या वाट्यास आलेली प्रेमभावना खोट्या कल्पकतेच्या आहारी जाऊन तो व्यक्त

करीत नाही. उदात्त, निष्ठावंत आणि आदर्शवत अशा प्रेमाची व्याकुळलेल्या भावनेने तो ग्वाही देत असतो. हे करीत असताना टीकाकार मात्र त्यातून तोचतोचपणा शोधून काढण्याचा अट्टाहास धरतात. विद्रोही कवितेतून व्यक्त होणाऱ्या तोचतोचपणाचे वैशिष्ट्य असे, की त्यातही शोधली तर विविधता सापडते. उदाहरण म्हणून 'आई' ही प्रतिमा याठिकाणी विचारार्थ घेउया। 'विद्रोही' कवितेतून दृष्टीस पडणाऱ्या 'आई' या प्रतिमेकडे जाणीवपूर्वक लक्ष केंद्रीत केले तर निरनिराळ्या छटा सहजपणे दृष्टीस पडतात. कवि यशवंतानी 'आई' ची गायिलेली थोरवी आपणास ज्ञात आहे. फक्त अवगत नाही. तिन्ही जगावर स्वामित्व गाजवणारा प्रत्यक्ष परमेश्वरही आईविना भिकारीच आहे हे सांगताना कवीने काव्यात्मकतेची बूज राखलेली आहे. परंतु त्यात व्याज्य काव्यात्मकता आहे. तिन्ही जगावर स्वामित्व गाजविणारा 'तो' स्वामी कल्पनेवर अधिक भर देऊन स्वतःला भिकारी मानत असला तरी वास्तवतेत तो भिकारी नसून स्वामीच असतो. म्हणूनच तिला व्याज्य काव्यात्मकता मानावी लागते. वास्तववादी दृष्टिकोणातून विचार करताना नारायण सुर्वे यांची 'माझी आई' ही कविता प्रभावी आणि प्रत्ययकारी असून या कवितेला विधानात्मक स्वर प्राप्त झालेला आहे. हा आर्तस्वर तिन्ही जगाच्या स्वामीचा भिकारी म्हणून नसून दारिद्र्याशी अविश्रांत झगडणाऱ्या, अपमान, छळ सोसणाऱ्या कष्टकऱ्याचा आहे. आईचे छत्र हरवल्यावर खऱ्या वेदनांचा आविष्कार नारायण सुर्वे आपल्या पोरकेपणातून व्यक्त करतात.

त्याच रात्री आम्ही पाचांनी
एकमेकास बिलगूनी
आईची माया समजून
घेतली चादर ओढून
आधीचे नव्हतेच काही
आता आईदेखील नाही

ज्याच्याजवळ काहीच नाही, त्याची मायेची ऊब गेल्यावर काय अवस्था होते. हे मनातील भाव सुर्व्यांच्या कवितेतून स्पष्टपणे जाणवतात. ज्यांचे स्वामित्व तिन्ही लोकावर लादलेले अशा स्वामीने स्वतःची भिकारी म्हणून केलेली तुलना किती बेगडी आणि हास्यास्पद वाटते ह्याची जाणीव व्यक्त होते. सुर्व्यांसारखेच 'आई' चे महात्म्य सांगणारा कवी म्हणजे वामन निंबाळकर. विद्रोही कवींचे वैशिष्ट्य असे, की प्रत्येकाने आपल्या आईच्या गुणवैशिष्ट्यांची वेगवेगळ्या पद्धतीने मांडणी करूनही तिच्या प्रातिनिधिक स्वरूपाला कमालीचे मनस्वीपणाने जोपासलेले आहे.

वामन निंबाळकरांची ‘ माय ’ अतिशय प्रभावीपणे आणि वेगळ्या सामर्थ्याने आपल्यापुढे उभी राहाते. ही कविता वाचताना काळजाला भिडून जाते. पूनर्प्रत्ययाचा अनुभव देऊन टाकते. नव्या आविष्काराचे लेणं घेऊन आलेली ही कविता चिंतनात गढून गेलेली आहे. जीवनाचे सर्वंकष तत्वज्ञान उभी करून टाकते. या कवितेने दारिद्र्याची पुरेपूर ओळख करून दिलेली आहे. आईच्या खऱ्याखुऱ्या वात्सल्याचा झरा तीत झिरपतांना दृष्टीस पडतो. चिमण्या भुकेलेल्या बाळाची नाजूक तगमग तीत आहे आणि आजुबाजूचे धुंद आणि भुकेला व्याकुळ बनविणारे जगही आहे. वामन निंबाळकरांनी ‘ साप ’ हे प्रतीक सामाजिक दुष्टप्रवृत्तीसाठी अतिशय परिणामकारकपणे वापरून आशयसंपन्न अशा प्रतिभेची साक्ष पटवून दिलेली आहे.

अर्जून डांगळे यांनी आपल्या ‘ आई ’ च्या प्रेमाची थोरवी गाताना सामान्य जीवन जगणारी असामान्य आई अचूकपणे ‘ आज मी उभा आहे ’ या कवितेतून साकारलेली आहे. तो म्हणतो,

“ रणरणत्या उन्हाच्या छाताडावर पाय ठेवू धारावीच्या कचरापट्टीत
गळ्यात गोणपाट अडकवून लोखंड–काच–लाकडे वेचणारी आई
पोट जाळण्यासाठी लोखंड काच– ‘ अब्दुल भंगारवाल्याला ’ विकी
अन् चुलीला जाळण्यासाठी लाकडे घरी घेऊन येई
चुलीतली लाकडे फुंकत आई आमचा अभ्यास बघत राही
धूर नसताना देखील उगाचच तिच्या डोळ्यात पाणी वाही.”

(छावणी हलते आहे. अर्जून डांगळे, पृ. क्र. ८)

विद्रोही कवीच्या आईस भ्रांत पडलेली आहे पोट भरण्याची! स्वतःपेक्षा ती आपल्या चिल्यापिल्यांचा अधिक विचार करते. मग ती निंबाळकरांची ‘ माय ’ जंगलातून लाकडे गोळा करून मोळी विकणारी असो, की अर्जून डांगळेंची धारावीच्या झोपडपट्टीत लोखंड–काच गोळा करून भंगारवाल्यास विकणारी आई असो. दोघींच्याही वाट्यास कष्ट उपसणे हे ओघानेच आलेले आहे. परंतु या कष्ट उपसणाऱ्या मातेच्या वृत्तीत ‘ रणरणत्या उन्हाच्या छाताडावर ’ पाय ठेवण्याचा करारीपणा आहे. निर्धार आहे आणि प्रचंड आत्मविश्वास आहे. गळ्यात गोणपाट अडकवताना आणि लोखंड–काच गोळा करताना तिला खंत वाटत नाही. खंत वाटण्याचे प्रयोजन तरी काय? कारण तिला आपल्या चिल्यापिल्यांचा भविष्यकाळ ह्यातूनच उज्ज्वल आणि दैदिप्यमान करावयाचा आहे. आणि तेवढ्याचसाठी या मातेने कष्ट उपसण्याचे व्रत स्विकारलेले आहे. हस्तीदंती मनोऱ्यात, प्रासादात व बंगल्यात राहाणाऱ्या सुखवस्तु आईपेक्षा–अर्जून डांगळ्यांनी उभी केलेल्या प्रातिनिधिक आईचा त्याग असीम आणि मौलिकच आहे. एका बाजूने चुलीतील लाकडे

फुंकताना आपल्या मुलांचा अभ्यास पाहणारी आई धोरणी, कुशल आणि व्यवहारी असल्याची साक्ष पटते आणि त्याहीपेक्षा आपला त्याग फुकट जाणार नाही, तो निश्चितच फलद्रुप होईल अशी मनोमन खात्री बाळगणाऱ्या आईच्या डोळ्यांतील कौतुकमिश्रित आसवे "धूर नसताना देखील उगाचच तिच्या डोळ्यात पाणी वाही" असे विलोभनीय दृष्य पाहून मन थक्क होऊन जाते. याहीपेक्षा विद्रोही कवींनी आपले कोणते सामर्थ्य आणि कसब प्रगट करावे अशी आपण अपेक्षा करावी !

भीमसेन देठे यांची 'फोडायचंच आभाळाला' ही कविता अशीच आईची थोरवी गाणारी. आपला, 'होरपळ' काव्यसंग्रह आपल्या आईस अर्पण करताना "हयातभर काखोटीला पाटी-खराटा घेऊन जिने काबाडकष्टात माझ्या आयुष्याला घडवलं त्या माझ्या आईस." असे उद्गार काढले आहेत. ह्यातच या कवीने आपली ओळख पटवून दिलेली आहे. हा कवी म्हणतो—

हे माझे आई !
काखोटीला पाटी-खराटा मारुन
लगबगीने शिरतेस गांवात
आरशासारखी लख्ख झाडलोट करतेस
गावकुसाबाहेरच्या परतीच्या वाटेवर
घामजलेली धावपळ तुझी............+

(होरपळ : भीमसेन देठे, पृ. क्र. ३)

आरशासारखी झाडलोट करणारी 'आई' एका वेगळ्या सामर्थ्याची जाणीव करून देते. उपेक्षित, भरडलेल्या, चिरडलेल्या समाजातील स्त्रीजीवनात कारुण्य किती ओतप्रोत भरलेले आहे ह्याची जाणीव सहजपणे होते.

"हे माझे आई !
तू अशी उसनवारी हासू नकोस ग
तुझं रडणंच मला आवडतं
ज्यात पेटवीत असतेस हिरोशिमा"............*

निर्धार, प्रेम, सचोटी, चिकाटी, सोशिकपणा आणि आत्मविश्वासच केवळ या 'आई' जवळ नसून 'क्रान्ती' घडवून आणण्याचेही सामर्थ्य आहे हे अचूकपणे भीमसेन देठेनी 'ज्यात पेटवीत असतेस हिरोशिमा' असे व्यक्त करून ओळखलेले आहे. विद्रोही कवीची 'आई' ही विद्रोही संस्कार नकळतपणे करणारी स्फूर्तीदात्री आहे.

नामदेव ढसाळांची 'आईच्या समजुतीसाठी' कविता देखील अतिशय महत्वपूर्ण आहे. तो म्हणतो—

आज पंचविशीमध्ये वार खुल्लेला तुझा पुत्र
ज्याला केलेस तू रजाचा गज दारिद्र्याचा झळा नी खस्ता सोसून
ज्याला भरवलीस तू भाताची शिते पोटाला चिमटे काढून
ज्याला वाढवलेस तूं नेत्राचा दिवा नि हाताचा पाळणा करून
ज्याला जपलेस तू आयुष्याच्या उलाढालीत तळहाताच्या फोडासारखे
आई तो तुझा लाडका,
इथल्या संस्कृतीच्या, रूढीच्या, परंपरेच्या विचारांच्या
व्यवस्थेच्या समर्थकांच्या विरूध्द बंड करून उठलाय "×

(मुर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले, पृ. क्र. १२)

इथल्या संस्कृतीच्या आणि तिच्या रक्षकांच्या विरुध्द बंड करण्यास सिध्द झालेला हा कवी आपल्या आईची समजूत का घालतो आहे, ह्याचे विवेचन या कवितेत आढळते. क्रांतिपुत्राची भूमिका या कवीने घेतलेली असून त्याचे व्यक्तिमत्व पेटलेले आहे. हे पेटलेले व्यक्तिमत्व समूहमनाचे प्रतीक आहे. जेव्हा विशिष्ट समाजच या भावनेने पेटतो तेव्हा व्यक्तिमन या समूहमनात विसर्जित होणे स्वाभाविकच ठरते.

विद्रोही कवितेवर तोचतोचपणाचा आरोप होत असताना 'आई' या प्रतिमेचा आंबेडकरीप्रेरणेचे कवी कशारीतीने वापर करतात, ह्याचा संक्षिप्त विचार या ठिकाणी केला. तो अभ्यासूंनी जाणीवपूर्वक लक्षात घ्यावा म्हणून! विद्रोही कविता विधानात्मक आणि समूहमनात विसर्जित होणारी असल्यानेच तोचतोचपणा प्रभावीपणे जाणवतो परंतु विधानात्मकता, सामुहिक बांधिलकी हीच या कवितेची जमेची बाजू आहे. नामदेव ढसाळांच्या 'आईच्या समजुतीसाठी' या कवितेच्या संदर्भात डॉ. म. सु. पाटलानी म्हटले आहे, "ती वरवर व्यक्तिनिष्ठ वाटत असली तरी तिचे स्वरूप वर्गीय आहे. हा वर्गच येथे आईचे रूप घेतो आणि कवी हा परंपरेच्या विरूध्द लढायला सिध्द झालेला तिचा क्रांतिपुत्र बनतो. त्याच्या तोंडी........

"कशास आई, भिजविसी डोळे, उजळ तुझे भाल
रात्रीच्या गर्भात उद्याच्या असे उषःकाल"

अशी भाषा येत नाही. त्याचे कारण कदाचित त्याची आई इतकी सुजाण नाही असे असेल. *

डॉ. म. सु. पाटलांनी या ठिकाणी एक प्रश्न निर्माण केला आहे. "कशास आई भिजविसी डोळे उजळ तुझे भाल रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल" या काव्यपंक्तीत काव्यत्मकता निश्चितच आहे, परंतु त्यात गुढरंजनही आहे,

* दलित कविता : डॉ. म. सु. पाटील : पृ. क्र. १९

काल्पनिकता आहे. आणि आशावादी सूर आहे. रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल ह्याची व्यक्तिमनाला खात्री वाटणे स्वाभाविक आहे. परंतु "आई तो तुझा लाडका इथल्या संस्कृतीच्या रूढीच्या परंपरेच्या विचारांच्या व्यवस्थेच्या समर्थकांच्या विरूद्ध बंड करून उठलाय," ह्या काव्यपंक्ती उषःकाल झाल्यानंतर घडणाऱ्या क्रांतिकारक घटनांची साक्ष पटविणाऱ्या आहेत. विद्रोही कवींची आई सुशिक्षित असणे म्हणजेच सुजाण असणे अशी भ्रामक कल्पना करणे फारसे आशादायक चित्र निर्माण करीत नाही. ती तेवढी सुजाण नसती तर क्रांतिपुत्राचे संस्कारक्षम मन घडविण्याची कुवत तिच्यात नसतीच. नामदेव ढसाळांच्या काव्यात गूढ नाही. खोटे मूडस् नाहीत आणि कल्पनाविलासही नाही. सरळ सरळ वास्तववादी भूमिका घेणारी काव्यनिष्ठा आहे. आपले पेटलेले व्यक्तिमन समूहात विसर्जित करून हा कवी संकेताविरूद्ध उभा ठाकताना सांकेतिक भाषेच्या आहारी जातो. आणि एका विरोधाभासाला जन्म देतो" ऽ 'गोलपीठा' या काव्यसंग्रहातही नामदेव ढसाळांचे व्यक्तिमन समूहमनात विलीन झालेले आढळून येते.

मी हे सारं काही बोलणार नव्हतो पण माझे हात जागे झालेत.

हजारो वर्षे मी होतो खंगत
या गुहा–गुहातल्या प्रचंड अंधाराला
कालच तो गुहेच्या तोंडाशी ठेवून गेला पिसाळलेला जाळ
मी शिलगावीत जाणार आहे या पुढचा काळ

(गोलपीठा, पृ. क्र. २१)

किंवा

"ती पहा रे ती पहा, मातीची अस्मिता आभाळभर झालीय
माझ्याही आत्म्याने झिंदाबादची गर्जना केलीय
रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो"
आता या शहराशहराला आग लावीत चला.

(गोलपिठा, पृ. क्र. २३)

"अशा कवितांतून व्यक्त होणारे जीवन समूहमनाचे आहे." हे म. सु. पाटलांना मान्य आहे. "पण त्याचे भान समूहाला नाही" * अशी म. सु. पाटलांनी ग्वाही दिलेली आहे. नेमकी याच ठिकाणी आंबेडकरी प्रेरणेच्या समूहमनाची आणि नामदेव ढसाळ या व्यक्तिमनाची ओळख पटवून घेताना त्यांनी फसगत करून घेतलेली आहे. समूहाच्या उरात सलणाऱ्या वेदना व्यक्त करण्यास अनेक विद्रोही

---

ऽ दलित कविता : डॉ. म. सु. पाटील. पृ. क्र. २०

* दलित कविता : डॉ. म. सु. पाटील पृ. क्र. १५

कवीप्रमाणे नामदेव ढसाळ निमित्तमात्र ठरलेला आहे ह्याची म. सु. पाटलांनी खात्री केल्याने "समूहाच्या उरात घुसमटून जाणाऱ्या साऱ्या वेदना जणू येथे एका व्यक्तिमनाच्याद्वारे एकवटून उद्रेकित झाल्यासारख्या वाटतात." * असे ते मत व्यक्त करतात. वास्तविक व्यक्तिमनाऐवजी समूहमनातूनच नामदेव ढसाळांच्या 'गोलपीठा' या काव्यसंग्रहातील व्यक्तिमन विकसित झालेले आहे हे नाकबूल करता येत नाही.

विद्रोही कविता फॉर्मला राबवून घेते का ? "दया पवार, नामदेव ढसाळ, त्र्यंबक सपकाळे, यशवन्त मनोहर, अर्जुन डांगळे, आणि प्रल्हाद चेंदवणकर कविता या फॉर्मला राबवून घेतात. फार काय डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे ते फक्त अनुवाद करतात" ऽ असा टीकाकारांचा विद्रोही कवितेबाबत आक्षेप आहे. 'फॉर्म' या संकल्पनेचा आपण विचार करतो तेव्हा पारंपारिक कसोट्याच अभिप्रेत असतात. भारतीय साहित्यशास्त्राचा विचार केला तर साहित्यात सामाजिकतेला नगण्य स्थानच दिलेले आढळून येते. "ललित साहित्याने समाजकारण केले पाहिजे, असे जे म्हटले जाते. त्याचा अर्थ एवढाच, की सामाजिक वास्तवाशी अधिक डोळसपणे, अधिक व्यापकतेने, अधिक जिज्ञासेने आणि जिव्हाळ्याने एकरूप होऊन ललित साहित्य निर्माण झाले पाहिजे" × ह्या प्रा. रा. ग. जाधवांच्या विधानाचा उघड अर्थ असा, की ललित साहित्य सामाजिक जीवनाकडे उपेक्षेने पाहाते. जे साहित्यच उपेक्षेने पाहाते त्या साहित्याच्या मानदंडाविषयी अधिक व्यापक बोलण्यासारखे काही नसते. तेव्हा विद्रोही कवितेचा अभ्यास करताना ललित कवितेच्या चौकटीत बसणारी समीक्षा उपयुक्त ठरत नाही. कारण या समीक्षेला मध्यमवर्गीय नोकरदार संस्कृतीचे धुरीणत्व महत्वाचे आणि जिव्हाळ्याचे वाटले आहे. साहित्यकृतीतील आशय ( Content ) आणि रुप ( Form ) यापैकी रुप ( Form ) महत्वपूर्ण मानणारी आजची समीक्षा ही प्रामुख्याने आशयास ( Content ) प्राधान्य देणाऱ्या विद्रोही कवितेच्या संदर्भात गैरलागू पडते आणि म्हणूनच विद्रोही कवितेच्या रुपाविषयी ( Form ) नवीन समीक्षात्मक दृष्टी अवलंबिणे भाग पडते. अलिकडे आशय आणि रुप ह्यांचा परस्पर संबंध जोडण्याचा जो प्रयत्न होत आहे त्याला कारणीभूत विद्रोही कविताच ठरलेली आहे. विद्रोही कवितेचे मूल्यमापन ललित कवितेच्या चौकटीनुसार केल्यास विद्रोही कवी रुपाला ( Form ) राबवून घेतात, असे मत सौंदर्यवादी टीकाकार व्यक्त करणारच.

---

* दलित कविता : डॉ. म. सु. पाटील, पृ. क्र. १५

ऽ दलित कवितेची वाङ्मयीन फलश्रुती : शशिकांत लोखंडे, रविवार सकाळ : दिनांक २७।७।८०

× साहित्य आणि सामाजिक संदर्भ : रा. ग. जाधव, पृ. क्र. ४१

अलिकडे समग्र मराठी कविता विपुल प्रमाणात निर्माण होत आहे. विपुलते-बाबत विद्रोही कविताही मागे नाही. ती ज्या गतीने, ज्या वेगाने मराठी कवितेला मागे सारुन पुढे जात आहे, त्यावरुन तिची शैली, भाषा, आशय (Content) आणि रुप (Form) वेगळ्या अर्थाने विचारात घेणे भाग पडत आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय या मूल्यांवर आधारलेल्या समाजजीवन दृष्टीचे आणि संस्कृतीचे धुरीणत्व विद्रोही कवितेने स्विकारलेले आहे. हे धुरीणत्व परिस्थितीतूनच निर्माण झालेले आहे. आणि या परिस्थितीला आंबेडकरी विचारप्रणाली प्रामुख्याने कारणीभूत आणि सहाय्यभूत ठरलेली आहे. विद्रोही कविता आंबेडकरांचा विचार व्यक्त करते म्हणून नाकारणे अयोग्य ठरते. विद्रोही कवितेला अकाव्य म्हटल्याने मराठी काव्याचीच हानी होते. एका दिवंगत सौंदर्यवादी टीकाकाराने नवकाव्यास विरोध करतांना मर्ढेकरांपासूनच्या नवकाव्यास 'अकाव्य' म्हटलेले आहे. नवकाव्य जोमात असतानाही त्यांनी त्यास ठाम विरोध केला. आचार्य अत्रे सारखेही अनेकजण नवकाव्यास विरोध करणारे त्यावेळी होते. त्याचे प्रामुख्याने कारण असे, की मानवी जीवनातील विसंगती मूल्यविहीनता, निरर्थकता आणि वैफल्याचे चित्रण येत असल्याने ही कविता नाकारणारा मोठा वर्ग होता. तात्पर्य, परिवर्तनशीलता या पारंपारिक मूल्ये जतन करणाऱ्या वर्गाला मान्य नव्हती आणि म्हणून नवकाव्य म्हणजे नैराश्य, दुर्बोधता आणि अश्लिलता असे त्यांनी समीकरण मांडले. नवकाव्य हे काव्यच नाही अशी टीकाकारांची धारणा होती. मनोविश्लेषणात्मक कवितेला त्यांनी विरोध केला. म्हणून नवकाव्याची निर्मिती आणि विपुलता लोप पावली का! बा. सी. मर्ढेकरांनीच मराठी कवितेला वेदनेचा खरा 'स्वर' प्राप्त करुन दिला असे म्हटले जाते. मर्ढेकरांची कविता किंवा मर्ढेकरी संप्रदायाची कविता उचलून धरली ती प्रामुख्याने सौंदर्यवादी टीकाकारांनीच, हे या ठिकाणी आवर्जून लक्षात घेण्यासारखे आहे.

तेव्हा सौंदर्यवादी टीकाकारांच्या विविध भूमिकांचा विचार केला तर विद्रोही कवितेला आणि तिच्यातील सामाजिक आशयाला गौणत्व देण्याचा त्यांचा दृष्टिकोण लक्षात घ्यावा लागतो. कलावादी दृष्टिकोणाचा प्रभाव मराठी साहित्यावर असल्याने माणसाचे संस्कारक्षम मन घडविणे हा कलेचा प्रधान सामाजिक–सांस्कृतिक हेतू असतो हेच मुळी कलावाद्यांस अमान्य आहे. सांस्कृतिक फलश्रुती या दृष्टीने सामाजिकतेचे महत्व शून्य असते असा या टीकाकारांचा दावा आहे आणि म्हणून आशयाकडे दुर्लक्ष करून रचनेला प्राधान्य देणाऱ्या कलावादाने सामाजिकता ही संकल्पना गौण मानली. प्रा. रा. ग. जाधव म्हणतात, "साहित्याचे मूल्य दुहेरी असते. समाजातील एक सर्जनशील कार्य म्हणून आणि एक स्वतंत्र कलात्मक निर्मिती म्हणून" *

---

* साहित्य आणि सामाजिक संदर्भ : रा. ग. जाधव, पृ. क्र. ७९

याचा अर्थ असा, की समाजाचा साहित्याशी निकटचा संबंध आहे. म्हणून त्यांनी साहित्य समीक्षक हा खास प्रांत असलेल्यांकडून काही अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत. ते म्हणतात, "साहित्य समीक्षक एखादी साहित्यकृती किंवा साहित्यप्रवाह किंवा प्रकार यांचा अभ्यास करुन त्यांची वाङ्मयीन वैशिष्ट्ये मांडण्याचा व मूल्य निर्धारित करण्याचा प्रयत्न करतो. यासाठी त्याला साहित्याच्या प्रकृतीची, प्रयोजनांची, परिणामांची तसेच त्याच्या इतिहासपरंपरेची, योग्य माहिती असावी लागते. समाजातील एक सर्जनशील कार्य म्हणून साहित्याचा जो दुसऱ्याप्रकारे विचार करतो, त्याची भूमिका ही मुख्यतः एका जागृत विवेकवाद्याची असते. बुध्दिवादी इंटलेक्चुअल म्हणजे कोण हे कसेही व्याख्यात केले; तरी समाजाच्या सर्व क्षेत्रात जे काही घडत असते, त्याचा व्यापक संदर्भात सखोलपणे साक्षेपाने व समतोल असा विचार मांडून त्यासंबंधी वैचारिक जागृती करणे, हे बुध्दिवादाचे मुख्य कार्य असते. साहित्य, समाज आणि धर्म यासारख्या कोणत्याही एका विषयात विशेष आस्था ठेवून तो त्याचा व्यापक संदर्भात विचार करतो." * प्रा. रा. ग. जाधवानी साहित्य समीक्षकासाठी सांगितलेली ही मार्गदर्शक तत्त्वे कलावादाचा सातत्याने पुरस्कार करणाऱ्या आणि समाजिकता व पुरोगामित्व ही संकल्पना धुडकावून लावणाऱ्या साहित्य समीक्षकांना लागू पडतात की नाहीत? लागू पडत असतील तर विद्रोही कवितेचे मूल्यमापन योग्यप्रकारे होत नाही असा अर्थ त्यातून निघतो.

सामाजिकदृष्ट्या अतिशय जिवंत आणि प्रखर अनुभव व्यक्त करणारी विद्रोही कविता सामुहिक जाणीवेचा आविष्कार आहे. कवीच्या कवितेतील आशय समूहाच्या जीवन दृष्टीतून साकार होतो. म्हणजेच जीवनदृष्टिमध्ये विचार, भावभावना, आकांक्षा, वस्तुस्थिती आणि बांधिलकी इ. बाबी येतात आणि समूहातील सारे घटक एकत्रितपणे एकसंध बांधले जातात. त्यामुळे कवीचे सामाजिक जीवन आणि समाजाची सामुहिक जाणीव साहित्यकृतीचे मूळ आकारास आणते. विद्रोही कवितेची वाटचाल अल्पशी असूनही यामुळेच ती प्रभावीपणे रंगमंचावर अवतरलेली आहे. फार मोठ्या टप्प्यातून आंबेडकरी प्रेरणेची कविता अद्याप गेलेली नसतानाही गोलपीठा, अंगारा, गावकुसाबाहेरील कविता, कोंडवाडा, उत्खनन, विद्रोही कविता, छावणी हालते आहे, उत्थानगुंफा, ऑडिट, सुरुंग व नाकेबंदी इ. काव्यसंग्रहांना अभिजात साहित्याचा दर्जा प्राप्त झालेला आहे किंवा नाही, हे तपासणे बाजूला ठेवले तरीही हे सारे कवी आपआपल्या समर्थ ताकदीने उभे आहेत आणि आजच्या प्रचलीत मराठी कवितेला मागे सारून पुढे जाण्याचा जिद्दीने आणि नेटाने प्रयत्न करीत आहे.

---

* साहित्य आणि सामाजिक संदर्भ : रा. ग. जाधव, पृ. क्र. ७८-७९

'दलित' या आयडेंटिटीमुळे प्रतिभासंपन्न अशा विद्रोही कवींच्या वाट्यास उपेक्षितपणा आला आहे. आणि योग्य मूल्यमापनाऐवजी अवमूल्यन त्यांच्या वाट्यास आले. दलितत्वाचे विद्रोही कवी भांडवल करतात या समजुतीमुळे विद्रोही कवितेच्या रचनेकडे टीकाकार लक्ष न देता बंड, नकार, प्रक्षोभ, विद्रोह, आक्रोश, संताप व क्रांतीची भाषा बोलण्यापेक्षा या कवितेत नाविन्यपूर्ण काहीच नाही असे समीकरण मांडून विद्रोही कवितेतील शब्दसामर्थ्य, घाट, आशयसंपन्नता, प्रतिमा, कल्पना आणि प्रतिके इ. कडे साफ कानाडोळा करतात. समाजव्यवस्थेने लादलेली सामाजिक हद्दपारी, अमानुष जीवन आणि त्या जीवनातून भीषण नाट्यमय भोगलेले प्रसंग व्यक्त करण्याची पाळी विद्रोही कवीवर परिस्थितीमुळे पडली, ती व्यक्त करताना दलितत्वाचे प्रकटीकरण निश्चितच होते. त्याशिवाय पर्यायच नाही. आणि तसे केले नाहीतर वास्तवतेपासून काव्यानुभव दूर जाण्याचा संभवच अधिक. पर्यायाने दलितत्वाचे भांडवल हीच विद्रोही कवितेची महत्त्वपूर्ण कसोटी म्हणून टीकाकारांच्या लक्षांत राहते. परंतु दुःखाचे महत्त्व सर्वमान्य आहे. दुःख व्यक्त करणे ही विद्रोही कवितेची जमेची बाजू! दुःखामुळे जीवनातील कारूण्याला अर्थपूर्णता प्राप्त होते. अश्रूना जन्म देण्याची ताकद जेवढी दुःखात आहे, तेवढी सुखात नाही. अश्रूंची फुले होतात. अश्रूमुळे जीवनातील कारूण्य समजून घेता येते, समजून देता येते. कारूण्यात दगडालाही पाझर फोडण्याची प्रचंड शक्ती आहे. विद्रोही कविता सातत्याने दुःखी जीवनाची शोकांतिका व्यक्त करताना कारूण्याचा वेध घेते. याच ठिकाणी पुन्हा आपणास विचारोन्मुख व्हावे लागते. करूणेत समानतेकडे घेऊन जाण्याची प्रचंड ताकद आहे. करूणेच्या अभावामुळेच भारतीय समाजजीवनातील विशिष्ट समूहजीवनाच्या वाट्यास गांजवणूक, छळवणूक, पिळवणूक आली. ज्यांच्या ज्यांच्या वाट्यास उपेक्षित हीन दीन, लाचार जीवन आले त्या त्या समूहजीवनाच्या वाट्यास अस्पृश्यता आली. ह्याची पूर्ण जाण ठेवून विद्रोही कविता जीवनाचा व्यापकपणे अर्थ शोधते आणि मानवी जीवन असह्य करणाऱ्या प्रवृत्तीविरोधी तिचा नकार नोंदविते. हा नकार परंपरेला आणि प्रस्थापित समाजव्यवस्थेविरूद्ध असल्याने काही टीकाकारांना अभिनिवेषी थाटाचा वाटतो. कारण परंपरा आणि प्रस्थापित समाजव्यवस्थेची मूल्ये जतन करण्याचा हट्ट त्यांच्याकडून सोडवत नाही.

विषमतावादी संस्कृतिला विद्रोही कवितेचा जो नकार आहे तो होकाराच्या शोधार्थ आहे. माझ्याही अस्तित्वाला काही अर्थपूर्णता आहे म्हणून व्यक्त होणारा आक्रोश नकारात्मक नाही. समाजजीवन आणि वाङमय ह्यांचा अनुबंध अतुट असतो. साहित्याची उपयुक्तता आणि स्वायत्तता : ट्रॉट्स्कीचे साहित्यशास्त्र यावर साहित्यमीमांसा करताना केशव शिरवाडकर म्हणतात की, "कलेत संघटीत होणाऱ्या जाणिवांची मुळे, कलेची अविष्कारपध्दत भूतकाळात रुजलेली असतात. भाषिक

कारागिरीच्या सामूहिक अनुभवात साहित्याची मुळे खोलवर गेलेली असतात. तेच साहित्य नव्या वर्गाच्या नव्या जाणिवांना अभिव्यक्ति देत असते. कोणत्याही दृष्टिने कला आणि सामाजिकता ह्यांची फारकत केली तर कलेचे कलेवर होणे अपरिहार्य आहे " + विद्रोही कवितेतून व्यक्त होणारे सामाजिक दुःख आणि त्या दुःखाच्या समूहमनाने कित्येकशतके भोगलेल्या मरणप्राय यातना करुणेला जागे करतात. हे समजून घेण्यासारखे आहे. कारण त्यामुळेच वास्तवतेचा खराखुरा अर्थ विद्रोही भूमिकेला प्राप्त होतो. आणि अशी कलाकृती आंतरिक प्रेरणा प्रकट करुन जाते. तेव्हा प्रश्न असा निर्माण होतो. की विद्रोही कवितेची समीक्षा करताना जाणकार, टीकाकार सत्याचा आभास निर्माण करतात. परंतु त्याचवेळी विद्रोही कवितेची धार बोथट कशी करता येईल ह्यावरच त्यांचे लक्ष केन्द्रीत झालेले आढळून येते. आंबेडकरी प्रेरणेच्या कवितेची समीक्षा तौलनिक पातळीवरून होत नाही. जर असे झाले तर मराठी कवितेला या कवितेने हादरवून टाकले आहे. एवढेच लक्षात न घेता नव्या कवितेच्या रचनेच्या आणि आकृतिबंधाच्या दृष्टिने विचार करणे भाग पडणार आहे. त्याशिवाय गत्यंतर नाही, हे कालांतराने सिद्ध होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सामाजिक बांधिलकी हा एक आणखीन आंबेडकरी प्रेरणेच्या कवितेच्या संदर्भात उपस्थित होणारा वादग्रस्त प्रश्न. या कवितेचे स्वरूप व्यक्तिसमाजनिष्ठ (Socio-Individual) असे होते. आणि ते तसे अंगिकारण्याचे प्रयोजन कोणते. ज्या संस्कृतिने आपल्या पूर्वजांना हद्दपारी भोगावयास लावली, अवहेलना सोसावयास लावली, अपमान गिळण्यास भाग पाडले, निंदा, नालस्ती आणि उपेक्षा सहन करण्यास निर्जिव बनविले, त्याच संस्कृतीस आदर्शवत मानणाऱ्या समाजजीवनात आंबेडकरी प्रेरणेचा कवी वावरतो. अशा गुदमरलेल्या अवस्थेत आपले सामाजिक स्थान कवडीमोल आहे ही 'स्वत्व' आणि 'सत्व' ची जाणीव झालेल्या विद्रोही कवीला या बाबतीतला अनुभव अस्सल वाटतो. आणि तो व्यक्त करताना व्यक्तिगत जीवनातील ताणबाण जसे तो प्रकट करतो, तेवढ्याच सामर्थ्याने समाजजीवनातील ताणबाणही प्रकट करतो.

प्रत्येकाच्या जीवन जगण्याच्या पध्दतीला वेगवेगळा अर्थ असतो. जगतानाच अनुभव घेण्याची प्रक्रिया घडत असते. जे जगत असतात ते जीवनानुभव घेत असतात. आपल्या भारतीय समाजजीवनात असे उपेक्षित समूह आहेत, की त्यांना जगणे हेच नेमके परिस्थितीने नाकारलेले आहे आणि या परिस्थितीला कारणीभूत ठरलेली आहे विषमतावादी मानवी प्रवृत्ति. अशा मानवी जीवन नाकारलेल्या समूहजीवनाला आधी जीवन म्हणजे काय ! हे खऱ्या अर्थाने समजून घ्यावे लागते

---

+ मार्क्सवादी साहित्य विचार : केशव शिरवाडकर पृ. क्र. ६०–६१

आणि नंतरच जीवनानुभव भोगण्याचा आनंद प्राप्त करावा लागतो. तोवर अशा समूहजीवनाची झगडण्याची शक्ती ऱ्हास पावलेली असते. आजच्या विद्रोही कवितेचा नेमका हाच अनुभव आहे. म्हणूनच विद्रोही कवी जीवनानुभव घेतानाच त्याच्या व्यक्तिगत अनुभवावर समाजजीवनाचा अनुभव प्रभावीपणे मात करीत असतो. पारंपारिक कवितेला आणि मध्यमवर्गीयांचे धुरीणत्व स्विकारणाऱ्या कवीला परिस्थितीने ( संस्कृतिने ) सुरक्षितपणे जगणे बहाल केलेले असल्यामुळे विद्रोही कवितेप्रमाणे त्याला जीवनानुभव घेण्यासाठी दुहेरी भूमिका पार पाडावी लागत नाही. जीवनानुभवामुळे कवितेतील भावपूर्ण आशय व्यक्त करण्यास मोलाची भर पडते हे खरेच परंतु हा जीवनानुभव कवी समाजात राहूनच घेत असतो. फरक एवढाच, की विद्रोही कवीला स्वतःपुरते जग विचारात घेण्याची उसंत नसते आणि ललित कवी व्यक्तिनिष्ठ जीवनात इतका मश्गुल झालेला असतो, की त्याला सभोवताली नित्याने घडणाऱ्या घडामोडींकडे लक्ष देण्याचे भान नसते. अशा विरोधात्मक जीवनमूल्यांवर आधारीत काव्यनिर्मितीची प्रक्रिया घडताना भावकवितेतही सामाजिक संदर्भ अटळ असतो. व्यक्तिसमाजनिष्ठ आंबेडकरी प्रेरणेची कविता बांधिलकी स्वीकारताना असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा या कवितेचे सामाजिक व व्यक्तिगत संदर्भ लक्षात घ्यावे लागतात. आंबेडकरी प्रेरणेच्या कवितेला, व्यक्ति-समाजनिष्ठ स्वरूप अभिप्रेत आहे ते साम्यवादी कवितेच्या स्वरूपापेक्षा भिन्न आहे. आंबेडकरी विचार समानतेलाच प्राधान्य देतो. बौध्दधम्माची शाश्वत मूल्ये प्रस्थापित करणे व जातीविरहीत समाजरचना निर्माण करणे याची ग्वाही देतो. तेव्हा भारतीय समाजजीवनात आंबेडकर विचारामुळे धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परिवर्तन अभिप्रेत आहे.

सद्यःस्थितीत विद्रोही कवितेचे स्वरूप कसे आहे, हे पाहाणे उद्बोधक ठरते. आर्थिक, सामाजिक आणि वैयक्तिक अशी विद्रोही कवितेची प्रकृती आहे आणि त्यामुळे ती एकाचवेळी आंबेडकरवाद व मार्क्सवादाचा आपल्या ध्येयपूर्तीसाठी सारखाच पुरस्कार करते. तळागाळातील उपेक्षित समाजाचा उध्दार करण्यासाठी आर्थिक प्रयोजन महत्वपूर्ण मानले तर मार्क्सवादी दृष्टी विद्रोही कवितेला टाळता येत नाही. एकाचवेळी आर्थिक विकास व सामाजिक विषमता नष्ट करण्याची घाई विद्रोही कवितेला झालेली असल्याने मार्क्सवादी तत्वज्ञानाने या कवितेला काही प्रमाणात प्रभावित केले आणि आंबेडकरविचारापासून ही कविता काही प्रमाणात फारकत घेऊ लागलेली दिसून येते. मूळ उद्देश बाजूला ठेवून उपप्रयोजनांना प्राधान्य देण्याची गफलत झालेली आहे. आंबेडकरतत्वज्ञानाला अभिप्रेत आहे बौद्धसंस्कृती. या बौद्धसंस्कृतीची जोपासना करणे आणि जातीयतेमुळे होरपळणाऱ्या दलितसमाजाची जातीयतेच्या भस्मासुरापासून मुक्तता करणे हे ध्येय आंबेडकरवादात समाविष्ट

झालेले आहे. जातीयवादी विषमता नष्ट करण्यावर भर देण्याऐवजी या कवितेने आर्थिक प्रश्नांतून निर्माण होणाऱ्या सामाजिक विषमतेवर लक्ष केन्द्रीत केले. परिणाम असा झाला, की ज्या संस्कृतीत जातीयवादी, विषमतावादी समाजरचनेची पाळेमुळे खोलवर रूजलेली आहेत; त्या संस्कृतीला आव्हान देतानाच विद्रोही कवितेला आपली नेमकी संस्कृती कोणती असावी, ह्याबाबत संभ्रम निर्माण झालेला आहे. मार्क्सवादी तत्वज्ञान अंगिकारणाऱ्या मार्क्सवादी कवितेला १९३० पासून स्वतःची संस्कृती निर्माण करता आलेली नाही आणि त्याचा दृश्य परिणाम असा झाला, की विद्रोही कवितेला सांस्कृतिक वारसा देण्यास मार्क्सवादी विचार अपुरा पडला. पुरोगामी वा मार्क्सवादी कवितेवरच या ना त्या कारणाने प्रस्थापित संस्कृतीचा जबरदस्त प्रभाव असल्याने, पुरोगामित्व सिद्ध करणारेही अनेकदा हिन्दु संस्कृतीचे गोडवे गातानाचे मोठे गंमतीदार दृश्य दृष्टीस पडते. आंबेडकरविचार आणि त्यानुसार मार्गक्रमण करणाऱ्या विद्रोही कवितेला बौध्दसंस्कृती असा दुसरा पर्याय आहे. विद्रोही कविता रंगमंचावर जोमात असतानाही दुर्दैवाने बुध्दविचाराचा समर्थपणे आणि प्रभावीपणे सांस्कृतिक उत्थापनासाठी वापर झाल्याचे अभावात्मक चित्रण आढळते. ह्याचे प्रमुख कारण असे, आंबेडकरवाद, मार्क्सवाद ह्या परस्पर विरोधी विचारसरणीची सांगड विद्रोही कवींनी घातली हे होय. परिणामी गेल्या १५ वर्षांच्या कालखंडात सांस्कृतिक वाटचालीच्या दृष्टिने विद्रोही कवितेची कामगिरी प्रभावीपणे झालेली दिसत नाही. हिंदुसंस्कृतीवर रोष प्रकट करणारी, आसूड उगारणारी आणि त्या संस्कृतीविरोधी सांस्कृतिक क्रांती करू मागणारी विद्रोही कविता बौध्दसंस्कृतिला आत्मसात करण्यात उणी पडली. म्हणून विद्रोही कवितेच्या समोर आज खरा प्रश्न निर्माण झालेला आहे. आंबेडकरवाद की मार्क्सवाद हा! अलिकडे काही विद्रोही कवी 'इझम' नाकारण्याचा अट्टाहास धरीत आहेत, ते यामुळेच; परंतु त्याचबरोबर विद्रोही कवितेच्या बांधिलकीच्या स्वरूपाविषयी गुंतागुंतीचा प्रश्न निर्माण झालेला आहे. आंबेडकरविचारानुसार सामाजिक बांधिलकीचा विचार करावयाचा, की मार्क्सवादी विचारानुसार करावयाचा, की दोहोंच्या दृष्टिकोणातून असा अनिर्णित स्वरूपाचा हा प्रश्न आहे. पर्यायाने आंबेडकरीप्रेरणेच्या कवितेची समीक्षा ही मार्क्सवादी विचार प्रमाण मानून होते. कलावादी टीकाकारांचा मार्क्सवादी विचार-सरणीकडे पाहण्याचा दृष्टिकोण आधीच ठरलेला असल्याने विद्रोही कवितेला एकांगी, एकसूरी, संतप्त आणि आक्रोशी असे जे म्हटले जाते त्या मागील मर्म लक्षात येते.

हा धोका आंबेडकरीप्रेरणेच्या काही कवींनी ओळखलेला आहे. गेल्या दशकात आंबेडकरवादावर मार्क्सवादी विचारसरणीने मात करण्याचा प्रयत्न करुनही विद्रोही कवितेवरील आंबेडकरवादाचा प्रभाव कमी न होता, तो अधिक डोळसपणे व्यक्त करण्यात काही कवी कमालीचे यशस्वी झालेले आहेत आणि आंबेडकरीप्रेरणेच्या

कवितेस मार्क्सवादापासून परावृत्त करण्यातही यश संपादन केलेले आहे. म्हणूनच विफलतेपोटी काही विद्रोही कवी दलित कविता 'इसम' नाकारते असे म्हणू लागलेले आहेत. ज्यांना मार्क्सवादाचा पुरस्कार करणे अटळ वाटणार आहे. त्यांनी केव्हाना केव्हातरी आंबेडकरवादापासून फारकत देणे अनिवार्य आहे. आंबेडकरवाद–मार्क्सवाद हातात हात घालून चालण्यासारखी परिस्थिती नाही. त्याचे फार मोठे कारण म्हणजे डॉ. आंबेडकरांनी आपल्या प्रेरकांसमोर ठेवलेला बुद्धविचार हे होय. मार्क्सवाद, की बुद्धविचार ह्यातील कोणती विचारप्रणाली आत्मसात करावी, ह्याचे निश्चित मार्गदर्शन आंबेडकरविचारापासून प्राप्त होते. ज्यांनी मार्क्सवाद अंगीकार लेला आहे आणि मार्क्सवादाच्या प्रभावाखाली राहूनही आंबेडकरवाद स्विकारावयाचा आहे परंतु बुद्धविचार अप्रत्यक्षपणे टाळावयाचा आहे, त्यांच्या आंबेडकरीप्रेरणेचा स्वीकार करण्याच्या भूमिकेबाबत अनेकांनी आजपर्यंत संशय व्यक्त केलेला आहे. ह्याचा विचार प्रामुख्याने बहुसंख्य आंबेडकरीप्रेरणेचे कवी करतात.

आंबेडकरीप्रेरणेच्या कवींना आणखीन स्पष्ट जाणीव झालेली आहे ती विद्रोही कवितेच्या मर्यादांविषयी. मार्क्सवाद आणि आंबेडकरवादात सारखीच घुटमळत राहणारी कविता, आंबेडकरीप्रेरणेचा सातत्याने उद्‌घोष करणारी कविता मार्क्सवादी विचार दलितोद्धारासाठी सहाय्यभूत ठरणारा आहे म्हणून त्या विचारप्रणालीविषयी मागील दशकात सहानुभूती व्यक्त केली गेली. विद्रोही कवितेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारावर मार्क्सवादी विचारांचे कलम करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अर्थात हा प्रयोग अयशस्वी ठरला, आणि काही विद्रोही कवींची आंबेडकरीप्रेरणा संशयास्पद असल्याची त्यांनीच ग्वाही दिली. यादृष्टीने प्रा. भालचंद्र फडके यानी व्यक्त केलेले मत असे — "डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, गौतमबुद्ध आणि मार्क्स यांच्या विचारांचे धन गाठीशी बांधून दलित कथालेखकांची जीवनदृष्टी अवतीभोवतीच्या वास्तवाचा वेध घेत आहे. सर्वच कथालेखकांचे विचारादर्श सारखे नाहीत, पण कुणीच डॉ. आंबेडकरांचे तत्वज्ञान नाकारलेले नाही. काहींनी डॉ. आंबेडकरांच्या विचारावर मार्क्सच्या विचाराचे कलम केले आहे. त्यांना वाटते, की दुःख, दैन्य, दास्य, शोषण इ. चे चित्रण करणारी कथा केवळ दलितांची कथा नाही तर ती सर्वस्पर्शी अनुभवाचे चित्रण करणारी जागतिक कथा आहे. तर काहींना बाबासाहेबांच्या विचारावर महात्मा बुद्धाच्या विचारांचे कलम करावे असे वाटते. तर काहींना डॉ. आंबेडकरांच्या निखळ तत्वज्ञानाशीच बांधिलकी असावी असे वाटते. *

आंबेडकरीप्रेरणेच्या कथेच्या बाबतीतच हा अनुभव येत नसून साऱ्या दलित साहित्याबाबत हाच अनुभव आहे. त्यास कविता अपवाद करता येत नाही.

---

* दलित साहित्याची प्रकाश यात्रा : भालचंद्र फडके. पृ. क्र. ३९

प्रा. भालचंद्र फडके यांनी दलित साहित्याच्या वैचारिक बांधिलकीचे विश्लेषण खालील प्रमाणे केलेले आहे. समग्र दलित साहित्य : १) बुध्दविचार २) मार्क्सविचार ३) आणि आंबेडकर विचाराशी निगडीत आहे. आंबेडकरविचारावर बुध्दविचाराचे कलम असावे, की मार्क्सवादी विचाराचे कलम असावे, असा वैचारिक संघर्ष असल्याची स्पष्ट जाणीव होते. हा वैचारिक संघर्ष उद्‌भवण्याचे कारण कोणते असावे; असा एक प्रश्न निर्माण होतो. त्याचे कारण असे, की आंबेडकरांच्या विचारांवर मार्क्सवादाचे कलम करणाऱ्यांना वाटते, की दुःख, दैन्य, दास्य, शोषण इ. चे चित्रण करणारे साहित्य केवळ दलितांच्या सर्वस्पर्शी अनुभवाचे चित्रण करणारे जागतिक साहित्य आहे. या विधानाचा मरळ सरळ अर्थ असा होतो की, ज्यांच्या विचारांपासून (आंबेडकरविचार) प्रेरणा घेतलेल्या त्या साहित्याने तोच विचार जागतिक साहित्य होण्यासाठी अपुरा असल्याची स्पष्ट कबुली देण्यासारखीच आहे. म्हणून निखळ आंबेडकरी प्रेरणा मानणाऱ्या साहित्यिकांकडून या विचारास प्रखर विरोध होतो. मार्क्सविचार हा जागतिक आहे हे निर्विवाद! पण त्याचबरोबर बुध्दविचार हा मूळ 'भारतीय' विचार असून जगालाही मार्गदर्शक ठरलेला आहे.

"बाबासाहेबांनी बुद्धधर्माचे तत्वज्ञान मांडले ते हे तत्वज्ञान माणसाला कल्याणाची दिशा दाखविल म्हणून 'शोषणा' च्या विरुध्द उभे राहणारे बौध्दमत बाबासाहेबांनी जाणीवपूर्वक स्वीकारले." * प्रा. भालचंद्र फडके ह्यांना बुध्दविचाराचे महत्व आणि गांभीर्य पटलेले आहे. आणि म्हणूनच "जातीभेदावर कुऱ्हाड घालून अस्पृश्यतेचे पाप मुळातच मारून टाकणाऱ्या गौतमबुध्द प्रणीत क्रांतीचा पुरस्कार केला पाहिजे." × असा अनाहूत सल्लाही ते देतात. असा सल्ला देण्याचा प्रा. भालचंद्र फडक्यांचा अधिकारही मान्य केला पाहिजे. कारण डॉ. आंबेडकर आणि त्यांच्या धर्मांतराकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण स्पष्ट आहे. बुध्दविचाराबाबत त्यांना कमालीची आस्था आहे. त्याचे कारण असे, की "जे अनुभव आले, वीस वर्षे जे चिंतन केले त्यातूनच बाबासाहेबांनी धर्मांतराचा निर्णय घेतला, धर्मांतराची ही ऐतिहासिक घटना म्हणजे दलितांच्या मुक्तिसंग्रामातील नव्या पर्वाची नांदी होती. १९२० नंतर बाबासाहेबानी जे वैचारिक आंदोलन आणि मानवमुक्तिचा लढा पुकारला होता त्यातले महत्वाचे पाऊल म्हणजे बौद्धधर्म स्वीकार" ऽ परंतु डॉ. आंबेडकरांच्या क्रान्तिविचाराचा पुरस्कार करणारे प्रा. फडके जेव्हा "काहींना बाबासाहेबांच्या

---

* दलित साहित्याची प्रकाश यात्रा : भालचंद्र फडके. पृ. क्र. १७

× दलित साहित्याची प्रकाश यात्रा : भालचंद्र फडके. पृ. क्र. २७

ऽ दलित साहित्याची प्रकाश यात्रा : भालचंद्र फडके. पृ. क्र. १२

विचारावर महात्मा बुद्धाच्या विचारांचे कलम करावे असे वाटते." × असे म्हणतात तेव्हा मात्र ती अत्यंत चिंतेची बाब वाटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्दधर्म स्वीकारल्यानंतर आंबेडकरी प्रेरणेच्या साहित्यिकांना जी दृष्टी लाभली, तिचे अनन्य-साधारण महत्व मान्य करणाऱ्यांपैकी प्रा. भालचंद्र फडके एक आहेत. आंबेडकरांनी बुद्धविचार स्वीकारला तो आदर्श जीवनवादी तत्वज्ञान म्हणून. आजच्या दलित साहित्याच्या निर्मितीत जो समूह गुंतलेला आहे, त्यात प्रामुख्याने आंबेडकरांना प्रेरणा मानणारा बहुसंख्य बौध्दधर्मीय समाजच आहे. अर्थात हे साहित्यिक आपली ओळख ( Identity ) दलित म्हणून सांगते, हा भाग निराळा. जे मुळातच बुध्दविचार मानणारे आहेत, ते आंबेडकरांच्या विचारावर बुद्धविचाराचे कलम करतात, असे भालचंद्र फडके सारखे जाणकार कसे काय म्हणतात ? व्यवहारात, दैनंदिन जीवनात बौद्धधर्मिय जीवनमूल्ये मानणारा आंबेडकरीप्रेरणेचा दलित साहित्यिक बौध्दधर्मिय नाही, असा त्यांच्या वरील विधानाचा अर्थ समजावयाचा काय ?

वस्तुतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारावर मार्क्सच्या विचाराचे काहींनी कलम केले आहे असेच प्रा. फडक्यांचे मत आहे. खरेतर बाबासाहेबांचे मार्क्सवादाबद्दलचे मत जगजाहीर आहे. आणि प्रा. फडके ह्यांना देखील ते ज्ञात असावे. डॉ. आंबेडकरांबद्दल एवढे गदगदून आणि गलबलून बोलणाऱ्या सुजाण टीकाकाराने आंबेडकरांच्या विचारावर काहींनी मार्क्सच्या विचाराचे कलम केले, ह्याबद्दल मार्क्सवादी दृष्टी ठेवणाऱ्या दलित साहित्यिकांना खडसावून जाब विचारण्याची नैतिक जबाबदारी पार पाडलेली नाही. मार्क्सविचाराचे अयशस्वी कलम करणाऱ्या साहित्यिकांची आंबेडकरी प्रेरणेच्या साहित्यिकांनी जी कोंडी केलेली आहे, त्याचीही दखल घेण्याची तत्परता प्रा. भालचंद्र फडके यांनी दाखविलेली नाही. उलट मार्क्सवादी विचारसरणी पेरणाऱ्या विद्रोही कवींचे मोठ्या आत्मियतेने ते कौतुक करतात. यशवंत मनोहरांच्या कवितेबाबत बोलताना ते लिहितात, "त्यांना 'मार्क्स' प्रमाणे विद्रोहाच्या वाटेवर सिध्दार्थ गौतम बुध्द ही हवा" ऽ यशवंत मनोहरांना बुध्द आणि मार्क्स एकाचवेळी हवे आहेत. आणि ते का हवे आहेत, हे शोधण्याचा प्रा. भालचंद्र फडके यांनी जरूर प्रयत्न केला, परंतु यशवंत मनोहरांच्या 'उत्थानगुंफा'तील 'बुद्ध' आणि 'मार्क्स' या कविता वाचल्यावर उघड उघड मार्क्सला बुद्धापेक्षा फार झुकते माप यशवंत मनोहरांनी दिलेले आहे, हे मात्र त्यांच्या नजरेतून सुटलेले आहे. दलित साहित्याची प्रत्येक कृती योग्यच असा हट्ट धरण्याच्या नादापायीच वास्तववादी भूमिका घेण्याचा आग्रह धरणाऱ्यांकडून वस्तुनिष्ठ

---

× दलित साहित्याची प्रकाश यात्रा : भालचंद्र फडके, पृ. क्र. ३९

ऽ दलित साहित्याची प्रकाश यात्रा : भालचंद्र फडके, पृ. क्र. ६५

भूमिका घेतल्या जात नाहीत हे विचित्र दृश्य पाहावयास मिळते. प्रा. भालचंद्र फडके ह्यांना डॉ. आंबेडकरांनी बौध्दधम्म स्वीकारल्यानंतर समाजात झालेले परिवर्तन खऱ्या अर्थाने नीट समजावून घेता आलेले नाही, असे खेदाने म्हणावे लागते. नाहीतर त्यानी चुकीच्या मार्गाने जाणाऱ्या आणि समाजजीवनाचे विकृत दर्शन घडविणाऱ्या दलित साहित्यिकांना योग्य ती समज देण्याची भूमिका न्यायीपणाने पार पाडली असती.

## भाग ३ :

## आंबेडकरी प्रेरणेची प्रवर्तक कविता :

### गौतम शिंदे :

'विद्रोही' आणि 'प्रवर्तक' हे काही आंबेडकरीप्रेरणेच्या कवितेचे मानदंड नव्हेत. एकाच वेळी ही कविता दोन्ही जाणिवा व्यक्त करीत आहे. आणि दोन्ही प्रकारच्या जाणिवांच्या सीमारेषा परस्परात मिसळून गेल्या आहेत. तथापि ज्या कवींच्या कवितेत प्रवर्तक जाणिवा ठळकपणाने दिसत आहेत अशाच कवींच्या कवितांचा या ठिकाणी अभ्यास करावयाचा आहे. कवि गौतम शिंदे यांचा ' प्रवर्तक ' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे, १४ ऑक्टोबर १९७८ या धम्मचक्र प्रवर्तनदिनी आणि या कवीची कविता आणि हा कवी चिरकाल स्मरणात राहील तो त्याने ' दलित ' या शब्दप्रयोगास केलेल्या कडव्या विरोधामुळे. ' दलित ' या शब्दास सद्यस्थितीत फार मोठे वलय प्राप्त झाले असतानाच हे धाडस गौतम शिंदेने दाखविलेले आहे. " आंबेडकर प्रेरणेची माझी कविता आहे, आणि मला दलित कवी समजू नये." असे ठाम मत या कवीने नोंदले आहे. आणि ' दलित ' या संकल्पनेस छेद दिला आहे. आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य म्हणजेच दलित साहित्य असा रूढ संकेत असताना आणि बहुसंख्य साहित्यिकांना ही ' संकल्पना ' मान्य असतानाही ज्या आंबेडकरीप्रेरणेच्या साहित्यिकांनी ' दलित ' शब्दाला कसून विरोध केला, आणि पायबंद घालण्याचा प्रयत्न केला, त्यातील गौतम शिंदे एक आहे. आपल्या कवितेकडे दलित काव्य म्हणून पाहू नये असे म्हणणारे आंबेडकरीप्रेरणेचे कवी दुर्मिळच आहेत. तेव्हा या कवींची

भूमिका अतिशय महत्वाची आहे. या कवीने स्वतःबद्दल काही अपेक्षा निर्माण केल्या आहेत.

'प्रवर्तक' काव्यसंग्रहातील कवितांचा विचार करताना एक अडचण उभी राहाते. गौतम शिंदे स्वतःचा उल्लेख आंबेडकरीप्रेरणेचा कवी असा करीत आहे. आणि मी दलित कवी नाही असेही ठामपणे सांगत आहे. हा कवी स्वतःला 'ललित' वा 'दलित' कवी मानून घेत नाही. म्हणूनच या कवीने 'आयडेंटिटीच्या' संदर्भात प्रश्नचिन्ह निर्माण केलेले आहे. गौतम शिंदेच्या काव्यसंग्रहाचे 'प्रवर्तक' हे नाव त्याच्या वैचारिकतेचे प्रतीक आहे; व त्यात अर्थपूर्णता आहे. म्हणूनच त्याची आयडेंटिटी एक प्रवर्तक कवी म्हणून लक्षात घेतल्यावाचून पर्याय नाही. या कविबद्दल प्रा. मे. पुं. रेग्यांनी काढलेले उद्‌गार अतिशय महत्वाचे आहेतच, शिवाय त्याच्या सामर्थ्याची जाणीव करून देणारेही आहेत. प्रा. रेगे 'प्रवर्तक' काव्य संग्रहाच्या प्रस्तावनेत म्हणतात, "हा कवितासंग्रह प्रकाशित होईल तेव्हा बहुधा अनेकजण 'आणखी एक दलित कविता संग्रह म्हणून स्वागतशीलतेने किंवा निर्विकारतेने त्याच्याकडे पाहतील. पण आपण दलित कवी नाही आणि ह्या कवितेकडे 'दलित काव्य' म्हणून पहायचे नाही असे श्री. शिंदे ह्यांनी मला निक्षून सांगितले आहे. मी स्वाभाविकपणे 'तुम्ही असे का म्हणता?' हा प्रश्न त्यांना केला. त्याचे त्यांनी जे उत्तर दिले त्याचा मतितार्थ असा, की डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्यापासून आपण शिकलो ते हे की ह्या समाजात स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ह्या मूल्यांवर आधारलेली संस्कृती आणि अन्याय, विषमता आणि श्रेष्ठत्व-कनिष्ठत्व यांवर आधारलेली संस्कृती ह्यांच्यात पूर्वापार झगडा चालत आला आहे. समता आणि बंधुभाव ह्या मूल्यांचा गौतम बुद्धाने उद्‌घोष केल्यापासून हा संघर्ष चालू आहे. काही जातींचा इतर काही जातींशी असलेला कलह असे त्याचे स्वरूपच नाही. ह्या संघर्षात आज कोण कुठे आहे हाच खरा प्रश्न आहे. श्री. शिंदे ह्यांची ही भूमिका पक्की आणि विचारपूर्वक बनविलेली आहे." ×

यावरून एक गोष्ट स्पष्ट होते, की गौतम शिंदेची वेगळी भूमिका ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराशी बांधिलकी स्वीकारणारी आहे, ती बुद्धविचाराशी अतूट नाते सांगणारी आहे. बौद्ध संस्कृतीच्या भरभराटीचा ध्यास या कवीने घेतलेला आहे. 'प्रवर्तक' या कवितासंग्रहास प्रा. मे. पुं. रेग्यांची प्राप्त झालेली प्रस्तावना ही गोष्ट अतिशय महत्वाची आणि लक्षवेधी ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने लिहिणाऱ्या साहित्यिकांचे साहित्य कसे असावे ह्याविषयी प्रा. मे. पुं. रेग्यांनी, 'अस्मिता'च्या (अस्मितादर्श) परिसंवादातून स्पष्ट मते मांडलेली आहेत.

---

× प्रवर्तक : गौतम शिंदे : प्रस्तावना, प्रा. मे. पुं. रेगे

प्रा. रेग्यांच्या त्या मतांकडे आंबेडकरीप्रेरणेच्या कवींनी गंभीरपणे पाहिलेले नाही. परंतु एका दशकानंतर प्रा. मे. पुं. रेग्यांना त्यांच्याच विचारानुसार वाटचाल करणारा गौतम शिंदेसारखा कवी तपासावा लागला हेच या कवीचे मोठे यश आहे. सन १९६७ साली प्रा. मे. पुं. रेग्यांनी मांडलेले विचार आज पुन्हा नव्याने विचारात घेण्याची निकड निर्माण झालेली आहे. याठिकाणी फक्त त्या विचारांची उजळणी करण्यासाठी ते पुन्हा तपासावे लागत आहेत. "नवबौध्दांच्या आंदोलनातून मूळ धरू लागलेल्या नवीन सांस्कृतिक मूल्य कल्पना लक्षात घेतल्यास, प्राचीन व अर्वाचीन मराठी वाङमयाच्या अध्ययन अध्यापनासाठी व रसग्रहण-मूल्यमापनाविषयी काही प्रश्न निर्माण झाले आहेत" ÷ असे प्रा. रा. ग. जाधवांनी विचारात घेऊनच मार्ग सुचविण्याविषयी प्रा. मे. पुं. रेग्यांना प्रश्न विचारलेला आहे. सर्व प्रश्नांचा खोलवर विचार करतानाच प्रा. मे. पुं. रेगे म्हणतात, "आता एक गोष्ट खरी, या नवबौध्दांच्या साहित्यात वास्तविक सामाजिक चित्रण जर प्रामाणिकपणे, प्रभावीपणे चित्रित झालं, तर एका नव्या प्रकारचं साहित्य मराठीत निर्माण होईल" * प्रा. मे. पुं. रेग्यांच्या या विचारांकडे गंभीरपणे मागील दशकातील विद्रोही कवितेने पाहिलेले नाही. उलट मागील दशकात विद्रोही भूमिकेचे समर्थन करण्यासाठी आंबेडकरीप्रेरणेच्या साहित्याने निग्रो व मार्क्सवादी वाङमयाशी समन्वय जोडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यात विद्रोही साहित्य काही प्रमाणात यशस्वी देखील झालेले आहे. यामुळे बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारलेला बौद्धधम्म आत्मसात करण्यासाठी गौतम शिंदेसारखे अनेक कवी अस्वस्थ झालेले आढळून येतात. त्यांच्या डोक्यात बुध्दविचार सारखा पिंगा घालीत असतो. आपण स्वीकारलेला मार्ग स्वकीयात व इतरांतही काही प्रश्नचिन्हे निर्माण करणारा आहे, ह्याची जाणीव गौतम शिंदेच्या सुजाण मनाला आहे. हा मार्ग त्रासाचा, उपेक्षेचा आणि अडचणीचा आहे, ह्याचे डोळसभान या कवीला आहे. एवढ्याच कारणासाठी आपल्या मनोगतात हा कवी म्हणतो, "मला जाणीव आहे, की माझ्या या भूमिकेमुळे मला अनेकांचा विरोध होईल. परंतु मी या सर्व गोष्टींना सामोरा जाण्यास समर्थ आहे. कारण मी जी भूमिका स्वीकारलेली आहे, तिच्याबद्दल मला यत्किंचितही निराशा वा अयशस्विता वाटत नाही. याच जाणिवेतून आणखी काही साहित्य प्रकाशित होईल अशी मला आशा वाटते. हा प्रवाह कोणी थांबवू शकत नाही." ×

या कवीला स्वतःबद्दल दुर्दम्य आत्मविश्वास आहे. आपल्या कवितेबाबतच्या भूमिकेबद्दल लक्ष वेधून घेणारा आणि काही अपेक्षा निर्माण करणारा हा कवी, आणि

---

÷ दलित साहित्य : एक अभ्यास, संपादक : अर्जुन डांगळे, पृ. क्र. २

* क्षित्ता : पृ. क्र. २

× प्रवर्तक : गौतम शिंदे, मनोगत

वामन निंबाळकर या कवीची बाबासाहेब आंबेडकरांचा - बुध्द विचार व्यक्त करण्यामागील जिज्ञासा सारखीच आहे. फरक आहे तो फक्त विद्रोही कवितेला अनुकूल – प्रतिकूल असण्याबाबत.

खरे तर विद्रोही कवितेला गौतम शिंदेचा नकार दलितत्व नाकारण्याच्या भूमिकेतून आलेला आहे. अन्यथा हा कवी देखील अंतर्बाह्य विद्रोहाने पेटलेला आहे, ह्याची साक्ष ' प्रवर्तक ' या काव्यसंग्रहातील ३६ कवितापैकी ' तोकोनामा ', ' त्याचा सन्मान कर ', ' माझ्या देशाचा मला अभिमान आहे ', ' जवानी ', ' लाटा आणखी उधाणल्यात ', ' रडे थांबवून ' आणि ' मी एक शस्त्र झालोय ' या कवितांतून होते. आत्मनिष्ठा हा या काव्यसंग्रहाचा विशेष असला तरी आत्मकेन्द्रियतेमुळे एका ठाम विचारावर पोसलेली गौतम शिंदेची कविता तिच्यातील विद्रोही सुरामुळे विरोधाभास निर्माण करते. उद्विग्न मनाने संघर्षासाठी प्रवृत्त होणे शक्य आहे, परंतु तेवढ्यासाठी वरच्या पट्टीत सूर लावण्याचा मोह प्रवर्तक कवितेने टाळणे आवश्यक आहे, तसे होत नसेल तर विद्रोही आणि प्रवर्तक कवितेत फरक करता येणे शक्य होत नाही.

गौतम शिंदेच्या वर उल्लेखिलेल्या काही कविता सोडून दिल्या तर उरलेल्या बऱ्याच कविता वस्तुनिष्ठतेवर आधारलेल्या आहेत. काही बौद्धिक आकलन करणाऱ्या, तर काही विचारसन्मुख होणाऱ्या आहेत. ' जातक ' ' त्यांचा सन्मान कर ' आणि ' प्रवर्तक ' या कवितांतून या कवीने नव्या मिथ्स् ( Myths ) मुक्तपणे वापरलेल्या आहेत. या मिथ्स् बौद्धसंस्कृतीच्या वाहक असल्याने बौध्द संस्कृती पुनर्जीवित करणाऱ्यांना नव्या मिथ्स् ( Myths ) शोधल्याशिवाय दुसरा पर्यायच नाही, ह्याची जाण या कवीने ठेवलेली दिसते.

आत्मचिंतन आणि स्वात्मजाणीव याचा ध्यास घेतलेली ' प्रवर्तक ' कविता अंतर्मुख होणारी आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय ही मार्गदर्शक तत्वे ' माणूस ' ही संकल्पना विकसित करणारी लोकशाहीमूल्ये आहेत. आपला देश स्वातंत्र्यप्रातीनंतर लोकशाहितत्वप्रणालीनुसार वाटचाल करू लागलेला आहे. बुद्ध-विचार हा स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय इ. ची हमी देणारा विचार आहे. हाच विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारून लोकशाहीवर असलेली त्यांची अनन्यनिष्ठा स्पष्ट केली आहे आणि उपेक्षित, दीनदुबळ्या, गोरगरीब समाजाचा उध्दार आणि कायापालट ह्याच मार्गाने झाल्याशिवाय राहणार नाही, अशी त्यांची खात्री झाली होती. भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यावर त्यापाठोपाठ डॉ. आंबेडकरांनी १९५६ साली घडवून आणलेले धम्मचक्रप्रवर्तन ह्या दोन्ही घटना उपेक्षित समाजाच्या उध्दारासाठी साह्यभूत ठरलेल्या आहेत. स्वातंत्र्याचा उपयोग

हा तळागाळातील शोषितांच्या वाट्यास जाणे आवश्यक आहे, हा विचार रुजविण्याचे फार मोठे श्रेय आपल्या लोकशाही व्यवस्थेला द्यावे लागते. अशा लोकशाहिमूल्यांची कदर करण्याचे आणि प्रतिष्ठा वाढविण्याचे प्रयत्न आंबेडकरी प्रेरणेचे कवी करतात याचा अर्थ आंबेडकरविचाराचा पुरस्कार करता करता लोकशाहीमूल्ये टाळता येतच नाहीत हे या कवींनी अनुभवलेले सूत्र आहे. परंतु लोकशाहीमूल्यांचा गौरव करीत असताना, लोकशाही मार्गावर निष्ठा ठेवीत असताना, दीनदुबळ्या उपेक्षितांच्या वाट्याचे दुःख झटपट संपले पाहिजे असा ध्यास घेणाऱ्या काही विद्रोही कवींना येथील लोकशाहिबद्दलच शंका वाटू लागलेली आहे. अनेक गोष्टी नाकारताना लोकशाहिप्रणाली नाकारण्याचे काहींनी धाडस केले. खरे तर लोकशाहिविचार आणि लोकशाही राबविणारी यंत्रणा ह्यात मुलभूत फरक आहे. यंत्रणेकडून अनेक तत्कालीन अडिअडचणीमुळे लोकशाहिव्यवस्था नीटपणे न राबविण्याची शक्यता असते, म्हणून लोकशाहितत्वप्रणालीला जबाबदार धरणे किंवा नाकारण्याचे प्रयोजन उरत नाही.

समाजाचा घटक या नात्याने समाजात घडणाऱ्या अनेक बऱ्यावाईट घडामोडींचा परिणाम संस्कारक्षम कविमनाने हेरलेला असतो. काहींनी लोकशाहीमूल्यांविषयी अनादर व्यक्त न करता खंत व्यक्त केली असेलही, नकारात्मतेचे प्रकटीकरण केलेले असेल, परंतु आपली कविता आंबेडकरीप्रेरणेची कविता आहे हे भान या कवींनी जपलेले जाणवत नाही. त्याचा दृश्यपरिणाम असा झाला, की आंबेडकरीप्रेरणेची कविता लोकशाहीमूल्यांना नकार दर्शविणारी आहे असा काहींनी ग्रह निर्माण केला. त्यामुळे लोकशाहितत्वप्रणालीस अतिशय व्यापक स्वरूपाचे महत्व प्राप्त करून देण्यास आंबेडकरीप्रेरणेची कविता कटिबध्द आहे हे पटवून देण्यासाठी या कवितेला धडपड करावी लागली. एखादा विचार पूर्णपणे समाजमनाला पटवून दिल्यावरही, त्याची पुनरावृत्ती टाळणे आवश्यक ठरते. कारण तेवढीच शक्ती दुसऱ्या चांगल्या निर्मितीसाठी उपयुक्त ठरू शकते. लोकशाही नाकारणाऱ्या काही विद्रोही कवींच्या भूमिकेमुळे अस्वस्थ झालेल्या व लोकशाहीवर निष्ठा ठेवणाऱ्या आंबेडकरीप्रेरणेच्या कवींना आपली नेमकी भूमिका कोणती ह्याचा उलगडा करणे क्रमप्राप्त झाले. गौतम शिंदे हा त्यापैकीच एक कवी होय. गौतम शिंदेची 'स्वातंत्र्याचा जाहीरनामा' ही कविता निव्वळ भूमिका म्हणूनच विचारात घ्यावी लागते,

"लोकशाही मार्गाने आम्ही चाललोहोत
गर्जत स्वातंत्र्यगीत एका असामान्य मानवी लढ्याचे
समता, स्वातंत्र्य, बंधुत्वाच्या घोषात

सुसंस्कृत मनाने आम्ही सोडवतोईत
इथल्या जटील समस्या. ”

( प्रवर्तक : पृ. क्र. ११ )

स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय या मूल्यांवर निष्ठा ठेवणे, आंबेडकर विचार, बुध्दविचार शिकवितो, हे समजून घेताना सुसंस्कृत मन असणे आवश्यक आहे. सुसंस्कृत मनाने आम्ही आमच्या समस्या सोडवीत आहोत असे गौतम शिंदे म्हणतो, तेव्हा त्याला नेमके काय सांगावयाचे आहे याचा अर्थबोध स्पष्टपणे होतो समस्या अनेक आहेत; त्या जटील आहेत; परंतु त्या सुसंस्कृत मनाने सोडविण्याशिवाय पर्याय नाही, ह्याची योग्य जाण या कविमनाला निश्चितपणे आहे. आंबेडकरीप्रेरणेच्या कवितेतील अनुभवाबाबत टीकाकारांनी भाष्य करताना, वेदनांचा, तळतळाटाचा आणि दाहक अनुभवांचा वाच्यार्थच फक्त विचारात घेतलेला आहे. परंतु त्यामागील प्रेरक शक्तिच्या ठायी-पर्यायाने प्रवर्तक जाणिवेत सुसंस्कृतपणाची हमी दिलेली आहे, ह्याचा खोलवर जाऊन ध्वनितार्थ लक्षात घेतलेला नाही. येथील सामाजिक समस्यांवर जलीम उपाय योजल्याशिवाय आणि त्यासाठी सर्वांनीच प्रयत्नशील असल्याशिवाय पर्यायच नाही, ह्याचे दायित्व समग्र समाजाने स्वीकारावे हे सांगण्याचे भान टीकाकारांना असणे आवश्यक आहे. तसे घडत नाही किंवा आंबेडकरीप्रेरणेच्या कवितेचा तसा अनुभव नाही. म्हणूनच विद्रोही भूमिका घेणाऱ्या कवींनी, नकार, बंड प्रक्षोभ आणि संताप ह्यातून दुःख, निराशा आणि आक्रोश व्यक्त केलेला आहे. असा अनुभव असताना देखील गौतम शिंदेसारखा प्रवर्तकजाणिवा असणारा कवी आपल्या समस्या सोडविण्यासाठी कटिबध्द आहे. स्वाभाविक झपाटलेपणातून गौतम शिंदे संघर्ष करण्यासाठी प्रवृत्त झालेला आहे. हे सारे करीत असताना—

“ माणसं मारायची कला
आम्हाला येत नाही
आमच्या हातातल्या तलवारींना धार आहे
पण रक्ताची चट नाही. ”

( प्रवर्तक : पृ. क्र. १. )

असे का म्हणतो ? त्याला कोणत्या क्रान्तीची स्वप्ने पडतात ? ह्याची उत्तरे तो वाचकांवर सोडून देतो.

‘माझे विखुरलेय रक्त या भारतभूमीवर ते तू झाकणार कसा ? ’

( प्रवर्तक : पृ. क्र. २. )

असे प्रश्नचिन्ह वाचकांसमोर ठेवून तथागताच्या—बुध्दांच्या या भारतभूमीवर घडलेल्या उत्पातांची जाणीव करून देतो. ही नोंद करताना भ्रष्ट संस्कृतीस तो आव्हानही देतो.

" हे बदनामी संस्कृती
माझ्या उकळत्या रक्ताला आव्हान देऊ नको
नागांचा रक्तअंगारहे मी "

( प्रवर्तक : पृ. क्र. २. )

नागवंशीय म्हणून थेट बौध्द संस्कृतीशी नाते सांगताना या कवीने बौध्द संस्कृतीचा ध्यास घेतलेला आहे. ' त्याचा सन्मान कर ' या कवितेला आत्मशोधामुळे आत्मबळ प्राप्त झाले आहे. आणि हीच प्रवर्तक जाणिवांच्या यशस्वितेची ग्वाही आहे. त्यासाठी या कवीने आपल्या समाजबांधवासमोर काही प्रश्न उभे केलेले आहेत.

" खरेच का आपण एवढे भयंकर आहोत ?
खरेच का शस्त्रविरहीत असतानाही
आपले शब्दच एवढे भीषण आहेत
या उघड्या मैदानावर "........

( प्रवर्तक : पृ. क्र. ४ )

विद्रोही कविता म्हणजे सातत्याने अन्याय उलथून टाकण्याची भाषा बोलणारी कविता. जग पेटवून देण्याची जाणीव करून देणारी कविता. बंड, नकार, चीड व प्रक्षोभ व्यक्त करणारी कविता. गौतम शिंदेने नेमके हे हेरलेले असून ' शस्त्रविरहीत असतानाही आपण खरेच का एवढे भयंकर आहोत ? ' असा प्रश्न स्वतःपुरता निर्माण केला आहे. संवेदनाक्षम मनाचा भावनाविष्कार याठिकाणी प्रत्ययास येतो. आपण भयंकर नाही आहोत, ह्याचे डोळसभान या कवीने जपलेले आहे. आणि ह्याची नोंद आंबेडकरीप्रेरणेच्या कवितेच्या टीकाकारांना घ्यावी लागणार आहे. गौतम शिंदेने आपल्याच बांधवांना केलेले आणखी एक आवाहन समजून घेण्यासारखे आहे.

" नदी असो, समुद्र असो, सागर असो, महासागर असो
सर्वांच्या तळाशी एकच भूमी आहे
म्हणून म्हणतो,
आपण आपले पाय कुठे आहेत ते पाहून घेऊया
आजपर्यंत आकाशाच्या गोष्टी पुष्कळांनी केल्या
बंधूनो, आकाशाला हात लावलाय कुणी ?
आकाशाच्या मृगजळी अस्तित्वावर फुंकर घालून
आज आपण मातीच्या गोष्टी करुया
आपण क्षितीज राहिलो किती काळ
आपण एक क्षितीज आहोत ओळखलेच नाही कधी
त्याचा एकदा अनुभव घेऊया

आपण उरात जुळवलीत स्वप्ने येणाऱ्या शतकांना पाहून
आता स्वप्नांना मातीचा सुगंध देऊ या.

( प्रवर्तक : पृ. क्र. ६ )

आपल्या बांधवांसमोर कैफियत मांडणारा हा कवी तक्रारीचा सूर कोठेही वरचढ होऊ देत नाही. आपली व्यथा तो अजीजीच्या स्वरातून व्यक्त करतानाच नेमकेपणाची आब राखून आहे. पुढील शतकाशतकावर नजर रोखून आपला भविष्यकाळ कसा उज्ज्वल आणि दैदिप्यमान असेल हे पाहण्याचा त्यास ध्यास लागलेला आहे. म्हणूनच मार्क्सवादी कुबड्यांचा आधार घेऊन दलित जीवनाचा कायापालट घडवू इच्छिणाऱ्या आणि त्यासाठी अतिरेकी विद्रोही भूमिका घेणाऱ्यांना समज देण्याची आवाहनात्मक भाषा अतिशय बोलकी आहे. चातुर्वर्ण्यव्यवस्था, परंपरा आणि हिंदुधर्मनिष्ठा, ईश्वरवाद इ. आंबेडकरविचार प्रखरपणे नाकारणारा असला तरी बुध्दविचार डोळसपणे स्वीकारणारा आहे. तो एकांगी, एकसूरी, संतप्त आणि आक्रोशी बनूच शकत नाही, त्याला काही कमाल आणि किमान मर्यादा आहेत. आंबेडकरी प्रेरणेच्या कवितेला जग उलथून टाकण्याऐवजी बुध्दविचारानुसार परिवर्तन घडवून आणावयाचे आहे, ह्याची स्पष्ट जाणीव गौतम शिंदेसारख्या कवींना होऊ लागलेली आहे; ह्याची दखल टीकाकारांना घ्यावीच लागणार आहे.

## दामोदर मोरे : बोधिवृक्ष कवितेतील आत्मशोध :

'बोधिवृक्ष' या शीर्षकाची दामोदर मोरेंची कविता 'अस्मितादर्श' दिवाळी अंकात ( दिवाळी अंक १९७९ ) वाचण्यात आली. आंबेडकरीप्रेरणेच्या कवितेच्या संदर्भात ही कविता उल्लेखनीय वाटली. विद्रोही कवितेचा पुढील टप्पा गाठणारी परंतु जाणीवपूर्वक प्रवर्तक अभिव्यक्ती करणारी ही कविता लक्षणीय वाटण्याचे कारण असे, की आंबेडकरीप्रेरणेच्या विद्रोही कवितेत नकार जसा प्रभावीपणे मांडण्यात आला आहे, तद्वतच या मातीतील मूल्यांचा स्वीकार करणारी भाववृत्ति विद्रोहापेक्षाही स्वतःचे वेगळेपण जपणारी आणि सांगणारी अशीही अनुभुती प्रवर्तनशील जाणिवांचा उद्रेक नसून परिपाक आहे. हा अनुभव दामोदर मोरेंच्या 'बोधिवृक्ष' या कवितेतून साकारला आहे. म्हणूनच दामोदर मोरे सारखा प्रवर्तकजाणिवांचा प्रातिनिधिक कवी आंबेडकरीप्रेरणेच्या कवितेची यापुढील वाटचाल कशी असणार आहे, ह्याची प्रचिती देऊन जातो. प्रवर्तक कवितेचे यश अशा कवींच्या हाती समर्थपणे सुरक्षित आहे.

दामोदर मोरेंना स्वतःच्या वेगळेपणाची जशी जाणीव आहे तशीच स्वतःच्या मर्यादांचीही.

“ या भयाण काळोख्या अरण्यात
का झाला असावा माझा जन्म
ही ऊंचच ऊंच वसलेली हिरवीगार झाडे
का येऊ देत नाहीत माझ्यापर्यंत प्रकाश
का देत आहेत मला धमक्या
हे जंगली आवाज
आणि ही हिंस्त्र श्वापदे
का टोळ्या टोळ्यांनी चाल करुन येताहेत
माझ्याच अंगावर
का रक्ताळत आहेत माझे अंगअंग
त्यांच्या तीक्ष्ण सुळ्या दातांनी
विषारी नखांनी
असह्य झाल्यात माझ्या मलाच आता
ह्या जीवघेण्या मरणकळा ”

हा कवी असंख्य प्रश्नांची एकाचवेळी उत्तरे शोधण्याचा केवळ स्वतःच्या अस्तित्वासाठी प्रयत्न करीत आहे. जन्मास येणे हा काय गुन्हा आहे? आपला जन्मच काळोख्या अरण्यात व्हावा ! म्हणून हा कवी हवालदिल झालेला आहे, असा वरवरचा भास होतो खरा, पण ते खरे कारण नाही. त्यामागील पार्श्वभूमी औचित्यपूर्ण आहे. प्रकाश प्राप्त करण्याचा हक्क सर्वच प्राणिमात्रांना आहे; मग तो काळोखात जन्मास येवो अथवा उजेडात ! प्रकाशाची चाहूल या कवीला लागलेली आहे. प्रकाश प्राप्त करणे हा माझा जन्मसिध्द हक्क असतानाही अवतीभवतीची नुसतीच हिरवीगार वाढलेली ऊंच ऊंच झाडे प्रकाशाला अटकाव करीत आहेत. दामोदर मोरेनी ‘ झाडे ’ ही प्रतिमा याठिकाणी समर्थपणे वापरलेली आहे. केशव मेश्रामांनी ‘ झाडे ’ नावाची प्रतिकात्मक कविता लिहून झाडांची थोरवी व्यक्त केलेली आहे. तर दामोदर मोरेनी झाडांची दुसरी बाजू प्रभावीपणे मांडलेली आहे. झाडांच्या मदतीला हिंस्त्र श्वापदेही आहेत आणि ते सतत या कविमनाला धमकावीत आहेत. टोळ्याटोळ्यांनी चाल करून येत आहेत. विषारी नखांनी त्याला ओरबाडले आहे. तीक्ष्ण सुळ्या दातांनी त्याचे अंगही रक्तबंबाळ झाले आहे. या वेदनांच्या असह्य कळा त्याला जीवघेण्या वाटतात आणि म्हणूनच तो या स्थितीत आत्मशोध घेत आहे.

"आता मीही काढलाय माझा जुना सुरा
जो मी वापरत असे मेलेली ढोरे फाडण्यासाठी
तोच आता मी धारदार करीत बसलोय
मनावर दगड ठेवून कठोरपणे
पण अशा निर्णायक क्षणालाच
का नको नको म्हणावे या बोधिवृक्षाने"

चिंतनाच्या परिपक्व मुशीतून दामोदर मोरेंची कविता आकारास येताना काव्यात्मकतेचे उत्कट भानही तिने जपलेले आहे. कवितेचा सबंध सूरच सामाजिक बांधिलकीतून संयतपणे व्यक्त होत आहे. ती अधिक गतिमान झाली आहे, 'झाडे', 'हिंस्र श्वापदे', 'तीक्ष्ण सुळे', 'धारदार सुरा', आणि 'बोधिवृक्ष' या प्रतिमांमुळे कवितेतील आशय अधिक गडद होतो. तो वेगळ्याच अर्थाने समजून घ्यावा लागतो. दोन वेगवेगळ्या सांस्कृतिकमूल्यांचा या कवीच्या मनात द्वंद्वात्मक आवेग आहे. दोन्ही संस्कृतींची पार्श्वभूमी उलगडताना या कवीसमोर काही मुलभूत प्रश्न निर्माण झालेले आहेत. आपल्या मनाचा कोंडमारा का होतो, ह्याची स्पष्ट जाणीव होत असल्याने मनावर दगड ठेवून कठोरपणे वागण्यास हा कवी प्रवृत्त झालेला आहे. तशी वाट मोकळी करून देण्याचाही प्रयत्न करीत आहे. आणि म्हणून मेलेली गुरेढोरे फाडण्यासाठी वापरलेला सुरा धारदार करण्याचा मनोदय तो जाहीर करीत आहे. त्याशिवाय पर्यायच नाही ? असा प्रश्न विचारताना तो काहीसा दिङःमूढ झालेला आहे. पण त्याचबरोबर या कवीला स्वतःच्या शौर्याचा आत्मविश्वासही गवसलेला आहे. मेलेली गुरेढोरे ओढण्याचा आणि ती फाडण्याचा त्याच्या पूर्वजांचा धंदा ! हा कवडीमोल किंमतीचाच नव्हे तर पशुपेक्षाही हीनदीन जीवन जगण्यास भाग पाडणारा धंदा ! सरावाने एखाद्या वाईट कामातही कौशल्य जपावे लागते. गुरेढोरे फाडण्यातही त्याच्या पूर्वजांनी कसब सिद्ध केलेले आहे. आता गुरेढोरे फाडण्याचा हीन व्यवसाय त्याने सोडून दिलेला आहे, परंतु कसब मात्र आत्मसात केलेले आहे. हेच कसब हिंस्र श्वापदाशी झगडण्यासाठी नीती म्हणून तो वापरू पहात आहे. तेवढ्याचसाठी तो कठोर बनला आहे. त्याने मनावर दगड ठेवला आहे. परंतु त्यातुनच वेगळी भावछटा व्यक्त झालेली आहे. माझे मन कठोर नाही तर अतिशय प्रेमळ, सोज्वळ, मुलायम आणि माणूसकीने ओतप्रोत भरलेले आहे, ह्याच्या खाणाखुणा याठिकाणी स्पष्टपणे नजरेत भरतात. परिस्थितीच्या बंधनामुळे त्याचे उद्विग्न मन कठोर बनू इच्छित असूनही निर्णायक क्षणालाच तो हा अविचार आहे; म्हणूनच त्याचा त्याग करण्यास सरसावलेला आहे. ही सुसंस्कृत आणि सभ्य मनाची खूण आहे. यामुळेच या कवितेचा आशय घनिभूत झालेला आहे. कवितेला वाङमयीन प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

या कवितेला वेगळा घाट प्राप्त होण्याचे दुसरे कारण असे, की या कवितेतून विणले गेलेले विविध ताण. हे ताण अनेकांगी आहेत. विविध मानसिक छटा तिच्यातून व्यक्त होतात. त्यात अस्तित्वाची उत्कट जाणीव आहे. मनाची गुदमरलेली अवस्था आहे. संवेदनाक्षम मन आहे आणि प्रचंड प्रमाणात मनाची होणारी घालमेलही आहे. याच घालमेलीतून विद्रोहाची ठिणगी पेटण्याचा संभव दिसतो, त्याचक्षणी ती विद्रोही ठिणगी विवेकाने विझवून टाकलेली आहे. विवेकाला चिंतनाची अजोड साथ लाभल्याने निर्णायक अवस्थेत दामोदर मोरे गुरफटून गेलेले आहेत. आणि बोधिवृक्षाच्या ठायी आपले बळ शोधीत आहेत. बुध्दाची प्रज्ञा–शील–करूणा ही आदर्श तत्वप्रणाली आत्मसात करीत आहे. बुध्द तत्वज्ञानाचा आदर्श या कवीने डोळ्यासमोर ठेवलेला आहे आणि त्यावर अपरिमित निष्ठाही आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घालून दिलेल्या सनदशीर मार्गावर बुध्द-विचारावर-त्याचा असीम विश्वास आहे. आणि म्हणूनच स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय प्राप्त करण्याची अभिलाषा या कवीच्या मनात किती खोलवर रुजलेली आहे, ह्याची साक्ष 'बोधिवृक्ष' या प्रतिमेतून व्यक्त होते. तेव्हा 'माणूस' आहे तरी कोण? हा ज्या ज्या टीकाकारांनी आंबेडकरीप्रेरणेच्या कवितेच्या संदर्भात प्रश्न निर्माण केला त्यांनी दामोदर मोरेंच्या 'बोधिवृक्ष' या कवितेतून समजून घेण्याचा प्रयत्न केला, तर प्रवर्तक कवितेचे सामर्थ्य त्यांच्याही लक्षात येईल.

प्रवर्तक कवितेची ही बाजू लक्षात घेताना, वामन निंबाळकरांनी आपल्या कवितेची मांडलेली भूमिका दामोदर मोरे या कवीच्या 'बोधिवृक्ष' या कवितेच्या संदर्भात विचारात घेणे औचित्यपूर्ण ठरेल. वामन निंबाळकरांनी आपली भूमिका मांडताना म्हटले, "या देशातील आमचा एक नंबरचा शत्रू म्हणजे जातीयवाद आहे. हा जातीयवाद जोपासणारी देवळे, देव, धर्म, आत्मा, धर्मग्रंथ, पुनर्जन्म, चमत्कार आणि अंधश्रध्दा या सर्वांना नकार देऊन त्यांना पायदळी तुडवून मी विज्ञानवाद, भौतिकवाद, अनिश्वरवाद, अनात्मवाद, नीतिवाद स्वीकारला आहे. हा बुध्दविचार बाबासाहेब आंबेडकरांचा विचार आहे. अध्यात्म नावाची भंपकबाजी या देशातून समूळ नष्ट झाली पाहिजे असे मला वाटते. या नकार व स्वीकारामुळेच या देशातील बहुसंख्य प्रश्न सुटतील अशा माझा दावा आहे. अध्यात्माने येथील माणसाला वेडे आणि आंधळे केले आहे. म्हणून कविता लिहिताना देव, धर्म, आत्मा व तत्सम शब्द व कल्पनांना मुळीच स्थान नाही. अन्याय, अत्याचार, दलितांचे जगणे–मरणे, त्याचे सुखदुःख, भावभावना चितारण्याचे आणि बुध्दविचार, आंबेडकरविचार शब्दबध्द करणाऱ्या कार्यकर्त्यांचे काम माझे आहे. मी दीन–दलितांचा कवी आहे. ज्यांच्या वाटेवर येथील धर्माने, संस्कृतीने अंधाराचे काटे पेरून ठेवले होते; त्यांचा मी कवी आहे."+

---

+ गावकुसाबाहेरील कविता : माझ्या कवितेची भूमिका, वामन निंबाळकर, पृ. ५–६

वामन निंबाळकरांची भूमिका गंभीरपणे विचारात घेण्याचे कारण असे, की बुध्दविचार, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार शब्दबद्ध करण्यास हा कवी वचनबध्द आहे. ज्यांच्या वाटेवर येथील धर्माने, संस्कृतीने अंधाराचे काटे पेरून ठेवले होते, त्यांचा कवी होण्याचे दायित्व या कवीने स्वीकारले आहे. म्हणूनच या कवीची भूमिका मला महत्वाची वाटते. परंतु याच कवीच्या समकालीन किंवा नंतरच्या विद्रोही कवींनी या भूमिकेचे प्रभावीपणे समर्थन केलेले आढळत नाही. ह्याची जाणीव यशवंत मनोहरांसारखा कवी करून देतो. यशवंत मनोहरांनी 'उत्थानगुंफा' काव्यसंग्रहात वर्गीय जाणिवा स्वीकारलेल्या आहेत. आंबेडकरवादाचेही समर्थन केलेले आहे. तेवढ्यासाठी आपली भूमिका स्पष्ट करताना अनात्मवाद, अनिश्वरवाद, गतिवाद, विज्ञानवाद आणि चातुर्वर्ण्यविरोध, वर्णव्यवस्थाविरोध या विचारांचा स्वीकार केला आहे. परंतु वामन निंबाळकरांनी बुद्धविचार, आंबेडकर विचार शब्दबद्ध करणाऱ्या कार्यकर्त्याची जी भूमिका घेतलेली आहे, तशी भूमिका यशवंत मनोहरांनी घेतलेली नाही. अर्थात कुणा एकाद्या कवीने जी भूमिका मांडली तिचा पाठपुरावा सर्वांनीच करावा अशी अपेक्षा करणेही सर्वस्वी चुकीचे आहे. मार्क्सविचार–आंबेडकरविचार–बुध्दविचार कसा आत्मसात केला ह्याचे समर्थन करतानाच यशवंत मनोहरांनी बुध्दविचाराबावत किती पोकळ अवसान आणलेले आहे ह्याची प्रचिती 'सिद्धार्थ गौतमबुद्ध' आणि 'कार्ल मार्क्स' या उत्थानगुंफातील कविता वाचल्यावर जिज्ञासूंना येते. खऱ्या अर्थाने बुद्धविचारच या कवीने नाकारला असता तर बुध्दतत्वज्ञानाबद्दल हा कवी किती उदासीन आहे, ह्याचा विचार करण्याचे प्रयोजनच उरले नसते. 'सिध्दार्थ गौतमबुद्ध' या कवितेच्या ओळीतून यशवंत मनोहरांनी कोणत्या जाणिवा अभिव्यक्त केलेल्या आहेत हे तपासणे उद्‌बोधक ठरेल.

सत्य सांगण्याचा तू केलेला भयंकर अपराध
मानचिन्ह म्हणून भाळावर मिरवित राहीन सिध्दार्था मी
सिध्दार्थ मीही एक अपराध करू
लहान तोंडी मोठा घास घेऊ ?
माऊलीच्या आर्तमनाचा माझा प्यारा विवेकवादी आहेस तू
पण माफ कर सिध्दार्था
तुला भगवान ही शिवी मी देऊ शकत नाही
मला माफ कर मी पाखंडी आहे आणि तुझी पुजा करू शकत नाही
माफ कर, तुला 'महात्मा' हे कुप्रसिद्ध दूषणही देऊ शकत नाही
माफ कर सिध्दार्था—
की तुझ्या मुखमंडलावरील चिरशांती

मला भाविकांची भाकडकथा वाटते
माफ कर माझ्या डोळ्यांतील जखमांना तू निरंतर बेचैन
आणि धगधगतांना दिसतोस
माफ कर सिध्दार्था, तुझ्या शत्रूंनी तुला दिलेल्या
पाखंडी या बिरूदामुळे तू मला अधिकच जवळचा वाटतोस
(उत्थानगुंफा : पृ. क्र. ७१)

सिध्दार्थ गौतम बुध्दाची माफी मागूनच लहानतोंडी मोठा घास घेताना पाखंडी म्हणून बुध्दाशी अधिक जवळीक आहे, आपले काही नाते आहे असा आभास निर्माण करण्यात हा कवी प्रयत्नशील आहे हे खरेच, परंतु हा पाखंडीपणा आपल्या आत्मकेन्द्री विद्रोही भूमिकेचे समर्थन करण्यासाठी अवतरलेला आहे ह्याची जाणीव नकळत होत जाते. या कवीची बुद्धविचाराबाबत असणारी भूमिका खऱ्या अर्थाने खालील ओळींत प्रतिबिंबीत झालेली आहे —

आणि तुला नाकारणारे अलिकडे खूपच वाढले आहेत
पण हे तू पाहू शकला असतास
तर माझी खात्री आहे सिध्दार्था
'मी बुध्दिष्ट नाही' असेच व्याकुळ वैतागाने
उरी फुटून तू म्हणाला असतास
कदाचित ठिणग्यांच्या आसवांनी रडला असतास कदाचित
किंवा या तुझ्या विटंबनेखातर
स्वतःच्याच पायाखाली निर्दय सुरूंग झाला असतास
किंवा
कदाचित 'बुध्द' असणे भयंकर नामंजूर करून
खवळल्या सागरासारखा क्रुध्द क्रुध्द झाला असतास
किंवा कदाचित भयंकर निर्णयशाली 'युध्द युध्द झाला असतास'
(उत्थानगुंफा पृ. क्र. ७१)

आजच्याक्षणी बुध्दविचाराकडे पाहण्याची यशवंत मनोहरांची ही दृष्टी सरळ सरळ पलायनवादी वाटते. आजच्या परिस्थितीचे सूक्ष्म अवलोकन करताना बुध्दाला अलिकडे नाकारणारे खूप वाढलेले आहेत, असा दावा या कवीने केलेला आहे. तेवढ्यासाठी बुध्दाने, "बुध्द असणे भयंकर नामंजूर करून खळवलेल्या सागरासारखा क्रुध्द क्रुध्द झाला असता" असे म्हटले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ साली बौध्दधम्माची दिक्षा घेतली तेव्हा आजच्यापेक्षा बुद्धतत्वज्ञान नाकारणारे संख्येने

अधिक होते. म्हणून त्यांनी, 'बुद्ध युद्ध युद्ध झाला असतास' असे बुध्दाला उद्देशून निराशाजनक उद्‌गार काढलेले नाहीत. यशवंत मनोहरांना असे का वाटते ! माझ्या-दृष्टिने ह्याची दोन कारणे संभवतात (१) यशवंत मनोहरांचा स्वतःवर भरवसा नाही. 'स्व' पीडेने या कवीचा स्वकियांवरही भरवसा नाही आणि तसा असता तर असा जर तरचा आशावादी सूर विद्रोही भूमिकेच्या समर्थनासाठी लावला असता की नाही ह्याची शंका वाटते. पारंपारिकता, अंधश्रद्धा, धर्मभोळेपणा बुद्धाच्या वैज्ञानिकतेने ज्या प्रभावीपणे हा विद्रोही कवी नाकारतो तेवढ्याच प्रभावीपणे बुध्दाचा खराखुरा प्रेरणादायी आणि महत्वपूर्ण विचार या कवीला पेलवलेला दिसत नाही. (२) मार्क्स-वादी जाणिवांमुळे यशवंत मनोहरांना बुध्द 'युध्द युध्द' किंवा 'क्रुध्द क्रुध्द' झाला असता असे वाटते. ''उत्थानगुंफा''तील 'सिध्दार्थ गौतमबुध्द' ही कविता ज्याठिकाणी थांबते तिचा पुढील टप्पा 'कार्ल मार्क्स' या कवितेपासून सुरू होतो आणि ह्या दोन्ही कविता एकत्रित वाचल्याशिवाय यशवंत मनोहरांची कविप्रकृती आणि वैचारिक बांधिलकी उलगडत नाही. 'कार्ल मार्क्स' या कवितेत या कवीने मार्क्सला उद्देशून 'माफ कर' असे कोठेही म्हटलेले नाही, 'मार्क्स' आम्ही तुला पाहिले नाही. पण 'तुझ्या युगभेदक नजरेतून आम्हीही सुटलो नाही' अशी 'कार्ल मार्क्स' या कवितेतून हा कवी कबुली देतो. "तुझ्या सांगण्यानुसार आम्ही प्रत्येकच गोष्टी-विषयी शंका घेऊ लागलो, खूपच चोखंदळ झालो आणि आम्हाला लाचार दलित करणारा परमात्मा आमच्यापुढे मान खाली घालून उभा राहिला, असू दे मार्क्स हे ! आता मागे फार वेळ पाहायचे नाही, तुलाही ते आवडायचं नाही पण मार्क्स आता सुरू व्हायला पाहिजे. दिशानी पेट घ्यायला पाहिजे."

"मार्क्स तुझ्या हृदयाचे वणवे  
या कवितांच्या हाती मी दिले आहेत"

(उत्थानगुंफा : पृ. क्र. ७३-७४)

एखादा भाविक, देवप्रसन्न व्हावा म्हणून जशी आळवणी करतो, तशीच यशवंत मनोहरांनी मार्क्सला आळवणी केलेली आहे. यशवंत मनोहरांच्या भूमिकेच्या संदर्भात त्यांचा बुध्दविचार आणि मार्क्सविचार याबाबतचा तौलनिक दृष्टिकोण याठिकाणी अभिप्रेत असून कुणी कोणत्या जाणिवा स्वीकाराव्यात हा व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोण आहे आणि व्यक्तिनिष्ठ दृष्टी जपणाऱ्या कविमनाला बुध्दविचार स्वीकारलाच पाहिजे, असे आग्रही प्रतिपादन कुणीही करू शकत नाही. परंतु आंबेडकरीप्रेरणा मान्य करणाऱ्या कविमनाची ह्यातून सुटकाही होणे अवघड आहे. बौद्ध संस्कृतीची मूल्ये आता कुणी कितीही जोमदारपणे नको नको म्हणून नाकारली तरी आंबेडकरी-प्रेरणेच्या कवितेला आता ती टाळता येत नाहीत. सर्व परंपरा खंबीरपणे नाकारणाऱ्या

या कवीने जे जे नाकारता येईल ते ते सर्वार्थाने खंबीरपणे नाकारूनही बुद्ध-विचाराशी, 'माणूस' या विचाराशी परिपोषक असणारी भूमिका मांडलेली नाही. कदाचित मार्क्सवादी विद्रोही भूमिकेच्या संवर्धनासाठी प्रवर्तक दृष्टिकडे डोळेझाक झालेली असेल. खरे तर बुद्धविचार आणि मार्क्सविचार आंबेडकरी प्रेरणेला पोषक आहेत की नाही, हे ठरविण्यातच आंबेडकरी प्रेरणेच्या विद्रोही कवितेने कमालीची उदासीनता दाखविलेली आहे. अशा पार्श्वभूमीवर "अशा निर्णायक क्षणी का नको नको म्हणावे या बोधिवृक्षाने" या दामोदर मोरेंच्या 'बोधिवृक्ष' या कवितेच्या ओळीतून व्यक्त होणारी आत्मजाणीव आणि डोळसभान औचित्यपूर्ण मानावे लागते. बोधिवृक्षाच्या आशयगर्भ प्रतिमेतून सूचकतेने आणि संयतपणे कल्याणकारी मौलिक विचार या कवीने व्यक्त केला आहे. ही जाणीव स्वागतार्ह मानावी लागते.

**बाळ हाटे :**

पद्यवेडा, चिंतनशील प्रकृतीचा कवी म्हणून बाळ हाटे आंबेडकरीप्रेरणेच्या कवीत लोकप्रिय आहे. 'रक्तखुणा' हा त्यांचा काव्यसंग्रह. सामाजिकबांधिलकीची परंतु वेगळ्या ढंगाची व घाटाची कविता लिहिणारा हा कवी. 'क्रान्तीच्या उद्गात्या,' 'गाईन म्हणतो एक गाणे', बहुरुपी, 'सूर्य उद्याचे', 'इतिहास सांगतो ते,' 'वारसा' 'माझा सूर्य : आंबेडकर', 'फाटलेली जिन्दगी,' 'बाजार' 'तू' 'रक्तखुणा' 'संस्कृति', 'मी', 'उध्वस्त' इत्यादि कविता वैशिष्ट्यपूर्ण आहेत. 'माझा सूर्य : आंबेडकर' या कवितेत हा कवी म्हणतो :

"सूर्य अक्षय उगवतो आणि मावळतो
पण माझ्या सूर्याला फक्त प्रकाशणेच माहित"

('माझा सूर्य : डॉ. आंबेडकर : रक्तखुणा : पृ. क्र. १७)

'उगवणे' आणि 'मावळणे' हा सृष्टीचाच नियम आहे. ज्या 'सूर्याला' अक्षय प्रकाशणेच ठाऊक आहे, जो कधी मावळत नाही, असा सूर्य – आंबेडकरविचार आहे. ह्याचा खोलवर या कविमनावर प्रभाव पडलेला आहे.

"आत्म्यात कोरलेला
त्याचा अंश
अटळ आहे – अढळ आहे

काळाच्या बिनतळव्याच्या
विखारी पायाखालून
प्रकाश झरणार आहे
किरण पसरत आहेत
रश्मी झरत आहेत
माझ्या अक्षय सूर्याच्या!"

बाळ हाटे डॉ. बाबासाहेब आंबेडकराविषयी उंचबळून बोलत असताना स्वतःचे अंतर्मुख होऊन परीक्षण करण्यास सिध्द झालेला आहे.

"क्रान्तीच्या उद्गात्या
आज मी खरंच खिन्न झालो आहे."

या कविमनाला असं का वाटावं? ज्याचा अक्षय सूर्य सातत्याने प्रकाशतो, अशा कवीच्या वाट्यास एवढी उदासीनता का यावी? असा एक प्रश्न स्वाभाविकपणे निर्माण होतो.

"उभ्या आसमंताला रंगवण्याचं तुझं स्वप्न
आताच कुठं गर्भातून प्रसवलं होतं
त्याच अशुध्दाच्या रौरवात
किड्यांनीसुध्दा जन्म घेतला
तुझे चावे घेण्यासाठी
त्यांनी नुसते रक्तच चोरले नव्हते
अभिजात कलावंतांच्या प्रतिभेचीसुध्दा
चोरी करून
भरल्या होत्या आपल्या झोळ्या.
त्यावर पुष्ट होऊन
वर पुन्हा तुझ्याच कर्तबगारीवर
काळजाचे तत्रे ठेवले
झाकून ठेवण्यासाठी.
— ज्यांना स्वतः कोण हे माहित नाही.
ते आणतात आव सर्वज्ञाचा
उसन्या अभिनिवेषात गातात भैरवी
क्रान्तीच्या नाट्याची,
परंतु त्यांना कळलेच नाही

ही नांदी होती उगवत्या सूर्याची ”

( क्रान्तीच्या उद्‌गात्या : रक्तखुणा : पृ. क्र. १ )

वर्णव्यवस्था, जातीयता, अंधश्रद्धा कर्मविपाकवाद, आणि मोक्षकल्पना याविरोधी विद्रोही कविता जशी आसूड उगविते तशीच ती, आंबेडकरविचाराचे स्वार्थासाठी भांडवल करणाऱ्यांच्या विरोधी पवित्रा घेण्यास सिध्द होते हे बाळ हाटे यांनी स्पष्ट केलेले आहे हा कवी तसा आत्मसंतुष्टही नाही आणि बेफिकीरही नाही. ‘ गाईन म्हणतो एक गाणे ’ यात स्वत वरील विश्वास प्रकट झाला आहे.

“ गाईन म्हणतो एक गाणे
ज्याच्यात असतील
प्राचीच्या कपोलावरचे
आरूण रंग आणि
वैश्विक भावनांचे
मनोरम स्वप्न
समृध्दी, विपुलता; स्वार्थाचा अभाव,
जो कधी मानवाला मानवाचा
शत्रू मानत नव्हता ”

( ‘ गाईन म्हणतो एक गाणे ’ : रक्तखुणा : पृ. क्र. ४ )

‘ क्रांती सूर्य : डॉ. आंबेडकरां ’ नी दिलेला क्रान्ती संदेश या कवीला मोठ्या सामर्थ्याने पुढे न्यावयाचा आहे, प्रसारीत करावयाचा आहे.

“ गाईन म्हणतो एक गाणे
भेदाच्या पलिकडचे
मार्क्सच्या ग्रंथाखाली झाकलेल्या
त्याच्या उपाशी पोटीच्या
अंतिम वेळेचे
एंगल्सच्या मित्रत्वाच्या ओझ्याखाली
लपवलेल्या अश्रूंचे,
लेनीनच्या थोरल्या भावाच्या
फाशीच्या दोरीचे,
सैबेरियातल्या जीवघेण्या बर्फाचे
काप्रीतल्या गॉर्कीच्या
फुफ्फुसातील क्षयाचे ”—

( गाईन म्हणतो एक गाणे : रक्तखुणा : पृ. क्र. ४

आंबेडकरविचारात क्रांतिविचाराचे मूळ शोधणाऱ्या कविमनाला निराशेचा आत्मप्रत्यय आलेला असावा. विद्रोही कवितेच्या मर्यादा स्पष्ट करतानाच मार्क्सवादी प्रेरणांचा विचार करणे आंबेडकरीप्रेरणेच्या कवितेला का शक्य नाही, ह्याचे सविस्तर विवेचन 'आंबेडकरीप्रेरणेची विद्रोही कविता' यात आलेले आहेच. बाळ हाटेसारख्या पद्यवेड्या, आंबेडकरविचाराने डोळसपणे मार्गक्रमण करणाऱ्या कवीने प्रवर्तक जाणिवांच्या कविता लिहिल्या तर पुढील पिढीसाठी हा कवी खास देणे देऊन जाईल, यात शंका वाटत नाही.

**बळवंत कांबळे :**

हे एक झपाटलेले कविमन! समाजपरिवर्तनासाठी आसूसलेला, समाजात नित्यनेमाने घडणारे अन्याय, अत्याचार, यामुळे आणि अमानुषतेने व्यथित झालेला हा कवी आहे. आपल्या 'निषेध' या काव्यसंग्रहातील 'निषेध' 'पेटते हिल्लोळ,' 'माय,' 'निषेधार्थ' 'समज,' 'आम्ही मात्र' 'सत्य' 'माझी कविता,' 'पाटलाचा रेडा मेला तेव्हाची गोष्ट' इत्यादि कवितांतून या कवीने सामाजिक निषेध नोंदविलेला आहे. या निषेधामागे एक दीर्घ चिंतन आहे. हे चिंतन विशिष्ट परिस्थितीची, अन्यायाची 'समज' देण्यासाठी कविमनाने केलेले आहे. या दृष्टीने त्यांची 'समज' ही कविता तपासणे उचित ठरेल.

"एक काळ असा होता
माणसासारखी माणसं आम्ही माणसाचेही गुलाम होतो
तसे काळाचेही गुलाम
सावलीच्या स्पर्शाला सांभाळीत
रस्त्यावर उमटलेल्या पाऊलखुणा बुजविण्यासाठी
पाठीला बोराटी अडकवून फिरणारे आम्ही
गळ्यात करवंटी अडकवून थुंकीलाही जपत होतो
असा काळ तोही आता इतिहास जमा झालाय
एकोणीशे सत्तावीस साल
महाड दलितांच्या मुक्तिसंग्रामाचा पहिला प्रहार
नासिकचा काळाराम मंदिर प्रवेश
तेहतीस कोटी देवांच्या नाळेशी निगडीत असलेल्या
धर्ममार्तंड बांडगुळांबरोबर दुसरा प्रतिकार

अशा धर्ममार्तंडांचीही चिरफाड करून
आम्ही काळाच्या उदरात घुसलोय
बंदिस्त काळोखात ठेचाळत पडलेले आमचे माणूसपण शोधाय"
('समज' निषेध : बळवंत कांबळे, पृ. क्र. १५)

माणूसकीसाठी व्याकुळलेले मन 'माणूस' या संकल्पनेस प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यास धडपड करीत आहे. संकल्प सोडीत आहे, आणि हा संकल्प सोडताना येथील संस्कृतीबद्दल त्याच्या मनात पेटलेले 'हिल्लोळ' प्रकाशमान होत आहेत.

'अिथल्या कर्मठ छिनाल संस्कृतीच्या पिलावळीने
माझ्या नागड्या संसाराचे बेगुमान काढावेत, ओरखडे
शब्दांनी फोडावा हंबरडा, डोळ्यांनी गाळावेत पावसाळे
तरीही मी विश्वास ठेवावा —
अिथल्या संस्कृतीवर'
('पेटते हिल्लोळ,' : निषेध : पृ. क्र. ११)

विसाव्या शतकातही माणसावर घडणाऱ्या अन्याय, अत्याचाराविषयी कोरडी सहानुभूती दाखविणाऱ्या मानवी प्रवृत्तीबद्दल हा कवी व्यथित आहे. म्हणूनच त्याची शोधकवृत्ती या मानवीप्रवृत्तीवर कोरडे ओढीत आहे.

"अजुनीही आमच्या डोळ्यांत बसविल्या जातात परंपरेच्या अंधार लाटा
समजत नाही मला कां धारण करतात पुरोगामित्वाचा खोटा मुखवटा
माणूसकीवर बलात्कारणाऱ्या नराधमानो
किती काळ तुटून पडणार आहात गिधाडासारखे
किती काळ तोडणार आहात आमच्या जगण्याची आधार-पाळे-मुळे"
(निषेध : पृ. क्र. १२)

हे शल्य हृदयात जपताना, वेदना सहन करताना, लोकशाहीविषयी मनोगत व्यक्त करताना हा कवी आपल्याच मनाची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत आहे.

"तरीही आम्ही तिरंग्याला जपायचं
त्याहून अधिक लोकशाही शासन समाज व्यवस्थेला
कारण –
लोकशाही लोकांसाठी
तरी–पुन्हा–पुन्हा
घालतोय सहनशीलतेचे टाके फाटल्या काळजाला
जरी उसवले तरी पुन्हा–
कारण

मला नामशेष व्हायचं नाहीय् ”

(‘निषेध’: निषेध : पृ. क्र. १०)

‘नामशेष’ न होण्याच्या ईर्षेपोटी विद्रोहाची ठिणगी सहनशीलतेने विझविण्याचा हा कवी प्रयत्न करतो, त्याचे कारण लोकशाही तत्वप्रणालीत शोधावे लागते. स्वतःच्या अस्तित्वाचा शोध लोकशाही जीवनमूल्यातून विकसित झालेला असून नामशेष व्हायचे नसेल तर लोकशाही मूल्यांवर निष्ठा ठेवल्याशिवाय पर्याय नाही, ह्याचा कविमनाला स्पर्श झालेला दिसतो.

बळवंत कांबळे अंतर्मुख होऊन समाजजीवन समजून घेण्याचा तळमळीने प्रयत्न करतो, हे उल्लेखनीय आहे. त्यादृष्टीने ‘निषेध’ मधील ‘दोस्त हो’ ही कविता अभ्यसनीय आहे. या कवितेत ‘दोस्तांना’ आव्हान आणि आवाहन आहे. दोस्तांच्या निष्क्रिय मनोवृत्तीची चिकित्सा आहे. कठोर आत्मपरीक्षणही आहे.

“ आपल्याच घरात दुसरा घुसून
लुटतोय आपल्याच–आया–बहिणीची इज्जत तेव्हा –
आमचं काळीज फाटतही नाहीं की–अश्रूही डोळा गळत नाही ”
किंवा –
“ बेकीचा फोफावणारा डेरेदार निवडुंग
वाढतोय डेरेदार आमच्याच अंगणात
कशी दिसणार आम्हाला विरोधकांची काळी कारस्थाने
आम्हीच आमची बांधतोय थडगी
उगा इतरांना कां दोष
आम्हालाच नडणार आहे आमचे बेताल वागणे.
दोस्त हो– सावधान ! ”

(‘दोस्तहो’ निषेध : पृ. क्र. १६)

बळवंत कांबळ्यानी स्वतःच्या विद्रोही भूमिकेच्या मर्यादा स्पष्टपणे लक्षात घेतलेल्या आहेत. त्यामुळे आत्मसंशोधन करण्यासाठी त्याचे मन आसुसलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानाचा मनावर खोलवर परिणाम झालेला असल्याने आंबेडकरविचारांकडे आत्मियतेने पाहण्याची या कवीची वृत्ती आहे.

“ तुझ्या तत्वज्ञानावर
उभा राहिलेला हा खंडप्राय देश
आणि—
तुझ्या चळवळीचे पायिक होऊन
समतेचा झेंडा खांद्यावर टाकून निघालेली काही तथागत मंडळी

आज, काल अशी कां वागताहेत मला समजत नाही ”
(संशोधन; निषेध : पृ. क्र. १७)

आंबेडकरवादाबरोबरच हा कवी मार्क्सवादानेही प्रभावित झालेला आहे. म्हणूनच ‘संशोधन’ आणि ‘कार्लमार्क्स’ या कवितांचा अभ्यास करताना, बळवंत कांबळ्यांचे कविमन नेमके कोणत्या विचारसरणीवर विसंबून राहून स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय प्रस्थापित करू इच्छिते, हे अभ्यासणे गमतीदार आहे. बळवंत कांबळे यांच्या ‘निषेध’ या काव्यसंग्रहाच्या मुखपृष्ठावरच ‘दलितस्थान’ निर्मितीची लालभडक घोषणा अवतरलेली आहे. त्यात प्रा. भालचंद्र फडके यांना विद्रोह, बंड, नकार दिसणे स्वाभाविक आहे. परंतु आंबेडकरविचाराचे ‘दलितस्थान’ हे ध्येय होते किंवा नाही, हा शोध घेणे अत्यावश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची देशनिष्ठा, राष्ट्रप्रेम याबद्दल कुणीही शंका व्यक्त करू शकत नाही. या पार्श्वभूमिचा आणि ‘निषेध’ मधील कवितांच्या अंतरंगाचा विचार केला तर मात्र ‘दलित-स्थान’ ची घोषणा आंबेडकर विचारात बसविणे टाळावे लागेल.

**अशोक पाटील :**

आंबेडकरवादाने झपाटलेला कवी म्हणून अलिकडच्या कवीत अशोक पाटलांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. ‘बस्तान’ हा काव्यसंग्रह त्यांनी ज्यांना अर्पण केला आहे त्यांच्याविषयी या कवीने प्रचंड आत्मविश्वास व्यक्त केलेला असून ‘स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायाच्या प्रस्थापनेसाठी बंडाचा झेंडा जे खांद्यावर घेतील त्या त्या सर्वांसाठी ” असे हा कवी म्हणतो. ‘भदन्त संघरक्षित’ ह्यांनी हा कवितासंग्रह प्रकाशित केलेला असल्याने अशोक पाटलांची आत्मजाणीव कोणत्या प्रकारची आहे, त्याचा उलगडा निश्चितच होतो.

व्यक्तिगत दुःख भोगणारा आणि सामाजिक दुःखापेक्षा स्वदुःख नगण्य आहे असे समजून घेणारा हा कवी आहे. बुद्धाने सांगितलेले दुःखाचे मूळ, त्यावरील उपाय कोणते आहेत, हेही योग्य प्रकारे समजून घेण्याचा या कवीने प्रयत्न केला असून, ‘बस्तान’ बांधण्यासाठी हे उमदे कविमन आसूसलेले आहे. अर्थातच, सांस्कृतिक मूल्यांची जडणघडण करण्याची ईर्षा या कवीच्या मनात खोलवर रूजलेली आहे. ‘बस्तान’ मध्ये एकूण तीस कविता समाविष्ट असून त्या वेगवेगळ्या मनस्वी स्वभावचित्रणाचे दर्शन घडवितात. ‘बिगुल,’ ‘माय,’ ‘बंडाचे गीत,’ ‘लेणी’

'अज्ञातवास' 'दोस्त हो,' 'बस्तान,' 'रंगाच्या दुनियेत' 'तर दोस्त' आणि 'चवदार तळ्याचे पाणी पेटत आहे' इत्यादि कविता 'बस्तान' मधील मूळ विचार-प्रेरणेवर प्रकाश टाकतात.

डॉ. बाबासाहेब अंबेडकर, 'आई' आणि 'समाज' ही प्रामुख्याने अंबेडकरी प्रेरणेची कविता लिहिणाऱ्या कवींची श्रध्दास्थाने आहेत. या श्रद्धास्थानांविषयी उचंबळून लिहिणाऱ्या कवींच्या काव्यातून अनेकवार पुनरावृत्ती झालेली दिसून येते. अशोक पाटलांच्या 'माय' आणि 'दोस्त हो' या अशाच कविता. परंतु त्यातील आशय हा ताजा, टवटवीत आणि वाचकालाच पुनर्प्रत्ययाचा आनंद देणारा आहे. हा कवी 'माय' कवितेत म्हणतो :—

"सूर्य डुबत असताना
मंदमंद अंधारात
तू येत होतीस........अगदी जड पावलान."

('माय' बस्तानः पृ. क्र. १०)

सूर्य अस्ताशी गेल्यावर, मंदमंद अंधार झाल्यावरच जड पावलाने चालणाऱ्यांचा खऱ्या अर्थाने दिवस सुरू होतो. हेच जीवनाचे खरे भाष्य. हेच दुःख आणि हीच शोकांतिका. आणि अशा पिचलेल्या हृदयाचा मोठेपणा असा, की सारे दुःख विसरण्यासाठी, दुःखावर मात करण्यासाठी जो मनोनिर्धार व्यक्त करण्याची मानसिक शक्ती लागते ती विलक्षण मानावी लागते. ती या कवीपाशी आहे. त्याला तोड नाही.

"पण निर्धार तुझा बोलत होतीस
माझ्या, शिकलेल्या पोराले न्हायी धाडीन कामाले!
तू जळत होती मेणबत्तीसारखी
गवताच्या भाऱ्यावर नि काड्याच्या मोळीवर
दिवस पालथे घालण्याची हिंमत तुझी
आणि तरीही जिद्दीने म्हणत होतीस
'माझ्या पोराले सायेब बनवीन."

('माय' बस्तान : पृ. क्र. १०)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा.' हा जो जीवनमार्ग सांगितलेला आहे, त्याचा प्रभाव अशिक्षित, दुःखात खितपत पडलेल्या आणि संपूर्ण जीवनच काबाडकष्ट करण्यात खर्ची घातलेल्या संवेदनाक्षम मनावर पडलेला आहे. ह्याचे जिवंत चित्रण 'माय' या कवितेतून साकार झालेले आहे.

'सूर्यडुबत असताना, 'मंदमंद अंधारात,' 'तू जळत होतीस मेणबत्तीसारखी' 'वैशाखी पौर्णिमेचा चंद्र', 'आसवातील थेंबाच्या वलयात' आणि 'सूर्याची आग'

इ. प्रतिमांचा सूचक वापर ‘ माय ’ या कवितेत पाटलांनी केला आहे. या प्रतिमांतून मनातील द्वंद्वात्मक आवेग अतिशय गतिमान झाला आहे. ‘ माय ’ शी तादात्म्य साधताना हा कवी म्हणतो :

“ हा तुझ्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावरचा
कष्टाचा इतिहास मी वाचतो तेव्हा
सूर्याची आग ........ होऊन ........
ओकावं म्हणतो सारखं
पण बघतो ........ वैशाखी पौर्णिमेचा चंद्र
आणि ....... विसावतो तसाच ! ”

( ‘ माय ’, बस्तान : पृ. क्र. ११ )

आपल्या पूर्वजांचा, आईवडिलांचा कष्टाचा इतिहास तपासताना हा कवी ‘ सूर्याची आग ’ ओकण्यास सिध्द झालेला आहे, परंतु तो विसावतो आहे, वैशाखी पौर्णिमेचा चंद्र पाहून ! याठिकाणी ‘ सूर्याची आग ’ ‘ वैशाखी पौर्णिमेच्या चंद्रात ’ विलीन झालेली आहे. या दोन्ही सुंदर प्रतिमा ‘ विद्रोही ’ आणि ‘ प्रवर्तक ’ जाणिवा एकाचवेळी प्रकट करून जातात आणि कविमनाचे वैशिष्ट्य उलगडून टाकतात. हा कवी प्रवर्तक जाणीवेशी का एकरुप झाला, त्याचा उलगडा ‘ लेणी ’ या कवितेतून होतो. ‘ लेणी ’ ही कविता वैशिष्ट्यपूर्ण आहे आणि ‘ माय ’ कवितेशी तिचे साधर्म्य आहे. शिवाय त्या कवितेचा आशय ‘ माय ’ च्या व्यक्तिमत्त्वाशी निगडीत आहे. ‘ लेणी ’ ही कविता तशी प्रतिकात्म कविता आहे. दोन वेगवेगळ्या सांस्कृतिक मूल्यांचा वेध घेणारी. त्या कवितेतील अशोक पाटलांची दृष्टी नजरेआड करता येत नाही. ‘ ते ’ हा शब्द ‘ लेणी ’ या कवितेत वारंवार येतो, तो वेगवेगळ्या भावछटा व्यक्त करण्यासाठी ! यापलीकडे ‘ ते ’ या शब्दप्रयोगातून एका संस्कृतीचा वेध घेतावेताच दुसऱ्या संस्कृतीचा अंमलही या कविमनावर झालेला दिसून येतो. प्रवर्तक जाणिवांचे प्रतिबिंब उलगडून सांगताना हा कवी म्हणतो,

“ तिच्या कल्पक नजरे समोर तरळत ‘ ते ’ होते
राजमहाल शीशमहाल ताजमहाल कुतुबमिनार वगैरे
लाखप्रतिकृतीनी, घालत होती ती रांगोळी
अन् भरत होती रागरंग जीवनाचे
तिच्या कल्पक नजरे समोर तरळत ‘ ते ’ होते
तेव्हा तू ही संस्कार मात्र करीत होतीस....... ”

( ‘ लेणी ’, बस्तानः पृ. क्र. १४ )

याठिकाणी ‘ संस्कार ’ या शब्दप्रयोगास फार मोठा आशय प्राप्त झालेला आहे. गावच्या बाहेर राहणारी उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या नैसर्गिक आपत्तीनाच

नव्हे तर जातीयतेच्या भस्मासुरामुळे छळ, बहिष्कार आणि विटंबनेस बळी पडलेली, झोपडीत कसाबसा जीव मुठीत धरून जगणारी ' माय ' आता संस्कारक्षम मने तयार करण्यास सिध्द झालेली आहे. ही प्रवर्तक जाणीव उल्लेखनीयच मानावी लागते. अशी जाणीव का निर्माण होतेय ? त्याचे कारण, शोध घेणे, शोधातून बोध घेणे, अवतिभवतीच्या परंपरागत संस्कारकेन्द्रातून घडविण्यात येणाऱ्या संस्कारांचे सूक्ष्म अवलोकन करणे आणि याच संस्कारकेन्द्रातून तयार झालेल्या संस्काराने संस्कृतीच्या नावाखाली ' म्हारीन,' ' अबला ' ह्या ' सुसंज्ञेने ' तिला संबोधण्यात आले, हे ही या ' माय ' ने नेमके हेरलेले आहे. ' म्हणून संस्कारकेन्द्रही तूच बांधत होतीस. ' असे कवी म्हणतो तेव्हा या वेगळया संस्कारकेन्द्रातून घडविण्यात येणारे संस्कारक्षम मन नव्या सांस्कृतिक मूल्यांनुसार घडत आहे. आणि तेही प्रभावीपणे घडत आहे हे जाणवते. आणि हे परिवर्तन विलक्षण गतीने झेप घेत आहे; त्यामागे अर्थातच या ' माय ' ने नवा आदर्श डोळ्यासमोर ठेवलेला आहे याची साक्ष पटते. हा आदर्श ' रमाबाई ' ' भिमाई ' या महान स्त्रियांपासून या ' माय ' ने घेतलेला आहे. ' रमाबाई ' ' भिमाई ' या परिवर्तनशील संस्कारकेन्द्राची शक्तिस्थाने आहेत. वेगळा सांस्कृतिक वारसा देण्याची किमया ' रमाबाई ' ' भिमाई ' या स्त्रियांच्या असीम त्यागातून घडलेली आहे. युगपुरूष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ' भिमाई ' आई म्हणून आणि ' रमाबाई ' पत्नी म्हणून इतकाच या दोन्ही नावांना मर्यादित अर्थ उरलेला नसून सर्व समाजजीवनाची श्रध्दास्थाने म्हणून त्यांना गौरविले जाते. म्हणूनच त्यांचा ' मिथ्स् ' म्हणून अशोक पाटलांनी यथार्थपणे वापर केलेला आहे.

' लेणी ' हे प्रतीक वापरून अशोक पाटलांनी बौद्ध संस्कृतीचा ध्यास घेतलेला आहे. ' तेव्हा तू ही संस्कार मात्र करत होतीस ' असे ' माय ' ला उद्देशून म्हटलेले असून भावगर्भ आशय ' लेणी ' या कवितेतून व्यक्त केला आहे. ' माय ' ला ' लेणी ' ची उपमा देऊन ' लेणी ' आणि ' माय' ह्यात एकरूपता प्रकट केली आहे. दोन वेगवेगळया संस्कृतींचा उलगडा करताना, ' तिच्या कल्पक नजरेसमोर तरळत ' ते ' होते ' असे जेव्हा हा कवी म्हणतो तेव्हा परंपरागत संस्कार करणारी ' कल्पक आई ' कशी आहे, हे ओळखण्याचे भान या कविमनापाशी आहे असे दिसते. कल्पक आईच्या संस्कारकेन्द्रातून घडणारे संस्कार कल्पकच असणार ह्याचे चिंतन आणि अवलोकन करून ' माय ' ने कोणता निर्धार केलेला आहे, हे सांगताना हा कवी डोळस बनलेला आहे.

" तिच्या कल्पक नजरेसमोर ' ते ' तरळत ' ते ' होते  
तेव्हा तू ही संस्कार मात्र करत होतीस !  
मेवा मिठाई अन् फराळानं मुलांना ती भरवत होती

सत्यनारायण नि सुतकही पाळत होती
पण चुलीत तुझ्या जळत होतं जन्माचं दुःख
अन् भाकरीच्या चान्यावर तू सिंहाना तर तयार करत होतीस
भविष्यातला तुझा आशीर्वाद फलद्रूप व्हावा म्हणून
हात तू जोडत होतीस.... ‘ बाबांच्या प्रतिमेस ’
अन् बापदादयांच्या आठवणींची शिदोरी सोडत
इतिहास सांगत होतीस मुलाना छळ, बहिष्कार, जातीयतेचा
तेव्हा तुझेच तुला आसवे आवरताना भान नव्हते
तू तर चित्रीत होतीस ‘ चित्र ’ श्रेष्ठ चित्रकारापेक्षा
अन् आठवून झुंजार लढ्यास बाबांच्या
तू तर अजिंठ्याचीं प्रतिकृतीलेणी नकळत कोरत होतीस
तिच्या कल्पक नजरे समोर तरळत ‘ ते ’ होते
तेंव्हा तू ही संस्कार मात्र करत होतीस !!

( ‘ लेणी ’, बस्तान : पृ. क्र. १५ )

अशोक पाटलांनी बौध्द संस्कृती का आत्मसात करण्याचा प्रयत्न केलेला आहे, ह्याचे उत्तर त्याने समर्पकपणे दिलेले आहे, ते ‘ झाड ’ या कवितेत. “ माझ्या जन्माबरोबरच स्माशानभूमीत माझ्या नावानं पैदा झालेलं एक झाड ” असे म्हणतानाच ‘ माझ्याही फळण्याफुलण्याचा, बहरण्याचा आणि कालवश होण्याचा विषय वादातीत का ठरावा ! ” म्हणून शोकमग्न होतो. मानवनिर्मित असलेल्या माझ्या दुःखाला सीमा का असू नये, ह्याचे आत्मभान या कवीस असल्याने

“ माझ्या जन्मासोबत आलेली वीतभर माती फाटलेली चिंधी
नि शिळ्या भाकरीचा तुकडाही
कां छिनून घ्यावा ज्यांनी त्यांनी.... ! ”

( ‘ झाडं ’, बस्तान : पृ. क्र. ३७ )

असाही एक आत्मप्रत्यय आल्यामुळेच अंतर्मूख होऊन, ‘ समीकरण ’ मांडतो.

‘भिरभिरतेय माझी नजर शाळेत न जाता परीक्षेस बसलेल्या मुलासारखी
मला उत्तर सापडत नाही
प्रश्न डिवचतात, विंचवासारखे डंख मारतात
ह्या गणितात बसत नाही सुख दुःख गम किंवा दर्दचे आकडे
शिकवलं नाही गुरूजीनं हातापायाच्या बोटावर
गणित सोडवायला.

( ‘ समीकरण ’, बस्तान : पृ. क्र. ४१ )

हे दुःख कशामुळे वाट्यास आले त्याचाही मूळापासून वेध घेण्याचा हा कवी प्रयत्न करतो. आणि त्याला आत्मजाणीव होते की,

‘जीवाचं मोल, शिळ्याभाकरीचा तुकडा, फाटलेला कपडा अन्
वितभर मातीही ओटीत टाकण्यास जो देश जी संस्कृती
धजत नाही ........ तिथं मरगळू नको असाच ”

( ‘ तर दोस्त ’, बस्तान : पृ. क्र. ५१ )

मरगळ झटकल्यामुळे त्याने निर्धार केला आहे. आपलेही ‘ बस्तान ’ बांधण्याचा.

‘ म्हणून म्हणतो........
मी आलोच पांढऱ्या शुभ्र घोड्यावर स्वार होऊन
हातावर आपले बस्तान घेऊन .......
मी आलोय ॥ ’

( ‘ बस्तान ’, बस्तान पृ. क्र. २६ )

‘ बस्तान ’ मध्ये जसा आत्मशोध आहे तसाच ‘ स्व ’ संस्कृतीचा वारसा शोधण्याचाही प्रयत्न आहे.

‘ आज कित्येक वर्षापासून पाहतोय
ह्या जमिनीच्या कणाकणावर पाऊस, वारा, ऊन
थंडीचा घणाघाती हल्ला
तिनेच साहले आजही साहते तशी स्तब्धच
पण मी विचारलेल्या प्रश्नाचं उत्तरं देत नाही ही माती ........
मी विचारतो ....... माझ्या गडप झालेल्या
संस्कृतीचा सांगाडा कुठाय ?
मी विचारतोय माझ्या वारसदाराचे मुर्दे कुठयात् ? ’

( ‘ शहनाज ’, बस्तान पृ. ५५ )

या शोधातून शोकात्म जाणीव प्रकट होते. गडप झालेल्या संस्कृतीचा विलक्षण प्रभाव या कविमनावर आहे. ही संस्कृती गडप करण्यास कारणीभूत ठरलेल्या, आणि आपल्या दुःखाचे मूळ जी संस्कृती आहे, तिचा त्याग करण्याशिवाय दुसरा पर्यायही नाही असे कवीला वाटत असतानाच ‘ दुःखातून मुक्ती मिळवून देणाऱ्या संस्कृतीला आत्मसात करणे अत्यावश्यक आहे, असे कवीला वाटते. म्हणूनच तो म्हणतो;

“ आता विचारतोय बुध्दालाच
दुःखाची कारणमीमांसा
सुख तसेच आसवे ....

दुःखातूनच मार्ग निघतोय !!

('मी विचारतोय', बस्तान : पृ. क्र. २१)

मानवी दुःखावर मात करावयाची असेल तर बुद्धविचार आत्मसात करण्याची जी गरज या कविमनाला वाटते, ती अतिशय सूचक आहे.

अशोक पाटलांच्या 'बस्तान' काव्यसंग्रहात 'एकलव्य,' 'शंबुक' 'लिंकन,' 'सॉक्रेटिस,' 'रमाबाई,' 'भिमाई,' 'सिद्धार्थ,' 'बुध्द,' 'ज्युलियस' 'ॲन्टोनी,' 'मस्तानी,' 'नेपोलियन,' 'हॅम्लेट,'' शहनाज,' 'महाजन पाटील,'' जर्नादन जयदेव मगाडे' आणि 'पोचीराम कांबळे' अशी नावे येतात, ती वेगवेगळ्या पार्श्वभूमीवर अवतरलेली आहेत. 'पेशवाई, 'हिरोशिमा' 'नागासाकी,' 'मराठवाडा,' 'महाड' असेही शब्द येतात. ते ऐतिहासिक मूल्यमापनासाठी.

'पिंपळपान,' 'चवदार तळे' 'महाड', 'नागसेन,' 'अशोकचक्र,' 'नागलोक'' जयभिम' इ. शब्द प्रतिमाची योजकताही केंद्रीभूत आशय परिणामकारकतेसाठी होते. म्हणूनच अशोक पाटलांचा 'बस्तान' हा काव्यसंग्रह प्रवर्तक जाणीवांचे यथायोग्य मूल्यमापन करणारा काव्यसंग्रह निश्चितच आहे.

**मनोहर तल्हार :**

आंबेडकर विचाराने झपाटलेला कवि मनोहर तल्हार यांची 'माणूस' कादंबरी प्रसिद्ध झालेली आहे. 'माणूस' ही संकल्पना विकसित करण्याचा जणू त्यांनी ध्यास घेतला आहे. प्रचारकी आवेशात अडकून न पडणारा, विद्रोहाचा बटबटीत आक्रोश न करणारा, आणि प्रचलित समाजव्यवस्थेचे भीषण, ओंगळ, हिडीस आणि रक्तपिपासू स्वरूप उघडे करणारा हा कवी आपल्या 'तू' या कवितेतून याची साक्ष पटवून देतो आहे. प्रवर्तनाकडे या कवीचे मन आकृष्ट झालेले आहे. सामाजिकबांधिलकी स्वीकारताना आपण निमित्तमात्र आहोत, पण जनजागृतीसाठी काही करता आले तर पहावे एवढ्याच कारणासाठी हा कवी मानसिकदृष्ट्या कवितेत गुंतलेला आहे. म्हणूनच त्याचा सूर संयमी आहे. या संयमाला आत्मपरिक्षणाची जोड आहे. आत्मपरिक्षणाला आकलनाची दिशा आहे. आणि त्याचा वेध घेण्याचा ठाम निर्धार आहे. आक्रोश, नकार, बंड, विद्रोह आणि प्रक्षोभात अडकून न पडता मनोहर तल्हारांची कविता आपल्याला

नेमके काय करावयाचे आहे, सांगावयाचे आहे ह्याचे योग्य भान राखून आहे. हे भान राखले गेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार पूर्णपणे आत्मसात करण्याच्या लालसेपोटी.

" पेटलेल्या सूर्याला हाती धरून
तू उभा राहिलास खंबीरपणे
जमिनीवर भक्कम पाया रोवून
लांबवर अंगुलीनिर्देश करून
दाखविलास तू मार्ग
सूर्यप्रकाशाइतका स्पष्ट
असंख्य दलितांना ............ "

( अस्मितादर्श : ऑ/नो/डि : १९८० )

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखविलेला मार्ग सूर्यप्रकाशाइतका स्पष्ट आणि सरळ मार्ग आहे हे नव्याने सांगण्याची आवश्यकता नसली तरी भक्कमपणे आत्मसात करण्याची निकड नाही का ? असा एक प्रश्न आजही निर्माण झालेला आहे आणि तो मनोहर तल्हारांनी आपल्या ' तू ' या वरील कवितेत, तद्वतच अनेक कवींनी अचूकपणे ओळखला आहे. त्याचे कारण असे, की डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी दाखविलेला मार्ग हा 'शॉर्टकट' नाही. तो दूरचा प्रवास आहे, खडतरही आहे आणि म्हणून त्यासाठी आवश्यकता आहे, निर्धाराची, संयमाची, सचोटीची, आत्मनिर्भरतेची ! दीनदुबळ्या, दुःखितांच्या उध्दारासाठी, विद्रोही कवितेला ' शॉर्टकट ' चे जबरदस्त आकर्षण होते, म्हणूनच काही विद्रोही कवींनी असंख्य काजव्यांनाच पेटता सूर्य समजून आपले मानले. काहींनी तर चक्क इंपोर्टेड सूर्याच्या प्रकाशाची वाटचाल महत्वपूर्ण मानली. कोणत्याही विचाराचे मूळ जमिनीत खोलवर रूजलेले असावे लागते. कलम करून जनमानसात विचार रूजत नसतात. आंबेडकर-विचार बुध्दविचाराचा वारसा घेऊन जमिनीवर भक्कम पाय रोवून स्वयंतेजी सूर्या-सारखा प्रकाशत आहे, ह्याचे भान तल्हारांना निश्चितच आहे.

" जे वर्षानुवर्षे अंधाराच्या खाईत चाचपडत होते
डोळे असून ठेचाळत होते
रक्ताळले होते तरी धडपडत होते
अंधाराला गिळून टाकणाऱ्या
नव्या तेजाच्या सूर्यासाठी....
जो तुझ्या हाती धगधगत होता
मार्गदर्शनाचे तुझे व्रत चालूच होते

आणि अंधाराच्या खाईतून एक-एक करून
सारे वर आलेत. ”

(‘तू’ .... अस्मितादर्श : ऑ./नो./डि. १९८० )

पेटलेला सूर्य हाती घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर खंबीरपणे उभे राहिले नसते तर अनंत वर्षांच्या अंधारात चाचपडणाऱ्यांना त्या गर्तेतून वर येता आले नसते. हे सूचकतेने आणि परिणामकारकरित्या या कवीने हेरलेले आहे. या व्रतामागील पार्श्वभूमीचा विचार करण्यास हा कवी प्रवृत्त झालेला आहे. हीच परिवर्तनगामी झालेल्या या कवीच्या काव्यलेखनाची जमेची बाजू आहे. आंबेडकरीप्रेरणा स्वीकारणारा प्रत्येकजण एकमेकाकडे कोणत्या वृत्तीने व कोणत्या दृष्टिकोणातून पाहातो हे नेमके या कवीने सांगितले आहे.

“ डोळसपणाने एकमेकांना बघू लागले
डोळ्यांत न मावणारा मानवांचा महासागर
आणि मध्यभागी भगवी वस्त्रे धारण करून उभा असलेला तू
दीपस्तंभा सारखा !
उसळलेला महासागर शांत झाला तुझ्या मंत्राने
मंतरल्यासारखा मंत्रोच्चरण करीत राहिला
बुध्दम् शरणम् गच्छामि
धम्मम् शरणम् गच्छामि
संघम् शरणम् गच्छामि ”
परंतु आता तुझ्या संपूर्ण शरिराची मशाल झाली होती
पेटलेला सूर्यच तुझ्या रूपात विलीन झाला होता.

(‘तू’ – अस्मितादर्श : ऑ/नो/डि ८० )

आंबेडकरविचार अविचल आहे, निश्चल आहे, दीपस्तंभासारखा आहे. समाजमनाशी भावनात्मक जवळिक सहजतेने या कवीने साधलेली आहे. व्यक्तिभावना आणि समाजभान या दोहोंत आंबेडकरविचार आत्मसात करण्यासाठी समान भावानुभव असल्याने पुनःप्रत्ययाचा आनंद वरील काव्यपंक्तीतून प्राप्त होतो. ‘पेटलेला सूर्य’ ही प्रतिमा विद्रोहासाठी वापरलेली नसून खडतर तपश्चर्येच्या प्रतिकासाठी परिणामकारकतेने वापरलेली आहे. ‘पेटलेला सूर्य’ आणि ‘दीपस्तंभ’ अशा विरोधी प्रतिमांना वेगळ्या अर्थाने व्यक्त करण्याचे कसब या कवीने प्रगट केले आहे. डॉ. आंबेडकर या व्यक्तिमत्वातून दीपस्तंभाचा प्रकाश, डोळ्यांत न मावणाऱ्या मानवाच्या महासागराच्या मध्यभागी भगवी वस्त्रे धारण करून उभा असलेल्यातून दिसावा आणि ‘मानवी महासागर’ या दीपस्तंभाने, ‘बुध्दं सरणं

गच्छामि, धम्मं सरणं गच्छामि, संघं सरणं गच्छामि,' अशा मंत्रानी मंतरून टाकावा, हा आशय कवीने योजलेल्या प्रतिकांतून आणि प्रतिमांतून घनिभूत तर होतोच आणि कविताही प्रचंड वेगाने पुढे सरकते ती वाचकांस विचारसन्मुख करण्यासाठी ! अंधाराला गिळून टाकणाऱ्या नव्या तेजाच्या सूर्यासाठी, 'माणूस' समर्थपणे उभा करण्यासाठी वचनबध्द असणारा आंबेडकरविचार, बुध्दं सरणं गच्छामि, धम्मं सरणं गच्छामि आणि संघं सरणं गच्छामि का व्हावा ? बुद्धाला शरण जाणे, धम्माला शरण जाणे आणि संघास शरण जाणे म्हणजे नेमके काय ? ह्याचे चिंतन करणे हे या कवितेचे उद्दिष्ट आहे. बुद्धाला देवपण न देणे, धम्माचे धर्मकांड होऊ न देणे आणि संघ म्हणजे झोटिंगशाही होऊ न देणे आणि 'माणूस' या संकल्पनेची प्रतिष्ठा वाढविताना जागरूक राहाणे अत्यावश्यक आहे, ह्याचे व्रत मनोहर तल्हारनी स्वीकारलेले आहे.

**अरविंद निकाळजे :**

"कालच स्वप्न पडलें
युद्ध पुन्हा सुरू झाल्याचे
क्षितीजरेषा शस्त्रांच्या टोकांनी वेढली गेलीय
नि त्याचसाठी जणु मला निशस्त्र केलं जातय्"....

(अस्मितादर्श : ऑ/नो/डि १९८०)

आंबेडकरीप्रेरणेचा कवी सावध का आहे ? तो गाफील का राहू इच्छित नाही ? तो भयमुक्त का नाही ? तो सतत भीतीच्या छायेखाली का वावरतो आहे ? त्याचे कारण असे, की जातीयतेच्या भस्मासुराने अद्यापही त्याचा पिच्छा सोडलेला नाही. जातीयतेचे भूत त्याच्या मार्गावर या ना त्या कारणाने व्यत्यय आणीत असल्याने हा प्रवर्तक कवी कासावीस झाला आहे. एका बाजूने 'स्व' सन्मानासाठी, उध्दारासाठी आणि स्वाभिमान उंचावण्यासाठी तो धडपडत असतानाच सामाजिक बांधिलकीच्या भानाने रंजलेल्या गांजलेल्या उपेक्षितांचा तो विचार करतो. या साऱ्या घटनांचा त्याच्या मनावर प्रचंड ताण पडतो. स्वप्नरंजनात बुडून जाण्याऐवजी त्याला वास्तवतेचे डोळसभान ठेवल्याशिवाय गत्यंतर उरत नाही. काल्पनिक विश्वात वावरणे त्याच्या कुवतीबाहेरचे असल्याने वास्तवतेची दाहकता व्यक्त करण्यावाचून त्याच्यासमोर दुसरा पर्यायही नाही.

स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय या तत्वप्रणालीचा उद्घोष करणारा विचार म्हणजेच बुद्धविचार! अरविंद निकाळजेसारखा कवी बुद्धाच्या अहिंसेला भित्रेपणाचे गालबोट लागू नये म्हणून, 'चढवलीत आता मी ही चिलखते' असे जेव्हा म्हणतो तेव्हा वाचकाला अंतर्मुख करण्यास वाव ठेवतो. बुद्धविचारानुसार चालणारा कवी हवालदिल होऊन असे का म्हणतो? असा एक प्रश्न निर्माण होतो. हा प्रश्न अरविंद निकाळजेंची 'शांततेची पाखरे' ही कविता वाचली म्हणजे सुटतो. 'युद्ध पुन्हा सुरू झाल्याची चाहूल' या कवीला लागलेली आहे. हे 'शीतयुध्द' नाही, 'महायुध्द' ही नाही. ते सरळ सरळ जातीय वणव्याचे मोहोळ आहे. आणि त्याने या कविमनाला घेरलेले आहे. अशा क्षणी त्याला 'निशस्त्र' करणारा बुद्धविचार समोर आहे. काय करावे? असा मानसिक तगमग वाढविणारा प्रश्न त्याच्यासमोर आहे. परंतु तो हवालदिल, गलितगात्र न होताही विवेकपूर्ण बनून मार्ग काढण्यासाठी प्रयत्नशील आहे आणि तेवढ्यासाठीच तो सज्ज राहू इच्छितो. बुद्धविचार आत्मसात करूनही हे सारे शक्य आहे, एवढे आत्मबळ त्याने प्राप्त केलेले आहे.

"किलावेनमणी नष्ट झाली
बेलछीची राखरांगोळी झाली
उभा मराठवाडा धगधगला
आणि आता हे सारे घडत असता
मी कोण्या दिशेला पाहावे
काळजाला काळीज जोडणारा दिवस
कधी उगवणाराय का!
माणुसकीच्या साजसंगीताने नटलेली रात्र
कधी येणाराय का!
प्रत्येक दिवस संघर्षाचे ताट घेऊनच येतोय
रणभेरी ऐकवूनच जातोय–
– माझ्या अस्तित्वाबर थयथया नाचून जातोय"

ही व्याकुळ अवस्था आहे. काळजाला काळीज जोडण्यासाठी मनोमिलनाची आस हा कवी उराशी जपून आहे. सामाजिक अभिसरणासाठी प्रेमभावना शब्दाशब्दातून ठसठशीतपणे अवतरत आहे. माणुसकीचा त्याने ध्यास घेतलेला आहे. कारण सामाजिक संघर्ष टाळण्यासाठी तो मनाची तयारी करता करताच त्याच्यासमोर प्रत्येक दिवशी नवा संघर्ष उभा ठाकतो. हा संघर्ष त्याच्या अस्तित्वावरच घाला घालू इच्छितो. तरीही त्याचा उद्रेक सांभाळताना होणाऱ्या घालमेलीची जाणीव करून देतो,–

" मी पाईक शांततेचा
नि शांततेची पाखरं तर टिपली गेलीयत
बंदुकीच्या नळ्यांनी, चौफेर.
मी पाईक शांततेचा.
मी अनुयायी बुद्धाचा
बुद्धाच्या अहिंसेला भित्रेपणाचे गालबोट लागू नये
म्हणूनच चढवलीत आता मीही चिलखते
नि झटकतो आहे
शस्त्रावर साचलेली धुळीची पुटे "

मी बुद्धाचा पाईक, शांततेचा भोक्ता अशी ग्वाही हा कवी देतो. त्याच्या विद्रोही मनाला त्याच्यातील शांततेच्या पाखराने आवरण्याचा कसोशीने प्रयत्न चालविलेला असून अंतर्मनावर मात केलेली आहे. आणि म्हणूनच त्याच्या विद्रोहाला विवेकाची, संयमाची आणि शांततेची किमान मर्यादाही आहे. ही मर्यादाच आंबेडकरी प्रेरणेच्या प्रवर्तक कवितेची खरी ओळख करून देते. तिच्यातून उद्याचे स्फुल्लिंग उमलणार आहे.

**शिवाजी सोनवणे :**

प्रवर्तक जाणिवा व्यक्त करताना शिवाजी सोनवणे काही प्रश्नांचा गंभीरपणे विचार करु इच्छितो. ' संवाद ' मधील ' बुध्दं सरणं गच्छामि ' या कवितेत,

" अरे ! संस्कृतीच्या रक्षकांनो
मी जन्माला आलो... तेंव्हाच
माझ्या नाळयाला.... अस्पृश्यतेची गाठ मारली "

( संवाद, वार्षिक विशेषांक सप्टें. १९८१ )

वामन निंबाळकरांनी " शब्दप्रभूनो " या कवितेत शब्दांची कसरत आणि पेरणी करणाऱ्यांना जशी समज दिली, तशीच संस्कृतीच्या रक्षकांना समज देण्याची ताकद शिवाजी सोनवणेपाशी आहे. जन्माला येताक्षणीच अस्पृश्यतेची गाठ आपल्या नाळेशी बांधावी, ही विषण्णता कवीला ग्रासून टाकणारी आहे. म्हणूनच त्याच्या शब्दांतून आवेग व्यक्त होतो. अशा संस्कृतीबद्दल आदर, प्रेम, आपुलकी आणि अभिमान न बाळगता अशा संस्कृतीचे कौतुक करणाऱ्यांना व गोडवे गाणाऱ्यांना कवी मार्मिक सवाल करीत आहे –

“ आणि तुमच्या सटवाईने
ललाटी विषमतेची रेषा ओढली.
तुमच्या सूर्यनारायणांच्या किरणांनी
माझी सावली पाडली तुमच्यावर
आणि तुम्ही विटाळले गेलात ”

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३००९
निबंध २४०४७
११।११।८३
ग्रंथ शाखा

विषमतेविरूध्द विद्रोह पुकारणे, समानतेचा पुरस्कार करणे, चातुर्वर्ण्यव्यवस्था नाकारणे, पर्यायाने हिंदुसंस्कृतीला नकार देणे हाच आंबेडकरीप्रेरणेच्या कवितेचा केन्द्रबिंदू आहे. शिवाजी सोनावणेच्या कवितेतून विषमतेबद्दल कटुतेची भावना व्यक्त होत असताना फारसे वेगळेपण दिसत नसेलही परंतु ‘सूर्यनारायणाच्या किरणांनी माझी सावली पाडली तुमच्यावर’ असे जेव्हा हा कवी म्हणतो, तेव्हा सूर्यनारायण या प्रतिमेचा अतिशय परिणामकारकपणे आणि विद्रोही कवीपेक्षा वेगळया तऱ्हेने वापर केलेला आढळतो. ‘सूर्य’ ही विद्रोही कवींची फार आवडती प्रतिमा. कितीवेळा ‘सूर्य’ विद्रोही कवितेतून प्रकटला असेल, ह्याची मोजदाद करता येत नाही. माझी सावली तुमच्यावर पाडण्यास तुमचाच सूर्य जबाबदार आहे असे म्हणताना उजेडापेक्षा अंधाराला तो किती महत्व आणि प्राधान्य देतो हे लक्षात येते. अंधाराला भेदाभेद ठाऊक नसावा आणि प्रकाशाला मात्र असावा, हीच खंत कविमनाला ग्रासून आहे. आत्मजाणिवेचे प्रगटीकरण करतानाच प्रकाशपुत्रांना योग्य जाणीव करून देण्याच्या लालसेपोटी, “ पण, विष्टा खाणाऱ्या गायीच्या मूत्राने पवित्र झालात ” असा संस्कृती रक्षकांचा दंभस्फोट करण्यासाठी साध्या आणि सोप्या शब्दांतून आशय व्यक्त करीत आहे.

हे सारे पाहिले
सारे सोसले
आणि मनुस्मृतीचे दहन करणाऱ्या
बोधिसत्वाने दाखविलेल्या
समतेच्या वाटेने प्रज्ञेची ज्योत घेऊन
बुध्दं सरणं गच्छामि
धम्मं सरणं गच्छामि
संघं सरणं गच्छामि
म्हणून बुद्धाच्या धम्म आणि
संघाला शरण गेलो ”

( संवाद : वार्षिक विशेषांक : सप्टें. ८१ )

बुद्धविचाराचा उद्घोष करणे, बौध्द संस्कृतीची भरभराट आणि प्रतिष्ठा वाढविणे ह्याचा ध्यास या कवीने घेतलेला असून 'बुद्धाच्या धम्म आणि संघास शरण गेलो आहे' अशी स्पष्ट कबुलीही दिलेली आहे.

**मधु गवई :**

'प्रवर्तक' जाणिवांनी भारावलेला मधु गवई स्वतःबद्दल काही अपेक्षा निर्माण करीत आहे. बुध्दतत्वज्ञानाकडे मधुकर गवई कोणत्या दृष्टिने पाहतो, हे तपासणे उद्बोधक ठरेल. 'गुंफा' या अनियतलिकाच्या अंक: ३ मध्ये 'पेरणी' ही कविता वाचताना, बुध्दविचाराची 'पेरणी' झाली म्हणून हा कवी आनंदून गेलेला जाणवतो पण त्याचबरोबर या पेरणी झालेल्या भूमीखाली काय दडलेले आहे, याची भयाकुल जाणीव त्याला हतबुद्ध करते.

"त्या कोरीवपणात
जी काळाला विसरता आली नाही
अशी
आज बहरून आलेली पेरणी
अजूनही
पायाखालची पडिक जमीन
खाचखळगे दलदल अगणित अडथळे
छळवणूक यातायात दुखापत
तरीही हरकत नाही."

बुद्धविचार आत्मसात करताना, त्या विचाराची पेरणी आणि वाढ व विकास करताना कितीही अडिअडचणी आल्या तरीही माघार घ्यावयाची नाही या विचाराशी कवी ठाम आहे.

"निश्चयाने अशी पेरणी करायची
मानसाला वेठीस धरणारा विचार ठोकरणारी
बुद्धाची कोरीव लेणी
स्मितांकित चेहरा
'तुम्ही सर्व स्वतंत्र आहात
अशी पेरणी करायची
जी विसरता येणार नाही काळाला
जिला कधीही मरण नाही.

'माणसाला वेठीस धरणारा विचार ठोकरणारी' आणि 'तुम्ही सर्व स्वतंत्र आहात' या दोन मानवी मूल्यांची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी हा कवी बुद्धविचाराच्या मार्गाने जाण्याचा प्रयत्न करीत आहे. या दोन्ही मूल्यकल्पनांत मानवाला अभिप्रेत असणारी जीवनमूल्ये मानवी जीवन सुखी, समृध्द आणि आदर्श बनविण्यास कारणीभूत ठरणारी आहेत. त्यामुळेच या जाणिवा वैश्विकपातळीवरून मानवी जीवनाचा विचार करणाऱ्या आहेत. याद्दष्टिने मधु गवई यांची 'पेरणी' ही कविता आशयगर्भ असून प्रवर्तक कवितेची यशस्वी वाटचालही स्पष्ट करणारी आहे.

**भुजंग मेश्राम :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखविलेल्या मार्गावरून मार्गक्रमण करीत असताना ताज्या दमाचे कवी किती जागरूक आहेत, परिस्थितीचे किती सूक्ष्म निरिक्षण करतात आणि त्यांच्या भावभावना आगळ्यावेगळ्या विचारातून कशा व्यक्त होतात, त्याची प्रचिती भुजंग मेश्रामांची 'हाकार' ही कविता करून देते. २१ मे १९८१ 'राजधानी' साप्ताहिकात प्रसिद्ध झालेली ही कविता. या कवीने आपल्या सामर्थ्याची फार अल्पावधित जाणीव करून दिली आणि वेगळ्या शैलीचा अनुभव प्राप्त करून दिला. सातत्य टिकविले तर उज्ज्वल भविष्य असलेला हा कवी आहे. भुजंग मेश्रामांच्या बऱ्याचशा कविता निरनिराळ्या नियत-अनियतकालिकातून प्रसिद्ध झालेल्या आहेत.

झाडांवरचा किलबिलाट इतक्यातच कसा ओसरला !
फडफडाटसुद्धा विरत गेलाय हळूहळू
क्षणात सगळे रान निरभ्र आकाशासारखे झाले आता
फांदीवरची पानं पंखासारखी का फडफडतायेत !
उद्या पाखरांच्या लाटा पुन्हा येतील म्हणजे ही पानं
महारोग्याच्या बोटांगत तर झडून जाणार नाहीत ना !
कदाचित पाखरांचे पंखही खुडले जातील शस्त्रांनी
आणि अरण्यतळे गढूळलेले असेल तेंव्हा
ह्या चोचीच्या म्याना रिकाम्या तर होणार नाहीत ना !
किती किती काढायच्या झाडांच्या समजुती !
पंख कधी पिकवायला गाडता येतात का टेंबरांसारखे !
ही पानं सुकतील उडतील-जळतील किंवा
कुणाची वाढ होतील, कुणाची वाटही लावतील
कदाचित् जीवशास्त्रीय प्रयोगशाळेत कैदही होतील,

**बबन लोंढे :**

आंबेडकरी प्रेरणेची कविता लिहिणारा या चालू दशकातील बबन लोंढे हा एक प्रभावी कवी ! 'तक्षक' मार्च १९७९ मध्ये प्रकाशित झालेली त्याची 'सार्थक' ही कविता. दोन वेगवेगळ्या संस्कृतीमधील वैचारिक संघर्ष अटळ आहे ह्याचे भान बबन लोंढेस असल्याने या लढ्यात कामी येण्याचा त्याने निर्धार केला आहे. एवढेच नाहीतर आपल्यानंतर आपल्यापोटी आलेल्या 'अंकुराने' देखील, हा संघर्ष करण्यास सिध्द असले पाहिजे अशी भावना व्यक्त केली आहे. 'सार्थक' या कवितेत आपल्या पत्नीस उद्देशून कवी म्हणतो,

तुझ्या गर्भाशयातला अंकुर
या अंधेऱ्या साम्राज्यात येईल तेव्हा
त्यालाही लावायचीच सवय या
क्रूर व्यवस्थेविरूध्द दंड थोपटून
उभ रहायची !

'क्रूर व्यवस्थेविरूध्द' दंड थोपटून उभे राहण्याची सवय लावण्यासाठी पत्नीची केलेली मनधरणी अगदी वेगळी मानसिक अवस्था प्रकट करून जाते. पोटात वाढणाऱ्या अंकुरावर चांगल्या संस्काराची अभिलाषा जशी व्यक्त होते, त्याहीपेक्षा पुढील पिढी घडविण्याची फार मोठी ऐतिहासिक कामगिरी आजच्या पिढीच्या स्त्रियांवर असल्याची जाणीव होते. आपल्यानंतर येणाऱ्या पिढ्यांचे भवितव्य भाग्यशाली आहे याची ग्वाही या कवितेत आहे.

चिऊ-माऊचा घास भरवतांना
विचारलंच त्यानं तर सांग
तुझा बाप या देशातल्या
सनातन गांडूगिरीबरोबर
दोन हात करायला गेला म्हणून
जगलो वाचलो तर परत येईन
नाहीतर....

'सनातन गांडूगिरी' शी दोन हात करता करताच मरणाचीही पर्वा न करणारा हा निर्धार आत्मनिष्ठ आहे. सुसंस्कृत मनाने, न्यायाने आणि आत्मनिर्भरतेने जगता यावे म्हणून 'सनातन गांडूगिरी' बरोबरचा हा संघर्ष अटळ आहे

आणि त्यासाठी सर्वस्व पणास लावण्यास कवी वचनबध्द आहे. त्यामुळे 'जगलो वाचलो' नाही तरी फारसे बिघडणार नाही, हे अगदी प्रभावीपणे मांडण्याचे कसब कवीने साधलेले आहे. यांतही आपल्या आशाआकांक्षाचे प्रतिबिंब कवी रेखाटतो आहे.

"त्याला मात्र शिकव
या सहिष्णू संस्कृतीच्या राजवाड्याचे
चबुतरे उखडायला"

विषमतावादी संस्कृती उखडून टाकण्याचा संकल्प करून संघर्ष करताकरता आपण अपुरे पडणार आहोत म्हणून पुढील पिढीवर दायित्व सोपविण्यास उत्सुक झालेला आहे.

"ज्यात विरल्यात आमच्या
बापजाद्यांच्या किंकाळ्या
निदान ...मी भोगलेल्या आयुष्यभरच्या
क्लेषांचे तरी सार्थक होईल"

बबन लोंढेचे विषमतावादी संस्कृतीचे मूल्यमापन यथार्थपणे लक्षात घेतले म्हणजे जीवन सार्थकी व्हावे म्हणून प्रवर्तक वाटेने वाटचाल केली पाहिजे अशी कवीची समज पक्की आहे.

## धुरंधर मिठबावकर :

'एक जखमपक्षी जगताना' या कवितेत काही प्रश्न घेऊन येतो. काही प्रश्नाची अंतर्मुख होऊन उत्तरे देतो. आणि वास्तवतेवर अधिक प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करतो.

"'बुद्ध भ्रमताना त्याच्या पायाशी एक जखमपक्षी
येऊन पडला होता अवचित
हा एक इतिहास काळाच्या छिन्नीने कोरलेला जिवंत
कालसमक्ष'
मी आज अभ्यासतोहे स्वताला काळाला अभ्यासून
दुःख झेलून
काळ आणि मी, मी आणि माझे ऊध्वस्त पूर्वजः
समोर बुद्ध : बुद्धाचे चित्र

तेव्हा हीच–हीच झाडे विचारतील मला
रानामधील हाकारच्या नवीन प्रयोगाबद्दल.
पक्ष्यांनो, तुम्ही गप्प तर राहणार नाही ना ?

'झाड' ही जुनीच प्रतिमा 'हाकार' कवितेत एक वेगळे वजन घेऊन आविष्कृत्त होत आहे. मानसिक द्वंद्व, मनाची घालमेल आणि अस्वस्थता तर तीतून प्रकट होतेच परंतु अनुभवाच्या परिपक्व मुशीतून भावभावना व्यक्त झाल्याने आजुबाजूच्या परिस्थितीचे केलेले सूक्ष्म अवलोकन आत्मपीडेने व्यथित झालेल्या या कवीमनाला उद्याची चाहूल लागलेली आहे, याची साक्ष देते. आणि पानांनी लडबडलेले झाड महारोग्याच्या बोटागत तर झडून जाणार नाही ना ? अशी खंत व्यक्त करते. त्याचबरोबर संकटाची जाणीव असल्याने पानांचे स्वाभाविक सुकणे, उडणे आणि जळणे विचारात घेतल्याने हीच सुकलेली, उडालेली आणि जळलेली पाने आपल्या स्वभावधर्मानुसार वागणार आहेत, हे सूचकपणे सांगण्याचे भानही जपलेले आहे. 'ही पाने कुणाची वाट होतील, कुणाची वाट लावतील कदाचित जीवशास्त्रीय प्रयोगशाळेत कैद होतील' या काव्यपंक्तीतून हा कवी नवप्रयोगाबद्दल दुर्दम्य आशावाद प्रकट करतो आणि पक्ष्यांना तुम्ही गप्प तर राहणार नाही ना ? असा प्रश्न विचारूनही अंतर्मुख होतो. तेव्हा घडत असलेल्या परिवर्तनाची नवप्रयोगाशी सांगड घालण्याचा या कवीने केलेला प्रयत्न अतिशय बहुमोल मानावा लागतो.

**अशोक चक्रवर्ती :**

समाज परिवर्तनाचा ध्यास घेतलेला, नवप्रयोगाचे स्वागत करणारा आणि हे सारे करीत असतांना 'संघर्षास' न डगमगता सामोरे जाऊ इच्छिणारा अशोक चक्रवर्ती. 'गुंफा' अंक : ३ या अनियतकालिकातील या कवीची 'संघर्ष' ही कविता अभ्यासनीय असून तरूण मनाच्या भावनांचा आविष्कार या कवितेतून होतो. आजच्या तरूण पिढीने, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे चिरंतन करण्यासाठी व्रतस्थ जीवनाची आवश्यकता आहे, हे ओळखले आहे. त्याचा प्रत्यय देणारी ही कविता

सूर्यफुलं उमलण्या आधीच करपून जातायत
इथल्या विषमतेच्या वासना गंडाने पछाडलेल्या
रोगट हवेत
इथल्या जीवांची हृदयकमळं जन्मापासूनच
कॅन्सरलेली निपजतायत उच्चनीचतेच्या जंतूंनी सडून

ती देऊ शकत नाहीत जीवनाला उदास अर्थ.

जीवनाला उदात्त अर्थ प्राप्त करून देण्यासाठी धडपड चाललेली असतानाच येथील विषमतावादी समाजव्यवस्थेपुढे नामोहरम झालेली उदात्त जीवनवादी दृष्टी, या कवीने विचारात घेतलेली आहे. अशोक चक्रवर्तीचा अनुभव नवा नाही किंवा त्यात वेगळ्या जाणिवा आहेत असेही नाही. परंतु ज्या वातावरणात कविमनावर संस्कार घडत आहेत, त्यातूनच जीवनाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न होतो आहे. तो बोधप्रद आहे. 'सूर्य' 'झाडं' ह्या प्रतिमा अनेकवार वापरल्या गेलेल्याच या कवीनेही वापरलेल्या आहेत पण त्यातून जगण्याची तीव्रतम ओढ अतिशय परिणामकारकतेने व्यक्त झाली आहे.

म्हणूनच इथली झाडं मला न्याय देऊ शकत नाहीत
जे इथल्या भ्रष्ट सूर्याला झाले अंकीत
साठवीत मुळाशी शतकांचा गाळ
त्यांनी आदेशाविना चालविलेल्या उद्याच्या गोळीबाराचा
मी हकनाक बळी म्हणून जगावं का !
त्यांच्या हातात आहेत शस्त्रांचे चाप नि
न्यायाच्या नाड्या
मी टांगलेला ........ मी ! मी ! मी !
मी वाचतोय बुध्दाच्या स्थिर निश्चल डोळ्यांत
शतकाचा संघर्ष.

स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय या मार्गाने जगण्याची लालसा मनात बाळगतानाच उद्याच्या गोळीबाराची जाणीव झाल्याने आपला बळी जाणार आहे. म्हणून जगावे, की मरावे अशा संभ्रमावस्थेत हा कवी गुरफटलेला असतानाच बुध्दाच्या स्थिर, निश्चल डोळ्यांतील शतकाशतकांचा संघर्ष लक्षात घेऊन पुढील संघर्षासाठी कटिबद्ध झालेला आहे. न्यायासाठी व्यथित असलेली सहज मानवी प्रवृत्ती 'संघर्ष' मधून व्यक्त झालेली आहे. येथील झाडे आणि सूर्यप्रकाश हेच मुळी भ्रष्ट झालेले असल्याने त्यांच्यापासून न्याय मिळविण्याची अपेक्षा या कवीने सोडून दिलेली आहे. जीवनाला उदात्त अर्थ प्राप्त करण्यासाठी खंबीरपणे अशोक चक्रवर्तीने आपली वाट निवडलेली आहे. आणि तेवढ्याचसाठी त्याने संघर्ष करण्याचे व्रत जाणीवपूर्वक स्वीकारले आहे.

आणि जखमपक्षी उरात तडफडत
यातून काढलेला संदर्भ
॥ आपलं जग म्हणजे एक उजाड माळरान ॥
मग याचसाठी केलं होतं का बुध्दाचे चीवर परिधान. ?
की त्याच्या चेहऱ्याचं कुणाला नसावेच भान ?
(अस्मितादर्श : ऑ/नो/डि १९७८)

काळानुरूप स्वतःला नीटपणे ओळखूनच सावधपणे पवित्रा घेण्याचा मनोनिश्चय एका वेगळया ऐतिहासिक पार्श्वभूमिवर याठिकाणी अवतरलेला आहे. बुध्दाचे 'चीवर' कशाकरिता परिधान केलेले आहे, याचा खोलवर जाऊन मिठबावकरांनी विचार केलेला दिसतो. 'चीवर' हा शब्दप्रयोग आंबेडकरीप्रेरणेच्या कवितेतून वारंवार व्यक्त होऊ लागलेला आहे, कारण या शब्दाला फारमोठे जीवनमूल्य आहे. एक जखमपक्षी हृदयात जपतानाही या कविमनाने बुद्धविचाराचे संस्कार करून घेतलेले आहेत. बुद्धाच्या काळापासून तो थेट आजपर्यंत आम्ही जखम घेऊन फिरायचे का ? असा सवाल करून पुन्हा एकदा बुद्ध निर्माण झाला पाहिजे अशी वांछा प्रकट केली आहे. प्रवर्तक जाणिवेच्या कविमनावर बुद्धविचाराचा प्रभाव किती खोल आहे याचे प्रत्यंतर येते.

**डब्ल्यू कपूर :**

'बलुतं' वाचतांना एका गदगदलेल्या झाडाची सामाजिक दुखण्यामुळे झालेली अनास्था व त्यामुळे व्यक्ति व समूहमनाला ग्रासून टाकणारी 'अभावग्रस्त'ता लक्षात येते. यापार्श्वभूमिवर डब्ल्यू. कपूरची 'अस्मितादर्श : जा./फे./मार्च १९८१ मधील 'बंधमुक्त' ही कविता एक वेगळाच आशय व्यक्त करते;

अविरत पाऊसधारांची कोसळण भयाझोकळ
गळा भरुन हुंदक्याच्या साथीला महापूर
मानवी आपतीशी झुंजणूक प्राणांतिक
घर माझे दारासकट वहात गेले दूर दूर
सीमापार पसरत जातो आता निब्बाणार्थी
माझे म्हणून माझ्यापाशी काहीही नसताना
बुध्दाच्या चीवराचे दान घेऊन मी होतो
भयमुक्त, दुःखमुक्त, उन्मुक्त, बंधमुक्त.

नैसर्गिक आपत्तींशी मुकाबला करता करता मानवाच्या पदरात अपयश येणे

समजण्यासारखे आहे. परंतु नैसर्गिक आपत्तींहून भयावह मानवीआपत्तीना तोंड द्यावे लागते, तेव्हा माणसाला नैतिक सामर्थ्य देणारे काही हवे असते. या आपत्तींशी मुकाबला करण्याची ताकद या कवीला 'चित्ररात' मिळते व तो भयमुक्त होतो. दुःखाच्या सीमारेषा त्याने ओलांडलेल्या आहेत आणि तो 'निब्बाणार्थी' बनलेला आहे. बुध्दविचारात निब्बाणास विशेष अर्थ आहे. हा कवी दुःखाच्या सीमारेषा ओलाडून का गेला आहे? त्याचे कारण असे, की 'माझे म्हणून माझ्यापाशी काहीही नसताना दुःखाबाबत का हळहळत राहावे' हा शोध त्याला लागला आहे.

'निब्बाण,' 'चीवराचे दान' या शब्दांचा आशय समजून घेताना त्यातून बौद्धसंस्कृतीची मूल्ये जपताना या कवीने केलेला निर्धार महत्वपूर्ण आहे.

## मिलिंद आठवले :

'मवा बी एक बा व्हता' (अस्मितादर्श : ऑ/नो/डि–१९७८) या कवितेत वास्तवतेवर भाष्य करताना या कवीने काही मूलभूत प्रश्नांनाच हात घातला आहे.

'पाय उलल्यागत झाले तरी बी
म्होरं म्होरंच जायचंय
जिथं मह्या हक्कांचं पसाभर का
व्हईना रान असेल
तिथं करीन मी काम गाळील मी घाम -
जर लोक म्हणत्याल, 'राम्या, म्हारांन'–
शेतात पेरलं धान अन् पिकवलं सोन्याचं रान...."
म्या मनाशीच हसलं-म्हणलं,
'मवा बी एक बा व्हता
ज्यानं शिकवलं–मास नाही खायाचं
ढोर नाही कापायचं,
बुध्दधर्मासारखं वागायचं, हिंमतीनं जगायचं!"
आता म्या लोकास्नी इच्चरतोय,
"आता म्हार हाय कोण?"

ग्रामीण जीवनात वावरणाऱ्या समूहमनाचे ही कविता प्रतीक असून मोजक्याच शब्दात परिणामकारकता आणि ध्येयनिष्ठा वास्तवतेवर अधिक प्रकाश टाकते. 'पाय उलल्यागत झाले तरी बी म्होरं म्होरंच जायचंय' हा या कवीचा निर्धार त्याच्या हक्काची जाणीव करुन देतो. घाम गाळण्याचे आणि शेतात सोने पिक-

विण्याचे आत्मबळ त्याला प्राप्त झालेले आहे. तळागाळातील समूहमनाच्या जीवनपद्धतीचा आविष्कार करुन समाजजीवनाची नेमकी ओळख या कवितेतून होत आहे. ' जर लोक म्हणत्याल, ' राम्या म्हारानं ' असा कडवट अनुभव आला तरी ' म्या मनाशीच हसलं- म्हणलं ' ' आता म्हार हाय कोण ! ' अशी या कवीची प्रतिक्रिया आहे. त्याच्या मनातील विद्रोह यावेळी प्रकट होत नसून कोण काय म्हणतो, यापेक्षा आपण स्वतः कोण आहोत, ह्याचे आत्मभान डोळसपणे जपल्यामुळे ' बुध्द धर्मासारखं वागायचं, हिंमतीनं जगायचं ' असे आत्मविश्वासाने शब्द निघाले आहेत. ते अतिशय लक्षणीय तर आहेतच तितकेच परिवर्तनालाही परिपोषक आहेत. यावरुन एक निश्चित अनुमान काढणे शक्य होते, की प्रवर्तक जाणिवेची आंबेडकरी प्रेरणेची कविता आपल्या खास वैशिष्ट्यांनी, विविधांगांनी वाचकांसमोर येत आहे.

**विजय जामसंडेकर :**

विजय जामसंडेकर प्रवर्तक जाणिवा व्यक्त करणारे एक चिंतनशील कविमन आहे. सातत्य राखले तर हा कवीदेखील या दशकात आपले वेगळेपण नक्कीच सिद्ध करून जाईल. म्हणून या कवीची ' उद्धाराचा मार्ग कोठला ? ही कविता याठिकाणी अभ्यासण्यास घेतलेली आहे.

" बाबा,
तळ्यात चांदण्यांची कमळं फुललीत
जलाशयात डुंबणारी मनं चांदणं वेचताहेत
पण तुमच्या डोळ्यात–
पाण्यातील सूर्याला लागयल ग्रहण
तडफडताहेत पाण्यावर जगणारी माणसं "

संवादातून डॉ. आंबेडकर या व्यक्तिमत्वाशी भावनिक जवळीक साधताना डॉ. आंबेडकरांनी दलितोद्धाराचे केलेले कार्य समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. म्हणूनच त्याला ' तळ्यात चांदण्यांची कमळं फुललीत ' आणि ' जलाशयात डुंबणारी मनं चांदणं वेचताहेत ' हे पाहून प्रसन्नाता वाटते. दलितोद्धाराचे प्रतीक म्हणून ' तळ्यात ' हा शद्वप्रयोग परिणामकारकरित्या योजलेला आहे. जागरूकता आणि सावधानता ही या कविमनाची विशेषता असल्याने " पाण्यातील सूर्याला लागलय ग्रहण," " तडफडताहेत पाण्यावर जगणारी माणसं, " " चांदण्याची कमळं फुललीत," " डुंबणारी मनं चांदणं वेचताहेत " आणि " पाण्यातील सूर्याला " अशा प्रतिमा वापरून या कवितेतील आशय भावगर्भ झालेला आहे.

" आकाशाच्या रंगात सृष्टी न्हाली
अिथली धरती नव्याने ल्याली
पण तुमच्या डोळ्यात –
आकाश कोसळून पडलय
धरती उध्वस्त झालीय "

'आकाशाचा रंग' हे आंबेडकरविचाराचे प्रतीक आहे, या 'निळ्या रंगात' ही धरती नव्याने न्हाली आहे आणि नवे लेणंही तिने परिधान केले आहे, असे जेव्हां हा कवी म्हणतो तेव्हा ह्यातील अर्थगर्भता चटकन् नजरेत भरते. असे असतानाही परिवर्तनाचे कार्य अद्यापही अपुरे असल्याची डोळसजाण या कविमनापाशी आहे—

" पोरा
अंधाराचा शाप आहे डोळ्यांना
स्वतःचा मुडदा वाहण्याची शिक्षा आहे खांद्यांना
पोटासाठी राबूनही भीक मागण्याची लाचारी असते हातांना
चालताना, आपल्याच सावलीची भीती मनाला
स्वतःच्या डोळ्यांनी फितूरी करण्याची मजबूरी जीभेला
माणसाला 'माणूस' न मानण्यात परंपरा आहे संस्कृतीला "

माणसाला 'माणूस' न मानणाऱ्या संस्कृतीचा त्याग करण्याचा मनोदय 'अंधाराचा शाप' गाडून टाकण्यासाठी या कवीने जाहीर केला आहे.

" तेव्हा, जगायला हवं अिथं
अितिहासाच्या पापण्यांत भविष्याचे डोळे लावून
ज्या मार्गाने प्रकाशदूत निघून गेला....
त्या पाऊल खूणांवर सूर्यफुल फुललीत..."

इतिहासाला साक्ष ठेवून भविष्यकाळ घडविण्याचे आपल्यावर दायित्व आहे म्हणून प्रकाशदूत ज्या मार्गाने गेला त्याचमार्गाने आपणही गेले पाहिजे, अशी या कवीची धारणा आहे. 'प्रकाशदूत' ज्या मार्गाने निघून गेला त्याच्या पाऊल-खुणावर सूर्यफूलं उमललेली या कवीला दिसून आलेली आहेत, हेच प्रवर्तक जाणिवेच्या संदर्भात अर्थपूर्ण आहे.

'अस्मितादर्श' च्या (एप्रिल/मे/जून १९८१) अकांतील 'साहित्यसूची नुसार वर्ष १३: अंक १ ते ४ जाने. १९८० ते डिसें. १९८० पर्यंतच्या 'अस्मितादर्श' अंकामध्ये १०९ कविता प्रकाशित झाल्या. अन्य नियतकालिके वर्तमानपत्रे आणि साताहिके यांचा विचार केला तर हा आकडा बराच मोठा होतो. महत्वाचे असे, की

या दशकात आंबेडकरीप्रेरणेची कविता विशेषतः प्रवर्तक जाणिवा अधिक प्रमाणात प्रगट करीत आहे या दृष्टिकोणातून वरील सर्व कवींच्या कवितांचा, त्यातील भावनाशयाचा, अभिव्यक्तीचा, त्यात प्रगट झालेल्या जीवनानुभूतीचा, आंबेडकरबुद्धविचाराचा इथपर्यंत अभ्यास केला. वरील बहुतेक कवींचे कविता संग्रह नजिकच्या काळात प्रकाशित होणार आहेत. आणि या कवींचे अनुकरण करत आणखी काही कविता मार्गस्थ झालेली आजच दिसते आहे. याचा स्पष्ट अर्थ असा आहे, की प्रवर्तक जाणिवेने बुद्धिवादी मन आज झळाळून उठत आहे. आंबेडकरविचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी ते काव्यनिबद्ध होत आहे हे सुचिन्ह मानावे लागते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरापासून प्रेरणा घेऊन लिहणाऱ्या कवीबरोबर कवयित्रींचाही फार मोठा वाटा आहे, सुगंधा शेंडे, कृष्णाबाई गायकवाड, अंजीली खोले, जिजाबाई तुपे, चद्रभागा भरणे, सुहासिनी गांगुर्डे, करुणा वाघ, शैला गजभीये, हिरा बनसोड, अनुराधा गुरव, ज्योती लांजेवार, मीना गजभीये, कुन्दा गायकवाड, गिपल गिमेकर, सुरेखा भगत इ. कवियत्री सातत्याने लेखन करीत आहेत. नागपूरच्या श्रीमती सुगंधा शेंडेचे दीर्घकाळ कविता लेखन थक्क करणारे आहे. हिरा बनसोड, यांच्या काव्यसंग्रहाने एक समर्थ आंबेडकरीप्रेरणेची कवयित्री अशीच त्यांची ओळख होते. अनुराधा गुरव ह्या प्रकृतिपिंडाने कथालेखिका! 'मांडव झाली वेल' हा त्यांचा नुकताच प्रकाशित झालेला कथासंग्रह. त्याही अलीकडे काव्य लेखन करीत आहेत.

नव्या सांस्कृतिक मूल्यांची जडणघडण प्रामुख्याने स्त्रियांनी कोणत्या दृष्टिकोणातून केली पाहिजे ह्याचे प्रतिबिंब वरील सर्व कवयित्रींच्या काव्यात उमटते आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्दधर्माची जी मुहुर्तमेढ रोवलेली आहे, त्या संस्कृतीचा आविष्कार घडविण्याचे आवाहान अर्थातच नव्या दमाच्या या कवियित्रींनी स्वीकारलेले आहे.

### ज्योती लांजेवार :

या कवयित्रीच्या सामर्थ्याचा अनुभव महाराष्ट्र बौध्द साहित्य परिषदेच्या १९ व्या साहित्य संमेलनात भद्रावती ( जिल्हा चंद्रपूर ) येथे आला. एखाद्या कवीसंमेलनाच्या अध्यक्षपदी कवयित्री असावी, हे दृश्य प्रथमच पाहायला मिळत होते. तो एक सुखद अनुभव होता. एका बहारदार कविसंमेलनाचे सूत्रचालन या कवयित्रीने ज्या पद्धतीने केले. त्यामुळे सारेच थक्क झाले हे जरी महत्वपूर्ण मानले नाही तरी एका

सामर्थ्यवान कवयित्रीचा परिचय त्यामुळे झाला. या कवयित्रीने ज्या कविता या संमेलनात सादर केल्या त्यातील 'कुरुक्षेत्र' ही कविता अतिशय भावस्पर्शी होती. 'कुरूक्षेत्र' ही कविता भूतकालीन वस्तूनिष्ठेवर जशी जोपासलेली आहे, तेवढीच ती वर्तमानकालीन वास्तवतेतून भविष्यकाळाची सुखद स्वप्ने रंगविणारी आहे.

"माझ्या डोळ्यांपुढे सतत उभी असते
कौरवाच्या राज्यसभेत बेअब्रू होणारी पांचाली"

स्त्रियांच्या वाट्यास आलेल्या दुःखाची परिणामकारकता या कवयित्रीने परिणामकारकतेने व्यक्त केली असून थेट महाभारतकालीन समाजरचनेवरच नजर केन्द्रीत केली आहे. स्त्रियांना उपेक्षा, मानहानी, अवहेलना, वंचना आणि अप्रतिष्ठा का भोगावी लागते, ह्याचे सूक्ष्म आत्मनिरिक्षण या कवयित्रीने केले आहे.

युगानुयुगे जन्माला आलेले दुःशासन
समाजानेच वाढविलेत स्वतःच्या छायेखाली
माना खाली घालून....

भारतीय समाजव्यवस्थेचे मानसशास्त्र अचूकपणे ओळखल्यामुळे येथील सांस्कृतिकदृष्ट्या जीर्ण आणि कुचकामी ठरलेल्या आदर्शमूल्यांबाबत ही कवयित्री केवळ उदासीनच नाही तर अशा समाजरचनेपासून तिला फारशी आशा वाटत नाही. म्हणूनच नव्या संस्कृतीचा सूर्य तळपळत ठेवण्यासाठी तिने मनोनिश्चय करून टाकला आहे.

या दुष्टांच्या हातून मावळणारा सूर्य
तू तळपत ठेव–अंधारू नकोस आभाळ
हे कृष्णा,....तुझ्या राज्यात
आईबहिणीवर अत्याचार
अन्....तू डोळे मिटावेस असे पार....

स्त्रीमन जात्याच कोमल, क्षमाशील, ज्योती लांजेवार मात्र स्वाभाविक कठोर बनली आहे. प्रत्यक्ष सृष्टीनिर्माता, महाभारत घडवून आणणारा आणि अर्जुनास स्वमुखे गीता सांगणारा श्रीकृष्ण–कौरवांच्या राज्यसभेत पांचालीची बेअब्रू होताना पार डोळे मिटून राहिला, ह्याबद्दल कवयित्रीचे संतापणे आणि त्यातून खंत व्यक्त करणे समजून घेण्यासारखेच आहे. त्याहिपेक्षा आजच्या समाजात स्त्रीचे वस्त्रहरण करणारे दुःशासन असावेत म्हणून ही कवयित्री उद्विग्न झालेली आहे. विविध मानसिक घालमेलींचा सुंदर मिलाप या कवितेतून प्रत्ययाला येतो.

अरे अंगभर वस्त्र पुरवू नकोस
पण वस्त्र ओढणारे ते हात

मुळापासून छाटून तरी टाक
पुनरावृत्ती होऊ देऊ नकोस
नव्या महाभारताची....

अन्याय, अत्याचार, छळ, गांजवणूक, पिळवणूक आणि अमानवी वृत्तीचे प्रदर्शन करणाऱ्या हातांचा मुळापासून उच्छेद केला जावा जेणे करुन महाभारताची पुनरावृत्ती होणार नाही, असे या कवयित्रीला वाटते. आपल्या बांधवापासून अंगभर वस्त्र शरीर झाकण्यासाठी मिळावयास हवे असा आशावाद प्रकट केला आहे. तिचा समाजव्यवस्थेबाबत असणारा अविश्वास आणि स्वकियाबद्दल असणारा आत्मविश्वास प्रामुख्याने तिच्या व्यक्तिमनाची नीटपणे ओळख करुन देतो. दुर्दैवाने नव्या महाभारताची पुनरावृत्ती करण्यास स्वकियांनीही हातभार लावला तर कुरुक्षेत्रावर जाण्यास ही कवयित्री सिध्द झालेली आहे.

नाहीतर आम्हालाही लिहाव्या लागतील
हिरव्या गवतावर लाल घोषणा
पेटावे लागेल होऊन वणवा
साऱ्या आसमंताला गवसणी घालून
तू मात्र तुझा....दिनदयाळाचा किताब
परत कर....अन् खुशाल होऊ दे
कुरूक्षेत्र...या भूमीचे...

'कौरवाच्या राजसभेत बेअब्रू होणारी पांचाली : 'युगानुयुगे जन्मास आलेले दुःशासन,' 'या दुष्टांच्या हातून मावळणारा सूर्य 'अंधारू नकोस आभाळ 'हे कृष्णा, 'मुळापासून छाटून तरी टाक, 'हिरव्या गवतावर लाल घोषणा, आणि 'दिनदयाळाचा किताब' इ. प्रतिमातून व्यक्त होणारी मानवीव्यथा मनस्वीपणा सिद्ध करून जाते. 'कुरुक्षेत्र' या भूमित घडण्याची चाहूल या कवयित्रीला का लागलेली आहे, ह्याचे उत्तर तिने परिणामकारकतेने योजलेल्या 'दुःशासन, या शब्दात शोधावे लागते. एक मानवीवृत्ती आणि दुसरी सामाजिक प्रवृत्ती दर्शविणारा 'दुःशासन' या शब्दप्रयोगांमुळे आशय समृद्ध झालेला आहे. या दुःशासनाचा प्रतिकार करण्यासाठी काय केले पाहिजे, ह्याचेही भान या कवयित्रीच्या 'नवी क्रान्ती' या कवितेत स्पष्ट होते.

जेव्हा उसळेल डोंब
पेटल्या विवेकाचा
जेव्हा उरेल थेंब
शेवटल्या रक्ताचा

तेंव्हा प्रत्येकातलाच माणूस
जागा होईल
आदिमायेची शक्ती
तुझ्या हातात येईल
साऱ्या जगाला आव्हान देऊन
ज्वालामुखीचा होईल स्फोट

नवी क्रान्ती घडवून आणण्याची किमया करण्याचे मनोरथ रचतानाच या कवयित्रीला विवेकाचे महत्व पटते. विवेकातून पेटणे हे यशस्वितेचे फार मोठे लक्षण समजावे लागते. कारण त्यात जागरुकतेला महत्व प्राप्त होते. प्रत्येक पेटलेल्या माणसाला आपल्या विद्रोहाचे महत्व कळलेले असते. या विद्रोहावर मात करण्यासाठी विवेकी असणेच हितकारक असते. संपूर्ण जागरूक 'माणूस' च अपेक्षित अशी नवी क्रान्ती घडवून आणू शकतो. शेवटी या नव्या क्रान्तीचा ध्यास घेण्याचे आणि नवी संस्कृती निर्माण करण्याचे या कवयित्रीचे प्रयोजन माणूसकीवर आधारलेली नवी समाजव्यवस्था निर्माण करणे हे आहे –

मग माणूसकी पायदळी तुडविणाऱ्या
नराधमाचा प्राशुनि घोट
नव क्रान्ती जन्मास येईल
आणि....
विझलेल्या सुक्ष्म आशा
धुमसायला लागतील
नव्या क्रान्तीचे
आभार मानून....

चिंतनाची दृष्टी लाभलेल्या या कवयित्रीने आशय नेटका आणि प्रभावीपणे व्यक्त केला आहे.

**मीना गजभीये :**

ही कवयित्री निसर्गाच्या माध्यमातून आपल्या शब्दांना आकार देण्याचा प्रयत्न करीत असून प्रकृतीपिंडाने विद्रोही असण्यापेक्षा प्रवर्तक असण्यावर या कवयित्रीने अधिक भर दिलेला आहे. अस्मितादर्श (एप्रि/मे/जून १९७९) मध्ये प्रकाशित झालेली 'येरे येरे पावसा' आणि 'प्रकाश विरघळला अंधारात' (निकाय, दिवाळी विशेषांक १९७८) या त्यांच्या कविता याठिकाणी विचारात घेतलेल्या आहेत.

निसर्गाचे माणसाला असलेले वेड, त्यामुळे त्याला होणारा आनंद, सातत्याने निसर्गाच्या सान्निध्यात राहण्याचा घेतलेला ध्यास, मीना गजभीयेची 'येरे येरे पावसा' ही कविता आत्मप्रत्ययाची जाणीव करून देणारी आहे.

> " आज सकाळी मला हिवाळा भेटला
> फुटपाथवर थंडीत कुडकुडतांना
> एकमेकावर दात आपटत मी
> कसे तरी त्याचे स्वागत केले "

हिवाळ्याचे कसेबसे स्वागत करूनच ही कवयित्री थांबलेली आहे. त्याविषयी ओढ नाही, आत्मियता नाही आणि दाद देण्याची प्रवृत्ती नाही. असली तर सूक्ष्म नकाराची वृत्तीच आहे. जीवनावर मार्मिक भाष्य 'हिवाळा' या शब्दप्रयोगाद्वारे कवयित्रीने केले आहे. तारूण्यसुलभ मनाला 'हिवाळा' भुरळ घालतो. जीवनाचा आस्वाद घेण्यास प्रवृत्त करतो. पण या कवयित्रीस 'हिवाळा' मात्र नकोसा वाटतो. ह्याचे कारण, फुटपाथवर थंडीत कुडकुडताना होणारी दयनीय अवस्था. नैसर्गिक वातावरणाचा प्रतिमासाठी मुक्तपणे वापर करून मीना गजभीयेनी दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्यांच्या जीवनाची भीषण शोकांतिका प्रभावीपणे व्यक्त केली आहे.

> " दुपारी मला उन्हाळा भेटला
> तहानेने घसा कोरडा पडला
> तरीही मी त्याचे स्वागत केलच
> म्युनिसिपालटीचा नळ
> नेहमीसारखाच कोरडा ठणठणीत होता "

घोटभर पाण्यासाठी असंख्य दलितांना, बौद्धांना कितीतरी यातना सोसाव्या लागतात, हे कटुसत्य आहे. पण त्याचबरोबर नागर जीवनातील भीषण शोकातिंका ह्यापेक्षा वेगळी नाही. 'म्युनिसिपालटीचा नळ, नेहमीसारखाच कोरडा ठणठणीत होता' या प्रतिमेतून माणसामाणसातील भेद किती खालच्या पातळीवर माणूस घेऊन गेलेला आहे, हे सिद्ध होतेच पण निसर्गही कसा भेदभाव पाळतो, हेच दर्शविण्याची सूचकता या कवितेत स्पष्ट झालेली आहे. " दुपारी मला उन्हाळा भेटला ", तारूण्य-सुलभ स्त्रीमनाचा कोंडमारा, परिस्थितीचे दडपण आणि सामाजिकता अचूकपणे या प्रतिमेतून व्यक्त होते.

> " संध्याकाळी मला पावसाळा भेटला
> त्याला तर मी गच्च मिठीच मारली
> म्हटलं मनात रात्र सारी पावसात भिजली
> माझ्या अंगणातील चिमण्यांना कसं म्हणावं

येरे येरे पावसा...
....श्रावणमासी हर्ष मानसी."

दरिद्र्यात खितपत पडलेल्यांच्या दुःखाला सीमा नाहीत. रात्रीपासून संध्याकाळपर्यंत, डोक्यावर वाहून नेणाऱ्या दुःखाला विरंगुळा देण्यासाठी पावसाळा भेटताक्षणीच त्याला गच्च मिठी मारण्याचा एवढाच काय तो सुखद प्रसंग भोगण्यास मिळतो, हे मीना गजभीयेनी योजकतेने मांडलेले आहे. पावसाळून येणे, दुसऱ्यावर प्रेमाचा वर्षाव करणे, सारे प्रेम इतरांच्या झोळीत मुक्तपणे टाकून 'माणूस' या संकल्पनेला अर्थपूर्णता प्राप्त करून देण्याचे फार मोठे सामर्थ्य आमच्याही हृदयात इतरांपेक्षा काकणभर सरसच सामावलेले आहे; हेच पावसाळ्याच्या आकर्षणातून सूचित करून, आंबेडकरी प्रेरणेच्या स्त्रीमनाची प्रभावी ओळख या कवयित्रीने करून दिलेली आहे.

या कवयित्रीची 'प्रकाश विरघळला अंधारात' ही कविता अभ्यासताना वरील विधानास पुष्टी मिळते.

"दिवस निमुळता होत जातो
नंतर अंधाराच्या पोकळीत
विरघळलेली मी"
माझ्या दुंभगण्याचे कुणालाच काही नसते
त्यांच्या निष्पर्ण डहाळीवर
पालवी फुटतच नाही!
जरी ते मूळ धरून असतात
माझेच रक्त पिऊन, तरी अजगरी विळख्याने
मलाच गुंतवलय्, युगान् युगापासून
त्यांच्याच विषारी फुत्काराने
माझा दिवस रात्रीत बदलतो"

'दिवस निमुळता होत जातो' 'अंधाराच्या पोकळीत निःष्पर्ण डहाळीवर' 'अजगरी विळख्याने,' 'माझा दिवस रात्रीत बदलतो' आणि 'आणि मी सूर्याचा किरण' अशा प्रतिमांचा मुक्तपणे वापर कवयित्री करते. एका बाजूने दिवस निमुळता होत जाताना अंधाराच्या पोकळीत विरघळणारे स्रीमन जसे आहे, तसेच ते रात्रीत दिवस बदलविणारे असून सूर्याचे किरण पकडण्याचा प्रयत्न करणारेही आहे. स्त्रीच्या दुभंगण्याचे अद्यापही कुणाला काहीच कसे वाटत नाही, हे आक्रोश न करताही या कवयित्रीने सांगितले आहे; आणि 'सूर्याचे किरण' पकडण्याचा निर्धार केलेला आहे.

**कुन्दा गायकवाड :**

विदर्भातील–अकोल्याची ही कवयित्री. ‘ सूर्य माझ्या डोळाभर होण्याआधी ’ ( सिंहगर्जना, दिवाळी अंक १९८० मधील ) आणि ‘ पेटत्या मशालीला साक्ष ठेवून ’ ( अस्मितादर्श, ऑ./नो./डि. १९८० मध्ये प्रकाशित झालेली ) ह्या कविता अभ्यासण्यासाठी घेतलेल्या आहेत. या कवयित्रीची झेप व आवाका नुसता मोठा नाही तर त्यात भारदस्तपणाही आहे. वाचकांना सुखद धक्के देण्याचे चुंबकीय आकर्षणही या कवयित्रीच्या कवितात आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरापासून प्रेरणा घेतलेल्यांना कोणते परिवर्तन अपेक्षित आहे. ह्याचा शोध कुन्दा गायकवाड आपल्या कवितामधून घेत आहेत.

“ यायचे असेल तुला तर
ह्याक्षणी येऊन जा
उजाळण्यापूर्वीच्या धूसर प्रकाशात
कदाचित् तुला माझ्या
घराची वाट सापडेल ”

( सूर्य माझ्या डोळाभर होण्या आधी )

स्वतःच्या मनोबलाचे यथार्थ आणि अचूक असे वर्णन वरील ओळीतून स्पष्टपणे होते.

“ रस्त्यावरची ही वळणं बघतेस ना –
संध्याकाळच्या सावल्या –
अमीट वेदनांनी लावलेल्या असाव्यात
तशीच ही लांबणार आहेत
माझ्या पावलांची सोबत घेऊन
थांबवू नकोस तेव्हा
सप्तपदीची वचने देऊन.... ”

जीवनातील विविध प्रसंगांना तोंड देताना होणारी तगमग प्रगट केलेली आहे. एका बाजूने जीवनातील अत्युच्च आनंद भोगण्याची उर्मी आहे, आनंद उपभोगण्याच्या क्षणालाही न थांबण्याचे आव्हान आहे, तर ‘ सप्तपदी ’ हा शब्द विशिष्ट समाजरचनेची आणि व्यवस्थेची पारंपारिक मूल्ये जतन करणारा आणि समाजव्यवस्था बळकट करण्यासाठी वाहकाची भूमिका बिनतक्रार पार पाडणारा आहे, ह्याचे भानही या कवयित्रीस आहे.

“ आक्रोशाची अंधार गाणी
नसानसातून फुलते माझ्या विद्रोहाचे पाणी
संदर्भ माझ्या आभाळाचे
भडकणार आहेत मशाली होऊन
रंगवू नकोस तेव्हा
स्वप्ने निळी चांदण्याचे कुंकू लावून ”

नित्यनेमाने आजूबाजूला घडणाऱ्या बारीक-सारीक घटना आक्रोशाला जन्म देतात, सहज कळत न कळतपणे या आक्रोशातून अंधार गाणी गायली जातात. त्यामुळे विद्रोह नसानसातून फुलून उठतो आणि त्याला अपरिहार्यता हेच कारण असते. सामाजिक स्वास्थ चांगले असण्यासाठी सुहृदयी आणि सुजाण मनाची आवश्यकता आहे. आज तसे मन तरुणाच्या ठायी वसत आहे आणि हे केवळ आंबेडकरी प्रेरणा स्वीकारामुळे घडत आहे. ‘ माणूस ’ म्हणून जगण्याची ईर्षा आणि या ईर्षेतून आकारास येणारी शोधकवृत्ती, डॉ. आंबेडकरांच्या शिकवणुकीतून आत्मसात केली जात आहे. ‘ पेटत्या मशालीला साक्ष ठेवून ’ या कवितेत

“ माणूस म्हणून जगण्याचे अर्थ
मी शोधत होतो
तेंव्हा तूच तर रूजविलेस
पानगळीचे संस्कार –
कित्येक युग मी शिशिराला
एकलव्य होऊन अंगठ्याचे
दान देतच गेलो
थेंबभर माणुसकीसाठी
शब्द गहाण ठेवीत आलो. ”

दोन वेगवेगळ्या सांस्कृतिक जाणिवांची गुंफण नेटकेपणाने व्यक्त केल्याने आशय समृद्धीची जाण जपलेली आहे. सांस्कृतिक मूल्यांना नीट समजावून घेताना दोन संस्कृतीमधील फरक प्रभावीपणे व्यक्त केलेला आहे. माणूस म्हणून जगण्याचे अर्थ शोधतांनाच ‘ पानगळीचे संस्कार ’ खोलवर रुजलेले असल्याने ‘ थेंबभर माणूसकीसाठी ’ शब्दच गहाण ठेवावे लागतात. किंवा एकलव्याच्या अंगठ्याचे दान द्यावे लागते हे कुन्दा गायकवाडनी प्रभावीपणे हेरलेले आहे. म्हणून ती अशा माणूसकीहीन संस्कृतीला आव्हान देण्याचा मनोदय जाहीर करते –

“ अस्मितेच्या उनझळा पांघरून
केंव्हातरी ग्रीष्मही फुलेल

याची जाणीव तूला
असायला हवी होती
अरे ! गाफील क्षणावर मात करण्याने
वाझोंटा इतिहास घडतो
रूढ संकल्पनांच्या तिरड्यावरून
वाहिलेलं तुझ अचेत तत्वज्ञान
काफिले अंधारगर्भाचे फुलवित गेले
अंधाराच्या साम्राज्यातील माझं अस्तित्व ”

माणूसहीन जीवन जगण्यास भाग पाडणारी संस्कृती किंवा त्या संस्कृति रक्षकांना, ‘ माणूस ’ म्हणून जगू इच्छिणाऱ्यांकडून अस्मिता जागृत झाल्यावर आणि आस्मितेने पेटलेल्या समूहमनाकडून विरोध होईल, याची जाणीव असावयास पाहिजे होती. हे सांगण्याचे भान सयंत, विवेकी आणि योग्य त्या शब्दातून कवयित्रीने व्यक्त केले आहे. एखादे तत्वज्ञान नाकारतानाच, ते का नाकारले आहे, ह्याचा आत्मशोध या कवयित्रीने घेतल्याने तिच्या अस्तित्वाचे खरेखुरे महत्व तिला कळले आहे.

क्रान्तीचे महत्व या कवयित्रीला उमजलेले आहे. ही क्रान्ती कोणत्या स्वरूपाची आहे ! असा प्रश्न निर्माण होतो. ही क्रान्ती आहे रक्तहीन ! हीच क्रान्ती कवयित्रीला आत्मबळ प्राप्त करून देणारी आहे. तेवढ्याचसाठी तिने नकारात्मक पवित्रा घेतलेला आहे. या नकारामागे बुद्धविचार प्रेरणात्मक म्हणून स्वीकारलेला असून ही कवयित्री मनूप्रेरीत तत्वज्ञानाचे युगायुगाचे देणे चुकते करण्यास कटिबद्ध झालेली आहे. आजवर झालेल्या संस्कारावर ‘ निखारे ’ ठेवून बौद्ध संस्कृतीनुसार संस्कारांना तिला आत्मसात करावयाचे आहे. तसा तिने संकल्प सोडलेला आहे. प्रवर्तक जाणिवांच्या संदर्भात ही जाणीव अतिशय महत्वपूर्ण मानावी लागते.

मोजक्या परंतु प्रत्ययकारी शब्दातून कुन्दा गायकवाडने समाजमन व्यक्त केले आहे. ‘ पानगळ, ’ ‘ शिशिर ’ ‘ उनझळा, ’ ‘ ग्रीष्म, ’ ‘ गहाण, ’ ‘ गाफील, ’ ‘ अंधार, ‘ तिरडी, ’ ‘ निखारे, ’ ‘ नकार ’ आणि ‘ मशाली ’ या शब्दांतून सामाजिक बांधिलकी सिध्द झालेली आहे. ‘ शब्दगहाण ’ ‘ अंधारगर्भ ’ ‘ संकल्पनाच्या तिरड्यावरून ’ ‘ उनझळा पांघरून ’ ‘ थेंबभर माणूसकीसाठी ’ इ. भावपूर्ण प्रतिमा वापरून आपल्या सामर्थ्याची जाणीव या कवयित्रीने करून दिलेली आहे. ‘ एकलव्य ’ हे भारतीय समाजमनाचे प्रतीक योग्यप्रकारे योजून त्यातून दोन भिन्नभिन्न सांस्कृतिकतेची अर्थपूर्ण अशी ओळख प्रभावीपणे करून दिली आहे. शिवाय या कवयित्रीने प्राक्कथांचा केलेला वापर अतिशय अर्थगर्भ आहे आणि हेच तिचे खरेखुरे यश आहे.

**गिपल गिमेकर :**

मराठवाड्यातील एक समर्थ नवोदित कवयित्री म्हणून गिपल गिमेकरांचा उल्लेख करावा लागतो. ‘ कापसाची नखी ’, ‘ आवळा आणि बोर ’ आणि ‘ चीवराचे गमक ’ ह्या त्यांच्या तीन कवितांचा विचार करताना लक्षात येते, की साध्या, सोप्या आणि परिचित अशा प्रतिकातून फार मोठा आशय व्यक्त करण्याची क्षमता या कवयित्रीपाशी आहे. भारतीय समाज जीवनात ‘ स्त्री ’ आणि ‘ शूद्र ’ यांच्या वाट्यास उपेक्षा, अपमान, अवहेलना, दुःख, कष्ट आणि संकटे इतकी अपरिमित आलेली आहेत, की स्त्री ही ‘ दासी ’ आणि शूद्र ‘ दास ’ ठरविली गेलेत. अशा पार्श्वभूमीवर दलित स्त्रीचा विचार केला तर तिच्यावर अन्यायांची, अत्याचारांची मोजदाद करता करता माणसामधील संवेदना शक्तीच नष्ट होऊन जाते.

‘कापसाची नखी ’ ही कविता तशी रूपकात्मक. आशयधन प्रतिमांतून स्त्रीत्वाच्या दोन बाजू समर्थपणे आविष्कृत झाल्या आहेत. ‘ बोंड ’, ‘ कापूस ’ या शब्दांतून स्त्रीचे तारुण्य, मांगल्य आणि हृदयाचे मोठेपण ह्याची जाणीव होते. स्त्रीच्या मनाचा उबदारपणा, हळूवारपणा याचा प्रत्यय येतो तसाच स्त्रीमनातून शीलसंपन्नतेचाही येतो, ही झाली एक बाजू. तर दुसरी बाजू: सातत्याने अन्याय, अत्याचार सहन करणारे स्त्रीमन अन्यायी वृत्तीवर तुटून पडण्याच्या पावित्र्यात आहे. कोमल हृदय कठोर करण्यास ती सिद्ध झाली आहे. आणि म्हणूनच ‘कापसाची नखी’ कशी जहरी असते ह्याची जाणीव करून देतानाही बजावते.

तू बोंडाला हात लावलास.... !
तू कापसालाही हात लावलास.... !!
पण .... आता मात्र
हात घातलास
तर कापसाची नखी
नांगी मारल्याशिवाय रहायची नाही.

अन्याय, अत्याचार सहन करणाऱ्यांनाही किमान नैसर्गिक मर्यादा असतात, ह्याची अत्याचार करणाऱ्यांना जाणीवच नसते. अशांना वेदनांचे मोल कळावे म्हणून झपाटलेले जागृत स्त्री मन कोणता प्रत्यय आणून देते, ह्याची साक्ष ‘ नांगी मारण्याची कल्पना ’ करून देते. स्त्रीत्वाच्या जहरीत्वाची अचूकपणे आणि परिणामकारकरित्या गिमेकरानी ओळख करुन दिलेली आहे. स्त्रीत्वाच्या दुबळेपणाबरोबर तिच्या करारीपणाचाही आत्मप्रत्यय या कवितेतून व्यक्त झाला आहे. प्रतिकारार्थ झालेल्या स्त्रीमनाचे स्पंदन प्रभावीपणे जसे जाणवते, तशीच भावविवशताही प्रकटते.

'आवळा आणि बोर' (तक्षक : मार्च/एप्रिल १९८०) ही कविता आशयसमृद्धी सिध्द करणारी कविता आहे. 'आवळा' आणि 'बोर' यांचा लपंडाव चाललेला आहे. बोर आवळ्याला झुकांड्या देत आहे. परंतु वाराही तिचा छळ मांडण्यात मश्गुल झाला असून त्याचा फायदा आवळाच घेत आहे. या झुंजीत बोर मात्र गलितगात्र झाली आहे आणि गिपल गिमेकरच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे 'जे व्हायचे तेच झाले' आहे.

"परंतु अखेरला मात्र
आवळयाच्या ओठा–पोटावर
काऱ्याच्या खाणाखुणा उमटल्या
मग -
सारीच पाने पानापानातून ओरडली
नैसर्गिक बलात्कार....
नैसर्गिक बलात्कार ... "

ही कविताही रूपकात्मकच आहे. कापसाची 'नखी' जशी स्त्रीचा तिखटपणा, जहरीवृत्ती दाखवून जाते तशीच वृत्ती बोरीचा काटा दाखवितो. प्रतिस्पर्ध्यास घायाळ करण्यासाठी, नामोहरण करण्यासाठी आणि आपल्या शीलाचे रक्षण करताना, अब्रू सांभाळताना साह्यभूत होणारी तेजस्वीता, प्रतिकार करण्याची क्षमता आणि प्राप्त होणारे आत्मबळ 'काटा' या प्रतिमेतून व्यक्त होते.

स्त्रियांवरील अन्याय, अत्याचाराला वाचा फोडताना सामाजिकता आणि काव्यात्मकता एकाचवेळी यशस्वीपणे हाताळतानाही कवयित्री वस्तुनिष्ठता आणि आत्मनिष्ठता प्रकट करते. आशयगर्भ शब्दांची गुंफण, प्रतिकांचा योग्य वापर आणि प्रतिमांना यथोचित दिलेले स्थान गिमेकरांची ताकद स्पष्ट करून जातात. 'चीवराचे गमक' (तक्षक, जा./फे. १९८०) ही या कवयित्रीची आणखी एक कविता.

"आत कुपातलं
पिवळं पिकलेलं
कारलं
कडू कडू म्हणता
अव्हेरलं
साऱ्या जगानं
बुद्धतत्वज्ञानासारखं
परंतु –
रामाच्या रामफळाला
सीतेच्या सीताफळाला

एवढंच नाही –
पिवळ्या पिवळ्या
कडू कारल्यालाही
काय माहित !
आपण चीवराचे
गमक आहोत ते ”

‘चीवराचे गमक’ या कवितेची मांडणी, तिचा घाट आणि शब्दसौंदर्यातून अप्रतिम अशा आशयाचा जन्म होतो. ‘चीवराचे गमक’ ही कविता दोन वेगवेगळ्या विचारप्रणालींचा एकाचवेळी विश्लेषणात्मक विचार करणारी परंतु त्यापैकी बुद्ध विचारावर ठाम श्रद्धा, निर्धार आणि निश्चय ठेवणारी. चीवराचे गमक कशाकशात आहे एवढा माफक विचार करूनच ती थांबत नाही तर जगण्याचे गमक, सत्यता आणि वास्तवताही नेमकेपणातून शोधण्याचा ध्यास घेत आहे. हा आत्मशोध इतरांनाही उपयुक्त, मार्गदर्शक आणि बोधप्रद ठरणारा आहे.

सत्य नेहमीच वस्तुनिष्ठेवर आधारलेले असले तरी ते कडवट असते आणि म्हणून ते स्वीकारणे मानवी प्रवृत्तीला जाचक ठरते. “पिवळं पिकलेलं आणि तेही आतकुपातलं कारलं” शोधण्याचे कर्तव्य मनुष्य जिज्ञासेपोटी पार पाडतो. कडू कारल्यापाशी आपला स्वतःचा वैशिष्ट्यपूर्ण असा स्वभावधर्म आहे. त्यात रसनिष्पती आहे. नको नको म्हणतानाच त्याची गोडी चाखणारे काही कमी नाहीत, हे गिमेकरांच्या स्त्रीसुलभ मनाने प्रभावीपणे हेरलेले आहे. या कवयित्रीने कडू कारल्याच्या स्वभाववैशिष्ट्यांशी पुन्हा बुद्ध तत्वज्ञानाची सांगड घातलेली आहे. बुद्धतत्वज्ञानाला वरकरणी कडू कारल्याची उपमा देऊन बुद्धविचाराचे प्रभावी विवेचन केले आहे. कवितेचा प्रकृतिपिंड हा विचारप्रधान झालेला असून त्यातच निरनिराळ्या कल्पना विस्तारलेल्या आहेत. वेगवेगळ्या रंगछटाही त्यातून व्यक्त होतात. माणसाच्या जीवन जगण्यातही काही अर्थपूर्णता आहे. हा अंतिम हेतू या वैचारिकतेत समाविष्ट झालेला आहे. यामुळेच अर्थपूर्णतेला वेगळा आकार प्राप्त होतो. कडू वाटणाऱ्या परंतु जीवन सुखी आणि समृध्द करणाऱ्या बुद्धविचाराचाच ध्यास घेणे आवश्यक आहे, हे जाणण्याचे व जाणवून देण्याचे गिमकरांचे उद्दिष्ट आहे.

‘चीवराचे गमक’ या कवितेचा उत्तरार्ध मात्र वाचकास अंतर्मुख करणारा आहे. रामफळ–सीताफळाची चव न चाखलेला विरळा. अवीट गोडी वाटावी अशी महती रामफळाची–सीताफळाची. नेमके याचठिकाणी या कवयित्रीने वाचकांना अंतर्मुख करून चिंतन करण्यास प्रवृत्त केले असून हे चिंतन थेट आदिमयुगापासूनच करावे लागते. याठिकाणी गिमेकरांच्या सामर्थ्याची स्पष्ट जाणीव होते. रामफळ,

सीताफळ आणि कडू कारलं या परस्परविरोधी गुणधर्म दाखविणाऱ्यां प्रतिमांचे गमक कशात आहे. ? हे सांगण्याचे भान या कवितेत जपलेले आहे. नव्या दमाची ही आंबेडकरीप्रेरणेची कवयित्री आपल्या सामर्थ्याची जणीव करून देतानांच प्रवर्तक कवितेची वाटचाल सुकर, सोपी आणि दमदार करण्यात गुंतलेली आहे.

**सुरेखा भगत :**

'आजपासूनच' ('सिंहगर्जना' दिवाळी अंक १९८०) ही सुरेखा भगत यांची कविता.

> " तर त्याला वाचून खूप दुःख झालं
> बीच्चारे ! लोक किती दुःखी आहेत
> श्रीमंत मजले चढविण्यात मश्गुल आहेत
> गरीब पाय घासण्यात व पोटाच्या प्रश्नांत मश्गूल आहेत "

सामान्य माणसाच्या जीवनातील भीषण कारुण्य नेमकेपणाने या कवयित्रीने हेरलेले असून श्रीमंतीच्या पाऊलखुणाही तिने तपासलेल्या आहेत. एका अर्थाने वास्तवता आणि जीवनातील भीषण नाट्यमयता मोठ्या तन्मयतेने पकडण्याचा प्रयत्न याठिकाणी झालला दिसून येतो. हा सूर दुःखकारण शोधार्थ प्रकटला आहे. या दुःखाला ऐतिहासिक मूल्य प्राप्त झालेले असल्यामुळे या कवयित्रीने तेवढ्यासाठी आपली भूमिका पक्की केलेली आहे. अंतर्मनातील घालमेल ती समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहे.

> " पण त्यात एक माणूस होता—तो म्हणाला
> दुःख होतय तर त्याचं निरसन केलंच पाहिजे
> गौतमबुध्दाने दुःखावर उपाय सांगितला आहे
> ते लोक दुःखी आहेत म्हणून रडत बसले नाहीत "

दुःख ही न संपणारी प्रक्रिया आहे आणि ते निवारण करण्यासाठी न थांबण्याचा मनोदय तिने व्यक्त केला आहे. या कवयित्रीची प्रेरणास्थाने भक्कम असल्याने तिचा आत्मविश्वास बळावलेला आहे.

> " फूले अस्पृश्यांचं दुःख पाहून कळवळले
> महारांना पाणी भरता येत नाही म्हणून पाहात बसले नाहीत. "

महात्मा फुल्यांनी दलितोद्धारासाठी केलेल्या कार्याचे महत्व ओळखून त्याप्रमाणे वाटचाल करताना दलितोध्दारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोणते उद्‌गार काढले होते ते शब्दबद्ध करतांना कवयित्री भावनाविवश झालेली आहे.

" दलितांचा उद्धार माझ्याच्यानी झाला नाही तर
बंदुकीची गोळी घालून मी प्राणार्पण करीन "

ही आठवण करून देण्याचे प्रयोजन तरी कोणते ? महात्मा बुद्ध, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वारसा पोटतिडीकीने सांगणाऱ्याबद्दलच या कवयित्रीने काही शंका व्यक्त केलेल्या आहेत म्हणूनच ती म्हणते :

माणूस........ पूढे म्हणाला
आणि आता फक्त तुम्ही एकच करता
दुसऱ्याच्या दुःखानी दुःखी होता
मग स्वतः काय करता ?

मानवाच्या परवशतेचे चित्रण विद्रोही कवितेने मागील दशकांत केले परंतु हे करीत असताना विद्रोही कविता विचारचक्रात गुरफटली. म्हणूनच दुसऱ्याच्या दुःखानी दुःखी होणाऱ्यांना किंवा तसा आभास निर्माण करणाऱ्यांना सुरेखा भगत यांनी विचारलेला प्रश्न मर्मभेदी आहे. तेवढ्यावरच ती थांबली नाही तर पुढील प्रश्नांचे तिला वेध लागले आहेत.

असं जर प्रत्येकजण म्हणत आला तर....
उद्धाराचं काम कोण करील ?
कोणाचे आसू कोण पुशील ?
तेव्हा तुमच्यापासूनच सुरवात करा ना
असं समजायचं
माझ्या बापाचं ऋण फेडण्यात मी थोडातरी समर्थ आहे.
थोडा तनाने, थोडा मनाने, थोडा धनाने....
असं प्रत्येकानेच केलं तर...
( संघं सरणं गच्छामि प्रत्येकाला समजेल )

जागतिक पातळीवरून दलित जाणिवा व्यक्त करू इच्छिणाऱ्यांनी, मार्क्स आता सुरू व्हायला हवं असा आक्रोश करणाऱ्यांनी; थोडा तनाने, मनाने आणि धनाने त्याग सोसला, कल्पनांच्या भराऱ्या जरा कमी मारल्या तर कोणते दृश्य दिसेल, ह्याचे चित्रण फार चांगले या कवयित्रीने उभे केले आहे. सुरेखा भगतच्या कवितेतून अस्तित्ववाद डोकावतो परंतु त्यास कार्यकारणभाव असून अतिशय संथ, संयमी आणि विवेकी सूरातून तो व्यक्त होतो. निराशवादापेक्षा आशावादाकडे ही कविता झुकलेली असून विचारांचे बळ सिध्द करून जाते. दुसऱ्याला निरर्थक बोध करण्यापेक्षा स्वःतच्या आत्मपरिक्षणातून काही जाणिवांना महत्वपूर्ण स्थान देऊन ही कविता पुढे सरकते. वाचकाला खिळवून ठेवण्याची प्रचंड ताकद या कवितेत निश्चितच

आहे. कोण काय करणार आहे, किंवा कुणी काय केले पाहिजे. असल्या क्रान्तीच्या पोकळ गप्पा मारण्यापेक्षा मी काय केले पाहिजे, ह्याचे भान ठेवणे आवश्यक आहे; हे सांगताना या कवयित्रीने आत्मनिरिक्षण केले आहे.

आपुलकीची भावना निर्माण होऊन
धम्माची भावना वाढीस लागेल
व उद्या आपण म्हणायला लागू...
बुद्धं सरणं गच्छामि !
त्याला पटलं तो म्हणाला....बर
बरोबर आहे.
तर मग, आज व आताच सुरवात करू या नां ! कां ?

संघभावनेमुळे धम्मभावना वाढीस लागणारच व त्यातून ' माणूस ' ही संकल्पना साकार होणार आहे, एवढा आत्मविश्वास या कवयित्रीस आहे. सुबोध वळणाची ही कविता आज आणि आतापासूनच कार्यसिद्धीस निघाली आहे. हे दृश्यच आल्हाद-दायक आणि उत्साहवर्धक आहे. एवढा प्रचंड आत्मविश्वास व्यक्त करणाऱ्यांच्याच सामर्थ्यावर प्रवर्तक कवितेची वाटचाल यशस्वी ठरणार आहे.

**समारोप :**

आंबेडकरी प्रेरणेच्या प्रवर्तक कवितेची वाटचाल कोणकोणत्या अंगाने होत आहे, हे आपण पाहिले. परंतु या कवितेला अनेक बाबींचे भानही राखणे अत्यावश्यक ठरते. ज्या संस्कृतीला चातुर्वर्ण्यव्यवस्था, जातीयता आणि भेदाभेद महत्वाचा वाटतो, ती संस्कृती डॉ. बाबासाहेबांनी त्यागून केवळ बौध्द संस्कृतीची नव्याने पुनर्रचना केली नसून बहुसंख्यांक समाजालाही बुध्दविचाराबद्दल जिव्हाळा, आत्मियता आणि आदर असल्यामुळे बहुसंख्यांक समाजही कालांतराने बौध्द संस्कृती आत्मसात करण्यास अनुकूल होईल, असा आत्मविश्वास व्यक्त करून 'सारा भारत बौध्दमय' करण्याची दूरदृष्टी ठेवलेली होती. भारतीय समाजमनावर बुध्दतत्वज्ञानाची असलेली पकड आपल्या कल्पकतेने हेरलेली होती. अर्थात धम्मचक्रप्रवर्तनानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे फारच थोड्या अवधित निधन झाल्याने त्यांचे स्वप्न अपुरे राहिले. आंबेडकरी प्रेरणेच्या प्रवर्तक कवितेला ह्याची तीव्र जाणीव होत आहे. ही शुभसूचक घटना मानावी लागते. परंतु टीकाकार आंबेडकरी प्रेरणेच्या विद्रोही कवितेची प्रकृती आणि आकृती ज्या कसोट्यांच्या आधारे तपासतात त्यावरून असे अनुमान काढतात, की आंबेडकरी प्रेरणेच्या साहित्याचा प्रवाह आज ना उद्या मूळ साहित्यात समाविष्ट होईल. विद्रोही कवितेला समाजाची सर्वंकष अशी पुनर्रचना अभिप्रेत नाही असाही सूर जाणकार व्यक्त करतात. यामुळे प्रवर्तक कवितेने सावधपणे पाऊल टाकून सर्वंकष समाजाच्या भरभराटीच्या प्रक्रियेत सामील झाल्याशिवाय पर्याय नाही.

विद्रोही कवितेच्या प्रकृतीवरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारलेल्या बौध्दधम्म निष्ठांचा दलित समाजाला प्रत्यक्ष फायदा कितपत होईल, ह्याबद्दल काहींनी शंका व्यक्त केलेल्या आहेत. विद्रोही कवितेचे रूपच वादग्रस्त असल्याने तिच्या धम्मनिष्ठांबाबत तौलनिक अभ्यास करणे अवघड काम आहे. परंतु आंबेडकरी प्रेरणेच्या प्रवर्तक कवितेने बौध्दधम्मनिष्ठा स्वीकारलेल्या आहेत. परिणामी या कवितेला धम्मनिष्ठेचा निश्चित फायदा होणार आहे. प्रवर्तक आणि विद्रोही कवीच्या अनुभवात आणि भावविश्वात नाही म्हटले तरी बराच फरक आहे. बौध्दधम्म स्वीकारण्याआधीच्या दलित जीवनातील भीषण शोकांतिकेस, दारिद्र्यास, अन्यायास, अमानुषतेस आणि नाट्यास विद्रोही कवितेने अतिशय महत्वाचे स्थान दिलेले आहे. इतके भयावह जीवन जगण्याचे दुर्भाग्य ज्या कवींच्या वाट्यास आलेले आहे किंवा अद्यापही येत आहे त्यांनी ह्या जीवनातील अनुभवांना महत्वपूर्ण मानणे स्वाभाविक आहे. प्रवर्तक जाणिवांच्या कवीनी इतका प्रखर आणि कडवट अनुभव अपवादात्मकच व्यक्त केला आहे. बौध्दधम्मामुळे जे परिवर्तन घडलेले आहे,

त्याचा विलक्षण प्रभाव अशा कवींवर स्पष्ट दिसतो. बौध्दधम्म स्वीकारल्यामुळे स्वतःच्या संस्कृतीचा, दैनंदिन जीवनातील आचार-विचार, श्रध्दा, संकेत आणि जीवनमूल्यांचा प्रवर्तक कवितेने व्यास घेतलेला आहे. त्याचे कारण असे, की बौध्द संस्कृती नव्याने रुजत असताना पंचवीस वर्षांचा कालावधी उलटलेला आहे. १९५६ साली जन्मलेली पिढी बरोबर पंचवीस वर्षे वयाची झालेली आहे. 'जन्मापासूनच या पिढीच्या वाट्यास 'बौध्द' ही आयडेंटिटी आलेली आहे. त्यामुळे या पिढीसमोर सांस्कृतिक वारसा देण्याचे उत्तरदायित्व आहे. पुढील पिढ्यांना बौध्दसंस्कृती, बौद्धधम्म, आणि बौध्द जीवनपध्दतीनुसार बौध्द, दलित व मागासलेल्या समाजात चैतन्य निर्माण करून ऐक्य करणे आणि बहुसंख्यांक समाजाबरोबर सलोखा निर्माण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला विचार गतिमान करावा लागणार आहे. खऱ्या अर्थाने हे आव्हानच आहे. आजच्या तरुण पिढीच्या कसोटीचा हा क्षण आहे.

काव्य जाणिवांच्या संदर्भात प्रवर्तक कवितेला नव्याने विचार करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. 'दलित' जाणिवा व्यापक करण्याचा मागील दशकात प्रभावीपणे प्रयत्न करण्यात आला. आता 'प्रवर्तक' कवितेला 'दलित' हा शब्द व्यापक करणे अवघड जाणार आहे. उपेक्षित समाजाबद्दलच्या जाणिवा बुध्दविचारानुसार व्यापक पातळीवरून व्यक्त करण्यासाठी आंबेडकरी प्रेरणेच्या प्रवर्तक कवितेला या दृष्टिने बऱ्याच प्रमाणात यश प्राप्त करावयाचे आहे. आपल्या कवितेचे खरेखुरे प्रयोजन कोणते ? हे आंबेडकरी प्रेरणेच्या प्रवर्तक कवींनी ओळखले आहे. ज्यांच्यावर अन्याय होतो ते आणि जे अन्याय करण्यास कारणीभूत ठरतात असे घटक 'दलित' म्हणून एकत्रितपणे दलितोद्धारासाठी झटतानाचे विचित्र दृश्य विद्रोही कवितेने अनुभवले आहे. आणि हे प्रवर्तक कवितेला उद्‌बोधक ठरलेले आहे. आपली वाट अधिक चोखंदळ करण्यासाठी व जाणिवा व्यापक करण्यासाठी बुध्दविचाराचा मार्ग पत्करणेच या कवितेने अंतिम उद्दिष्ट मानल्यामुळे 'दलित' आयडेंटिटी कालांतराने लुप्त होणार आहे. त्याचे कारण असे, की आपल्या काव्यास दलित काव्य म्हटले जाऊ नये असे आंबेडकरी प्रेरणेचा प्रवर्तक जाणिवांचा तरुणवर्गच अलिकडे म्हणू लागलेला आहे.

सर्वंकष आंबेडकरविचार व्यक्त करताना प्रामाणिकता हाच घटक महत्वपूर्ण ठरु शकतो. मागील दशकात आंबेडकरवाद-मार्क्सवाद हातात हात घालून दलितोध्दार करण्याचा प्रयत्न झाला. त्याचप्रमाणे दलितोध्दारासाठी ज्यांचे ज्यांचे सहकार्य घेणे उचित होते ते घेऊनही अन्याय, अत्याचार आणि छळ करणाऱ्या प्रवृत्तीविरोधी झगडताना दलितसमाज एकाकी पडल्याचे भयावह दृश्य काहीनी निदर्शनास आणलेले आहे. मार्क्सवादाने प्रभावित झालेला कामगारवर्ग किंवा पुरोगामी विचा-

राने भारावलेला सुशिक्षित वर्गही बौद्ध, दलित, मागासवर्गीय आणि आदिवासी समाजाच्या बाजूने फारसे आशादायक चित्र निर्माण करू शकलेला नाही. ह्याचाही प्रवर्तक जागिवेच्या कवितेला विचार करावयाचा आहे. परावलंबित्व आणि दलितत्त्व एकाचवेळी झुगारून दिल्याशिवाय आंबेडकरविचार प्रभावीपणे व्यक्त करणे प्रवर्तक कवितेला शक्य होणार नाही ह्याची योग्यवेळी काही कवींना जाणीव आलेली दिसून येते. इतरांना दिलासा देणारी, प्रामुख्याने हरवलेले माणूसपण शोधणाऱ्यांना मार्गदर्शक ठरणारी प्रवर्तक वाटचाल गतिमान करणे प्रवर्तक कवींच्या निष्ठांवरच अवलंबून आहे. ज्यांना माणसाचे माणूसपण समजलेले आहे, उपेक्षित, रंजलेल्या, गांजलेल्या भरडलेल्या समाजजीवनात बदल घडवून आणावयाचा आहे, ते क्रियाशील राहून सहकार्याचा सतत हात देत राहणारच! परंतु या सहकार्याचा हेतू आंबेडकरवाद पर्यायाने बुध्दविचारच संपविण्याचा असेल तर असे सहकार्य प्रवर्तक कवितेला परवडण्यासारखे आहे किंवा नाही, हेही या कवितेला ओळखावे लागेल; हे विद्रोही कवितेच्या आकृतीवरून, प्रकृतीवरून आणि अनुभवावरून सिद्ध झालेले आहेच. जेव्हा कोणतीही विचारसरणी एका विशिष्ट गतीने, दिशेने आणि ठरविलेल्या विचारानुसार मार्गक्रमण करीत नाही, दुसऱ्या कोणत्यातरी विचाराशी संगनमत करते तेव्हा त्या दोन्ही विचारसरणी अपूर्णत्व सिध्द करतात; परिणामी तत्कालिन समाजजीवनावर त्याचा अनिष्ट परिणाम होतो. ह्याचे भान प्रवर्तक कवितेला ठेवावे लागणार आहे.

**संदर्भग्रंथ :**

केशवसुत आणि तांबे : प्रा. श्री. के. क्षीरसागर
श्री चोखामेळा महाराजांची पंढरपुरावर स्वारी : हरीभाऊ तोरणे
दलितोद्धारक गुरुवर्य बनसोड : ना. रा. शेंडे
दलित कविता : म. सु. पाटील
दलित साहित्य का नको? : विजय सोनवणे
दलित साहित्य—एक अभ्यास : अर्जुन डांगळे
दलित साहित्याची प्रकाशयात्रा : भालचंद्र फडके
पराभवांची रहस्ये : मुरलीधर मनोहर जावडेकर
मराठी कविता : जुनी आणि नवी : वा. ल. कुळकर्णी
मार्क्सवादी साहित्य विचार : केशव शिरवाडकर
समाज आणि साहित्य : अविनाश सहस्त्रबुध्दे
साहित्य आणि सामाजिक संदर्भ : प्रा. रा. ग. जाधव

**काव्यसंग्रह :**

उत्थानगुंफा : यशवंत मनोहर
गावकुसाबाहेरील कविता : वामन निंबाळकर
गोलपीठा : नामदेव ढसाळ
छावणी हालते आहे : अर्जुन डांगळे
निषेध : बळवंत कांबळे
प्रवर्तक : गौतम शिंदे
प्रदिप : संपादक : शामराव बनसोड
बस्तान : अशोक पाटील
मधुवंती : ना. रा. पगारे
मुर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले : नामदेव ढसाळ
रक्तखुणा : बाळ हाटे
विशाखा : वि. वा. शिरवाडकर
होरपळ : भीमसेन देठे
हू विल डायग्नोझ इट : हरीश बनसोडे

**नियतकालिके :**

अस्मितादर्श
गुंफा
तक्षक
सुगावा
संवाद
सिंहगर्जना

**साप्ताहिके :**

बहुमत
राजधानी

**वर्तमानपत्रे :**

रविवार : मुंबई सकाळ

ग्रंथालय ठाणे
३००१
निबंध २४०४८
११।११।८३
शाखा

REFBK-0024047

## आंबेडकरी कवितेचे अंतरंग :

स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी साहित्यात जे जे नवे प्रवाह आले आणि फोफावले त्यातील आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य हा असाच एक महत्त्वाचा नवाप्रवाह आहे. या प्रवाहाचे मूळ अधिष्ठान आंबेडकरविचार आहे. शतकानुशतके ज्या पददलित जातीजमातीनी अन्याय, अपमान, तिरस्कार सोसला त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने नवी संजीवनी दिली. मराठी साहित्याला या वाङ्मयाने सर्वसमावेशकता, सर्वगामित्व प्राप्त करून दिले. एका नव्या जीवनविचाराबरोबर नवा कलाविचारही बहाल केला. आंबेडकरी साहित्याची समस्त मराठी साहित्याला ही फार मोठी देणगी आहे.

आंबेडकरी प्रेरणेच्या विद्रोही कवितेबाबत विचारवंतांनी अधिक खोलवर जाऊन विचार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तिची झेप व मर्यादाही लक्षात घेतलेली आहे. परंतु या कवितेचे समर्थन करणाऱ्यांनी आणि तिच्यावर टीका करणाऱ्या टीकाकारांनी आंबेडकरी प्रेरणेच्या कवितेची 'प्रवर्तक' बाजू फारशी गंभीरपणे विचारात घेतलेली दिसून येत नाही.

आंबेडकरी प्रेरणेच्या कवितेची 'प्रवर्तक' बाजू विचारात घेता असे दिसते, की ही कविता लोकशाहीमूल्यांवर विद्रोही कवितेपेक्षा अधिक अधिष्ठित आहे. आत्मचिंतन आणि स्वात्मजाणीव ह्यांचा ध्यास घेतलेली, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय या मार्गदर्शक तत्त्वांची हमी देणाऱ्या बुद्धविचारप्रणालीवर निष्ठा ठेवणारी, दीनदुबळ्या, गोरगरीब समाजाचा उद्धार आणि कायापालट याच मार्गाने झाल्याशिवाय राहणार नाही अशी अंतरी खूणगाठ बांधणारी ही कविता आहे. आंबेडकरविचार बुद्धविचार शिकवितो हे समजून घेऊन, स्वतःच्या समस्या सोडवून घेताना सुसंस्कृत समूहमन तयार करून बुद्धविचारानुसार परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केल्यास तो अधिक मूलगामी ठरू शकेल याची जाणीव ठेवणारी ही कविता आहे.

जागर प्रकाशन, १४/११२, उन्नत नगर नं. ४,
गोरेगाव (प.), मुंबई ४०००६२. मूल्य : अठरा रुपये.